८९
२

तमसो मा ज्योतिर्गमय

प्र / ८९/२
मंत्रालय

# स्वातंत्र्याविषयी

अनुवादक
व. भ. कर्णिक

# स्वातंत्र्याविषयी

# (*On Liberty*)


लेखक :

जॉन स्टुअर्ट मिल

भाषांतर :

व. भ. कर्णिक



महाराष्ट्र राज्य

साहित्य आणि संस्कृती मंडळ

१९७२

| उपस्कर | दिनांक | स्वाक्षरी |
|---|---|---|
| [illegible] | १७/११/६ | [illegible] |
| [illegible] | | |
| [illegible] | | |
| तपासले | | |



प्रकाशक :

© महाराष्ट्र राज्य

साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रक :

म. शं. साठे

दी प्राज्ञ प्रेस

वाई ( जि. सातारा )

प्रथमावृत्ती : जुलै १९७२ ( श्रावण १८९४ )

प्रिय पत्नी

**विमल**

हिच्या स्मृतीस

समर्पण

# पुरस्कार

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी पश्चिमी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे, इंग्रजी भाषेला व साहित्याला, आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे मुख्य स्थान आहे तसे स्थान महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषा यांच्यातील अभिजात व उच्च साहित्य आणि इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात व उच्च साहित्य यांतील निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश-अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर-योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफिनीस, युरिपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल्, गटे, शेक्सपीअर, टॉल्स्टॉय्, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की, बर्टांड रसेल, रुथ बेनेडिक्ट, रायशेन बारव, ए. एन्. व्हाइटहेड, क्रोचे, मालिनाव्स्की, कॅसिरेर, गार्डन व्ही. चाइल्ड् इत्यादिकांचा

या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे " नाट्यशास्त्र ", " संगीत रत्नाकर ", ध्वन्यालोक, प्राकृतातील " गाथासप्तशती " त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

या योजनेतील जॉन स्टुअर्ट मिल लिखित "On Liberty" या पुस्तकाचा श्री. व. भ. कर्णिक यांनी केलेला मराठी अनुवाद "स्वातंत्र्याविषयी" हे दहावे पुस्तक आहे. साहित्य-संस्कृती मंडळाच्या वतीने हा अनुवाद प्रकाशित करण्यास आम्हास आनंद होत आहे.

वाई
दि. १ ऑगस्ट १९७२

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष
महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळ.

# अनुक्रम


प्रस्तावना पृ. १

निवेदन पृ. ७३

स्वातंत्र्याविषयी पृ. १

अर्पणपत्रिका पृ. २

प्रकरण १ प्रास्ताविक पृ. ३

प्रकरण २ विचार आणि चर्चास्वातंत्र्य पृ. २४

प्रकरण ३ व्यक्तित्व, सुखी जीवनाची एक आवश्यकता पृ. ८५

प्रकरण ४ व्यक्तीवरील समाजाच्या सत्तेच्या मर्यादा पृ. १०७

प्रकरण ५ अनुप्रयोग पृ. १४५

# स्वातंत्र्याविषयी

## प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमधे जे अनेक प्रख्यात विचारवंत होऊन गेले त्यांच्यामधे जॉन स्टुअर्ट मिल याचे स्थान खूपच वरच्या दर्जाचे आहे. एकोणिसावे शतक हे इंग्लंडचे मोठे भाग्याचे शतक. शतकाच्या सुरवातीला नेपोलिअन बोनापार्ट याचा पराभव करून इंग्लंडने युरपमधे आपले प्रभुत्व प्रस्थापित केले आणि जगामधे अजिंक्य राष्ट्र म्हणून आपला दबदबा निर्माण केला. ज्याच्यावर सूर्य कधीही मावळत नाही असे जागतिक स्वरूपाचे साम्राज्य इंग्लंडने संपादन केले ते या शतकातच. औद्योगिक क्रांतीमुळे व तंत्रविद्येच्या विकासामुळे औद्योगिक उत्पादन अनेक पटीने वाढले होते आणि इंग्लंड ही जगाची बाजारपेठ बनली होती. उत्पादनात व व्यापारात इंग्लंडची बरोबरी करू शकेल असे कोणतेही राष्ट्र नव्हते. व्यापाराच्या निमित्ताने म्हणा किंवा लूट व खंडणी यांच्या रूपाने म्हणा, साऱ्या जगाच्या संपत्तीचा ओघ इंग्लंडच्या दिशेने वहात होता. अशा या समृद्धीच्या काळात मिलचा जन्म झाला आणि त्याचे सारे आयुष्य गेले.

उत्पादनामधे, संपत्तीमधे व लष्करी सामर्थ्यामधे सर्व जगाला मागे टाकणाऱ्या इंग्लंडमधील सामान्य जनतेची परिस्थिती मात्र अत्यंत केविलवाणी होती. कारखान्यात काम करणाऱ्या पुरुषांचे, बायकांचे व मुलांचे अनन्वित हाल होत होते. त्यांना मिळणारी मजुरी अतिशय अपुरी असे आणि त्यांना कराव्या लागणाऱ्या कामावर वेळेचे बंधन नव्हते. शतकाचा पहिला चतुर्थांश उलटून जाईपर्यंत त्यांना संघटना बनविण्याचाही अधिकार नव्हता. लोकशाही राष्ट्र म्हणून इंग्लंडची जगभर ख्याती होती; पण प्रत्यक्षात

राजसत्ता केवळ मूठभर सरंजामदारी वतनदार कुटुंबांच्या हाती होती; सामान्य जनतेला तर राहोच, पण नव्याने उदयास आलेल्या श्रीमंत कारखानदारांना देखील तिच्यामधे हिस्सा नव्हता. औद्योगिक क्रांतीमुळे नवे वर्ग व नवे वर्गसंबंध निर्माण झाले होते, परंतु अधिष्ठित समाजव्यवस्था व राजसत्ता त्यांची दखल घेण्यास तयार नव्हती. समाजातील या वेगवेगळ्या वर्गांतील संघर्षामुळे फ्रान्समधे घडून आली तशी रक्तमय क्रांती इंग्लंडमधे घडून यावयाची; परंतु विचारवंतांच्या व समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे देशामध्ये ज्या राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधारणा घडून आल्या त्यांच्यामुळे तो उत्पात टळला. इंग्लंडमधे क्रांती घडून आली, परंतु ती उत्क्रांतीच्या स्वरूपात व शांततेच्या मार्गाने.

समाजामधे मतपरिवर्तन घडवून आणून कायद्यांच्या रूपाने व समाजव्यवहार बदलून ज्यांनी या सामाजिक क्रांतीची जडणघडण केली त्या विचारवंतांच्या परिवारात मिलचा जन्म झाला, बालपण गेले आणि शिक्षण झाले. लहानपणी हे जे त्याच्या मनावर संस्कार झाले त्याचे परिणाम चिरःस्थाई स्वरूपाचे होते. जेरेमी बेंथम हा या विचारवंतांचा मुकुटमणी. त्यानेच उपयुक्ततावाद ( utilitarianism ) हा नवा विचारसंप्रदाय निर्माण केला व प्रसृत केला. तत्त्वनिष्ठ पुरोगामी ( Philosophical Radicals ) मंडळींचा तोच स्फूर्ती देणारा गुरू होता. न्यायशास्त्रावर प्रगल्भ आणि विचारप्रवर्तक असे ग्रंथ लिहून आणि त्यांना अनुकूल अशी मनोवृत्ती निर्माण करून त्याने इंग्लंडमधील कायदेकानूत व न्यायपद्धतीत आमूलाग्र क्रांती घडवून आणली. बेंथमचे मार्गदर्शन मिलला लहानपणी लाभले आणि त्याच्या विचारांचा व विचारसरणीचा मिलच्या मनावर जो परिणाम झाला तो अखेरपर्यंत कायम राहिला.

मिलचा बाप जेम्स मिल हा बेंथमचा मोठा मित्र आणि चाहता होता. जेम्स मिलला बेंथमची मते पूर्णपणे मान्य होती आणि उपयुक्ततावाद वाढविण्यामधे आणि सामाजिक सुधारणेच्या चळवळीला गती देण्यामधे

दोघांचाही सारखाच हात होता. दोघांचही संबंध अत्यंत सौहार्दाचे होते व बरीच वर्षे बेंथॅमचे कुटुंब व जेम्स मिलचे कुटुंब शेजारी शेजारी रहात होते. जेम्स मिलच्या जॉन स्टुअर्ट या कुशाग्र बुद्धीच्या मुलाकडे बेंथॅमचे पहिल्यापासूनच लक्ष होते आणि त्याला शिक्षण देऊन त्याच्या मनाची जडण घडण करण्यात जेम्स मिल इतकाच बेंथॅमचाही वाटा आहे.

जॉन स्टुअर्ट हा जेम्स मिलचा पहिला मुलगा व पहिले अपत्य. २० मे १८०६ साली त्याचा लंडन येथे जन्म झाला. त्या वेळी जेम्स मिल लंडन येथे रहात होता. त्याची सांपत्तिक परिस्थिती सरासरीची होती. त्याला निश्चित असे उत्पन्न नव्हते. पुस्तके व लेख लिहून जे काही पैसे मिळतील त्यावर त्याला उदरनिर्वाह करावा लागे. राजकारण व धर्म या विषयावरील त्याची मते प्रतिष्ठित मंडळींना पसंत पडतील अशी नव्हती. पैशासाठी म्हणून त्या मतांना मुरड घालायला तो कधीही तयार नसे. उलट त्या मतांचा उद्घोष करण्याची तो कोणतीही संधी दवडत नसे. अशा विपरीत परिस्थितीत जीवन कंठूनही त्याने भारताचा इतिहास ( History of India ) हा प्रचंड ग्रंथ लिहिला. अर्थशास्त्र व राजकारण या विषयावरही त्याने विपुल लेखन केलेले आहे. या लेखनामुळे विचारवंतांमधे त्याला मोठी मान्यता होती. बेंथॅमशी त्याची मैत्री जडली ती त्याच्या या विचारसंपदेमुळे. त्याच्या विद्वत्तेमुळे व समाजसुधारणेच्या सर्व चळवळींमधील त्याच्या पुढाकारामुळे त्याच्याकडे नेहमी हुशार व अभ्यासू तरुणांची ये जा असे. त्यांच्यापैकी काही जण नंतर जॉन स्टुअर्टचे सहकारी बनले. अशा गाढया विद्वानाच्या व उत्कट समाजसुधारकाच्या पोटी जन्माला आल्याकारणाने जॉन स्टुअर्टला पहिल्यापासूनच पांडित्याचे व समाजसेवेचे बाळकडू लाभले. त्याची आई मात्र एक सर्वसाधारण बाई होती. तिचा त्याच्या मनावर मुळीदेखील परिणाम झालेला दिसत नाही. त्यामुळे पुढे त्याने आत्मचरित्र लिहिले त्यात तिचा उल्लेख देखील नाही. जेम्स मिलची आर्थिक अडचण संपली ती १८१९ मधे त्याला भारतावर राज्य चालवणाऱ्या ईस्ट

इंडिया कंपनीच्या लंडन येथील इंडिया हाउस (India House) नावाच्या मुख्य कचेरीत कायम स्वरूपाची नोकरी लागली तेव्हा. जॉन स्टुअर्टही पुढे त्याच कचेरीत नोकरीस लागला. बापापासून सुरू झालेली ही भारताबद्दलची आस्था व निकट संबंध जॉन स्टुअर्टने कायम टिकवले.

मिलच्या शिक्षणाला त्याच्या तिसऱ्या वर्षापासूनच सुरुवात झाली. त्याचे चवदाव्या वर्षापर्यंतचे सारे शिक्षण त्याचा बाप जेम्स मिलने केले. जेम्स मिलच्या शिक्षणाबद्दलच्या काही कल्पना होत्या. त्या कल्पनांनुसार त्याने आपल्या मुलाला शिक्षण दिले. मुलाला त्याने शाळेत घातले नाही. स्वतःच तो आपल्या मुलाचा शिक्षक झाला. तो मोठा कडक पण पद्धतशीर शिक्षक होता. शिक्षण केवळ शिक्षणाच्या वेळेत चालत नसे. सकाळ संध्याकाळ तो मुलाला बरोबर घेऊन फिरायला जात असे. त्यावेळी देखील शिक्षणाचे पाठ दिले जात असत. ग्रीक व लॅटिन या भाषा, अंकगणित, बीजगणित व भूमिती, इतिहास, अर्थशास्त्र व तर्कशास्त्र तसेच विज्ञान आदि विषयांचे सांगोपांग ज्ञान जेम्स मिलने आपल्या मुलाला दहा वर्षांच्या अवधीत दिले. आणि नुसते ज्ञान दिले एवढेच नव्हे तर त्याला विचार करायला, विचारातील गुणदोष शोधायलाही त्याने शिकविले. बापाकडून मिळालेले शिक्षण मिलला आपल्या बहिणीला शिकवावे लागत असे. त्यामुळे ते अधिक पक्के झाले. बापाच्या नजरेखाली झालेल्या या शिक्षणाचे सविस्तर वर्णन मिलने आपल्या आत्मचरित्रात केले आहे. शिक्षणाच्या या पद्धतीत काही दोष होते यात संशय नाही. मिलने स्वतःच त्यांचे थोडे दिग्दर्शन केले आहे. पण वडिलांच्या आग्रहावरून हे जे ज्ञानभांडार व व्यवस्थित विचार करण्याच्या पद्धती त्याने आत्मसात् केल्या त्यांचा त्याला पुढील आयुष्यात खूप उपयोग झाला. लहानपणी मिळालेल्या या शिक्षणामुळे आपण बरोबरीच्या मंडळींच्या पुढे जवळ जवळ एक तपाने होतो असे मिलला नंतर आढळून आले.

जेम्स मिलने शिक्षणाची ही पद्धत उचलली ती फ्रेंच तत्त्वज्ञ हेल्वेशिअसकडून. हेल्वेशिअसचा शिक्षणावर मोठा भरंवसा होता. माणूस चांगला किंवा वाईट बनतो तो शिक्षणामुळे असा त्याचा विश्वास होता. शिक्षण सुधारून समाज सुधारता येईल अशी त्याची कल्पना होती. त्याच्या विचारांचा जेम्स मिल, बेंथम आदिकरून उपयुक्ततावादी इंग्रजी विचारवंतांच्या विचारांवर खूप परिणाम झालेला आहे. पदार्थविज्ञानशास्त्रात बेकनने जे कार्य केले ते नीतिशास्त्र व समाजशास्त्र यात हेल्वेशिअसने केले असे बेंथमचे मत होते. मिलला देखील मोठेपणी हेल्वेशिअसबद्दल खूप आदर वाटत असे.

मिल बापाकडून जसे खूप शिकला तसेच त्याच्याकडे नेहमी येणाऱ्या काही विचारवंतांकडूनही तो खूप शिकला. त्या मंडळींमधे पहिला उल्लेख केला पाहिजे तो बेंथमचा. बेंथमशी जेम्स मिलचा खूप घरोबा होता. त्यामुळे जॉन स्टुअर्टसह तो बॅजूहाटच्या घरी पुष्कळ वेळा रहायला जात असे. या घरोब्यामुळे व निकट वास्तव्यामुळे मिल पितापुत्रांवर बेंथमच्या व्यक्तित्वाचा व विचारांचा जो प्रभाव पडला त्याला तुलना नाही. प्रसिद्ध अर्थशास्त्रवेत्ता रिकार्डो हा देखील जेम्स मिलच्या घरी नेहमी येत जात असे. त्याने जॉन स्टुअर्टला अर्थशास्त्राचे अनेक पाठ दिले. या खेरीज प्रसिद्ध कायदेपंडित जॉन ऑस्टिन व इतिहासज्ञ ग्रोट यांचाही उल्लेख केला पाहिजे. या मंडळींनी मिलला विचारसंपदा तर दिलीच, पण सुसंस्कृत जीवनाचा, निरपेक्ष समाजसेवेचा आणि निष्कलंक चारित्र्याचाही आदर्श घालून दिला. मिलने तो आदर्श गिरवला एवढेच नव्हे तर तो अधिक उज्वल केला.

शिक्षणाचा भार ज्याने मुख्यत्वेकरून उचलला तो बाप उपयुक्ततावादी व उपयुक्ततावादाचा जनक बेंथम याचा निकटचा सहवास आणि मार्गदर्शन, यामुळे मिल उपयुक्ततावादी बनणे अगदी साहजिक होते. वयाच्या सोळाव्या वर्षी मिलने बेंथमचे ग्रंथ वाचले आणि त्या वाचनाचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला. आपल्याला एक नवी दृष्टी लाभली असे

त्याला वाटले. अधिकात अधिक लोकांचे सुख (greatest happiness of the greatest number) साधणे हेच मानवी जीवनाचे खरे उद्दिष्ट हा सिद्धांत त्याला इतका पटला की तत्त्वज्ञानातील व नीतिशास्त्रातील सर्वश्रेष्ठ सिद्धांत म्हणून त्याने त्याचा स्वीकार केला. उपयुक्तता (utility) हीच प्रत्येक व्यवहाराची खरी कसोटी हे तत्त्व देखील त्याला पटले. ती कसोटी स्वीकारली तर कायदे करून व लोकमताला इष्ट ते वळण लावून समाज कसा सुधारता येईल त्याचे स्पष्ट चित्र त्याच्या डोळ्यापुढे उभे राहिले. आपल्या जीवनाचे उद्दिष्ट निश्चित झाले असे त्याला त्यानंतर वाटू लागले. पुढील आयुष्यात उपयुक्ततावादातील काही उणीवा मिलच्या लक्षात आल्या. त्याने उपयुक्ततावादामधे काही बदलही केले; विशेष करून सुखाची व्याख्या त्याने अधिक व्यापक केली व केवळ सुखाचा शोध घेऊन सुख सापडत नाही तर काही कर्तव्ये निश्चित करून ती पार पाडण्यातच सुख आढळते असे काही नवे विचार प्रसृत केले. परंतु मूलतः तो उपयुक्ततावादीच राहिला. आयुष्याच्या सुरवातीस स्वीकारलेल्या त्या तत्त्वज्ञानाचाच त्याने अखेरपर्यंत पुरस्कार केला.

उपयुक्ततावादाचा आढळ झाल्यानंतर त्याच्या प्रचारासाठी व अभ्यासासाठी मिलने १८२२-२३ च्या सुमारास एक लहानशी संस्था स्थापन केली. तिचे नाव त्याने युटिलिटेरिअन सोसाएटी असे ठेवले. तिच्या भोवती काही उत्साही व आग्रही उपयुक्ततावादी जमा झाले. संस्था फार दिवस चालली नाही. परंतु तिच्यामुळे उपयुक्ततावादाचा जिकडे तिकडे गवगवा मात्र खूप झाला. पुढील आयुष्यातही मिलने दोन तीन चर्चासंस्थांत भाग घेतला. या ठिकाणी अनेक विषयांची उलट सुलट चर्चा होई. मिल चर्चेमधे उत्साहाने भाग घेई. या चर्चांचा ज्ञानसंवर्धनासाठी खूप उपयोग झाला असे त्याने आत्मवृत्तान्तात लिहून ठेवले आहे. शिवाय या चर्चांच्या निमित्ताने त्याचा अनेक बुद्धिवान् व पुढे नामांकित झालेल्या तरुणांशी संबंध आला. त्यांच्यापैकी काहींशी त्याची दाट मैत्री जमली. याच सुमारास म्हणजे

मे १८२३ मधे मिल इंडिया हाऊसमध नोकरीला लागला. त्याची ही नोकरी १८५९ मधे म्हणजे १८५७ मधील भारतातील शिपायांचे बंड किंवा पहिले स्वातंत्र्य युद्ध झाल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त होईपर्यंत टिकली. सुरवातीपासूनच मिलकडे भारतातील अधिकाऱ्यांकडे पाठवायच्या खलित्यांचे कच्चे मसुदे तयार करण्याचे काम होते. हलके हलके नोकरीमधे त्याला बढती मिळत गेली. आणि शेवटची दोन वर्षे मुख्य तपासनीस (Examiner) म्हणून त्याने काम केले. या कामामुळे भारतातील विविध समस्यांची त्याला फार चांगली माहिती झाली. त्या समस्या सोडवण्यासाठी त्याने वेळोवेळी उदार (Liberal) स्वरूपाच्या अनेक सूचना केल्या. त्यांच्यापैकी पुष्कळांना संमती मिळाली नाही व काही संमती मिळूनही अंमलात येऊ शकल्या नाहीत. खलिते तयार करण्याच्या कामाचा मिलला अनेक दृष्टीने उपयोग झाला. व्यवस्थितपणे लिहिण्याचा त्याला सराव झाला. आपले मुद्दे दुसऱ्याला कसे पटावायचे हे तो शिकला, शिवाय आपले म्हणणे पुर मान्य झाले नाही तरी देखील न रागावता शक्य तेवढी जास्त मान्यता मिळविण्याचे कौशल्यही त्याने हस्तगत केले. हे जे गुण त्याने संपादन केले त्यांचा त्याला लिखाणात व सार्वजनिक जीवनात खूप उपयोग झाला. इंडिया हाऊसमधील नोकरी मिलच्या वाचनाच्या, चिंतनाच्या व लेखनाच्या आड आली नाही. उलट तिच्या योगाने त्याला जे आर्थिक स्थैर्य लाभले त्यामुळे त्याला आपले बौद्धिक जीवन निश्चित मनाने विकसित करता आले.

मिलचे पहिले प्रसिद्ध झालेले लेखन घडले ते वर्तमानपत्रात पत्रांच्या रूपाने. ट्रॅव्हलर व क्रॉनिकल या पत्रात १८२२ पासून नंतरच्या दोन तीन वर्षांत त्याची बरीच पत्रे व काही लेख प्रसिद्ध झाले. क्रॉनिकल हे पत्र नंतर स्पष्टपणे बेंथमच्या विचारांचा व तत्त्वनिष्ठ जहालवादाचा पुरस्कार करू लागले. त्या विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी काही दिवसांनंतर वेस्ट मिन्स्टर रिव्ह्यू हे नियतकालिक निघाले. प्रतिष्ठित विचारांचा प्रचार

करणारी एडिंबरा रिव्ह्यू व क्वार्टर्ली रिव्ह्यू अशी दोन नियतकालिके होती. नवीन विचार लोकांपुढे मांडण्यासाठी मात्र प्रचाराचे साधन नव्हते. वेस्ट मिन्स्टर रिव्ह्यूने ती उणीव भरून काढली. मिलने त्या नियतकालिकात लेखन केले. परंतु त्याचा खरा आधार होता तो जेम्स मिल. त्याच्या पांडित्या-मुळे आणि आदरणीय तितकेच विलोभनीय अशा व्यक्तित्वामुळे नियत-कालिकाला एकदम प्रतिष्ठा लाभली आणि सामाजिक व राजकीय नवविचारांचे ते मुखपत्र बनले. मिल पितापुत्रांचा त्या नियतकालिकाशी पाच वर्षे घनिष्ट संबंध होता.

इंग्लंडमधे या काळात नवीन विचारांचा प्रभाव वाढत चालला होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर तिच्यामधे घडून आलेल्या भीषण हत्येमुळे व नेपो-लियनच्या कारकीर्दीत झालेल्या लढायांमुळे देशामधे प्रागतिक विचारांना जो पायबंद पडला होता तो या सुमारास बराच ढिला झाला होता. इंग्लंडमधील रूढ विचार व प्रतिष्ठित संस्था यांच्या गुणदोषांची चिकित्सा सुरू झाली होती. बेंथम व जेम्स मिल आदिकरून पुरोगामी तत्त्ववेत्त्यांनी त्या चिकित्सेला मूलगामी स्वरूप दिले. देशातील सर्व संस्थांमधे, मग त्या राजकीय असोत की सामाजिक वा न्यायालयीन असोत, आमूलाग्र परिवर्तन केले पाहिजे असा त्यांचा दावा होता. राजकारणामधे त्यांना प्रातिनिधिक स्वरूपाची राज्य-व्यवस्था हवी होती. यासाठी पार्लमेंटच्या निवडणुका लवकर लवकर, शक्य तर दर वर्षी, व्हाव्या व शक्य तितक्या अधिक लोकांना मताधिकार मिळावा असा त्यांचा आग्रह होता. अर्थकारणात ते खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते होते. समाज-कारणात त्यांना समता व स्वातंत्र्य हवे होते. यासाठी भाषण, मुद्रण व विचारस्वातंत्र्यावर त्यांचा अधिक कटाक्ष होता. सर्व विचार विमुक्तपणे लोकांसमोर आले की लोकांना खरे कोणते, खोटे कोणते ते ठरवता येईल असा त्यांचा विश्वास होता. तसेच शिक्षणावर त्यांचा मोठा भर होता. लोकांना सुशिक्षित करा, मग लोक आपण होऊन चांगल्या संस्थांची व चांगल्या राज्यकर्त्यांची निवड करतील आणि मग समाजाची प्रगती निर्वेधपणे होत

राहील अशी त्यांची भूमिका होती. हे विचार वेस्टमिन्स्टर रिव्ह्यूमार्फत, पुस्तकांच्या रूपाने व अन्य मार्गांनी जनतेसमोर उत्साहाने व कळकळीने मांडले जात होते. तत्त्वनिष्ठ पुरोगामी मंडळींच्या प्रचाराच्या या कार्यात मिलने मोठ्या हिरीरीने भाग घेतला. नंतरच्या काळात काही किरकोळ बाबींबद्दलची मिलची मते बदलली, पण तारुण्यात स्वीकारलेल्या राजकीय व सामाजिक सुधारणेच्या व्रतापासून तो कधीही ढळला नाही.

हे कार्य चालू असतानाच १८२६ च्या सुमारास मिलच्या मनात शंकाकुशंकांचे, प्रश्नोपप्रश्नांचे आवर्त उठले. इतके दिवस जग सुधारण्याच्या उद्योगात आपण गुंतलेलो आहो यातच त्याला समाधान वाटत होते. आणि ते काम उपयुक्ततावादाच्या तत्त्वानुसार आणि बेंथमच्या शिकवणुकीप्रमाणे आमरण करीत रहावे ही त्याची मनीषा होती. पण काही काळानंतर त्याला त्यात समाधान लाभेनासे झाले. आपले श्रम व्यर्थ आहेत, आपले जीवन व्यर्थ आहे असे त्याला वाटू लागले. निराशेच्या काळ्याकुट्ट मेघांनी त्याचे मन व्यापून टाकले. हे असे का व्हावे ते त्याला समजेना. या संभ्रमावस्थेतून बाहेर पडण्यासाठी त्याने खूप धडपड केली, पण बरेच दिवस त्याला मार्ग सापडला नाही. मनाच्या या अवस्थेत आतापर्यंत संपादन केलेल्या ज्ञानाची, उराशी बाळगलेल्या विचारांची व स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाची त्याने फेरतपासणी केली. त्या तपासणीनंतर त्याला असे आढळून आले की आपल्या शिक्षणात काही उणीवा होत्या व आपल्या विचारात व तत्त्वज्ञानात काही दोष आहेत. या उणीवा दूर करण्याचे व दोष भरून काढण्याचे साधन जेव्हा विचाराअंती गवसले तेव्हाच त्याची संभ्रमावस्था दूर झाली.

शिक्षणातील जी मोठी उणीव त्याच्या नजरेस आली ती ही की आपल्या शिक्षणात भावनांकडे (feelings) अजिबात दुर्लक्ष करण्यात आले होते. जेम्स मिलच्या हिशेबी भावनांना मुळीच महत्त्व नव्हते. त्याचे सारे लक्ष केंद्रित झालेले होते ते विचारजन्य कृतीवर. त्यामुळे त्याने जॉन

स्टुअर्टच्या बुद्धिविकासाकडे लक्ष पुरविले, भावनांच्या जोपासनेकडे मात्र मुळीच लक्ष पुरविले नाही. उपयुक्ततावाद हा एक भावनाशून्य यांत्रिक स्वरूपाचा विचार आहे हा जो लोकांमधे समज निर्माण झाला होता तो त्या वादाच्या पुरस्कर्त्यांनी केलेल्या या भावनांच्या अवमूल्यनामुळेच. आपल्या भावना दुर्लक्षित राहिल्या म्हणूनच कोणत्याही कामाबद्दल आपल्या मनात भावनोत्कटता निर्माण होत नाही हे मिलच्या लवकरच लक्षात आले. म्हणून त्याने भावनांची जोपासना आरंभिली. संगीताने त्याने सुरवात केली आणि नंतर त्याचे लक्ष काव्याकडे वळले. काव्यामधे वर्डस्वर्थचे काव्य त्याच्या मनाला अधिक रुचले. निसर्गाची त्याला पहिल्यापासून आवड होतीच. वर्डस्वर्थच्या काव्याची रुची चाखल्यानंतर ती आवड अधिक अर्थपूर्ण झाली. काव्याच्या बरोबरीने इतर कलांचाही त्याने आस्वाद घेतला. केवळ बौद्धिक शिक्षणाच्या अट्टाहासामुळे खुरटलेले त्याचे भावजीवन नंतर प्रफुल्लित झाले. आणि मग एकंदर जीवनामधे व समाजसुधारणेच्या स्वतःच्या अंगीकृत कार्यात त्याला आनंद आढळून येऊ लागला. स्वतःच्या या अनुभवावरून त्याने निष्कर्ष काढला तो असा की मानवी जीवनात बुद्धीइतकेच भावनांनाही महत्त्व आहे आणि शिक्षणात बुद्धीच्या विकासाइतकेच भावनांच्या जोपासनेकडेही लक्ष पुरविले पाहिजे. तसेच संस्थांच्या सुधारणांच्या बरोबरीने माणसाच्या अंतर्गत सुधारणेसाठीही प्रयत्न होणे अगत्याचे आहे. अंतर्गत सुधारणेसाठी माणसाच्या भावनांना नीट वळण लावले पाहिजे; त्या सुसंस्कृत व सत्त्वशील बनवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माणसाच्या सर्वांगीण स्वरूपाकडे लक्ष दिले पाहिजे; केवळ त्याच्या बुद्धीकडे लक्ष देऊन भागणार नाही. या विचारांनी मिलचा उपयुक्ततावादावरचा विश्वास उडाला असे नव्हे; पूर्वीचा एकांडेपणा व आग्रहीपणा नष्ट झाला एवढेच.

या काळातील चिंतनामुळे उपयुक्ततावादातील काही दोषदेखील मिलच्या ध्यानात आले. सुख साधावयाचे तर ते सुखाचा हव्यास धरून

लाभत नाही; समाजोपयोगी कार्ये करता करता कर्तव्ये पार पाडल्यामुळे जे समाधान लाभते ते खरे सुख अशी त्याच्या मनाची धारणा झाली. समाजोपयोगी कार्य कोणते ते स्थल-काल-परिस्थितीनुसार ठरते; त्याबद्दल त्रिकालाबाधित असा कोणताही नियम सांगता येत नाही. तसेच कोणत्या संस्था इष्ट व कोणत्या अनिष्ट ते परिस्थितीनुसार ठरते. त्यांच्या-बद्दल देखील सर्व कालाला लागू पडतील अशी कोणतीही विधाने करता येत नाहीत. प्रातिनिधिक राज्यव्यवस्था इंग्लंडमधील किंवा एकंदर युरपमधील परिस्थितीनुसार इष्ट आहे; पण म्हणून ती सगळ्या देशात कोणत्याही काळी इष्ट ठरेल असे विधान करणे धाष्ट्यांचे ठरेल. म्हणजेच तो अधिक व्यापक दृष्टीने विचार करू लागला; पूर्वीच्या विचारातील संकुचितपणा गेला; वेगळ्या विचारसरणींच्या पुरस्कर्त्यांच्या विचारांचा अभ्यास तो अधिक सहानुभूतिपूर्वक दृष्टीने करू लागला; ते विचार प्रतिगामी स्वरूपाचे आहेत असे मानून त्यांना त्याज्य मानण्याऐवजी त्यांच्यामधे जे काही चांगले असेल ते स्वीकारून आत्मसात् करण्याचा त्याचा प्रयत्न सुरू झाला. कट्टर उपयुक्ततावाद्यांना मिलचा हा प्रयत्न योग्य वाटला नाही. मिलने आपले तत्त्वज्ञान सोडून दिले, उपयुक्ततावादाला तो पारखा झाला अशी त्यांनी ओरड चालवली; पण ती ओरड खोटी होती हे त्याच्या नंतरच्या कार्यावरून सिद्ध झाले.

मिलच्या ठिकाणी ही व्यापक दृष्टी निर्माण झाली ती फ्रान्स व जर्मनीतील तत्कालिन व नुकत्याच होऊन गेलेल्या विचारवंतांच्या वाङ्मयाचे त्याने जे परिशीलन केले त्यामुळे. सेंट सायमनच्या विचारांशी त्याचा या काळात परिचय झाला. सेंट सायमन हा समाजसत्तावादाचा पुरःस्कर्ता. त्याचे सगळे विचार जरी मिलला पटले नाहीत, तरी मालमत्तेबद्दलचे विवेचन त्याला फार विचारार्ह वाटले. पण त्याच्यावर अधिक चिरस्थाई परिणाम घडून आला तो प्रसिद्ध तत्त्वज्ञानी कॉम्ट याच्या विचारांचा. कॉम्टच्या मतांचा सुरवातीला मिलच्या मनावर खूप प्रभाव होता. मागाहून

मात्र त्या विचारातील स्वातंत्र्यविरोधी सूर त्याच्या लक्षात येऊ लागले. कॉम्टची शिस्तबद्ध समाजाची योजना त्याला मुळीच आवडली नाही. उत्तरवयात त्याने कॉम्टच्या विचारांवर 'ऑगस्ट कॉम्ट अँड पॉझिटिव्हिझम' ( August Compt and Positivism ) नावाचा ग्रंथ लिहिला. कॉम्टच्या विचारसरणीतील दोष त्याने त्या पुस्तकात मुद्देसूद रीतीने दाखविले आहेत. जर्मन वाङ्मयाचाही त्याने या काळात अभ्यास केला. याच काळात त्याची कार्लाइलशी ओळख झाली. ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले. परंतु नंतर वैचारिक अंतर वाढत गेले. कार्लाइलबद्दल मिलच्या मनात शेवटपर्यंत आदर राहिला; पण एकाचा दुसऱ्याच्या विचारांवर विशेष परिणाम झालेला दिसत नाही. कॉलेरिजची गोष्ट मात्र वेगळी आहे. परिचय होण्यापूर्वीच मिलने त्याची काही काव्ये व इतर लिखाण वाचले होते. परिचय झाल्यानंतर त्याने कॉलेरिजचे संपूर्ण वाङ्मय वाचले. कॉलेरिजबद्दल त्याच्या मनात नितांत आदर निर्माण झाला. त्याच्या विचारांवर कॉलेरिजचा बराच प्रभाव पडला आहे असे दिसते. विशेषेकरून कवी व शास्त्रज्ञ व त्यांच्या वेगवेगळ्या भूमिका याबद्दलचे जे मिलचे विवेचन आहे त्याच्यावर कॉलेरिजची दाट छाया पडली आहे असे म्हणता येईल.

मनामधे वैचारिक संभ्रम निर्माण झाला होता तरी देखील मिलने या काळात खूप लिखाण केले. अर्थशास्त्रविषयक प्रश्नांवर काही महत्त्वाचे लेख लिहिले, तर्कशास्त्रावरील आपल्या ग्रंथाचा आराखडा तयार केला, आणि प्रचलित राजकीय प्रश्नांवर वेळोवेळी लेखांच्या रूपाने मतप्रदर्शन केले. राजकीय घडामोडींची ती वर्षे होती. १८३० च्या जुलैमधे फ्रान्समधे राज्यक्रांती झाली. त्या क्रांतीचा पुढारी लाफायेट् याच्याशी मिलची ओळख झाली. त्या नंतर काही महिने फ्रान्समधील घडामोडींबद्दल एक्झामिनर या वर्तमानपत्रात मिल दर आठवड्याला लेख लिहित असे. याच सुमारास इंग्लंडमधे पार्लमेंटच्या सुधारणेबद्दलची चळवळ सुरू झाली. तिचाच

परिणाम म्हणून पुढे १८३२ साली पहिला सुधारणा कायदा (Reform Act) मंजूर झाला. त्यानिमित्ताने मिलने वर्तमानपत्रातून राजकीय प्रश्नांबद्दल खूप फुटकळ लिखाण केले. या सर्व कार्यांमुळे व विशेषेकरून त्याच्या मतामधे जे परिवर्तन झाले त्यामुळे मिलच्या मनावरील निराशेचे पटल दूर झाले आणि समाज सुधारावा व लोकांचे जीवन कमी कष्टाचे व दुःखाचे व्हावे यासाठी सतत प्रयत्न करीत रहावे ही जी त्याची आकांक्षा ती त्याला पुन्हा अर्थपूर्ण वाटू लागली.

या सुमारास मिलच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची घटना घडून आली. ती घटना म्हणजे हॅरिएट टेलर या बाईशी घडून आलेली ओळख व मैत्री. मिलची त्या बाईशी पहिली भेट १८३० साली झाली. तिच्या नवऱ्याच्या कुटुंबाशी मिल कुटुंबाचा जुना संबंध होता. पहिली भेट झाली त्यावेळी मिल पंचवीस वर्षांचा होता आणि ती तेवीस वर्षांची होती. तिचे लग्न झालेले होते व नवऱ्याशी तिचे संबंध मोठे प्रेमाचे होते व ते शेवटपर्यंत तसेच राहिले. मिलशी तिची ओळख हलके हलके वाढत गेली व तिचे लवकरच गाढ स्नेहात रूपांतर झाले. मिल पुष्कळ वेळा तिच्या घरी रहायला जात असे. त्यांनी एकत्र प्रवासही खूप केला. ते एकमेकांच्या सहवासात नसत त्यावेळी त्यांचा पत्रव्यवहार चालू असे. पहिली वीस वर्षे त्या स्नेहाचे स्वरूप केवळ बौद्धिक व भावनिक होते. दोघेही एकमेकांवर अत्यंत अनुरक्त होते; तरी देखील श्री. टेलर यांच्याबद्दल दोघांच्याही मनात इतका आदर होता की त्यांचे मन दुखावले जाऊ नये म्हणून त्यांनी आपल्या प्रेमाला वैषयिक प्रेमाचे रूप येऊ दिले नाही. हॅरिएट व मिल यांच्या स्नेहसंबंधाबद्दल समाजामधे बरीच कुजबूज होती. पण दोघांनीही तिच्याकडे दुर्लक्ष केले. १८४९ साली श्री. टेलर मृत्यू पावले. त्यानंतर एप्रिल १८५१ मधे दोघांनी लग्न केले. त्यांचे वैवाहिक जीवन फक्त साडेसात वर्षे टिकले. ती साडेसात वर्षे मिलच्या जीवनातील अतीव आनंदाची वर्षे होती. १८५८ मधे त्याची बायको दक्षिण फ्रान्समधे एव्हिनन येथे मरण पावली. तिथेच मिलने तिची

समाधी बांधली. मिल्ला मृत्यू आला तो त्याच गावी; आणि मृत्यूनंतर त्याचा पार्थिव देह पुरला गेला तो तिच्याच समाधीत. आपल्या आयुष्याची उर्वरित पंधरा वर्षे त्याने बहुतांशाने त्याच गावी काढली. दर वर्षी काही दिवस मात्र तो लंडन येथे वास्तव्य करत असे. या काळात त्याला साथ केली ती त्याच्या मुलीने, श्रीमती टेलर यांना त्यांच्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलीने. या मुलीवर मिलचे स्वतःच्या मुलीसारखे प्रेम होते. आईच्या मृत्यू-नंतर तिने त्याला लेखनाच्या व पत्रव्यवहाराच्या कामात खूप मदत केली. तिच्या या मदतीचा आपल्या आत्मचरित्रात मिलने खूप गौरवाने उल्लेख केलेला आहे.

हॅरिएट टेलरचे मिलच्या जीवनातील स्थान फार मोठे आहे. तिच्याशी ओळख झाल्यापासून आपण जे लेखन केले त्याची स्फूर्ती आपल्याला तिच्यापासून मिळाली असे त्याने लिहून ठेवले आहे. लेखनाच्या विषयाचा दोघे मिळून विचार करत, त्यानंतर मिलने जे काही लिहिले असेल त्याच्यावरून हॅरिएटचा हात फिरे आणि नंतरच ते प्रसिद्ध होई. लेखन चालू असताना देखील ती त्याला वेळोवेळी सूचना करी आणि त्यामुळे ते अधिक परिपूर्ण होई. या पद्धतीमुळे आपले लेखन केवळ एकट्याचे नसून दोघांचे संयुक्त लेखन आहे असे मिलचे म्हणणे आहे. ओळख झाली तेव्हापासूनच त्यांचे बौद्धिक सहजीवन सुरू झाले. हलके हलके ते अधिकाधिक सर्वांगीण व सखोल होत गेले. काही काळानंतर शरीरे दोन पण मन एक अशी त्यांची अवस्था झाली. आपण हॅरिएटपासून खूप शिकलो असे मिल म्हणतो. विशेषतः समाजवादाबद्दल जी त्याच्या मनात आपुलकी निर्माण झाली व इतरांच्या मनातील चांगले ते ग्रहण करण्याची आणि लेखनात शक्यतेच्या मर्यादा लक्षात घेण्याची वृत्ती त्याच्या ठिकाणी वाढली ती हॅरिएटमुळे असे त्याने लिहून ठेवले आहे. मिलच्या हिशेबी हॅरिएट टेलर ही एक असामान्य स्त्री होती. बुद्धीने ती जशी कुशाग्र होती तशीच भावनेने

तरल होती. बुद्धी आणि भावना यांचा तिच्याठिकाणी अजोड संगम झाला होता असे त्याने म्हटले आहे. त्याने तिच्यावर जी स्तुतिसुमने उधळली आहेत त्यांच्यावरून त्याच्या तिच्याबद्दलच्या असीम प्रेमाची उत्तम कल्पना येते; परंतु त्याने केलेल्या अपार स्तुतीला ती प्रत्यक्षात कितपत पात्र होती हे ठरविण्याला त्याच्या शब्दाखेरीज दुसरे साधन उपलब्ध नाही. आणि तसे पाहिले तर तिच्या मोठेपणाचे मोजमाप घेण्याची आवश्यकता तरी कुठे आहे ? मिलच्या जीवनात ती आली आणि त्याच्या जीवनावर व लेखनावर तिने चिरस्थाई स्वरूपाचा परिणाम केला एवढे अभ्यासकाने नमूद केले म्हणजे पुष्कळ झाले. हॅरिएट टेलरचे स्वतःचे लिखाण फार थोडे आहे. तिने लिहिलेला स्त्रियांची मुक्तता ( Enfranchisement of Women ) हा निबंध मिलने आपल्या मासिकात प्रसिद्ध केला. तिची काही पत्रे उपलब्ध आहेत. त्यांच्यावरून ती एक मोठी कुशाग्र बुद्धीची स्त्री होती हे ताबडतोब लक्षात येते.

मिलच्या हॅरिएट टेलरवरील नितांत प्रेमाची उत्तम कल्पना येते ती तिच्या समाधीवर कोरलेल्या वाक्याने. ते वाक्य आहे ते असे : "तिच्यासारखे मन आणि बुद्धी असणारी आणखी काही थोडी मंडळी असती तर या भूतळावरच स्वर्गाचे स्वप्न दृष्टीस पडले असते. भूतळाचा स्वर्गाला देखील हेवा वाटू लागला असता." ( Were there a few hearts and intellects like hers, this earth would already become the hope for heaven ) स्वातंत्र्याविषयी ( On Liberty) या प्रबंधाच्या अर्पणपत्रिकेतही त्याने तिच्याबद्दल असेच गौरवाचे उद्‌गार काढले आहेत. आत्मचरित्रात त्याने तिची शेलेशी तुलना करून बुद्धीच्या क्षेत्रात तिची नंतर जी वाढ झाली त्यामुळे शेले तिच्यापुढे मुलासारखा ठरेल असे म्हटले आहे. मिलच्या या उद्‌गारांच्या खरेखोटेपणाची चिकित्सा करण्यात हशील नाही. त्यांचा अर्थ घ्यावयाचा तो एवढाच की हॅरिएट टेलरमधे त्याला आपले आराध्य दैवत सापडले आणि ते दैवत त्याला त्याच्या पुढील आयुष्यात प्रेरणा देत राहिले व मार्गदर्शन करीत राहिले.

१८३३ मधे पार्लमेंटच्या सुधारणा कायद्यानुसार नवीन निवडणुका झाल्या. या निवडणुकांमधे स्वतःला तत्त्वनिष्ठ पुरोगामी म्हणवणारी काही मंडळी निवडून आली. ही मंडळी पार्लमेंटमधे आपल्या तत्त्वज्ञानाचा चांगला प्रचार करतील अशी मिल पितापुत्रांची अपेक्षा होती. पण ती पुरी झाली नाही. त्यांना मार्गदर्शन करण्याच्या हेतूने मिलने **एक्झामिनर** व **मंथली रिपॉझिटरी** या नियतकालिकात बरेच लेखन केले. त्याच्यापैकी काही नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. ते लेखन बहुतांशाने राजकीय स्वरूपाचे होते. त्याच उद्देशाने १८३४ साली **लंडन व वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू** नावाचे एक नवे नियतकालिक मिलच्या मित्रमंडळींनी काढले. १८३७ नंतर त्या नियतकालिकाची आर्थिक जबाबदारी मिलवर पडली. त्याने या नियतकालिकासाठी खूप लेखन केले. तत्त्वनिष्ठ जहालवादाचे मुखपत्र म्हणून ते चालवले जात होते; तरी देखील ते संकुचित स्वरूपाचे नाही हे दाखवण्यासाठी मिलने त्यामधे कार्लाइलसारख्यांचेही लेख छापले. बेंथममधील उत्तम ते आत्मसात् करून त्याची अलीकडे जी राजकीय, आर्थिक व सामाजिक मते बनली होती त्यांचा तो नियतकालिकातून प्रचार करीत होता. प्रचारामुळे पुरोगामी मंडळींचे काम वाढेल आणि देशामधे पुरोगामी पक्ष वाढेल (Radical Party) अशी मिलची कल्पना होती. परंतु देशातील परिस्थिती अनुकूल नव्हती; त्यामुळे पक्ष निर्माण होऊ शकला नाही. ती आशा निमाल्यानंतर व आर्थिक बोजा सहन करणे अशक्य झाल्यामुळे १८४० साली मिलने त्या नियतकालिकातून अंग काढून घेतले. त्यानंतर दहा वर्षे ते नियतकालिक चालले व मिलनेही त्याच्यासाठी थोडेबहुत लेखन केले. पण इतर नियतकालिकांमधेही तो त्यानंतर लिहू लागला.

पुरोगामी पक्ष जन्माला येईल अशी एक चांगली संधी त्या काळात निर्माण झाली होती. मंत्रिमंडळ असावे तितके पुरोगामी नाही म्हणून लॉर्ड डरहम नावाच्या एका पुरोगामी मंत्र्याने राजीनामा दिला होता. राजीनामा दिल्यानंतर पुरोगामी धोरणासाठी चळवळ उभारावी असे त्याच्या मनात होते.

तेवढयात कॅनडामधे गव्हर्नर जनरल म्हणून त्याची नेमणूक झाली. कॅनडामधे नुकतेच जे बंड झाले होते त्याच्या कारणांची त्याने शहानिशा करावी व असा प्रकार घडू नये म्हणून उपाय सुचवावे हे काम त्याला मुख्यत्वेकरून देण्यात आले होते. कॅनडामधे गेल्याबरोबर त्याने पुरोगामी स्वरूपाच्या काही योजना आखल्या, पण इंग्लंडमधे मंत्रिमंडळाला त्या पसंत पडल्या नाहीत म्हणून त्याने राजीनामा दिला. या राजिनाम्यामुळे अमीर उमरावांचा जैसे थे वृत्तीचा टोरी ( Tory ) पक्ष त्याच्यावर उसळला एवढेच नव्हे तर थोडाबहुत उदारमतवादी असा व्हिग ( Whig ) पक्षही त्याच्यावर फार रागावला. दोघांनी मिळून त्याच्याविरुद्ध काहूर उठवून त्याला बदनाम करण्याचा चंग बांधला. या परिस्थितीत लॉर्ड डरहमच्या नेतृत्वाखाली पुरोगामी पक्षाची उभारणी करता आली असती. ते घडले नाही पण मिलने मात्र एक अत्यंत महत्त्वाचे काम केले. कॅनडाविषयक प्रश्नांचा त्याचा अभ्यास होता; लॉर्ड डरहमची भूमिका त्याला मान्य होती; म्हणून त्याने लॉर्ड डरहमच्या समर्थनाचा एक मुद्देसूद लेख आपल्या नियतकालिकात लिहिला. त्यानंतर इतरांनाही धीर आला व ते लॉर्ड डरहमच्या बाजूने लिहू लागले. या प्रचारामुळे लोकमत पालटले आणि लॉर्ड डरहम इंग्लंडला परतला तेव्हा त्याचा धिक्कार होण्याऐवजी त्याचे उत्साहाने स्वागत झाले. मिलने वेळीच त्याचे जे समर्थन केले त्यामुळेच लोकमताला ही कलाटणी मिळाली. पुढे डरहमचा कॅनडाबद्दलचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि दोन तीन वर्षातच त्याने सुचविल्याप्रमाणे कॅनडाची स्वराज्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. ऑस्ट्रेलिया आदिकरून गोऱ्यांची वसती असलेल्या वसाहतींमधेही नंतर त्या सूचनांची अंमलबजावणी झाली आणि त्या वसाहतींचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटला. या सुयोगी घटनेचे थोडेबहुत तरी श्रेय मिलच्या योग्य क्षणी प्रसिद्ध झालेल्या लेखाला दिले पाहिजे.

१८३६ मधे मिलवर एक कौटुंबिक आपत्ती ओढवली. ती म्हणजे त्या वर्षी २३ जूनला घडून आलेला त्याच्या बापाचा मृत्यू. जवळ जवळ

एक वर्षभर तो आजारी होता आणि शेवटी कुटुंबात चालत आलेल्या क्षयाच्या रोगाला तो बळी पडला. मिलचे विचार अलीकडे बापाच्या विचारापेक्षा वेगळे झाले होते, पण बापाबद्दलचा आदर तिळमात्रही कमी झाला नव्हता. शेवटच्या वर्षात तर आपल्या मतामधे व बापाच्या मतामधे फारसे अंतर नसावे असे त्याला वाटू लागले होते. जेम्स मिल हा एक मोठा तत्त्ववेत्ता आणि ग्रंथकार होऊन गेला. त्याने लिहिलेल्या भारताचा इतिहास या ग्रंथाचा अगोदरच उल्लेख झालेला आहे. त्याखेरीज अर्थशास्त्र व मानसशास्त्र यावरही त्याने विद्वन्मान्य असे ग्रंथ लिहिले आहेत. पांडित्य, बुद्धिवादी निष्ठा आणि समाजहिताची तळमळ यांनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील पुरोगामी विचारांच्या तरुण मंडळींच्या मनावर त्याने जे प्रभुत्व गाजवले त्याचा इतिहासात दाट ठसा उमटला आहे.

नियतकालिकाच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यानंतर मिलला ग्रंथरचनेकडे लक्ष पुरवता आले. १८३६ मधे सुरू केलेला तर्कशास्त्रावरील सुप्रसिद्ध ग्रंथ ( System of Logic ) त्याने १८४१ मधे पुरा केला. तो १८४३ मधे प्रसिद्ध झाला. पुस्तक लोकप्रिय ठरले आणि त्याच्या लवकरच तीन आवृत्त्या निघाल्या. अर्थशास्त्रावरील ग्रंथ ( Political Economy ) त्याने १८४५ मधे लिहायला सुरवात केली आणि तो त्याने १८४७ मधे पुरा केला. १८४८ मधे तो प्रसिद्ध झाला. ते पुस्तकही खूप लोकप्रिय ठरले. अर्थशास्त्र समाजशास्त्राचा एक भाग आहे असे कल्पूनच मिलने हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तकाच्या प्रत्येक नव्या आवृत्तीत तो सुधारणा करीत गेला. या सुधारणा मुख्यत्वेकरून श्रमजीवी आणि त्यांचे भवितव्य या विषयावरील प्रकरणात झाल्या. मिलची भूमिका समाजसत्तावादाला अधिकाधिक अनुकूल बनत गेली. हा फरक पडला तो हॅरिएट टेलरच्या प्रेरणेमुळे असे त्याने नमूद करून ठेवले आहे. हे पुस्तक आपण दोघांनी मिळून लिहिले असे मिल म्हणतो. त्याने ते हॅरिएटला अर्पण केले आहे.

या नंतरचे त्याचे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे स्वातंत्र्याविषयी ( On Liberty ) हा विस्तृत प्रबंध. मिलने प्रबंधाचा पहिला आराखडा तयार केला तो १८५४ मधे. त्या वेळी तो छोटासा निबंध म्हणून लिहावा अशी त्याची कल्पना होती. नंतर १८५५ मधे हॅरिएट टेलरबरोबर युरपचा प्रवास करताना रोम शहरात त्या निबंधाला प्रबंधाचे स्वरूप देण्याची कल्पना त्याला सुचली. प्रबंधाचे लेखन पुनर्लेखन पुढची दोन तीन वर्षे मधून मधून चालू होते. प्रबंधावर दोघांनी मिळून खूप परिश्रम केले. १८५८–५९ च्या हिवाळ्यात त्याची पुन्हा तपासणी व्हावयाची होती. पण तत्पूर्वी १८५८ मधे हॅरिएट मरण पावली; त्यामुळे तिचा शेवटचा हात प्रबंधावरून फिरला नाही. मिलच्या म्हणण्याप्रमाणे तो प्रबंध ही त्याची एकट्याची कृती नसून दोघांची मिळून संयुक्त कृती होती. तिच्या मृत्यूनंतर त्याच्यामधे कोणताही फेरफार न करता त्याने तो १८५९ मधे प्रसिद्ध केला. तो प्रबंध मिलने तिला अर्पण केला आहे.

१८५४ मधे मिल क्षयाच्या विकाराने खूप आजारी पडला. हा रोग त्याच्या घराण्यातच होता असे दिसते. तो मधून मधून बळावत असे आणि शेवटी मिल त्यालाच बळी पडला. १८५४ ला उद्भवलेले दुखणे फार गंभीर स्वरूपाचे होते. यातून आपण वाचणार नाही असे त्याला काही दिवस वाटले. म्हणून जे काही लिहावयाचे ते लवकर लिहून टाकावे असे त्याला वाटू लागले. कोणकोणच्या विषयावर लिहावयाचे याची त्याने यादी तयार केली; आणि पुढे त्याने लेखन केले ते बहुतांशाने त्या यादीनुसार. हॅरिएट टेलरही या सुमारास आजारी पडली होती; म्हणून दोघेही काही महिने दक्षिण फ्रान्स-मधे जाऊन राहिले होते. मिलच्या तब्येतीत काही काळानंतर सुधारणा झाली आणि तो पुढे जवळ जवळ वीस वर्षे जगला. हॅरिएटची प्रकृती मात्र बिघडत गेली आणि ती पुढे फक्त पाचच वर्षे जगली. या काळातील दोघामधील पत्रव्यवहार मोठा अभिजात स्वरूपाचा आहे. त्यामधे मिलच्या नियोजित लेखना-बद्दल विचारविनिमय आहे, गंभीर प्रश्नाविषयी चर्चा आहे आणि दोघांना

एकमेकाबद्दल वाटणाऱ्या प्रेमाचा व जिव्हाळ्याचा मनोवेधी आविष्कार आहे. मिल हॅरिएटच्या मतांना व सूचनांना किती महत्त्व देत असे ते या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होते. हॅरिएटने एका पत्राने धर्म या विषयावरील निबंधाबद्दल मिलला काही सूचना केल्या होत्या. त्या आपल्याला आवडल्या असे तिला सांगणाऱ्या उत्तराच्या आपल्या पत्रात मिल लिहितो : "तुझ्यामागे जगण्यात काय अर्थ आहे ! तुझ्या प्रेरणेखेरीज जिवंत ठेवण्यासारखे असे मी काहीदेखील लिहू शकणार नाही." केवढा हा विश्वास व केवढे हे प्रेम ? वैचारिक विश्वामधे मिल–हॅरिएट टेलर संबंधाला जे एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे ते दोघांच्या एकमेकावरील गाढ प्रेमामुळे आणि इतरत्र क्वचित्च दृष्टीस पडणाऱ्या बौद्धिक सहजीवनामुळे.

या नंतरच्या काळात मिलने पार्लमेंटच्या सुधारणेबद्दलचा (Thought on Parliamentary Reform) प्रबंध लिहिला. १८५९ च्या सुमारास देशामधे जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली होती तिच्यामुळे तो त्याला लिहावासा वाटला. पार्लमेंटपुढे त्यावेळी राजकीय सुधारणेचे एक विधेयक होते आणि देशभर त्याची चर्चा चालू होती. मिलने आपला प्रबंध लिहिला तो त्याच्या अनुषंगाने. पुढील दोन वर्षात त्याने प्रातिनिधिक राज्यपद्धती (Representative Government) आणि स्त्रियांचे दास्य (Subjection of Women) ही दोन महत्त्वाची पुस्तके लिहिली. याखेरीज त्याचे फुटकळ लेखन चालू होते. त्यापैकी काही इतके महत्त्वाचे होते की नंतर ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. या पुस्तकामधे उपयुक्ततावाद (Utilitarianism), धर्माची आवश्यकता (Utility of Religion) व निबंध आणि चर्चा (Dissertations and Discussions) यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. निबंध आणि चर्चा या पुस्तकात वेगवेगळ्या विषयावर वेळोवेळी लिहिलेले लेख एकत्र करण्यात आले आहेत. पुस्तकाचे तीन खंड प्रसिद्ध झाले आहेत.

१८६१ मध्ये अमेरिकेत यादवी युद्ध (Civil War) उद्भवले. गुलामगिरीच्या प्रश्नावरून उत्तरेकडील राज्ये व दक्षिणेकडील राज्ये

यांच्यामधे ते उद्भवले होते. वास्तविकपणे या युद्धामधे इंग्लंडमधील उदार-मतवादी व पुरोगामी मंडळींनी गुलामगिरीला विरोध करणाऱ्या उत्तरेकडील राज्यांचा उघडपणे पाठपुरावा करायला हवा होता; परंतु अमेरिकेने इंग्लंडशी भांडून आपले स्वतंत्र राष्ट्र बनवले तेव्हापासून इंग्लंडमधील वरिष्ठ वर्गांचा त्या देशावर राग होता. त्यामुळे लोकमत उत्तरेकडील राज्यांना अनुकूल नव्हते. उलट यादवी युद्धामुळे अमेरिकेचा नाश झाला तर बरे असेदेखील काही जणांना वाटत होते. स्वतःला उदारमतवादी म्हणवणारी काही मंडळीसुद्धा जनमताच्या या प्रवाहाबरोबर वहात गेली होती. या वेळी मिलने अमेरिकेतील संघर्ष ( Contest in America ) या शीर्षकाखाली दोन लेख लिहून यादवी युद्धाचे खरे स्वरूप उघड केले. गुलामगिरीबद्दल त्याला पहिल्यापासून तिटकारा होताच व गुलामांच्या मुक्ततेच्या कार्य-क्रमाला त्याचा पाठिंबा होता. यादवी युद्धाचा निकाल असत् पक्षाच्या म्हणजेच दक्षिणेकडील राज्यांच्या बाजूने लागला तर जगातील पुरोगामी चळवळीला मोठा धक्का बसेल अशीही धास्ती त्याला वाटत होती. त्यामुळे त्याने आपले लेख मोठ्या जिव्हाळ्याने व मुद्देसूद पद्धतीने लिहिले. लेखांचा पुरोगामी विचारसरणीच्या लोकावर फार चांगला परिणाम झाला; आणि त्यानंतर उत्तरेकडील राज्यांच्या पक्षाला इंग्लंडमधे भरीव पाठिंबा मिळू लागला. मिलच्या अगोदर काही पुरोगामी लेखकांनी त्याच आशयाचे विचार व्यक्त केले होते; परंतु मिलच्या लेखांनी जे साधले ते त्यांना साधता आले नव्हते.

नाना तऱ्हेच्या लेखनाच्या कार्यात अशा रीतीने व्यग्र असताना १८६५ साली मिलला पार्लमेंटच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याची विनंती करण्यात आली. यापूर्वीही एक दोन वेळा त्याने निवडणुकीला उभे रहावे अशी त्याला विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावेळी इंडिया हाउसमधील नोकरीची अडचण होती. शिवाय पार्लमेंटच्या निवडणुकीबद्दल त्याची काही निश्चित मते होती. निवडणुकीसाठी उमेदवाराने खर्च करावा हे त्याला

मान्य नव्हते. असा खर्च करणे म्हणजे पार्लमेंटचे सभासदत्व विकत घेण्या-सारखेच आहे असे त्याला वाटत होते. खर्च करावाच लागला तर तो मतदार-क्षेत्रातील लोकांनी करावा. उमेदवाराने देखील आपले पार्लमेंटमधे जाणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कितपत आवश्यक आहे याचा निर्विकार बुद्धीने विचार करावा. मिलचे पुढे असेही मत होते की निवडून आलेला पार्ले-मेंटचा सभासद हा मतदारांचा केवळ मुखत्यार ( delegate ) नसतो तर तो त्यांचा प्रतिनिधी असतो. म्हणजेच त्याने, केवळ त्यांची मते स्वीकारून त्यांची वकीली न करता, स्वतःच्या बुद्धीने सर्व प्रश्नांचा विचार केला पाहिजे व राष्ट्रहिताच्या दृष्टीने जे आवश्यक त्याचाच पुरस्कार केला पाहिजे. मतदारक्षेत्रातील लहानसहान तक्रारीकडे लक्ष पुरवत बसण्याऐवजी राष्ट्रीय महत्त्वाच्या गोष्टीवरच त्याने आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. ही सारी भूमिका मान्य करून आपल्याला पार्लमेंटमधे पाठवायला कोणचेही मतदार-क्षेत्र तयार होईल असे मिलला वाटले नव्हते.

पण १८६५ साली तो योग जुळून आला. यावेळी मिल इंडिया हाउसच्या नोकरीच्या बंधनातून मुक्त झालेला होता. मतदारांच्या पुढाऱ्यां-पैकी ज्यांनी निवडणुकीला उभे राहण्याची मिलला विनंती केली होती त्यांच्यापुढे आपली भूमिका व अटी त्याने स्पष्टपणे मांडल्या. शिवाय आपण मते मागण्यासाठी हिंडणार नाही व निवडून आल्यानंतर स्थानिक स्वरूपाच्या तक्रारीकडे लक्ष द्यायला आपल्याला वेळ होणार नाही हेदेखील त्याने स्पष्ट केले. या सर्व गोष्टी सर्वसाधारण मतदारापुढेही निःसंदिग्धपणे ठेवण्यात आल्या. त्यांना मान्यता मिळाली तेव्हाच मिल निवडणुकीला उभा रहायला तयार झाला. निवडणुकीच्या प्रचारामधे त्याने शेवटचा फक्त एक आठवडा भाग घेतला, त्यावेळी सभातून भाषणे करून व इतर प्रकारांनी सर्व राष्ट्रीय प्रश्नांवरील आपली मते त्याने खुलासेवारपणे समजावून सांगितली. स्त्रियांना मताचा अधिकार असावा की नसावा याबद्दल त्यावेळी बराच वाद माजला होता. खरे मत सांगणे निवडणुकीच्या दृष्टीने

धोक्याचे होते. पण तो धोका पतकरून स्त्रियांना मताचा अधिकार मिळावा हे जे आपले मत ते मिलने धिटाईने सांगितले. अशीच एक दुसरी अडचण उपस्थित झाली होती तिचा त्याने आत्मचरित्रात मुद्दाम उल्लेख केला आहे. 'पार्लमेंटच्या सुधारणेबद्दलचे विचार' (Thoughts on Parliamentary Reform) या पुस्तकात मिलने असे लिहिले होते की इंग्लंडमधील कामगार, त्यांना खोटे बोलण्याबद्दल लाज वाटत असली तरी, सर्वसाधारणपणे खोटे बोलतात. कामगारांच्या एका सभेत दुसऱ्या उमेदवाराने फलकावर ढोबळ अक्षरात ते वाक्य लिहून, तुम्ही .... हे लिहिले का, असा सवाल मिलला विचारला. मिलने त्याचे हो असे उत्तर दिले. कामगारांना मिलचा प्रामाणिकपणा व स्पष्टवक्तेपणा आवडला. त्यांनी टाळ्या वाजवून त्या उत्तराचे स्वागत केले. कामगारांची मते विरुद्ध पडण्याऐवजी मिलच्या बाजूने पडली. स्तुतिपाठकाऐवजी स्पष्टवक्ती माणसे आपल्याला अधिक आवडतात हे कामगारांनी दाखवून दिले.

निवडणुकीमधे मिल विजयी झाला आणि पुढच्या निवडणुकीपर्यंत तो पार्लमेंटचा सभासद होता. या पार्लमेंटने महत्त्वाचे काम केले ते म्हणजे सुधारणाविधेयक (Reform Bill) मंजूर करण्याचे. सुधारणाविधेयकावरील चर्चेमधे मिलने खूप उत्साहाने भाग घेतला. स्त्रियांना मताचा अधिकार मिळावा व अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व लाभावे म्हणून प्रमाणात्मक मतदान पद्धतीचा (proportional representation) स्वीकार व्हावा म्हणून त्याने प्रयत्न केले. पण दोन्ही कल्पना लोकांना इतक्या नवीन वाटल्या की त्यांना पाठिंबा लाभला नाही. मतदानाचा हक्क थोडा विस्तृत झाला एवढाच फायदा सुधारणा कायद्याने पदरात पडला.

पार्लमेंटमधे कामाच्या बाबतीत मिलने एक धोरण ठरवले होते. दुसरे सभासद जी कामे करत असतील त्यांच्याकडे आपण लक्ष देण्याचे कारण नाही; परंतु इतर कुणीही जी कामे अंगावर घेऊन करण्यास तयार नसतील त्यांच्याकडे आपण लक्ष पुरवावे. या नियमानुसार त्याला दोन

प्रश्नांकडे खास लक्ष पुरवावे लागले; एक आयर्लंडचा प्रश्न आणि दुसरा कामगारांचा प्रश्न.

आयर्लंडच्या प्रश्नाने त्यावेळी उग्र स्वरूप धारण केले होते. आयर्लंडमधे वेळोवेळी इंग्रजी सत्तेविरुद्ध बंडाचे उठाव होत होते व विभक्तीकरणाची चळवळ वाढू लागली होती. मिलला विभक्तीकरण मान्य नव्हते, परंतु राज्य करण्याची पद्धत सुधारली पाहिजे व जमिनीबद्दलचा कायदा बदलला पाहिजे असे मात्र त्याला उत्कटतेने वाटत होते. इंग्लंडची आयर्लंडमधे राज्य करण्याची पद्धत दडपशाहीची व असंस्कृत आहे अशी त्याची धारणा होती. म्हणूनच हेबिअस कॉर्पस रूपाने मिळणारे नागरी स्वातंत्र्याचे हक्क तात्पुरते नाकारण्याचे विधेयक पार्लमेंटपुढे आले त्यावेळी त्याने त्याला कडाडून विरोध केला. मिलचे हे भाषण त्या वेळी लोकांना आवडले नाही. आयर्लंडमधे इंग्रजी राज्य-कर्त्यांनी जी जमीनदारशाही प्रस्थापित केली होती ती त्याला मुळीच पसंत नव्हती. जमीन कसणाऱ्या कुळांना कायम वहिवाटीचा हक्क मिळावा व त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या खंडावर नियंत्रण असावे असा त्याचा आग्रह होता. मिलची ही साधी सूचना देखील त्या काळात लोकांना क्रांतिकारक वाटली. या संबंधात त्याने १८६८ साली 'इंग्लंड व आयर्लंड' ( England and Irland ) नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. विभक्तीकरण नको, पण जमिनीचा प्रश्न मात्र सुटला पाहिजे अशी त्या पुस्तिकेची भूमिका होती. पुस्तिका इंग्लंडमधे लोकांना आवडली नाही; आयर्लंडमधे मात्र ती फार लोकप्रिय ठरली. मिलसारख्या पुरोगामी मंडळींच्या आयर्लंडचा प्रश्न समजुतीच्या व तडजोडीच्या मार्गाने सोडविण्याच्या प्रयत्नाना यश आले नाही आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांशातच इंग्लंडला अखेर आयर्लंडचे वेगळे राष्ट्र बनविण्याला संमती द्यावी लागली.

कामगारांच्या बाबतीत त्यांना मताचा अधिकार मिळावा हा मिलचा आग्रह होता. सुधारणाकायद्याला त्याने त्या आशयाची दुरुस्ती सुचवली

होती, पण ती मंजूर झाली नाही; मिल पार्लमेंटचा सभासद असताना कामगारांच्या सभा भरविण्याच्या हक्कावरून एकदा पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्याची त्याने आत्मवृत्तात हकिकत दिली आहे. कामगारांनी लंडनमधील हाइड पार्कमधे भरवलेली एक सभा पोलीसांनी उधळून लावली होती. त्या झटापटीत काही कामगारांना मारझोड झाली. त्यामुळे कामगार फार संतप्त झाले. त्यांनी काही दिवसानंतर त्याच ठिकाणी पुन्हा सभा घेण्याचे ठरवले. सरकारने ती सभा होऊ द्यावयाची नाही असे ठरवले व जरूर तर त्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याचा निश्चय केला. सार्वजनिक शांततेच्या दृष्टीने कामगार व लष्करी शिपाई यांच्यामधील हा संघर्ष टाळणे आवश्यक होते. मिलने कामगार पुढाऱ्यांशी वाटाघाटी करून तो संघर्ष टाळला. कामगार पुढाऱ्यांचा त्याच्यावर विश्वास होता. पोलीसांच्या दुर्वर्तनाचा त्याने अगोदरच निषेध केलेला होता व कामगारांच्या सभा भरविण्याच्या हक्काचे जोरदार समर्थन केले होते; त्यामुळे कामगार पुढाऱ्यांनी ती सभा न भरविण्याचा त्याचा सल्ला मानला आणि त्यामुळे संघर्ष टळला. संघर्ष टाळल्याबद्दल मागाहून सरकारने मिलचे उघडपणे आभार मानले. काही दिवसानंतर हाइड पार्कमधील सभांवर बंदी घालणारे एक विधेयक सरकारने पुढे आणले. मिलने व त्याच्या मित्रांनी विधेयकाला विरोध केला. ते विधेयक अखेर मंजूर झाले नाही.

पार्लमेंटचा सभासद म्हणून मिलने आणखी एक मोठी कामगिरी केली. ती म्हणजे जमेकामधे नीग्रो लोकांवर जे अत्याचार झाले त्यांना वाचा फोडण्याची. इंग्रजी अधिकाऱ्यांच्या जुलमामुळे संतप्त झालेल्या जमेकामधील नीग्रो प्रजेने लहानसे बंड उभारले होते. बंड तेव्हाच दडपून टाकण्यात आले. बंड दडपून टाकताना आणि त्यानंतर इंग्रजी अधिकाऱ्यांनी अनेक अत्याचार केले. लष्करी कारवाईत शेकडो नीग्रो प्राणाला मुकले. त्यानंतर लष्करी कोर्टे स्थापन करण्यात आली. कोर्टांनी अनेक पुरुषांना व बायकांना फटक्यांच्या, तुरुंगवासाच्या व देहांताच्या अमानुष शिक्षा दिल्या. सुरवातीला

या अनाचाराविरुद्ध इंग्लंडमध्ये कुणी आवाज उठवला नाही. मागाहून काही जणांची सदसद्विवेक बुद्धी जागृत झाली आणि त्यांनी या प्रकरणाचा निषेध करण्यासाठी एक समिती स्थापन केली. जमेका समिती असे तिला नाव देण्यात आले. मिल तावडतोब त्या समितीचा सभासद झाला. काही दिवसानंतर त्याची अध्यक्ष म्हणून निवड झाली. समितीने लोकमत जागृत केले आणि मग गव्हर्नर आयर व त्याच्या हाताखालील इतर अधिकारी यांचा निषेध होऊ लागला. त्यांच्यावर फौजदारी कोर्टात खटले भरण्याचेही प्रयत्न झाले. पण ते यशस्वी ठरले नाहीत. या सर्व कामात मिलने प्रामुख्याने भाग घेतला. पार्लमेंटमधे त्याने या प्रकरणाविषयी अनेक प्रश्न विचारले. १८६६ मधे त्यावर पार्लमेंटमधे चर्चा झाली. त्यावेळी केलेले भाषण हे पार्लमेंटमधे केलल्या आपल्या भाषणांपैकी उत्कृष्ट भाषण अशी मिलची समजूत होती. त्याचे हे काम लोकप्रिय स्वरूपाचे नव्हते. नीग्रो सारख्या मागासलेल्या लोकांवर परदेशात केलेल्या अत्याचाराबद्दल इंग्रजी अधिकाऱ्यांविरुद्ध स्वदेशी फौजदारी कोर्टात खटले चालावे ही गोष्ट इंग्रजी जनतेला आवडणारी नव्हती. जनतेच्या रागाची पर्वा न करता मिल आपल्याला जे योग्य वाटले ते करीत राहिला. या काळात त्याला धमकीची खूप निनावी पत्रे येत. काहींनी तर त्याला ठार मारण्याची धमकी दिली होती. या धमक्यांनी मिल आपल्या नियोजित कार्यापासून विचलित झाला नाही हे वेगळे सांगावयास पाहिजे असे नाही.

याखेरीज इतर जी कामे मिलने केली त्यामधे तीन गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे आरोपी प्रत्यर्पण कायद्यामधे ( Extradition Act ) त्याने घडवून आणलेली दुरुस्ती. गुन्हा जर राजकीय स्वरूपाचा असेल तर गुन्हेगाराला त्याच्या देशातील शासनाच्या विनंतीवरून त्या शासनाच्या हवाली करू नये हा मिलचा आग्रह होता. १८६६ मधे तो पार्लमेंटमधे असताना त्या आग्रहाला मान्यता मिळाली नाही, परंतु मागाहून जी चर्चा झाली तिच्यामधे असे ठरले की ज्याच्या

प्रत्यर्पणा ( extradition ) बद्दल मागणी केली असेल त्याला इंग्रजी कोर्टा-मधे आपला गुन्हा राजकीय स्वरूपाचा आहे हे सिद्ध करण्याची संधी दिली जावी. कायद्यामधे नंतर ही दुरुस्ती झाली. तिचे सारे श्रेय खास समितीमधे ( select committee ) मिलने जे काम केले त्याला दिले पाहिजे. या दुरुस्तीमुळे युरपमधील राजकीय क्रांतिकारकांना पूर्वीप्रमाणे इंग्लंडमधे आश्रयासाठी येण्याची सोय झाली. डिझ्राएली सरकारने १८६८ साली पार्लमेंटमधे सादर केलेल्या लाचलुचपतविरोधी विधेयकात ( Bribery Bill ) दुरुस्त्या सुचवण्याचे जे कार्य केले ती दुसरी गोष्ट. या कामामधे मात्र मिलला यश प्राप्त झाले नाही. विधेयकामधे सुधारणा सुचवून निवडणुकामधे जी लाचलुचपत होते ती थांबवावी असा त्याचा हेतू होता. टोरीपक्षाला त्या सुधारणा पसंत नव्हत्या. उदारमतवादी सदस्यांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यांची सारी मदार होती ती गुप्त मतदान पद्धतीवर. त्यामुळे निवडणुकीतील गैरप्रकार कायद्याने थांबवणे या गोष्टीचे त्यांना महत्त्व वाटले नाही. परिणाम असा झाला की पुढच्या निवडणुकीत मतदारांची संख्या वाढली पण त्याच्या बरोबरीने गैरप्रकारही वाढले. तिसरी महत्त्वाची गोष्ट मिलने केली ती म्हणजे स्त्रियांना मताचा अधिकार मिळावा याबद्दलच्या चळवळीला त्याने चालना दिली. सुधारणा कायद्याच्या चर्चेच्या वेळी स्त्रियांचा मतदारात समावेश व्हावा या आशयाचा अर्ज त्याने पार्लमेंटला सादर केला होता. अर्जावर अनेक नामवंत स्त्रीपुरुषांच्या सह्या होत्या. पार्लमेंटमधील चर्चेच्या वेळी मागणीला अपेक्षेबाहेर पाठिंबा मिळाला. त्यामुळे मागणीच्या पुरस्कर्त्यांना धीर आला आणि तिच्या प्राप्तीसाठी देशव्यापी स्वरूपाची जनजागृती करण्याच्या हेतूने त्यानी एक संस्था स्थापन करण्याचे ठरविले. 'स्त्री मताधिकार समर्थक राष्ट्रीय संस्था' ( National Society for Women's Suffrage ) या नावाने ती संस्था १८६८ मधे स्थापन झाली. ही संस्था स्थापन करून तिचे कार्य वाढविण्यामधे मिलची मुलगी हेलन टेलर हिने मोठे काम केले. मिलचा

संस्थेशी संबंध होता म्हणून अनेक वजनदार स्त्रीपुरुषांनी तिला पाठिंबा दिला. संस्थेचे काम मोठ्या उत्साहाने चालले. तरीदेखील फळ पदरात पडायला आणि स्त्रियांना मताचा अधिकार मिळायला आणखी पन्नास एक वर्षे थांबावे लागले.

पार्लमेंटच्या कामामधे गुंतल्यामुळे मिलला त्या काळात लेखन असे फारसे करता आले नाही. तरी नियतकालिकासाठी त्याने काही लेख लिहिले. दुसरे एक महत्त्वाचे काम त्याने केले ते म्हणजे जेम्स मिलच्या मनोव्यापारांचे पृथक्करण या विषयावरील लेखांचे संपादन व प्रसिद्धीकरण. पित्याचे आपल्यावरील मोठे ऋण थोड्याबहुत प्रमाणात फेडण्याचा मिलचा हा प्रयत्न होता. या काळात त्याचा पत्रव्यवहारही खूप वाढला होता. अनेक गोष्टींबद्दल अनेक लोक त्याला पत्रे लिहीत; आणि त्यांपैकी महत्त्वाच्या पत्रांना मिल उत्तरे देई. पत्रव्यवहार संभाळण्याच्या कामात त्याला हेलन टेलरची खूप मदत झाली. पुष्कळशा पत्रांवर मिलची सही असली तरी बरीचशी पत्रे हेलनने लिहिलेली असत असे आत्मवृत्तावरून कळते. पत्रव्यवहाराचा बराचसा भाग नंतर प्रसिद्ध झाला. याच काळात सेंट अँड्र्यूज विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रेक्टर म्हणून मिलची निवड केली. त्या नात्याने विद्यार्थ्यांसमोर त्याने जे भाषण केले ते त्याच्या भाषणांपैकी महत्त्वाचे भाषण आहे. या भाषणात शिक्षणाच्या प्रश्नावरील आपली मते मिलने विशद केली आहेत.

१८६८ साली पार्लमेंटची नवी निवडणूक झाली. निवडणुकीमधे मिल वेस्टमिन्स्टर मतदार संघामार्फत उभा राहिला होता. निवडणूक त्याने आपल्या तत्त्वानुसार लढवली. निवडणुकीमधे तो यशस्वी झाला नाही. टोरी पक्षाचा तर त्याला विरोध होताच, पण उदारमतवादी (Liberal) पक्षही त्याच्यावर खूष नव्हता. पार्लमेंटमधे त्याने वेळोवेळी केलेली भाषणे व काम पक्षाच्या कार्यक्रमाच्या चौकटीत बसणारे नव्हते. याखेरीज चार्लस ब्रॅडलॉ याच्या निवडणूक निधीला त्याने मदत केली हे देखील एक

कारण घडले. ब्रॅडलॉ निरीश्वरवादी व धर्मरूढीविरोधी म्हणून उदारमतवादी पक्षाला तो मान्य नव्हता. उमेदवाराने स्वतः निवडणुकीसाठी खर्च करू नये या आपल्या मतानुसार मिलने कामगार उमेदवारांना निवडणुकीच्या खर्चासाठी काही मदत पाठवली होती. तशीच मदत त्याने ब्रॅडलॉला पाठवली होती. कारण ब्रॅडलॉबद्दल त्याच्या प्रामाणिकपणामुळे व समाज-सेवेच्या कळकळीमुळे मिलला आदर होता. पण स्वतःच्या निवडणुकीच्या कार्यात त्याला ती मदत बाधक ठरली. ब्रॅडलॉ नंतर इंग्रजी राजकारणात खूप गाजला. भारताबद्दल त्याला फार कळकळ होती. भारतीय प्रश्नांचा तो पार्लमेंटमधे इतक्या हिरिरीने प्रचार करी की भारताचा सभासद (Member for India) असा त्याचा लौकिक झाला. १८८९ साली भारतामधे येऊन त्याने भारतीय प्रश्नांचा अभ्यास केला. डॉ. ॲनी बेझंट ही त्याची सहकारी व प्रिय शिष्या. राजकीय चळवळीच्या संघटनेबद्दल ती जे ब्रॅडलॉकडून शिकली ते तिने नंतर भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या चरणी वाहिले. निवडणुकीतील पराजयामुळे मिलला विशेष वाईट वाटले नाही. पार्लमेंटमधील कामापेक्षा आपले वाचन, चिंतन व लेखन अधिक बरे असे त्याला अलिकडे वाटू लागले होते. त्यामुळे पराजयानंतर दोन तीन खात्रीच्या जागा त्याला देऊ केल्या गेल्या, परंतु त्याने त्या स्वीकारल्या नाहीत.

पार्लमेंटच्या कामातून मोकळा झाल्यानंतर दक्षिण फ्रान्समधील एव्हिनन (Avignon) गावी त्याने घर बांधले होते तिथेच तो बहुतांशाने राहिला. लंडनला तो वर्षातून एकदोनदा जाऊन यायचा. या वानप्रस्थाश्रमाच्या काळात त्याला सोबत केली ती त्याच्या मुलीने, हेलन टेलरने. तिच्या बुद्धिमत्तेबद्दल, तिच्या ज्ञानाबद्दल आणि तिच्या कार्यनैपुण्याबद्दल मिलच्या मनात आदरमिश्रित कौतुकाची भावना होती. ती त्याला पत्रव्यवहाराच्या बाबतीत व इतर लेखनात मदत करी. या काळात मिलने नवीन कामे अंगावर घेतली नाहीत. तरुण मंडळींना

उत्तेजन देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे कार्य मात्र सतत चालू होते. वैचारिक जगामधे त्याला मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. बुद्धिवादाचा व पुरोगामी प्रवृत्तींचा महर्षी म्हणून नवीन पिढी त्याच्याकडे पहात होती. त्याचेही जागतिक घटनांकडे सदोदित लक्ष असे आणि समाजहितकारक असे जे जे घडेल त्याचे अभिनंदन करून त्याला पाठिंबा द्यायला तो कधीही चुकला नाही. अशा रीतीने जरा अलिप्तपणे कालक्रमणा करीत असताना त्याचा जुना रोग बळावला आणि ८ मे १८७३ रोजी त्याने त्याचा बळी घेतला. एकोणिसाव्या शतकाच्या विचारविश्वातील एक अत्यंत तेजस्वी तारा निखळून पडला. तारा निमाला तरी त्याचा प्रकाश निमाला नाही. त्या प्रकाशाची स्निग्ध सुंदर प्रभा सबंध जगभर फाकली असून आजच्या युगातील बुद्धिवादी व मानवतावादी प्रवृत्तींना ती मार्गदर्शन करीत आहे.

मिलने विपुल लेखन केलेले आहे, त्याच्या लेखनाकडे पाहिले की त्याची बुद्धी कशी सर्वंकश होती त्याची उत्तम कल्पना येते. अर्थशास्त्र व राजकारण या विषयांवरील त्याची पुस्तके फार प्रसिद्ध आहेत. पण तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व इतिहास यावर देखील त्याने मौलिक स्वरूपाचे ग्रंथ लिहिले आहेत. या खेरीज साहित्यामधेही त्याची चांगली गती होती. वर्डस्वर्थ, कार्लाइल, कॉलेरिज इत्यादी प्रख्यात साहित्यिकांवरील त्याचे लेख त्याच्या रसिकतेची व विदग्ध बुद्धिमत्तेची चांगली साक्ष देतात. तो सर्व-शास्त्रपारंगत असा पंडित होता; आणि पांडित्याबरोबर त्याच्या ठिकाणी श्रेष्ठ दर्जाची सहृदयताही होती. म्हणून एकोणिसाव्या शतकातील अत्यंत सुसंस्कृत मनुष्य अशी त्याची ख्याती आहे. काही अभ्यासकांनी तर त्याची ॲरिस्टॉटलशी तुलना करून इंग्रजी इतिहासातील व्हिक्टोरिया राणीच्या युगातील ॲरिस्टॉटल म्हणून त्याला गौरविले आहे.

मिल सहृदय पंडित होता तसाच तो क्रियाशील समाजसुधारक होता. समाजसुधारणेचे तत्त्वज्ञान तर त्याने सांगितलेच पण समाज-

सुधारणेच्या प्रत्यक्ष कार्यातही त्याने वेळोवेळी भाग घेतला. मिलचा संततिनियमनावर भर होता. लंडनच्या कामगार वस्तीत संततिनियमना-बद्दलची पत्रके वाटली म्हणून त्याला एकदा तरुणपणी अटक झाली होती. या लहान गोष्टीचा उल्लेख करण्याचे कारण एवढेच की एखादी गोष्ट मनाला पटली की ती सिद्धीस जावी म्हणून मिल जरूर ते प्रत्यक्ष कार्य करण्यास नेहमी तयार असे. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीच्या बाबतीत तेच घडले. त्या कार्यासाठी त्याने आपली लेखणी व वाणी आमरण झिजवली; एवढेच नव्हे तर मरणापूर्वी काही वर्षे त्या कामासाठी म्हणून त्याने एक वेगळी संस्था काढली आणि आपल्या प्रतिष्ठेच्या बळावर तिला मानमान्यता मिळवून दिली. वसाहतवादाला त्याचा पहिल्यापासून विरोध होता. म्हणून कॅनडाच्या बाबतीत लॉर्ड डरहम याने ज्या सूचना केल्या त्याला त्याने सक्रिय पाठिंबा दिला आणि शासनाने त्यांचा स्वीकार करावा म्हणून जोराची खटपट केली. पददलित व मागासलेल्या समाजा-विषयी त्याला फार कळकळ वाटत असे आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायामुळे त्याच्या मनाला पीळ पडत असे. जमैकामधील नीग्रो समाजा-वर झालेल्या अत्याचाराविरुद्ध दाद मागण्यासाठी इंग्लंडमधे त्याने जी चळवळ उभारली तिच्यामधे त्या मन:स्थितीचे प्रत्यंतर आढळते. ती चळवळ उभारून लोकप्रियता मिलच्या पदरात पडली नाही. उलट सत्ताधारी वर्गाचा राग त्याने आपल्यावर ओढवून घेतला. परंतु अन्यायाविरुद्ध झगडणे हे त्याच्या रक्तात इतके भिनले होते की लोकांच्या रोषाला न घाबरता त्याने ती चळवळ उभारली. आयर्लंडमधील जनतेचा आणि विशेषेकरून शेतकऱ्यांचा त्याने पाठपुरावा केला तोदेखील मनाच्या त्या ओढीमुळे. कामगाराबद्दल सहानुभूती दाखवणे अगर कामगार कार्यकर्त्यांशी स्नेहसंबंध ठेवणे त्या काळात प्रतिष्ठित समजले जात नसे. परंतु मिलने दोन्ही गोष्टी केल्या. कारण मानवी समतेवर त्याचा विश्वास होता आणि कामगारवर्गाची उन्नती केल्याखेरीज समाजाची प्रगती साधणार नाही अशी त्याची धारणा

होती. कामगारांच्या सहकारी संस्थांना त्याने आपल्यापरीने खूप मदत केली. याचाच अर्थ हा की मिल केवळ तत्त्वांचा उद्घोष करून थांबला नाही; त्याने त्या तत्त्वानुसार वर्तनही केले.

मिलच्या सर्व मतांचा किंवा सिद्धांतांचा या ठिकाणी ऊहापोह करणे शक्य नाही. ते करावयाचे म्हणजे वेगळा स्वतंत्र ग्रंथच लिहावयास हवा. इथे योजिले आहे ते एवढेच की मिल या व्यक्तीची जशी थोडक्यात माहिती दिली तशीच त्याच्या महत्त्वाच्या विषयांवरील मतांची थोडी तोंडओळख करून द्यावी. मतांची तोंडओळख करून द्यावयाची म्हणजे त्याच्या जीवनाचे तत्त्वज्ञान ज्यात सामावले आहे त्या उपयुक्ततावादापासूनच सुरवात केलेली उत्तम. मिलने आयुष्याच्या सुरवातीला उपयुक्ततावाद स्वीकारला तो त्याने आमरण सोडला नाही. बेंथम व जेम्स मिल यांनी पुरस्कारिलेला तो सिद्धांत त्याला संकुचित वाटला, म्हणून त्याने त्यात भर टाकली; पण उपयुक्ततेचे तत्त्व त्याने कधीही सोडले नाही.

उपयुक्ततावादावरील आपले विचार मिलने उपयुक्ततावाद (Utilitarianism) या पुस्तकात विस्ताराने सांगितले आहेत. उपयुक्ततावाद म्हणजे कृत्ये सुखकारक आहेत की दुःखकारक आहेत यावरून त्यांची इष्टानिष्टता अजमावण्याचा सिद्धांत. ते कृत्य अधिक चांगले की ज्याच्या योगाने अधिकात अधिक लोकांचे अधिकात अधिक सुख साधते. वरवर पाहता सिद्धांत सोपा वाटतो, पण जरा विचार केला की व्यवहाराच्या दृष्टीने त्याच्यामधे ज्या अनेक अडचणी आहेत त्या ध्यानात येतात. सुख म्हणजे काय ? केवळ शारीरिक सुख, की बौद्धिक व भावनिक सुखाचाही त्यात अंतर्भाव होतो ? सुख कुणाचे, व्यक्तीचे की समाजाचे ? सुख अजमावयाचे कसे ? सुखाचा हव्यास, हेच का पुरुषार्थाचे उद्दिष्ट ? मग काही माणसे स्वतःच्या सुखावर अंगार ठेवून दुसऱ्यांच्या किंवा समाजाच्या सुखासाठी झटत राहतात आणि ती वरिष्ठ दर्जाची माणसे आहेत असे

समजले जाते, त्याचा अर्थ कसा लावायचा ? सुख हेच जीवनाचे उद्दिष्ट आहे असे का मानावयाचे ?

मिलने या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. ती देताना काही बाबतीत तो बेंथम व जेम्स मिल यांनी घालून दिलेल्या मर्यादांच्या पलीकडे गेला आहे. सुखाच्या व्याख्येमधे तो शारीरिक सुखांच्या बरोबरीने बौद्धिक, मानसिक व भावनात्मक सुखांचाही अंतर्भाव करतो. मनुष्य जसा सुसंस्कृत होतो तसा तो शारीरिक सुखापेक्षा इतर सुखांना अधिक मूल्य देतो असे मिलचे म्हणणे आहे. बेंथम व जेम्स मिल यांच्या हिशेबी भावनांना विशेष महत्त्व नव्हते. मिल त्यांना महत्त्व देतो, एवढेच नव्हे तर भावनांचा आविष्कार व परिपोष करणारे जे कवी व साहित्यिक त्यांना त्याच्या दरबारात मोठे मानाचे स्थान आहे. समाजाच्या सुखापेक्षा तो व्यक्तीच्या सुखावर अधिक भर देतो. सुख अनुभवता येते ते व्यक्तीला, समाजाला नव्हे; म्हणून व्यक्तींची सुखासाठी जी धडपड चाललेली असते त्यातूनच समाजाचे सुख साधते असा त्याचा निष्कर्ष आहे. प्रत्येक व्यक्ती केवळ आपल्या सुखासाठी झटते असे नव्हे; आपल्या परिवाराच्या, आजूबाजूच्या मंडळींच्या, सुखासाठीही ती झटते. कारण त्यांच्या सुखावर आपले सुख अवलंबून आहे हे तिला कळते. परिवाराचा परिघ हलके हलके वाढत जातो आणि त्यामुळे केवळ संकुचित स्वार्थाकडे पाहण्याची बुद्धी कमी होते. संस्कारामुळे, सवयीमुळे व शिक्षणामुळे माणसाच्या ठिकाणी इतरांच्या सुखासाठी झटण्याची ही प्रवृत्ती निर्माण करता येते आणि त्यातच नंतर मनुष्य स्वतःचे सुख शोधू लागतो. माणसे सुसंस्कृत होतात तसतशी ही प्रवृत्ती वाढीला लागते. उपयुक्तता हे मूळ उद्दिष्ट; त्यातून अधिकांचे अधिक सुख साधणे हा नीतिनियम निर्माण होतो; माणसे स्वतःच्या सुखासाठी सवयीने वा जाणीवपूर्वक त्या नियमांचे परिपालन करतात; आणि त्यामुळे समाजाची प्रगती होते असा मिलचा सर्वसाधारण सिद्धांत आहे.

मिल सुखांची प्रतवारी करतो. काही सुखे हलक्या दर्जाची असतात, तर काही वरच्या. मनुष्य खालच्या दर्जाच्या सुखापेक्षा वरच्या दर्जाची सुखे पसंत करतो. मिलने लिहिले आहे : "संतुष्ट डुकरापेक्षा असंतुष्ट मनुष्य होणे चांगले; संतुष्ट मूर्खापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटिस होणे चांगले" ( It is better to be a human being dissatisfied than a pig satisfied; better to be Socrates dissatisfied than a fool satisfied. *Utilitarianism* p. 197 ). माणसाच्या ठिकाणी जी प्रतिष्ठेची भावना ( sense of dignity ) आहे तिच्यामुळे मनुष्य आपण होऊन ही निवड करतो. वरिष्ठ दर्जाच्या सुखांची ओढ त्याच्या मनात उत्पन्न होते. जास्त लोकांच्या मनात ती ओढ निर्माण झालेली नाही व त्या ओढीनुसार सर्वांना आपले वर्तन ठेवता येत नाही याचे कारण म्हणजे आजचे भिकार शिक्षण व भिकार समाजव्यवस्था ( wretched education and wretched social arrangements. *Utilitarianism* p. 200 ). आजच्या समाजामधे जे दारिद्र्य आणि दुःख आहे, की ज्यांच्यामुळे बहुसंख्य लोकांना आपल्या मनाचा विकास करता येत नाही, ते मानवी प्रयत्नांनी दूर करता किंवा निदान मोठ्या प्रमाणात कमी करता येण्यासारखे आहे. उदारमनस्क अशा पुष्कळांना त्या प्रयत्नातच सुख लाभते. म्हणून उपयुक्ततावादामधे देखील निःस्वार्थ समाजसेवेला मानाचे स्थान आहे. मनुष्य समाजामधे जन्माला येतो आणि वाढतो. नाना तऱ्हेच्या नात्यांनी तो समाजाशी बांधला जातो आणि मग त्याचे सुख आणि समाजाचे सुख यांच्यामधे परस्परावलंबी संबंध निर्माण होतात. समाजाची जसजशी निरोगी वाढ होते तसतसे इतरांच्या सुखाकडे लक्ष पुरविण्यातच आपले हित आहे असे प्रत्येकाला वाटू लागते. इतरांबद्दलची सहानुभूती प्रत्येकाच्या मनात निर्माण होते. माणूस व इतर प्राणी यांच्यामधे दोन महत्त्वाचे भेद आहेत. एक हा की माणसाला मुलाबाळापुरतीच नव्हे तर सबंध मनुष्यजातीबद्दलही सहानुभूती वाटू शकत.

आणि दुसरा हा की बुद्धीची वाढ झाल्याकारणाने स्वतःबद्दल किंवा इतराबद्दल वाटणाऱ्या भावनांना व्यापक स्वरूप देता येते. या गुणामुळे माणसाला समाजाशी समरस होता येते आणि समाजाला जे वर्तन बाधक ते आपल्यालाही बाधक ही कल्पना त्याच्या ठिकाणी वाढते. समाजामधे प्रत्येकाला सुखाचा सारखा हक्क आहे. याचाच अर्थ हा की सुखाची साधने सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजेत. आजच्या समाजात हे घडत नाही, कारण काही सामाजिक रूढी किंवा संस्था यांच्यामुळे अथवा समाजाच्या काही अडचणींमुळे ही समानता अद्याप प्रस्थापित झालेली नाही. पण मिलचा असा विश्वास आहे की जसजसा समाज प्रगत होईल, बुद्धिवाद व मानवता वाढेल तसतशी समानता अधिकाधिक प्रमाणात प्रस्थापित होईल. त्याने लिहिले आहे : "समाजाच्या स्थैर्यासाठी ज्या रीतीभाती व संस्था एकेकाळी अत्यावश्यक समजण्यात आल्या त्यांचा कालांतराने सर्वजण जुलमी व न्यायविरोधी रूढी व संस्था असा धिक्कार करू लागतात असे समाजसुधारणेच्या इतिहासावरून दृष्टीस पडते. गुलाम आणि स्वतंत्र मनुष्य, उमराव आणि भूदास (serf), उच्च कुळीचे आणि गरीब माणसे यांच्यामधील भेदभावाबद्दल ते घडून आले आहे. वर्ण, वंश आणि लिंगभेद यांच्यावर आधारलेल्या उच्चता व नीचता या कल्पनांच्या बाबतीतही ते लवकरच घडून येईल, थोडबहुत आजही घडून आले आहे." (The entire history of social improvement has been a series of transitions by which one custom or institution after another from being a supposed primary necessity of social existence, has passed into the rank of an universally stigmatised injustice and tyranny. So it has been with the distinctions of slaves and freemen, nobles and serfs, patricians and plebeians; and so it will be, and in part already is, with the aristocracies of colour, race and sex",

*Utilitarianism*, p. 247 ). मिलची ही कल्पना आजदेखील प्रत्यक्षात अवतरलेली दृष्टीस पडत नाही. परंतु त्याला ती कल्पना सुचली आणि नजीकच्या काळात घडून येणारी एक घटना म्हणून त्याने तिचा उल्लेख केला यातच त्याच्या मनाच्या मोठेपणाची व दुर्दम्य आशावादाची साक्ष सापडते.

राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर मिलने पुस्तके लिहिली. पण या सर्व विषयांकडे तो पहात असे तो नीतिशास्त्राच्या दृष्टि-कोनातून. नीतिशास्त्र हे त्याच्या साऱ्या विचारमंथनाचे सूत्र. उपयुक्तता-वादाचा त्याने स्वीकार केला तो नीतिशास्त्राचा आधार म्हणून. त्या वादाच्या आधाराने समाजाला उपयुक्त असे नीतिनियम त्याला शोधायचे होते. समाज गतिमान् असतो, त्यामुळे समाजाच्या परिस्थितीनुसार नीति-नियम बदलतात असे त्याचे मत होते. नीतिनियमांना निसर्गाचा आधार शोधण्यात हशील नाही. निसर्ग या शब्दाचे मुख्यत्वेकरून दोन अर्थ आहेत. एक हा की निसर्ग म्हणजे बाह्य किंवा आंतर जगात विद्यमान असलेल्या सर्व शक्ती आणि शक्तीमुळे घडून येणारे सारे व्यवहार. दुसरा अर्थ हा की घडून येणारे सारे व्यवहार नव्हेत तर मनुष्याच्या स्वेच्छेने अगर जाणीवपूर्वक केलेल्या हस्तक्षेपाखेरीज घडून आलेले सारे व्यवहार. ( In one sense, it means all the power existing in either the outer or the inner world and everything which takes place by means of those powers. In another sense it means, not everything which happens but only what takes place without the agency, or without the voluntary and intentional agency, of man. *Nature* p. 370 ). या दोन अर्थानुसार निसर्गाची व निसर्गाला आधारभूत धरून सुचवण्यात आलेल्या नीतिनियमांची चिकित्सा करून मिल जो निष्कर्ष काढतो तो येणेप्रमाणे : " पहिला अर्थ गृहीत धरला तर माणसाने निसर्गाचे अनुकरण केले पाहिजे हा सिद्धांत निरर्थक आहे. कारण

माणसाला निसर्गाचे अनुकरण करण्याखेरीज दुसरे काही करताच येत नाही. त्याची सर्व कृत्ये जी घडतात ती निसर्गाच्या भौतिक व मानसिक नियमानुसार व त्यांच्या प्रेरणेने. दुसरा अर्थ जर घेतला तर माणसाने निसर्गाचे अनुकरण करावे किंवा निसर्गामधे जे आपाततः घडते त्याला आपल्या स्वेच्छेने केलेल्या कृतींचा आदर्श म्हणून मानावे. हा सिद्धांत जितका अविचारी (irrational) तितकाच अनैतिक आहे हे दृष्टीस पडेल. अविचारी म्हणण्याचे कारण असे की मनुष्य जेव्हा कोणतीही कृती करतो तेव्हा तिच्या योगाने निसर्गाची सहज प्रवृत्ती बदलते आणि त्याच्या चांगल्या कृतीमुळे त्या प्रवृत्तीत हितावह असा बदल होतो. अनैतिक या कारणा-मुळे की माणसाने ज्या गोष्टी केल्या तर सर्वांच्या दृष्टीने त्या तिरस्करणीय ठरतील त्या गोष्टी निसर्गक्रमामधे हरघडी घडत असतात. एखाद्या माणसाने आपल्या वर्तनात निसर्गात जे घडते त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला तर तो दुष्टातील दुष्ट मनुष्य असे सर्वांच्या दृष्टीस पडेल व सर्वांना ते मानावे लागेल." (In the first of these senses, the doctrine that man ought to follow nature is unmeaning, since man has no power to do anything else than follow nature; all his actions are done through and in obedience to some one or many of nature's physical or mental laws. In the other sense of the term, the doctrine that man ought to follow nature or, in other words, ought to make the spontaneous course of things the model of his voluntary actions is equally irrational and immoral : Irrational, because all human action consists in altering, and all useful action in impro-ving, the spontaneous course of nature : Immoral, because the course of natural phenomena being complete with everything which when committed by human beings is most worthy of abhorrence, anyone

who endeavoured in his actions to imitate the natural course of things would be universally seen and acknowledged to be the wickedest of men. *Nature* p. 401 ). निसर्गाला दयामाया नसते. मारणे व मरणे हे त्याच्या पाचवीला पुजलेले असते. इष्ट, अनिष्ट, सुंदर, असुंदर याचा विचार न करता निसर्गाचे विध्वंसाचे कार्य चालू असते. निसर्गाकडून निमिषार्धात जो दुष्टपणा घडून येतो तो मानवांना शतकानुशतकही करता येणार नाही. अशा तऱ्हेचे बुद्धिवादाला पटणारे पण निसर्गभक्तांना बोचणारे स्पष्ट विचार मिलने निसर्ग (*Nature*) या निबंधात ठिकठिकाणी विखुरले आहेत. संस्कृतीची, कलाकौशल्याची वाढ होते ती निसर्गाचे अनुकरण करून नव्हे, तर निसर्गाचे जे नियम आहेत ते बदलून. तसेच मनुष्य सुसंस्कृत बनतो तो निसर्गदत्त भावनांना मोकळा वाव देऊन नव्हे, तर त्यांना बुद्धीच्या नियंत्रणाखाली आणून. निसर्गामधे चांगले आणि वाईट, खरे आणि खोटे हा विचार नाही. तो विचार माणसाला निर्माण करावा लागतो, असे मिलचे म्हणणे आहे.

नीतीला निसर्गात जसा आधार सापडत नाही तसाच तो धर्मात किंवा देवाच्या कल्पनेतही सापडत नाही. मिल पहिल्यापासूनच निधर्मी वातावरणात वाढला. त्याच्या बापाचा धर्मावर अगर देवावर विश्वास नव्हता. मिलला धार्मिक कल्पना झुगारून द्याव्या लागल्या नाहीत. त्या त्याच्या मनात कधी रुजल्याच नव्हत्या. आपल्या बापाच्या धर्माबद्दलच्या व देवाबद्दलच्या मतांची त्याने आत्मचरित्रात माहिती दिली आहे. तीच निःसंशय त्याचीही मते होती. " नीतीचा मोठा शत्रू या दृष्टीने तो धर्माकडे पहात असे. मनुष्यजातीच्या कल्याणाशी ज्यांचा संबंध नाही अशा संप्रदायांचे, भक्तिभावनेचे व समारंभांचे धर्म स्तोम माजवतो व खऱ्या सद्‌गुणाऐवजी त्या भ्रामक समजुतींचा माणसापुढे आदर्श ठेवतो हा त्याचा पहिला आक्षेप होता. दुसरे म्हणजे धर्मामुळे नीतीचा दर्जा खालावतो. कारण नीती म्हणजे देवाच्या मर्जीप्रमाणे काम करणे असे धर्म सांगतो.

देवाची धर्म नानातऱ्हेने स्तुती करतो. पण प्रत्यक्षात त्याचे जे वर्णन केले जाते त्यावरून देव म्हणजे अत्यंत द्वेषार्ह अशी शक्ती असे दृष्टीस पडते." [ He looked upon it ( religion ) as the greatest enemy of morality : first, by setting up fictitious excellencies, belief in creeds, devotional feelings, and ceremonies not connected with the good of human kind,- and causing these to be accepted as subtitutes for genuine virtues : but above all, by radically vitiating the standard of morals; making it consist in doing the will of a being, on whom it lavishes indeed all the phrases of adulation, but in sober truth it depicts as eminently hateful. *Autobiography*, p. 32 ]. परमेश्वर कनवाळू आणि सर्वशक्तिमान् तर त्याने जगामधे एवढे दुःख, दारिद्र्य आणि हिंसा का निर्माण केली असे तो नेहमी विचारत असे. परमेश्वर एक तर सर्वशक्तिमान् नाही किंवा तो कनवाळू नाही असा त्याचा निष्कर्ष होता. परमेश्वर जर कनवाळू असता तर जगामधे जी रोगराई आहे, अन्याय आहे व जुलूम जबरदस्ती आहे ती त्याने कशी चालू दिली असे तो नेहमी विचारत असे. मिलच्या इतर लेखनातही हे विचार अनेक वेळा आलेले आहेत. विश्वाचा उद्‌भव कसा झाला हे आपल्याला माहीत नाही, पण ते माहीत नाही म्हणून सर्वसाक्षी, सर्वज्ञानी, सर्वशक्तिमान परमेश्वराने ते निर्माण केले असे मानण्याचे कारण नाही. पशुपक्ष्यांच्या जगामधे जी महाभयंकर हिंसा व जुलूमजबरदस्ती चालू असते ती पाहिली की त्या जगाचा निर्माता मोठा दुष्ट आणि निर्घृण असला पाहिजे असे वाटू लागते. मनुष्यसमाजामधे हिंसेला व जुलूमजबरदस्तीला आळा पडला आहे, कारण माणसाने निसर्गावर मात करून आपल्या बुद्धीने समाजधारणेचे नवे नियम केले. म्हणून समाज प्रगत होतो तसतसे हे नियम सुधारतात आणि ते अधिकाधिक व्यापक होतात. धर्माचे

ऐतिहासिक महत्त्व मिल नाकारत नाही. एकेकाळी परमेश्वरप्रणीत व धर्म-विहित म्हणूनच माणसे नीतिनियम मानत असत. परंतु आता एकतर समाज पुष्कळ सुधारला आहे व दुसरे म्हणजे धर्मावरील लोकांचा विश्वास खूप कमी झाला आहे; म्हणून नीतिनियमांना वेगळा आधार शोधला पाहिजे अशी मिलची भूमिका आहे. मिलला तो आधार सापडला सामाजिक उपयुक्ततेच्या ( social utility ) सिद्धांतामधे. समाजाच्या उपयुक्ततेला म्हणजेच कल्याणाला जे उपकारक ते नीतिमान असा त्याने निष्कर्ष काढला.

अलौकिक ( transcendantal ) किंवा अद्भुत कल्पनांवर आधारलेला धर्म मिलला पसंत नव्हता; परंतु धर्मामुळे व्यक्तीला व समाजाला जी शिकवण मिळते तिला त्याचा विरोध नव्हता. म्हणून परमेश्वराश्रित किंवा अलौकिकाश्रित धर्माच्याऐवजी मानवाश्रित मानवी धर्माची ( Religion of Humanity ) उदात्त कल्पना त्याने समाजापुढे ठेवली. ही कल्पना त्याला सुरवातीला सुचली फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्ट याच्या विचारावरून. कॉम्टच्या कल्पनेतील दोष होता तो हा की सर्व तऱ्हेच्या नियमांनी, विधींनी व बंधनांनी तो धर्म जखडलेला होता. शिवाय तो कणीतरी वरून लादावयाचा होता. त्या धर्मामधे परमेश्वराची किंवा आधिदैविक विचारांची आवश्यकता नव्हती ही गोष्ट मात्र मिलला फार आवडली. मिलच्या मानवी धर्मामधे परमेश्वर नाही आणि परलोकही नाही. त्या धर्माचे 'धर्माची उपयुक्तता' ( Utility of Religion ) या पुस्तकात त्याने जे विवेचन केले आहे त्याचा मुख्य भाग पुढीलप्रमाणे आहे : "सर्व जनांच्या कल्याणाविषयीच्या विशाल आणि सुसंस्कृत विचारांवर आधारलेली नीतिमत्ता समुदायाच्या हितासाठी व्यक्तीच्या हिताकडे किंवा व्यक्तीच्या हितासाठी समुदायाच्या हिताकडे दुर्लक्ष करणार नाही. ती कर्तव्याला जसा योग्य वाव देईल तसाच स्वातंत्र्य व स्वयंस्फूर्ती यांनाही योग्य वाव देईल. ज्यांचा स्वभाव अधिक सुसंस्कृत त्यांच्या बाबतीत सहानुभूती, परोपकारबुद्धी व उत्कृष्ट गोष्टी-

बद्दलची मनाची तीव्र ओढ यांच्या योगाने ती नीतिमत्ता प्रभावी ठरेल. इतरांच्या बाबतीत शक्य त्या प्रमाणात त्या भावनांची जोपासना करावी लागेल व जोडीला लोकनिंदेमुळे माणसाला जी लाज वाटते तिचाही उपयोग करावा लागेल. ही उदात्त नीतिमत्ता फळांची आशा दाखवून आपला श्रेष्ठपणा प्रस्थापित करणार नाही. पुढच्या जन्मी काही मिळावे अशी अपेक्षा बाळगण्याऐवजी या जन्मी इह लोकातच ज्यांच्याबद्दल आपल्याला आदर वाटतो त्यांची किंवा उत्तम म्हणजे ज्यांचा आपण सन्मानाने गौरव करतो अशा सर्व पूजनीय मृत वा जिवंत व्यक्तींची प्रशंसा लाभावी याच फळाची, अपेक्षा करणे झाले तर, कुणी अपेक्षा करील. दुःख भोगत असताना ती अपेक्षा मनाला दिलासा देईल आणि मन कच खाईल त्या वेळी त्याला धीर देईल. हयात असलेल्या मित्रजनांना आपले वर्तन आवडेल या कल्पने-इतकीच दिवंगत पूर्वजांना व मित्रांना ते आवडेल ही कल्पना सद्वर्तनाची प्रेरक शक्ती होऊ शकते. सॉक्रेटिस, किंवा हॉवर्ड किंवा वॉशिंग्टन, किंवा अँटोनिनस, किंवा ख्रिस्त यांना आपले वर्तन आवडले, किंवा त्यांनी ज्या पद्धतीने आपले कार्य केले त्याच पद्धतीन आपण आपले कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहो ही कल्पना उत्तम मंडळींनादेखील आपल्या मनातील सर्वोत्कृष्ट भावना आणि विचार यांच्या अनुसार काम करण्यास प्रवृत्त करू शकते."

( A morality grounded on large and wise views of the good of the whole, neither sacrificing the individual to the aggregate nor the aggregate to the individual but giving to duty on one hand and to freedom and spontaneity on the other their proper province, would derive its power in the superior natures from sympathy and benevolence and the pasion for ideal excellence; in the inferior, from the same feelings cultivated up to the measure of their capacity, with the super-added force of shame. This exalted

morality would not depend for its ascendancy on any hope of reward; but the reward which might be waked for, and the thought of which might be a consolation in suffering and a support in moments of weakness, would not be a problematical future existence but the approbation, in this, of those whom we respect, and ideally of all those, dead or living, whom we admire or venerate. For the thought that our dead parents or friends would have approved our conduct is a scarcely less powerful motive than the knowledge that our living ones do approve it; and the idea that Socrates, or Howard, or Washington, or Antoninus, or Christ would have sympathised with us, or that we are attempting to do our part in which they did theirs, has operated on the very best minds as a strong incentive to act up to their highest feelings and convictions." *Utility of Religion*, p. 423 ). ही नीतिमत्ता धर्मासारखीच आहे असे मिल म्हणतो. भावनांना व इच्छा-अपेक्षांना इष्ट ते वळण लावण्याचे कार्य हा मानवी धर्म करू शकेल. त्या धर्माची जर लहानपणापासून सर्वांना शिकवण मिळाली, त्या धर्माच्या आचरणाची जर सवय लागली आणि त्या धर्मानुसार आचरण घडले तर लोकामधे वाहवा होते आणि न घडले तर लोकनिंदा सहन करावी लागते हे कळले की तो धर्म ही समाजातील मोठी प्रभावी शक्ती बनेल. साध्या शिक्षणाने आज जसे लोकांना देशप्रम शिकवता येते तसेच मानवी धर्माच्या शिक्षणाने त्यांना जगावर किंवा एकंदर मानवजातीवर प्रेम करायला शिकवता येईल. मग सर्व व्यक्ती स्वतःच्या व समाजाच्या उत्कर्षासाठी कार्य करू लागतील. इहलोकीचे जीवन सुधारले की लोकांना परलोकाचा ध्यास लागणार नाही. आणि मग सर्व जण इहलोकीचे जीवन सुधारण्या-

साठी उत्साहाने व दक्षतेने काम करू लागतील असे हे मिलचे नीतिशास्त्र आहे आणि समाज सुधारण्याबद्दलचे त्याचे भव्य आणि उदात्त स्वप्न आहे.

मिलच्या तर्कशास्त्रावरील ग्रंथाचा या ठिकाणी विशेष विचार करण्याचे कारण नाही. आता तो विशेष वाचनात नाही आणि तर्कशास्त्राची त्यानंतर खूपच प्रगती झालेली आहे. पण मिलने तो ग्रंथ लिहिला त्यावेळी त्यामधे विशद केलेले विचार नवीन व लोकविलक्षण स्वरूपाचे होते. त्या ग्रंथाचे लेखन जवळ जवळ तेरा वर्षे चालू होते. समाजातील प्रतिगामी शक्तींच्या विरुद्ध तो झगडत होता. त्या शक्तींचे खरे प्रतिष्ठान माणसांच्या मनात आहे, ज्या गोष्टी किंवा विचार ते खरे आहेत असे धरून चालतात, त्यामधे आहे असा त्याचा विश्वास होता. त्या विचारांची व गृहीत कृत्यांची मिथ्यता सिद्ध करण्यासाठी म्हणून त्याने तर्कशास्त्रावरील ग्रंथ लिहिला. डॉ. व्हेवेल हा त्या काळातील प्रसिद्ध तत्त्वज्ञानी होता. त्याच्या मते काही सार्वत्रिक स्वरूपाची, अनुभवाच्या क्षेत्रापलीकडील, निरपवाद सत्ये असतात. मिलला ही भूमिका मान्य नव्हती. तो अनुभववादी तत्त्वज्ञानी होता. गृहीत कृत्ये मानावी, पण ती अनुभवाच्या निकषावर तपासली पाहिजत असा त्याचा आग्रह होता. त्याचा तर्कशास्त्रावरील ग्रंथ केवळ शास्त्रीय स्वरूपाचा नाही, समाजामधे ज्या समजुती प्रचलित आहेत त्याचा खरेखोटेपणा कसा अजमावा, विचार खरा की खोटा हे कसे सिद्ध होते, साक्षी-पुराव्याचे नियम कोणते वगैरे विषयांचा ग्रंथात विचार झालेला आहे. अनुभव हाच सत्यतेचा सर्वश्रेष्ठ पुरावा हा मिलचा सिद्धांत. या सिद्धांतामुळे आजच्या युगातील विलियम जेम्स, ड्युई आदिकरून वस्तु-स्थितिवादी ( Pragmatist ) तत्त्वचिंतक मिलला गुरुस्थानी मानतात. विलियम जेम्सने प्रॅगमॅटिझम हे आपले पुस्तक मिलला अर्पण केले आहे. मिल जिवंत असता तर तो आमचा नेता झाला असता असे मानणे माझ्या कल्पनेला आवडते असे त्याने लिहिले आहे.

मिलच्या अर्थशास्त्रावरील ग्रंथामधे देखील अर्थशास्त्रीय प्रमेयांच्या बरोबरीने समाजशास्त्रीय प्रश्नांचाही ऊहापोह आहे. अर्थशास्त्र हा समाज-शास्त्राचा एक भाग आहे असे मिलचे मत होते. संपत्तीच्या उत्पादनाचा प्रश्न कदाचित् केवळ अर्थशास्त्रीय तत्त्वांचा विचार करून हाताळता येईल; परंतु संपत्तीच्या विभागणीचा ( distribution ) प्रश्न समाजाचे स्वरूप, समाजातील वेगवेगळ्या गटांच्या आशाआकांक्षा व त्यांच्या-मधील संबंध, समाजातील सत्तास्पर्धा इत्यादी समाजशास्त्रीय गोष्टींचा विचार केल्याखेरीज समाधानकारकरीतीने सोडवता येणार नाही. म्हणूनच अर्थशास्त्रावरील ग्रंथात त्याने अनेक राजकीय व सामाजिक प्रश्नांचा विचार केला आहे; आणि आजच्या युगात तो विचारच अधिक महत्त्वाचा आहे.

मिलच्या काळात मुक्त अर्थव्यवस्थेचे ( leissez faire ) तत्त्व लोकमान्य व राजमान्य होते. पुरोगामी मंडळीही त्या तत्त्वाचा पुरस्कार करीत. त्या तत्त्वाचा मुख्य मुद्दा हा की शासनाने अर्थव्यवहारात हस्तक्षेप करू नये. उद्योगपतींना त्यांच्या मर्जीनुसार उद्योगधंद्यांची वाढ करण्यास पुरा वाव द्यावा. मिलला हे तत्त्व मान्य होते व त्याचा त्याने आपल्या पुस्तकात सर्वसाधा-रणपणे पुरस्कार केला आहे. हे तत्त्व त्याच्या राजकीय तत्त्वज्ञानाशी सुसंगत होते. राजकारणात अधिकात अधिक सत्ता गाजवणाऱ्यापेक्षा कमीतकमी सत्ता गाजवणाऱ्या राज्यपद्धतीचा तो पुरस्कर्ता होता. शिवाय जे कार्य लोक करू शकतील ते कार्य शासनाने कधीही करू नये असा त्याचा कटाक्ष होता. मुक्त व्यवहाराच्या तत्त्वाला पुष्कळ वेळा मुरड घालावी लागते हे मात्र तो विसरला नाही. पुष्कळ वेळा लोक एखादे कार्य करण्यास तयार नसतात. ते सर्वसाधारण हिताचे असेल तर शासनाने ते करण्याची जबाबदारी पतकरली पाहिजे. ग्रंथामधे एके ठिकाणी त्याने लिहिले आहे : " काही काळी आणि स्थळी अशी परिस्थिती असते की शासनाने जबाबदारी अंगावर घेतल्याखेरीज रस्ते, गोद्या, बंदरे, कालवे, पाटबंधारे, इस्पितळे, शाळा, विद्यालये, छापखाने वगैरे बांधलेच जात नाहीत. लोक इतके गरीब असतात

की जरूर ते भांडवल त्यांना उभारता येत नाही. किंवा मागासलेपणामुळे वर उल्लेखिलेल्या गोष्टींची आवश्यकता त्यांच्या ध्यानात येत नाही; किंवा एकत्र येऊन अशा गोष्टी करण्याची त्यांना सवय नसते. एकतंत्री राज्य-पद्धतीची ज्यांना सवय लागली आहे अशा देशात हे कमी अधिक प्रमाणात घडून येते. किंवा जे देश परतंत्र आहेत आणि ज्या देशावर दुसऱ्या एखाद्या अधिक प्रगत व जोमदार लोकसमूहाचे राज्य आहे व जिथे प्रजा आणि राज्यकर्ते यांच्यामधे संस्कृतीचे मोठे अंतर आहे अशा देशात हे अधिक प्रमाणात घडून येते. जगाच्या अनेक भागात ज्या गोष्टींना खूप पैसा लागतो आणि संघटनेचे कार्य लागते त्या गोष्टी लोकांना करता येत नाहीत; आणि शासनाने त्या केल्याखरीच त्यांची निर्मिती होत नाही. अशा परिस्थितीत प्रजेचे अधिकात अधिक कल्याण साधण्याची आपली कळकळ व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तिच्या असहायतेमुळे जे करणे भाग पडले ते शासनाने करून दाखवणे. ते करावे मात्र अशा पद्धतीने की जिच्यामुळे प्रजेची असहायता वाढण्याऐवजी कमी होईल. चांगले शासन द्यावयाची ती सर्व मदत अशा पद्धतीने देईल की तिच्यामुळे स्वतः कार्य करण्याची जी अल्पस्वल्प भावना आढळून येईल तिला उत्तेजन लाभेल, तिची जोपासना होईल." At some times and places there will be no roads, docks, harbours, canals, works of irrigation, hospitals, schools, colleges, printing presses, unless the government establishes them; the public being either too poor to command the necessary resources, or too little advanced in intelligence to appreciate the ends, or not sufficiently practised in conjoint action to be capable of the means. This is true, more or less, of all countries inured to despotism, and particularly of those in which there is a very wide distance in civilization between the people and the government:

as in those which have been conquered and are retained in subjection by a more energetic and more cultivated people. In many parts of the world, the people can do nothing for themselves which requires large means and combined action; all such things are left undone, unless done by the state. In these cases, the mode in which the government can most surely demonstrate the sincerity with which it intends the greatest good of its subjects, is by doing the things which are made incumbent on it by the helplessness of the public, in such a manner as shall tend not to increase and perpetuate but to correct that helplessness. A good government will give all its aid in such a shape, as to encourage and nurture any rudiments it may find of a spirit of individual exertion. *Principles of Political Economy*. Vol. II ( 3 rd Edition, p. 569). म्हणजेच मिल मुक्त अर्थव्यवस्थेचा आंधळा भक्त नव्हता. प्रत्यक्षात देशकालमान परिस्थिती प्रमाणे त्या तत्त्वावर ज्या मर्यादा पडतात त्या तो ओळखून होता.

मिलच्या काळातील अर्थशास्त्रज्ञांना सर्वसाधारणपणे कामगारसंघ मान्य नव्हते. मिलची भूमिका मात्र वेगळी होती. कामगारसंघांना त्याचा विरोध नव्हता. ते कामगारांनी स्वेच्छेने बनवलेले असावेत, त्यामधे जुलूम जबरदस्ती होऊ नये एवढाच त्याचा आग्रह होता. संघामुळे कामगारामधे सहकार्य वाढेल व त्यांचे शिक्षण व संस्कृती सुधारेल अशी त्याची कल्पना होती. कामगारसंघांच्या काही मागण्या मात्र त्याला मान्य नव्हत्या. उदाहरणार्थ, समान वेतनाची मागणी. आळशी आणि उद्योगी, अकुशल आणि कुशल कामगारांना एकाच रांकेत बसवू नये असे त्याचे मत होते. काही संघ ते करू पाहताहेत असे त्याला वाटत होते. त्यांचा त्याने निषेध

केला. एकंदर कामगार वर्गाच्या हलाखीच्या परिस्थितीबद्दल त्याला फार वाईट वाटे. त्यांचे पगार वाढले पाहिजेत, त्यांची राहणी सुधारली पाहिजे व त्यांच्यामधे शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे असे त्याला सारखे वाटत असे. कामगारांची संख्या कमी होऊन मागणीच्या मानाने पुरवठा कमी झाल्याखेरीज त्यांचे पगार वाढणार नाहीत हे त्याच्या अर्थशास्त्राने त्याला शिकवले होते; म्हणून तो कामगारांमधे नेहमी संततिनियमनाचा प्रचार करी. तो प्रचार विशेष यशस्वी झाला नाही. पण नंतरच्या काळात संघटनेमुळे व आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे कामगारांचे पगार वाढले व रहाणीमानही उंचावले.

कामगारांशी कसे वागावे याबद्दल त्या काळात जी विचारसरणी प्रचलित होती ती अशी की, त्यांना काही कळत नाही; म्हणून त्यांनी काय करावे, काय करू नये हे त्यांच्या इच्छेवर न सोपवता, कुणी तरी त्यांना नियम घालून द्यावे आणि त्यांचे पालन होईल अशी व्यवस्था करावी. श्रीमंत मंडळींनी त्यांचे अज्ञानी मुलासारखे पालन करावे. त्यांनी स्वयंस्फूर्तीने काही करावे अशी गरज उरू नये. त्यांनी आपले दिवसभराचे काम करावे व नीतीचे आणि धर्माचे पालन करावे या पलीकडे दुसरे काही त्यांना करायला सांगू नये. त्यांची नीती आणि धर्म वरिष्ठवर्गाने त्यांच्यासाठी निश्चित करावे; त्यांना त्यांचे योग्य शिक्षण दिले जाईल अशी सोय करावी; आणि काम व मालकाविषयी वाटणारा आपलेपणा याच्या मोबदल्यात त्यांना अन्न, पाणी, वस्त्रे व निवारा मिळेल आणि त्यांच्या अध्यात्मिक उन्नतीची व निरुपद्रवी करमणुकीची सोय होईल अशी योग्य ती तरतूद करावी. Of spontaneous action on their part there should be no need. They should be called on for nothing but to do their day's work, and to be moral and religious. Their morality and religion should be provided for them by their superiors, who should see them properly taught it, and should do all that

is necessary to ensure their being, in return for labour and attachment, properly fed, clothed, housed, spiritually edified-and innocently amused. ( *ibid* p. 324 ).

मिलला ही विचारसरणी पसंत नव्हती हे वेगळे सांगावयास नको. मानवी समता व व्यक्तिस्वातंत्र्य याबद्दलच्या त्याच्या विचारांशी ती पूर्णपणे विसंगत होती. मिलच्या मते कामगार व मालक असे दोन वंशपरंपरागत वर्ग असावेत ही कल्पना मानवी समतेच्या व स्वातंत्र्याच्या युगात टिकण्यासारखी नाही. तो वर्गभेद टिकवायचा झाला तर भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य नष्ट करावे लागेल. हा भेद टिकवणे मालकवर्गाच्याही फायद्याचे नाही. मालक कामगारांना आपले कायमस्वरूपाचे नोकर व आश्रित मानू लागले तर कामगारदेखील यांना सतत लुबाडले पाहिजे व शक्य तितक्या जास्त पगारात कमीत कमी काम केल पाहिजे असे मानू लागतील. उभयपक्षी ही मनोवृत्ती निर्माण झाली तर उद्योगधंदे वाढणार नाहीत. म्हणून कारखान्याबद्दल कामगाराला आपलेपणा वाटेल अशा पद्धतीने तो चालवणे अगत्याचे आहे हे भांडवलदारांच्या देखील लक्षात येईल अशी मिलची अपेक्षा होती.

उत्पादनाची जी पद्धत मिलला आवडत होती तिचे त्याने एकेठिकाणी विस्तृत वर्णन केले आहे त्याचा मथितार्थ हा : " मनुष्यजातीची सुधारणा झाल्यानंतर जी पद्धत निर्माण होईल तिच्यामधे भांडवलदार हा प्रमुख आणि कामगारांना व्यवस्थे- ( management ) च्या बाबतीत काही बोलता येत नाही असा प्रकार राहणार नाही. भांडवल कामगारांच्या संयुक्त मालकीचे असेल, कामगारामधे समतेचे नाते असेल आणि निवडलेल्या व काढून टाकता येण्यासारख्या व्यवस्थापकांच्या देखरेखीखाली ते काम करतील. केवळ तत्त्व म्हणून जोवर या कल्पनेचा ओवेन किंवा लुई ब्लांक यांच्या लेखनात व इतरत्र विचार होत होता तोवर ती अशक्य कोटीतील

गोष्ट आहे असे सर्वसाधारणपणे लोकांना वाटत असे. अस्तित्वात असलेले भांडवल हस्तगत केल्याखेरीज व कामगारांच्या फायद्यासाठी ते बळकावल्याखेरीज त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देता येणार नाही असे पुष्कळांचे म्हणणे होते. इंग्लंडमधील व युरोपखंडातील इतर देशात समाजसत्तावादाचा ( socialism ) तोच उद्देश व कार्य आहे अशी काही जणांची कल्पना आहे आणि इतर काही जण मुद्दाम तसे भासवतात. परंतु माणसामधे श्रम करण्याची व स्वार्थत्यागाची सुप्त शक्ती आहे. एखाद्या महान् कल्पनेच्या किंवा उदात्त भावनेच्या प्रेरणेने तिला कधीमधी जागवता येते. १८४८ मधील फ्रेंच राज्यक्रांतीने ती प्रेरणा दिली. एका मोठ्या देशातील हुषार आणि उदार कामगारांना एकदम अशी जाणीव झाली की आता आपल्या देशात जी शासनयंत्रणा निर्माण झाली आहे ती बहुजनांच्या स्वातंत्र्यासाठी आणि प्रतिष्ठेसाठी झटणार आहे. भांडवलदारांच्या फायद्यासाठी उत्पादनाची साधने म्हणून राबावे हेच केवळ बहुजनांचे निसर्गाने नेमून दिलेले व कायद्याने ठरविलेले कार्य आहे असे त्या शासनयंत्रणेला वाटणार नाही अशीदेखील त्यांची खात्री झाली. हे उत्तेजन लाभल्यानंतर संघटनेच्या योगाने कामगारांना आपली मुक्ती साधता येईल ही समाजवादी विचारवंतांनी त्यांच्या मनात पेरलेली कल्पना अंकुरित झाली आणि तिला फळ आले. फळ आले ते हे की अनेक कामगारांनी असा निश्चय केला की एखाद्या मालकासारख्या कुशल कामगारासाठी किंवा कारखानदारासाठी काम करण्याऐवजी आपण एकमेकासाठी काम करावे. आणि त्यांनी असाही निश्चय केला की कितीही काम करावे लागले आणि कितीही गरिबीत रहावे लागले तरी आपण श्रमानी भांडवल निर्माण करू या. हे भांडवल निर्माण झाले की बाहेरून आणलेल्या भांडवलासाठी आपण निर्मिलेल्या संपत्तीतून जी जबर खंडणी द्यावी लागते ती द्यावी लागणार नाही. हे भांडवल निर्माण करण्यासाठी भांडवलदाराने स्वतः किंवा त्याच्या पूर्वजांनी श्रमाने संपादन केलेल्या व काटकसर करून

रक्षिलेल्या भांडवलावर आपल्याला दरोडा घालावा लागणार नाही हे देखील त्यानी ओळखले होते." (The form of association, however, which if mankind contrive to improve, must be expected in the end to predominate, is not that which can exist between a capitalist as chief, and working people without a voice in the management, but the association of the labourers themselves on terms of equality, collectively owning the capital with which they carry on their operations, and working under managers elected and removable by themselves. So long as this idea remained in a state of theory, in the writings of Owen or of Louis Blanc, it may have appeared, to the common modes of judgment, incapable of being realized, and not likely to be tried unless by seizing on the existing capital, and confiscating it for the benefit of the labourers; which is even now imagined by many persons, and pretended by more, both in England and on the Continent, to be the meaning and purpose of Socialism. But there is a capacity of exertion and self-denial in the masses of mankind, which is never known but on the rare occasions on which it is appealed to in the name of some great idea or elevated sentiment. Such an appeal was made by the French Revolution of 1848. For the first time it then seemed to the intelligent and generous of the working classes of a great nation, that they had obtained a government who sincerely desired the freedom and dignity of the many, and who did

not look upon it as their natural and legitimate state to be instruments of production, worked for the benefit of the possessors of capital. Under this encouragement, the ideas sown by Socialist writers, of an emancipation of labours to be effected by means of association, throve and fructified; and many working people came to the resolution, not only that they would work for one another instead of working for a master tradesman or manufacturer, but that they would also free themselves, at whatever cost of labour or privation, from the necessity of paying, out of the produce of their industry, a heavy tribute for the use of capital; that they would extinguish this tax, not by robbing the capitalits of what they or their predecessors had acquired by labour and preserved by economy, but by honestly acquiring capital for themselves. *ibid* 339.)

फ्रान्समधे त्या काळात निर्माण झालेल्या कामगारांच्या सहकारी उत्पादक संस्थांबद्दल मिलला मोठी आपुलकी, आशा वाटत होती. त्याच्या योगाने समाजामधे क्रांतिकारक स्वरूपाचा बदल घडून येईल अशी त्याची अपेक्षा होती. सहकारी संस्थांमधे सामुदायिक उत्पादनाचे नैतिक, बौद्धिक व आर्थिक फायदे आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य यांचा मेळ घालता येईल अशी त्याची कल्पना होती. पुढच्या काळात सहकारी संस्था वाढल्या नाहीत आणि मिलची कल्पना फलद्रूप झाली नाही ही गोष्ट वेगळी.

मिल समाजसत्तावादी होता की नाही याबद्दल बरीच चर्चा झाली आहे. समाजसत्तावादाच्या आजच्या कल्पनेनुसार तो त्या वादाचा पुरस्कर्ता होता असे म्हणता येणार नाही. कारण मिलचा सत्तेच्या केंद्री-करणाला विरोध होता. कामगारांची परिस्थिती सुधारावी, उत्पादनाच्या

प्रक्रियेत त्यांना महत्त्वाचे स्थान लाभावे, त्यांना मताचा अधिकार मिळावा व राजकारणातील आणि समाजकारणातील त्यांचे वजन वाढावे हे सर्व मिलला मान्य होते; ही त्याची जी मते बनली ती बहुतांशाने हॅरिएट टेलरच्या प्रेरणेमुळे. त्याबद्दल त्याने तिला आत्मचरित्रात व अर्थशास्त्रावरील ग्रंथात धन्यवाद दिले आहेत. या मतामुळे तो स्वतःला मर्यादित स्वरूपातील समाजसत्तावादी ( qualified socialist ) समजत असे. समतेचा समाज स्थापन करण्याचे समाजवादाचे उद्दिष्ट मिलला मान्य होते; पण ते उद्दिष्ट प्रत्यक्षात कसे अवतरेल याविषयी त्याला स्पष्ट कल्पना नव्हती. म्हणून त्या दिशेने जे प्रयत्न होतील ते स्वागतार्ह आहेत असे त्याचे म्हणणे होते. पूर्ववयात सेंट सायमन व फॉरिअे ( Fourier ) यांच्या मताबद्दल व प्रयोगाबद्दल त्याला मोठे आकर्षण होते. उत्तरवयात ते पुष्कळ कमी झाले. समाजसत्तावादातील सहकाराचा विचार त्याला फार आवडत असे. उत्पादकांचे व ग्राहकांचे सहकारी संघ स्थापन व्हावे आणि त्यांना अर्थव्यवहारात महत्त्वाचे स्थान लाभावे असे त्याला फार वाटत असे. कामगारांना कारखान्यात भागीदारी लाभावी असेदेखील त्याचे एक मत होते. भांडवलशाही समाजात जी जीवघेणी स्पर्धा आणि चढाओढ चालू असते ती त्याला मान्य नव्हती. एके ठिकाणी त्याने लिहिले आहे. "माणसांची नेहमीची अवस्था म्हणजे सतत पुढे जाण्यासाठी झगडत राहणे असे ज्यांना वाटते त्यांनी तयार केलेला जीवनाचा आदर्श मला आवडत नाही. आजच्या समाजजीवनात जे एकमेकांना बुडवणे, चिरडणे, शह देणे, पायावर पाय देणे चालते ते माणसाच्या हिताच्या दृष्टीने इष्ट आहे असे मला वाटत नाही. औद्योगिक प्रगतीचा तो एक अत्यंत अप्रिय आणि अनिष्ट भाग आहे असे मला वाटते" ( I confess I am not charmed with the ideal of life held out by those who think that the normal state of human beings is that of struggling to get on; that the trampling,

crushing, elbowing and treading on each other's heels, which form the existing type of social life, are the most desirable lot of human kind, or anything but the disagreeable symptoms of one of the phases of industrial progress, *ibid*, Vol IV, p. 754 )

समाजवाद प्रस्थापित व्हायचा तर तो कामगार सुशिक्षित व सुसंस्कृत झाल्याखेरीज होणार नाही, असे त्याचे निक्षून सांगणे होते. समाजवाद ही एक आदर्श समाजव्यवस्था आहे. तिची आजच्या दोषांनी व उणीवांनी भरलेल्या भांडवलशाही पद्धतीशी तुलना करण्यात हशील नाही. भांडवलशाही सुधारत आहे आणि तिचे उन्नत स्वरूप कदाचित् समाजवादापेक्षाही चांगले असू शकेल. म्हणून या दोघांमधे निवड करण्याचें कार्य पुढच्या पिढीवर सोपवू या, असे मिलचे म्हणणे होते. समाजसत्तावादी पद्धतीबद्दल त्याला मोठी धास्ती वाटत होती ती ही की उत्पादनाची सारी साधने शासनसंस्थेच्या मालकीची झाली की ती संस्था एवढी प्रबळ होईल की व्यक्तीचे स्वातंत्र्य व हक्क नष्ट होतील. एकोणिसाव्या शतकातील प्रमुख विचारवंतांपैकी मिलनेच पहिल्या प्रथम समाजसत्तावादाचा मनोराज्य, कविकल्पना म्हणून धिक्कार केला नाही. त्यानेच पहिल्याप्रथम त्या वादाचा सहानुभूतीपूर्वक दृष्टीने विचार केला. तो त्याचा पुरस्कर्ता मात्र कधीही बनला नाही. त्याने जे विचारांचे बीज पेरले त्याला त्याच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी समाजसत्तावादी चळवळीचे फळ आले. इंग्लंडमधे फेबिअन सोसाएटी स्थापन झाली आणि तिने शांततापूर्ण व लोकशाहीवादी समाजसत्तावादाचा खूप प्रचार केला. फेबिअन सोसाएटीच्या विचारांवर मिलच्या विचारांची मोठी छाप पडली आहे. म्हणून विसाव्या शतकात लेबर पार्टीच्या मार्फतीने जी समाजसत्तावादाची चळवळ वाढली तिची वैचारिक मनोभूमिका मिलने तयार केली असे म्हणता येईल.

एक नवल वाटण्यासारखी गोष्ट आहे ती ही की मिलच्या लिखाणात कार्ल मार्क्सचा उल्लेख आढळत नाही. दोघेही सर्वसाधारणपणे एकाच

काळात वाढले व त्यांचे लेखनकार्यही एकाच काळात घडले. मिलचे वाचन प्रचंड होते व वाचलेल्या ग्रंथांचा तो साधारणपणे उल्लेख केल्यावाचून रहात नाही. शिवाय समाजवादाबद्दल त्याला आकर्षण होते. पण समाजवादी लेखक म्हणून तो उल्लेख करतो तो ओवेन, सेंट सायमन, फॉरिओ आदींचा; मार्क्सचा नव्हे. पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या ( First International ) कार्याचीही त्याला माहिती होती. असे असतानाही मार्क्सचा उल्लेख आढळत नाही याचा अर्थ हा असावा की मार्क्सच्या लिखाणाला त्या काळात विशेष महत्त्व प्राप्त झालेले नसावे आणि त्यामुळे ते मिलच्या नजरेतून निसटले असावे. मार्क्सला मात्र मिलच्या लिखाणाची माहिती होती. मिलच्या अर्थशास्त्रीय सिद्धांताबद्दल त्याला आदर नव्हता. तरीदेखील भांडवलशाहीपुढे तोंडपुजेपणा करणाऱ्या क्षुद्र अर्थशास्त्रज्ञांमधे मिलची गणना करण्यास त्याचा विरोध होता. आपल्या कॅपिटल ( Capital ) या ग्रंथात त्याने एके ठिकाणी ही गोष्ट स्पष्ट केली आहे. मिल साम्यवाद ( communism ) व समाजवाद ( socialism ) हे शब्द एकाच अर्थाने वापरत असे. पुढे त्या शब्दांच्या अर्थात व त्यानी सूचित केलेल्या संघटनेत व आंदोलनात खूप फरक पडला. साम्यवादाला मार्क्स पितृस्थानी आहे. समाजवादाला मिलबरोबर इतके जवळचे नाते सांगता आले नाही तरी त्याच्या उत्तरवयातील लिखाणात आपली परंपरा शोधता येते. या दृष्टीने पाहिले तरीदेखील मिल आणि मार्क्स हे पुढच्या काळात दोन परस्परविरोधी प्रवृत्तींचे प्रवर्तक म्हणून जगापुढे आले असे म्हणता येईल.

मिलचे राजकीय विचार त्याच्या 'प्रातिनिधिक राज्यपद्धत' (Representative Government) या विस्तृत प्रबंधात आढळतात. इतरत्रही बरेच ठिकाणी ते विखुरलेले आहेत. मिल लोकशाहीचा व प्रातिनिधिक राज्यपद्धतीचा पुरस्कर्ता होता. मोठ्या समाजात सर्वांना एकत्र येऊन राज्यकारभार चालवणे शक्य नाही म्हणून प्रातिनिधिक राज्यपद्धतीचा स्वीकार करणे भाग पडते. प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार सर्वांना असला

पाहिजे. मिलच्या काळात इंग्लंडमधे मताचा अधिकार संकुचित होता ते त्याला मान्य नव्हते. मताच्या अधिकारासाठी शिक्षणाची अट मान्य करायला त्याची तयारी होती; मालमत्तेच्या अटीला मात्र त्याचा संपूर्ण विरोध होता. अल्पसंख्य गटांनाही प्रतिनिधित्व लाभले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. त्यासाठी त्याने प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची ( proportional representation) कल्पना सुचवली होती. ती कल्पना त्यावेळी मान्य झाली नाही व आजदेखील ती अमान्य आहे. मिलचा गुप्त मतदान (secret ballot) पद्धतीला विरोध होता. मतदारांनी न घाबरता व कुणाच्याही भिडेला बळी न पडता आपल्याला जो उमेदवार योग्य वाटेल त्याला आपले मत उघडपणे दिले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. मत देणे हे एक सार्वजनिक कर्तव्य आहे आणि ते प्रत्येकाने धिटाईने उघडपणे केले पाहिजे. मिलचा गुप्त मतदान पद्धतीला विरोध त्या काळीही कुणाला आवडला नाही आणि आजही त्याला कुणी पाठिंबा देत नाही.

शासनसंस्थेबद्दलचे मिलचे विचार मौलिक स्वरूपाचे आहेत. शासनसंस्था आपल्या आवडीनुसार व गरजेनुसार लोकांना बनवता येते. पण ती बनवताना इतिहास, संस्कृती व सामाजिक परिस्थिती यांचा विचार डोळ्याआड करता येत नाही. म्हणून वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या शासनपद्धती रूढ होतात. परंतु समाज जसजसा सुसंस्कृत होईल तसतशी प्रातिनिधिक राज्यपद्धत त्याला अधिकाधिक आवडू लागेल. राजकीय यंत्रणा माणसे निर्माण करतात आणि माणसेच ती चालवतात. म्हणून माणसांना तिच्याबद्दल आपलेपणा वाटला नाही, त्यांनी तिच्या कार्यात लक्ष घातले नाही तर ती सुस्थिर व कार्यक्षम बनणार नाही. इतर कोणत्याही राज्यपद्धतीपेक्षा प्रातिनिधिक राज्यपद्धतीला हा नियम अधिक लागू पडतो. मतदारांनी मतदानाकडे दुर्लक्ष केले अगर सार्वजनिक हित डोळ्यापुढे ठेवून मतदान करण्याऐवजी स्वार्थबुद्धीने अगर धाकदपटशहाला बळी पडून अगर जात, गोत यासारख्या अवांतर गोष्टींना महत्त्व देऊन मतदान केले तर प्रातिनिधिक

राज्यसंस्था लोकांचे खरेखुरे प्रतिनिधित्व करू शकणार नाहीत व कल्याणा-ऐवजी लोकांचे अकल्याणच अधिक होईल. "प्रातिनिधिक राज्यपद्धत इतर सर्व पद्धतींपेक्षा चांगली, कारण तिच्यामधे सार्वभौम सत्ता म्हणजेच नियं-त्रणाची उच्चतम सत्ता अखेरीला समाजातील समुदायाच्या हाती असते. त्या सत्तेचा उपयोग करण्यामधे प्रत्येक नागरिकाला भाग घेता येतो. एवढेच नव्हे तर प्रत्येकाला मधून मधून स्थानिक किंवा प्रादेशिक स्वरूपाचे एखादे काम स्वतः करावे लागते आणि त्याच्या योगाने शासनाच्या कार्यात प्रत्यक्षपणे भाग घेता येतो" (The ideally best form of government is that in which the sovereignty, or supreme controlling power in the last resort, is rested in the entire aggregate of the community, every citizen not only having a voice in the exercise of that ultimate sovereignty, but being, at least occasionally, called on to take an actual part in the government by the personal discharge of some public function, local or general. *Representative Government*, p. 42). शासनाच्या कामामधे लोकांना प्रत्यक्षपणे भाग घ्यायला सापडला पाहिजे या गोष्टीवर मिलचा मोठा कटाक्ष होता. असा भाग घेतल्यामुळेच लोकांचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास होतो असे त्याचे म्हणणे होते. या दृष्टीने तो शासनसंस्थेला राष्ट्रीय शिक्षणाचे एक साधन (an agency of national education) समजत असे. लोकांमधे सद्गुणाची व शहाणपणाची वाढ करणे हे शासनसंस्थेचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे अशी त्याची समजूत होती.

प्रातिनिधिक राज्यव्यवस्था उत्तम असली तरी ती सर्व समाजांना सारखीच उपयुक्त ठरेल असे म्हणता येत नाही. अगदी मागासलेल्या अवस्थेतील समाज, जुलमी सत्तेपुढे मान वाकवायची ज्यांना नेहमी सवय लागली आहे असे समाज, लहान गटापुरते विचार करणारे समाज किंवा

इतरांवर हुकुमत गाजवण्याची लालसा ज्यांच्या ठिकाणी अधिक आहे अशा व्यक्तींचे समाज– या समाजामधे प्रातिनिधिक राज्यव्यवस्था तावडतोब रुजणे व वाढणे कठीण आहे. परंतु शिक्षणाचा व संस्कृतीचा दर्जा जसा वाढेल तसे ते समाजदेखील ती राज्यव्यवस्था अमलात यावी म्हणून प्रयत्न करू लागतील अशी मिलची अपेक्षा होती.

प्रातिनिधिक स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेत प्रतिनिधीसभेमधे जनतेतील सर्व गटांना आणि वर्गांना समप्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, गरीबांना आणि कामगारांना पुरे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे हा मिलचा आग्रह होता. त्यांच्या वतीने दुसऱ्या कोणी त्यांची बाजू मांडण्याऐवजी त्यांना स्वतःला आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. मिलच्या काळात कामगारांना मताचा अधिकार नव्हता व वयात आलेल्या प्रत्येक इसमाला, मग ती स्त्री असो की पुरुष असो, मताचा अधिकार असला पाहिजे ही कल्पनाही लोकप्रिय नव्हती. व्यक्तीला किंवा गटाला दाराबाहेर ठेवून त्यांच्या जीवनाबद्दल घेतल्या जाणाऱ्या निर्णयाबद्दल त्यांना अर्ज विनंत्या करायला लावणे अन्यायाचे आहे असे त्याचे ठाम मत होते. लोकनियुक्त प्रतिनिधीसभेच्या कार्यक्षेत्राबद्दल व अधिकाराबद्दल मिलने व्यक्त केलेले विचार आजदेखील मार्गदर्शक ठरण्यासारखे आहेत. मिलने लिहिले आहे : "राज्य करण्याचे कार्य प्रतिनिधी-सभेच्या आवाक्याबाहेरचे आहे. ते करण्याच्या भानगडीत पडण्याऐवजी सभेने शासनावर नजर ठेवावी आणि नियंत्रण करावे. सभेचे ते खरे कार्य आहे. शासनाच्या कृत्यावर प्रसिद्धीचा झोत टाकणे, कुणालाही विवाद्य वाटतील अशा कृत्यांचे पूर्ण स्पष्टीकरण व समर्थन द्यायला भाग पाडणे, जी कृत्ये निंदनीय वाटतील त्यांचा निषेध करणे, आणि शासन जे चालवतात त्यांनी त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाचा दुरुपयोग केला असेल किंवा राष्ट्राचे विचारपूर्वक ठरलेले जे मत असेल त्याच्या विरुद्ध त्यांचे वर्तन घडले असेल तर अधिकाराच्या जागेवरून त्यांना काढून टाकणे व त्यांच्या जागी प्रत्यक्षपणे

किंवा अप्रत्यक्षपणे नवीन मंडळींची नेमणूक करणे – हे प्रतिनिधीसभेचे खरे कार्य आहे." ( Instead of the function of governing, for which it is radically unfit, the proper office of a representative assembly is to watch and control the government : to throw the light of publicity on its acts; to compel a full exposition and justification of all of them which anyone considers questionable; to censure them if found condemnable and, if the men who compose the government abuse their trust or fulfil it in a manner which conflicts with the deliberate sense of the nation to expel them from office, and either expressly or virtually appoint their successors. *Representative Government*, p. 81 ) प्रतिनिधि-सभेला याखेरीज दुसरे महत्त्वाचे काम करता येईल ते म्हणजे राष्ट्रीय तक्रार मंडळाचे ( committe on grievances ) आणि वैचारिक महासभेचे ( congress of opinions ). मिलच्या मते प्रत्यक्षात शासन चालविणे, कायदे लिहून काढणे, हे प्रतिनिधी-सभेचे काम नव्हे; ते तज्ञांचे काम आहे. त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या कामावर देखरेख करणे हे सभेचे कार्य. शासनाचे नेहमीचे काम करण्यासाठी कुशल आणि कर्तबगार असे सरकारी कामगार असावेत. निवडणुकीच्या पद्धतीने नव्हे तर निवडीच्या पद्धतीने त्यांची नेमणूक व्हावी. निवड परीक्षेच्या रूपाने व्हावी व परीक्षेच्या बाबतीत कुणाचीही भीड मुर्वत चालू नये. धोरणे मात्र लोकनियुक्त प्रतिनिधींनी ठरवावी व सरकारी कामगारांनी त्यांची अंमलबजावणी करावी.

मिल लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता होता तरीदेखील लोकशाहीतील दोष त्याच्या नजरेतून निसटले नाहीत. लोक अडाणी व असंस्कृत आहेत तोवर लोकशाही यशस्वी होणे कठीण आहे हे तो ओळखून होता. म्हणून

लोकशिक्षणावर त्याने मोठा भर दिलेला आहे. समाजामधे वर्गभेद, वंशभेद अगर त्या तऱ्हेचे इतर भेद तीव्र असले तर त्यांच्या योगानेही लोकशाहीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. म्हणून लोकशाहीचे राज्य राष्ट्राच्या सीमेनुसार बनावे व राष्ट्रामधे एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न व्हावे असे त्याने सुचविले होते. समाजामधे गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग असतात. बहुसंख्य गरीबांनी केवळ वर्गीय हित डोळ्यापुढे ठेवून कायदे केले तर त्याने समाजाचे नुकसान होईल. म्हणून वर्गीय दृष्टिकोनाऐवजी सामाजिक दृष्टिकोन दोघांनीही स्वीकारावा अशी त्याची सूचना होती. सर्वात मोठा दोष व धोका मिलला वाटला तो सामान्य जनांच्या अधिकार-लालसेचा व त्यामुळे घडून येणाऱ्या वैयक्तिक स्वातंत्र्यावरील अतिक्रमणाचा. आणि समाजामधे बुद्धीचे, भावनांचे व संस्कृतीचे जे उत्कृष्ट आदर्श आहेत त्यांचा लोप होण्याचीही धास्ती मिलच्या मनाला सारखी टोचत होती. त्याच्या लिखाणात तिचा ठिकठिकाणी उल्लेख आहे. स्वातंत्र्याविषयी ( *On Liberty* ) या प्रबंधात त्या विषयाची विस्तृत चर्चा आहे. काळाचा ओघ समतेच्या दिशेने वाहतो आहे हे मिलला दिसत होते. समतेला त्याचा विरोध नव्हता. पण समतेपेक्षाही स्वातंत्र्य अधिक मोलाचे आहे असे त्याचे मत होते. त्या दृष्टीने समतेवर आधारलेल्या लोकशाहीमधे स्वातंत्र्य अबाधित राहील अशी काळजी घेतली जावी हा त्याचा आग्रह होता.

स्वातंत्र्यावर अतिक्रमण होऊ नये या दृष्टीने मिलने केलेली महत्त्वाची सूचना ही की शासनसंस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित असावे. मुक्त अर्थव्य-वस्थेचा जरी तो पुरस्कर्ता असला तरी प्रचलित समाजव्यवस्थेमधे शासनाला अनेक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात हे त्याला मान्य होते. तरीदेखील जे काम व्यक्ती अगर व्यक्तिसमूह करू शकेल ते शासनाने करू नये असा त्याचा आग्रह होता. एकतर जिव्हाळ्यामुळे व्यक्ती अगर व्यक्तिसमूह ते काम अधिक चांगल्या रीतीने करू शकेल; व दुसरे म्हणजे ते काम स्वतः केल्याने त्यांची बौद्धिक व मानसिक पातळी उंचावेल. याखेरीज

त्यांचा सैद्धांतिक मुद्दा जो आहे तो असा : "समाजाच्या निर्मितीबद्दल आपली कल्पना कोणचीही असो, आणि राजकीय संस्था कोणच्याही असोत, प्रत्येक व्यक्तीच्या भोवती असा एक परिघ असतो की ज्यामधे शासनाला, मग ते एकाचे किंवा थोड्यांचे अगर पुष्कळांचे असो, पाऊल टाकू देऊ नये. समज आलेल्या व्यक्तीच्या जीवनात असा एक भाग असतो की ज्या भागावर त्याच्या व्यक्तित्वाचाच अंमल चालावा व त्यावर दुसऱ्या व्यक्तीचे अगर एखाद्या समुदायाचे नियंत्रण पडू नये" (Whatever theory we adopt respecting the foundation of the social union, and under whatever political institutions we live, there is a circle around every individual human being, which no government, be it that of one, of a few, or of the many, ought to be permitted to overstep: there is a part of the life of every person who has come to years of discretion, within which the individuality of that person ought to reign uncontrolled either by any other individual or by the public collectively. *Principles of Political Economy* Vol. II 3rd Edition, p. 527.) मिलच्या विचारातील हा मध्यवर्ती मुद्दा आहे. 'स्वातंत्र्याविषयी' (*On Libetry*) या प्रबंधात त्याने शासनाच्या दृष्टीनेच नव्हे तर समाजाच्या दृष्टीनेही त्याचे विवेचन केले आहे. शासनाने व समाजानेही व्यक्तीच्या जीवनात एका विवक्षित मर्यादेपलीकडे हस्तक्षेप करू नये हा मिलचा मुख्य आग्रह.

अर्थशास्त्रावरील ग्रंथात दुसऱ्या एका ठिकाणी शासनाने काय करावे आणि लोकांना काय करू द्यावे याबद्दल मिलने लिहिले आहे ते येणे प्रमाणे : "समाजातील सर्व मंडळींना, अगदी खालच्या थरावरील लोकांना देखील स्वतः करता येतील अशा पुष्कळ गोष्टी असाव्या; त्यांची बुद्धी आणि सत्शील यांना शक्य तेवढा खुला वाव मिळावा; त्यांच्याशीच संबंध

असलेली अशी सारी कामे शासनाने त्यांना आपल्या शक्तीनुसार करू द्यावी; एवढेच नव्हे तर, सामुदायिक स्वरूपाची कामे देखील त्यांना खुशीच्या सहकाराने करू द्यावी व ती करण्याच्या कामी उत्तेजन द्यावे; कारण सामुदायिक हिताच्या गोष्टींची चर्चा केल्याने व त्यांची व्यवस्था पाहिल्याने माणसांच्या ठिकाणी सार्वजनिक हिताची जाणीव वाढते; आणि स्वतंत्र देशातील लोकांचे वैशिष्ट्य म्हणून जे सांगण्यात येते त्या सामाजिक व्यवहाराबद्दलच्या ज्ञानाचा उगम आहे तो त्या प्रवृत्तींमधेच." ( It is therefore of supreme importance that all classes of the community, down to the lowest, should have much to do for themselves; that as great a demand should be made upon their intelligence and virtue as it is in any respect equal to; that government should not only leave as much as possible to their own faculties the conduct of whatever concerns themselves alone, but should suffer them, or rather encourage them, to manage as many as possible of their joint concerns by voluntary co-operation: since the discussion and management of collective interests is the great school of that public spirit, and the great source of that intelligence of public affairs, which are always regarded as the distinctive character of the public of free countries. *ibid* p. 535 )

लोकशाहीमधेही सत्तेचे केंद्रीकरण एका मध्यवर्ती शासनसंस्थेमधे होऊ नये असा मिलचा आग्रह होता. देशामधे अनेक स्थानिक स्वराज्य संस्था असाव्यात आणि स्थानिक प्रश्न हाताळण्याची व सोडवण्याची जबाबदारी व सत्ता त्यांच्या ठिकाणी असावी अशी त्याची सूचना होती. स्थानिक संस्थांच्या कारभारात अनेक लोक भाग घेऊ शकतात व त्यामुळे त्यांचे ज्ञान, कर्तबगारी व स्वावलंबन वाढतात हा मिलच्या हिशेबी

स्थानिक संस्थांचा मोठा गुण आहे. टॉकव्हिलेचा अमेरिकन लोकशाही-बद्दलचा ग्रंथ या बाबतीत त्याला मोठा मार्गदर्शक वाटला. लोक कारभारात भाग घेत आहेत अशा तऱ्हेची (participatory) लोकशाही स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकाधिक सत्ता देऊन वाढवता येईल अशी त्याची कल्पना होती. मध्यवर्ती सत्तेने त्यांना मार्गदर्शन करावे, त्यांना माहिती पुरवावी, परंतु त्यांच्या प्रत्यक्ष कारभारात मात्र होता होईल तो हस्तक्षेप करू नये अशी मिलची भूमिका होती.

'प्रातिनिधिक राज्यपद्धत' (*Representative Government*) या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणात स्वतंत्र राज्यांनी आपल्यावर अवलंबून असलेल्या प्रदेशावर राज्य कसे करावे त्याचा मिलने ऊहापोह केला आहे. तो ऊहापोह विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील परिस्थितीत बराचसा गैरलागू आहे. कारण आता परतंत्र प्रदेश असे जवळ जवळ उरलेलेच नाहीत. जे काही थोडे आहेत त्यांची स्वतंत्र होण्याची धडपड चालू आहे. त्यांच्यावर राज्य करण्याच्या पद्धतीत सुधारणा करा अशी मागणी करण्या-ऐवजी त्यांना स्वातंत्र्य द्या हीच मागणी आज जिकडे तिकडे ऐकू येते. या दृष्टीने मिलच्या विवेचनाचे महत्त्व आज केवळ ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. तरीदेखील भारतीयांना ते महत्त्वाचे वाटेल. कारण भारतातील इंग्रजी अंमलाच्या अनुभवावर ते आधारलेले आहे. मिलला त्या अंमलाचा व राज्यपद्धतीचा इंडिया हाउसमधील नोकरीमुळे दीर्घकालीन अनुभव होता.

एका लोकसमुदायाने दुसऱ्या लोकसमुदायावर राज्य करणे मिलला पसंत नव्हते. ऐतिहासिक घटनांमुळे एकाचे राज्य दुसऱ्यावर स्थापन झाले तर लोकांनी स्वतः राज्य न करता राज्याची जबाबदारी काही नियुक्त मंडळींवर सोपवावी. ती मंडळी प्रामाणिक, उदार मताची व कर्तबगार असली तर परतंत्र राष्ट्रातील लोकांचे हित डोळ्यापुढे ठेवून ते राज्यकारभार चालवतील. सामान्य जनतेला व लोकनियुक्त प्रतिनिधींना त्या देशाची काहीच माहिती नसल्याकारणाने राज्यकारभार नीट रीतीने चालवता

येणार नाही. सामान्य जनतेच्या मार्गातील अडचणी मिलने पुढीलप्रमाणे वर्णन केल्या आहेत : "एका देशातील लोकांना दुसऱ्या देशावर राज्य करणे नेहमीच फार कठीण असते आणि ते कधीही नीट रीतीने करता येत नाही. राज्यकर्ते आणि प्रजाजन यांच्यामधे सवयीचे व विचारांचे विशेष वैषम्य नसतानाही ही अडचण निर्माण होते. बाहेरच्या देशातून आलेल्या मंडळींना देशीय मंडळींच्या भावनांशी समरस होता येत नाही. एखाद्या गोष्टीचा ज्यांच्यावर आपण राज्य करतो आहो त्यांच्या भावनांवर काय परिणाम होईल किंवा त्यांच्या मनाला ती कशी भासेल याचा स्वतःच्या मनाला ती कशी भासते व स्वतःच्या भावनांवर तिचा काय परिणाम होतो यावरून परदेशीयांना अंदाज बांधता येणार नाही. साधारण कुवतीच्या देशीय माण-साला देखील जे सहजगत्या समजते ते परदेशीय मंडळींना अभ्यासाने व अनुभवाने हळूहळू शिकावे लागते आणि ते शिकणे अपुरेच ठरते. कायदे, रूढी व ज्याविषयी कायदेकानू बनवायचे ते सामाजिक संबंध यांच्या-विषयी लहानपणापासून माहिती असण्याऐवजी ते त्यांना शेवटपर्यंत नवखेच वाटतात. अनेक गोष्टींच्या साद्यंत माहितीसाठी त्यांना तद्देशीय मंडळीं-वरच अवलंबून राहवे लागते आणि मग कुणावर विश्वास ठेवावा ते ठरवणे कठीण असते. लोकांना त्यांच्याबल भीती वाटते, संशय वाटतो आणि पुष्कळ वेळा अप्रीतीही वाटते. एतद्देशीय मंडळी त्यांच्या गाठीभेटी घेतात त्या केवळ स्वार्थी हेतूने आणि मग जे त्यांच्यापुढे लांगूलचालन करतात तेच त्यांना विश्वासार्ह वाटतात. त्या बाबतीत धोका हा की सगळ्याच एतद्देशीय लोकांचा ते तिरस्कार करू लागतात आणि एतद्देशीय लोकांच्या बाबतीत धोका हा की परक्यानी केलेली कोणचीही आपल्या हिताची गोष्ट असणे शक्य आहे यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. परक्या देशावर चांगल्या रीतीने राज्य करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या मार्गात ज्या अनेक अडचणी असतात त्यांची ही केवळ एक चुणूक आहे." (It is always under great difficulties, and very

imperfectly, that a country can be governed by foreigners, even when there is no extreme disparity in habits and ideas between the rulers and the ruled. Foreigners do not feel with the people. They cannot judge, by the light in which a thing appears to their own minds or the manner in which it affects their feelings, how it will affect the feelings or appear in the minds of the subject population. What a native of the country, of average practical ability, knows as it were by instinct, they have to learn slowly, and after all imperfectly, by study and experience. The laws, the customs, the social relations for which they have to legislate, instead of being familiar to them from childhood, are all strange to them. For most of their detailed knowledge they must depend on the information of natives; and it is difficult for them to know whom to trust. They are feared, suspected, probably disliked by the population; seldom sought by them except for interested purposes; and they are prone to think that the servilely submissive are the trustworthy. Their danger is of despising the natives; that of the natives is of disbelieving that anything the strangers do can be intended for their good. These are but a part of the difficulties that any rulers have to struggle with who honestly attempt to govern well a country in which they are foreigners. *Representative Government*, p. 258 )

भारतातील अनुभवावरून हे लिहिले गेले आहे हे कुणीही सांगू शकेल. म्हणून मिलचा इंग्रजी पार्लमेंटने भारतावर राज्य करावे या गोष्टीला

विरोध होता. त्याच्या मते ईस्ट इंडिया कंपनी कायम राखून तिच्या मार्फतीने राज्य चालविणे अधिक श्रेयस्कर होते. त्याचा युक्तिवाद होता तो हा की इंग्रजी जनतेला भारताची व तेथील बहुविध प्रश्नांची माहिती नाही व ती राज्य करील ते केवळ स्वतःच्या हिताच्या दृष्टीने आणि त्यामुळे भारतीय जनतेची अधिक पिळगूक होईल. म्हणून त्याने ईस्ट इंडिया कंपनीचे विसर्जन होऊ नये व जुनी राज्यपद्धत चालू रहावी अशी खूप खटपट केली. त्याच्या खटपटीला यश आले नाही. व्हिक्टोरिया राणीचा प्रत्यक्ष अंमल भारतावर सुरू झाला आणि परिणामी तीच योजना अधिक श्रेयस्कर ठरली. परतंत्र राष्ट्रे स्वतंत्र व्हावी हे सर्वसाधारणपणे मिलचे मत होते, परंतु त्यांना ते स्वातंत्र्य तावडतोब देऊन टाकता येईल असे मात्र त्याला वाटले नाही. परतंत्र राष्ट्रे अप्रगत आहेत, मागासलेली आहेत; त्यांना शिक्षण देऊन सुसंस्कृत करणे व स्वराज्याला पात्र करणे हे त्यांच्यावर राज्य करणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांचे कर्तव्य आहे असे त्याचे मत होते. आजच्या काळात ते मत कुणाला रुचणार नाही. पण मिलच्या काळात ते मत पुरोगामी स्वरूपाचे होते. त्या मतानुसार भारतामधे नवीन विचार, नवीन पद्धती व नवीन संस्था उभारण्याच्या दृष्टीने इंडिया हाउसशी त्याचा संबंध होता तोवर तो वेळोवेळी सूचना करीत होता. विशेषेकरून १८५७ च्या बंडानंतर भारतातील धार्मिक व सामाजिक व्यवहारात हस्तक्षेप करू नये असा जो विचारप्रवाह सुरू झाला त्याला त्याचा विरोध होता. परतंत्र देशातही स्वदेशी जुलूम करणारे आणि जुलमाखाली भरडून निघणारे, सत्ताधारी श्रीमंत वर्ग आणि गरीब सामान्य जनता असते या गोष्टीकडे तो नेहमी लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत असे. पूर्वोक्त मंडळींना इंग्लंडमधे जाऊनही प्रचार करता येतो, पार्लमेंटची सहानुभूतीदेखील मिळवता येते; उत्तरोक्त मंडळींना मात्र ती प्रचाराची साधने उपलब्ध नसतात, त्यांना होईल तो जुलूम मुकाट सहन करावा लागतो. मिलने उत्तरोक्त सामान्य जनतेचा निःशब्द असंख्य ( silent myriods ) असा उल्लेख केला आहे.

राज्यसंस्थेच्या इतर भागाविषयीही मिलने आपल्या ग्रंथात विचार प्रदर्शित केले आहेत. पण ते तितके महत्त्वाचे नाहीत. एका अत्यंत महत्त्वाच्या विचाराचा पुन्हा उल्लेख करणे मात्र आवश्यक वाटते. तो विचार हा की राज्यसंस्था ही एक सामाजिक योजना आहे; समाजातील लोकांचा, म्हणजेच हरएक व्यक्तीचा, बौद्धिक, सामाजिक व सांस्कृतिक दर्जा उंचावणे हे त्या संस्थेचे प्रमुख कार्य; लोकांना अधिकात अधिक स्वातंत्र्य देऊन व राज्यव्यवहारात प्रत्यक्षपणे भाग घेण्याची त्यांना अधिकात अधिक संधी देऊनच हे कार्य साधता येते. सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीने ती राज्यसंस्था अधिक उपयुक्त की जी हे कार्य अधिक चांगल्या रीतीने करू शकेल. या दृष्टीने विचार करता मिलला लोकशाही व प्रातिनिधिक राज्यव्यवस्था अधिक उपयुक्त वाटली म्हणून त्याने तिचा पुरस्कार केला.

व्यक्तीचे समाजातील स्थान, व्यक्तीचे स्वातंत्र्य व विकास, समाजाच्या उत्कर्षासाठी सुजाण व सुसंस्कृत स्वतंत्र व्यक्तीची वाढ होण्याची अवश्यकता यावरील विचार मिलने 'स्वातंत्र्याविषयी' ( *On Liberty* ) या प्रबंधात ग्रथित केले आहेत; त्या प्रबंधाचे संपूर्ण भाषांतर पुढे आहे. म्हणून त्यात व्यक्त केलेल्या विचारांचा इथे मथितार्थ देण्याची आवश्यकता नाही. त्या प्रबंधाबद्दल जे लिहिले गेले आहे त्याचा थोडक्यात उल्लेख करणे मात्र जरूरीचे वाटते. प्रबंधाचे जे महत्त्व आहे ते त्याच्या योगाने नीट लक्षात येईल.

स्वातंत्र्य या विषयावर जे अमर वाङ्मय निर्माण झाले आहे त्यामधे मिलच्या या प्रबंधाचा समावेश होतो. पुष्कळांनी मिल्टनच्या एरोपॅजिटिका ( Aeropagitica ) या विख्यात निबंधाशी त्याची तुलना केली आहे. लॉर्ड मोर्ले या प्रख्यात उदारमतवादी तत्त्वचिंतकाने प्रबंधाविषयी आपल्या आठवणीत लिहिले आहे : "हे लहान पुस्तक दुर्मिळ पुस्तकांपैकी एक आहे. ती दुर्मिळ पुस्तके की ज्यांच्यावर विरोधी टीकाकारांनी हवी तशी टीका केल्यानंतरही त्यांच्यामधे असे काही उरते की ज्याच्या योगाने माणसाच्या

प्रतिष्ठेत मोठी भर पडते." ( The little volume belongs to the rare books that after hostile criticism has done it best are still found to have somehow added a cubit to man's stature. *Recollections*, Lord Morley, Vol I p. 61 ) प्रबंधाच्या भाषेची, विचारसंपदेची आणि त्यामधे व्यक्त झालेल्या जिवंत तळमळीची पुष्कळांनी मुक्त कंठाने स्तुती केलेली आहे.

प्रबंधावर अनेकांनी टीकाही केलेली आहे. काहींना त्याचे मुख्य प्रमेय मान्य नाही; तर काहींना त्याच्यातील युक्तिवाद अपुरा वाटतो. प्रसिद्ध इतिहासकार व लेखक मेकॉले याची टीका वेगळ्या तऱ्हेची आहे. तो म्हणतो की पृथ्वी पुराने वाहून जात असताना मिल आग लागली अशी ओरड करतो. मेकॉलेची ही टीका सार्थ मानणारी बरीच मंडळी आहेत. त्यांच्या टीकेचा आशय आहे तो हा की मिलने प्रबंध लिहिला त्या काळात इंग्लंडमधे भरपूर भाषणस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य होते; म्हणून मिलने व्यक्त केलेली भीती अनाठायी होती; जिथे स्वातंत्र्याला भरपूर वाव आहे तिथे त्याचा लोप होईल अशी धास्ती बाळगण्याचे कारण काय ? या टीकेला उत्तर एवढेच की मिल विद्यमान परिस्थितीबद्दल लिहीत नव्हता; या परिस्थितीच्या पोटात ज्या प्रवृत्ती वाढीस लागल्या होत्या त्यांच्यावर त्याचे लक्ष केंद्रित झाले होते. राजकीय सत्तेचे वितरण झाल्यानंतर अशिक्षित व असंस्कृत असा सामान्य जनांचा समुदाय– समाज एक विचाराचा, एक पातळीचा व एक रुचीचा असावा असा आग्रह धरण्याची शक्यता होती. तो आग्रह व्यक्तिविकासाच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड आला असता. मिलला तो धोका दिसत होता. आपल्या पिढीला व पुढे येणाऱ्या पिढ्यांना सावधान करण्यासाठी त्याने तो प्रबंध लिहिला.

मिलचा हा प्रबंध चिरंतन महत्त्वाचा आहे. व्यक्ती आणि समुदाय यांच्यामधील संघर्ष चिरस्थाई स्वरूपाचा असून तो वेगवेगळ्या काळी व वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळी रूपे धारण करतो. मिलचे पहिले वैशिष्ट्य

हे की त्या संघर्षातील व्यक्तीची बाजू त्याने निर्धाराने आणि मुद्देसूद रीतीने पुढे मांडली. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर व विकासावर होणारा आघात केवळ शासनयंत्रणेकडून होत नाही तर तो समाजाकडूनही होतो आणि समाजाकडून होणारा आघात जास्त व्यापक व घातुक स्वरूपाचा असतो हे त्याने दाखवून दिले हे त्याचे दुसरे वैशिष्ट्य. तिसरे वैशिष्ट्य हे की व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी स्थलकालातीत असे काही नियम त्याने घालून दिले. मिलने वर्णन केलेली परिस्थिती व त्याने सुचविलेले नियम आजच्या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील परिस्थितीलाही लागू पडण्यासारखे आहेत. आज जगातील अनेक देशांमधे जो सामुदायिक समाज ( mass society) निर्माण होत चालला आहे त्यामधे व्यक्तीला सुरक्षित स्थान नाही. व्यक्तिवैशिष्टय व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा लोप होत चालला असून समाज एकजिनसी असावा, त्यामधे विसंवादी सूर निघू नयेत अशी जोराची धडपड सुरू आहे. अशावेळी मिलचा प्रबंध अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे हे कुणालाही नाकारता येणार नाही. प्रबंधात निरुत्तर करणारा युक्तिवाद आहे तसाच भावनेचा ओलावा आहे. मनाची तळमळ आणि बुद्धीची कुशाग्रता यांचा प्रबंधात मनोहर संगम झालेला आहे. एक शतकापूर्वी लिहिलेला तो प्रबंध आजच्या युगालाही मार्गदर्शन करू शकेल. ग्रीस आणि इटली येथील निसर्गरमणीय परिसरात आणि ग्रीक व रोमन संस्कृतींनी भारावलेल्या वातावरणात मिलने तो लिहिला. स्वातंत्र्यावर सुंदर व परिपूर्ण असे काही लिहावे असे फार दिवस त्याच्या मनात होते. सौंदर्य आणि संस्कृती यांचा श्रेष्ठ उपासक व उद्गाता जर्मन महाकवी गटे याच्या वाङ्मयाचे तो त्या काळात परिशीलन करीत होता. प्रिय सखी आणि विदुषी पत्नी हॅरिएट हिच्या प्रतिभाशाली बुद्धीची जोड त्याला लाभली होती. तिच्या आणि त्याच्या सहाध्ययनाचे, सहचिंतनाचे व सहविचाराचे तो प्रबंध हे एक परिपक्व फळ आहे. त्या फळाची गोडी अशी अवीट आहे की सुशिक्षित व सुसंस्कृत जगाला तिचा कधीही विसर पडणार नाही.

व्यक्तीचा विकास म्हणजेच समाजाचा विकास असे मिलचे समीकरण होते. व्यक्तीच्या विकासाला मर्यादा नाही. त्या मर्यादारहित विकासाला पूर्ण वाव देणे हे समाजाचे कर्तव्य आहे. व्यक्तीच्या हातून चुका होतील, पण अनुभवाने त्या चुका सुधारल्या जातील, आणि ती संधी लाभल्यामुळेच व्यक्तीचा स्वतंत्र व्यक्ती म्हणून विकास होईल. कोणचीही गोष्ट आप्तवाक्याच्या बळावर सत्य म्हणून स्वीकारू नये. बुद्धीला पटली व अनुभवाने सिद्ध झाली तरच तिचा सत्य म्हणून स्वीकार व्हावा आणि हे सत्य देखील सदोदित तपासत राहिले पाहिजे. नवीन अनुभवामुळे त्यामधे फेरफार करण्याची आवश्यकता भासणे शक्य आहे. म्हणून बुद्धीचे व विचारांचे स्वातंत्र्य हवे. सेंट अँड्रूज विश्वविद्यालयामधे रेक्टर म्हणून निवड झाल्यानंतर मिलने जे प्रास्ताविक भाषण ( Inaugural Address ) केले त्यामधे त्याने विद्यार्थ्यांना जो सल्ला दिला तो हा : " तुम्ही काहीही करा, पण मनाची कवाडे खुली ठेवा. तुमचे विचारस्वातंत्र्य कधीही हरवू नका " ( Whatever you do keep your minds open. Do not barter away your freedom of thought ). विचारस्वातंत्र्यामुळेच मनुष्यजातीची प्रगती होते व विचार जिथे कुंठित होतो तिथे प्रगतीही संपते असा मिलचा सिद्धांत होता. व्यक्तीखेरीज विचार नाही. म्हणून व्यक्ती ज्या प्रमाणात स्वतंत्र त्या प्रमाणात ती स्वतंत्र विचारांची निर्मिती करू शकते. स्वतंत्र प्रज्ञेच्या व्यक्तींच्या विकासाला अनुकूल अशी समाजाची रचना असावी, समाजामधे विवेकनिष्ठेला प्राधान्य असावे आणि सद्सद्विवेकबुद्धीला पटणार नाही असे कोणतेही कृत्य करण्याची कोणतीही सक्ती होऊ नये. असा समाज निर्माण व्हावा ही मिलची आकांक्षा होती आणि ती आकांक्षा पुरी व्हावी म्हणून तो आमरण झटत राहिला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमधे व फ्रान्स, जर्मनी, इटली आदि करून राष्ट्रांमधे जी उदारमतवादाची चळवळ वाढली

तिच्यावर मिलच्या मतांचा व कृतींचा खूप प्रभाव पडला. उदारमतवादाचे बरेचसे पुरस्कर्ते त्याला गुरुस्थानी मानत होते. बुद्धिमान् तरुणांना त्याच्या विचारांचे कसे आकर्षण वाटत होते त्याचे वर्णन बर्ट्रंड रसेलने आपल्या आत्मचरित्रात केले आहे. रसेलचा बाप मिलचा शिष्य व स्नेही होता. अमेरिकेतही अनेक प्रसिद्ध विचारवंत मिलच्या विचारांना मोठा मान देत असत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उदारमतवाद मागे पडला होता. अलीकडे समाजाला त्याची आवश्यकता पुन्हा परत भासू लागली आहे. त्यामुळे मिल व त्याचे विचार यांच्याबद्दलची जिज्ञासा पुन्हा जागृत झाली असून त्याच्या जीवनाचा व वाङ्मयाचा सध्या सखोल अभ्यास चालू आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या पिढीतील नेत्यांवर मिलच्या विचारांचा खूप प्रभाव पडला होता. त्या विचारानुसार भारतामध्ये उदारमतवादी चळवळ उभारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे ती चळवळ त्या काळात वाढली नाही. सुशिक्षित विचारवंतांच्या मनातील मिलबद्दलचा आदर व प्रेम मात्र कधी कमी झाले नाही.

एकोणिसावे शतक युरपचे आशावादाचे शतक होते. ज्ञान आणि विज्ञान यांची सारखी वाढ होत होती. उद्योग आणि व्यापार यांची भरभराट चालू होती. युरोपिअन राष्ट्रांचे जगावर स्वामित्व प्रस्थापित झाले होते आणि रानटी लोकांना सुधारण्यासाठी आपण आशिया व आफ्रिका खंडातील देशांत जात आहो असे युरपमधील पुष्कळ सुसंस्कृत आणि सुशिक्षित लोकांना वाटत होते. प्रगती हा इतिहासाचा नियम असून त्या नियमानुसार अकुंठित प्रगती होत जाईल असा त्यांचा समज होता. पुढारलेल्या युरोपिअन राष्ट्रांतील समाज खूप बदलले आणि ते आणखीही खूप बदलतील असा त्यांना विश्वास वाटत होता. राजकारणात लोकशाही, अर्थकारणात सुबत्ता व समाजकारणात समता सारखी वाढत जाईल अशी त्यांची कल्पना होती. शिक्षणाच्या प्रसारामुळे माणसे अधिक सुसंस्कृत व समाजहितदक्ष बनतील अशी त्यांना खात्री वाटत होती. त्यामुळे

तत्त्वचिंतकांमधे व समाजधुरीणांमधे आशावादाचे वातावरण होते. मिल त्या वातावरणात वाढला. त्यामुळे तोही आशावादी होता. समाजातील अनेक दोष त्याला दिसत होते, गरीब जनतेचे दुःख आणि दारिद्र्य त्याच्या नजरेत भरत होते. पण या साऱ्या अडचणी दूर करता येण्यासारख्या आहेत अशी त्याची खात्री होती. लोकशाहीचा व शिक्षणाचा प्रसार होताच जनतेच्या सुखाच्या मार्गातील अडचणी दूर होतील असा त्याचा ठाम विश्वास होता. म्हणून त्याच्या लिखाणात सर्वत्र आशावादी सूर आढळतो. शेवटी शेवटी मात्र त्याच्या मनात थोडा संशय उत्पन्न होऊ लागला होता. संस्था बदलल्या, पण माणसे बदलली नाहीत; शिक्षणाचे अपेक्षित परिणाम घडून आले नाहीत; जुन्या विचारांचे व रूढींचे प्रस्थ कमी झाले नाही—अशा काही गोष्टी पाहिल्यानंतर तो थोडा साशंक होई; पण त्याच्या हयातीत समाजाची एकंदरित प्रगतीच होत गेली; त्यामुळे त्याला आपला आशावादी दृष्टिकोन बदलणे भाग पडले नाही.

एकोणिसाव्या शतकात इंग्लंड भाग्याच्या शिखरावर होते. त्याचा उत्कर्ष सारखा चालूच होता. त्या उत्कर्षाला कधी उतरती कळा लागेल अशी त्या काळात कुणाला शंका देखील वाटली नाही. ऐहिक ऐश्वर्याच्या बाबतीतच नव्हे तर वैचारिक व सामाजिक क्षेत्रातही इंग्लंड अग्रेसर होते. अशा या आपल्या वर्धिष्णू व विजिगीषू देशाचा व समाजाचा मिलला अभिमान होता. इंग्लंडचा त्याने एके ठिकाणी "पृथ्वीतळावरील सर्वात अधिक श्रीमंत व स्वतंत्र आणि तसेच सुसंस्कृत आणि सामर्थ्यवान् राष्ट्र" (the wealthiest–and one of the freest as well as most civilized and powerful nation of the earth. *Representative Government*, p. 236) असा उल्लेख केलेला आहे. इंग्रजी समाजाच्या त्या उत्तुंग भूमिकेवरून आशिया व आफ्रिका खंडातील समाज अर्धरानटी अवस्थेत आहेत असे मिलला वाटल्यास नवल नाही. त्या समाजांच्या संस्कृतीबद्दल त्या काळात फारच थोडी माहिती

उपलब्ध होती. शिवाय पाश्चात्य समाजांच्या संस्कृतीतील मूळावरच घाव घालतील असे दोष तोवर दृग्गोचर झाले नव्हते. आशिया आफ्रिकेतील देशांची अर्धरानटी अवस्था मिलच्या मनाला शल्यासारखी बोचत होती. तो मागसलेपणा पाश्चात्य राष्ट्रांनी नष्ट केला पाहिजे व मागासलेल्या देशातील जनतेला सुधारणेचे व संस्कृतीचे सर्व लाभ मिळवून दिले पाहिजेत हा त्याचा नेहमीचा आग्रह असे.

एकोणिसाव्या शतकातील एक प्रख्यात विचारवंत म्हणून मिलचे नाव इतिहासात अजरामर आहे. त्याने केलेला बुद्धिवादाचा, उदारमतवादाचा व मानवतेचा पुरस्कार जागतिक विचारसंपदेचा अविभाज्य भाग बनला आहे. विसाव्या शतकातील पुरोगामी चळवळ त्याच्याकडे स्फूर्तिदाता गुरू म्हणून पाहते. त्याने निर्माण केलेल्या विचारधनात आजच्या युगाला मार्गदर्शक ठरेल असे पुष्कळ आहे.

— व. भ. कर्णिक

# निवेदन

ही प्रस्तावना अडीच वर्षांपूर्वी लिहिली. भाषांतर त्याच्या अगोदर काही महिने पुरे झाले. मुद्रिते तपासताना ज्या एका व्यक्तीने लेखन वरचेवर वाचून व त्याचे कौतुक करून मला उत्तेजन दिले तिची क्षणोक्षणी आठवण होत होती.

ती व्यक्ती हयात असती तर तिच्या ऋणाचा उल्लेख करण्याचे कारण पडले नसते. परंतु जवळ जवळ दोन वर्षांपूर्वी एका काळरात्री एका दुरात्म्याने सर्वांशी प्रेमाने वागणाऱ्या त्या सुशील माऊलीचा निर्घृण खून केला. त्यामुळे त्या ऋणाचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही.

ती व्यक्ती म्हणजे माझी प्रिय पत्नी विमल. मिल आणि हॅरिएट टेलर यांच्या अलौकिक प्रेमाची कथा माझ्या तोंडून ऐकल्यापासून विमलला या प्रबंधाबद्दल व त्याच्या भाषांतराबद्दल अतीव जिव्हाळा निर्माण झाला होता. भाषांतर जसे होईल तसे ती वाचीत असे. आणि प्रस्तावनाही तिने मोठ्या आवडीने वाचली होती. पुस्तक लवकर प्रसिद्ध व्हावे अशी तिची फार इच्छा होती. म्हणून भाषांतर झटदिशी पुरे करावे असे तिने सारखे माझ्या पाठीमागे टुमणे लावले होते. पुस्तक आता थोड्या दिवसात प्रसिद्ध होईल. परतु प्रसिद्ध झालेले ते पुस्तक पहायला मात्र ती हयात नाही.

मिलने हा प्रबंध हॅरिएट टेलरला अर्पण केला आहे. त्याचे अनुकरण करून मी हे भाषांतर माझी प्रिय पत्नी विमल हिला अर्पण करत आहे. मिल व हॅरिएट टेलर ही ताल वृक्षासारखी उत्तुंग माणसे त्या मानाने आम्ही फार छोटे, परंतु हॅरिएट टेलरच्या सहवासात मिलला जे अपूर्व प्रेमजीवन लाभले तेच मला माझ्या पत्नीच्या सहवासात आढळले. विमल ही खरोखर "प्रमला" होती. सर्वांच्यावर तिने प्रेमाचा वर्षाव केला.

प्रेमाच्या बरोबरीने तिच्या ठिकाणी कविवर्य माधव जुलियन यांनी ज्याची गोडवी गाईली आहे ती "थोर सहिष्णुता, रसिकता" देखील होती. त्यामुळेच आयुष्यभर अनेक कष्ट सहन करूनही ती अखेरपर्यंत "प्रेमला" राहिली.

विमलने माझे जीवन आणि संसार उभारला, फुलवला आणि समृद्ध केला, गरीबीच्या संसारातही तिने मला, मुलाबाळांना, कुटुंबीयांना आणि सार्वजनिक कार्यातील माझ्या सर्व लहानथोर सहकाऱ्यांना कधी काही उणे पडू दिले नाही. विवाहामधे पाणीग्रहण केले तेव्हापासून तिने माझ्यावर अपार विश्वास टाकला होता. मी मात्र त्या विश्वासाला पात्र ठरलो नाही. शेवटचा प्रसंग तिच्यावर गुदरला तेव्हा मी तिचे रक्षण करू शकलो नाही; एवढेच नव्हे तर तिला धीर द्यायला देखील मी त्या क्षणी हजर नव्हतो. राहत्या घरी विश्रब्ध मनाने निद्रिस्त असताना मानेभोवती गळफास आवळला गेला त्या क्षणार्धात तिच्या मनात काय काहूर उठले असेल त्याची मला कल्पनाही करवत नाही. त्या क्षणी तिला कुणी त्राता आढळला नाही.

ती गेली आणि आता उरल्या आहेत त्या केवळ तिच्या मधुर स्मृती. त्या स्मृतींच्या चरणी ही फुलाची पाकळी मी विनम्र भावाने वहात आहे.

अभंग, साहित्य सहवास,<br>वांद्रे (पूर्व) मुंबई ५१<br>२३ जॅन्युआरी १९७१

व. भ. कर्णिक

## स्वातंत्र्याविषयी

या पानांमधे विशद केलेल्या प्रत्येक युक्तिवादातून जे उदात्त व सर्वापेक्षा श्रेष्ठ तत्त्व सिद्ध होते ते हेच की विविध मार्गांनी व विविध क्षेत्रात घडून आलेला मानवाचा विकास हीच सर्वोत्तम आणि सर्वथैव महत्त्वाची अशी गोष्ट आहे.

— विल्हेल्म फॉन् हम्बोल्ट, स्फिअर अँड ड्यूटीज ऑफ गव्हर्नमेंट *Sphere and Duties of Government.*

# अर्पणपत्रिका

माझ्या लेखनामधे जे उत्कृष्ट आहे त्याला जिने स्फूर्ती दिली व जे तिने थोडेबहुत स्वतः लिहिले तिच्या प्रेमळ आणि शोकपूर्ण स्मृतीस मी हे पुस्तक अर्पण करीत आहे. ती माझी मित्र आणि पत्नी होती. सत्य आणि योग्य याबद्दलची तिची उदात्त भावना हीच माझी मुख्य प्रेरणा होती व तिची पसंती हेच माझे मुख्य समाधान होते. अनेक वर्षांपासून मी जे लिहितो आहे ते जितके माझे आहे तितकेच तिचे आहे. परंतु या पुस्तकाला मात्र तिच्या अमूल्य निरीक्षणाचा व सुधारणांचा लाभ फारच थोडा मिळाला. काही महत्त्वाचे भाग, त्यांचे तिने पुनः काळजी-पूर्वक परीक्षण करावे म्हणून, बाजूला ठेवले होते. आता ते परीक्षण त्यांना लाभणे शक्य नाही. तिच्याबरोबर तिच्या थडग्यामधे जे बहुमोल विचार व उदात्त भावना पुरल्या गेल्या आहेत त्या अल्पस्वल्प जरी मला जगापुढे ठेवता आल्या तरीदेखील जगाला हितकारक अशा गोष्टी मी अधिक चांगल्या रीतीने लिहू शकेन. तिच्या उत्तेजनाखेरीज आणि जिला तोड सापडणार नाही अशा तिच्या प्रज्ञेच्या मदतीविना मी काही विशेष चांगले लिहू शकेन असे वाटत नाही.

प्रकरण १

# प्रास्ताविक

या निबंधामधे जे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे ते मनुष्य स्वतंत्रेच्छ आहे की परमेश्वरी इच्छेने किंवा नियतीने बांधलेला आहे या तात्त्विक वादातील स्वातंत्र्यापेक्षा वेगळे आहे. इथे जे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे ते नागरी किंवा सामाजिक स्वातंत्र्य. समाज व्यक्तीवर न्यायानुसार जी सत्ता गाजवू शकतो त्या सत्तेचे स्वरूप आणि तिच्या मर्यादा हा या निबंधाचा विषय आहे. हा मुद्दा कधी स्पष्टपणे मांडला जात नाही; आणि त्याची सर्वसाधारण अशी चर्चाही क्वचित् होते; पण आजच्या युगामधे व्यावहारिक स्वरूपाचे जे अनेक वाद निर्माण झाले आहेत त्यांच्यावर, उघड अगर नकळत, त्याचा खूप प्रभाव पडलेला आहे. आणि उद्याच्या युगामधे अत्यंत महत्त्वाचा युगप्रश्न असे स्थान त्याला लवकरच लाभेल असे म्हणता येते. हा प्रश्न तसे पाहिले तर नवा नाही. एका दृष्टीने अगदी पुरातन काळापासून मानवी समाजामधे त्या प्रश्नामुळे दुही माजलेली आहे. मनुष्यजातीतील अधिक सुसंस्कृत अशा गटांनी आता जो प्रगतीचा टप्पा गाठला आहे त्या टप्प्यामधे तो प्रश्न वेगळ्या आणि नवीन परिस्थितीत उभा राहतो आणि त्याचा वेगळ्या आणि अधिक मूलगामी पद्धतीने विचार करावा लागतो.

ग्रीस, रोम आणि इंग्लंड यांचा अगदी लहानपणापासून आपल्याला जो इतिहास माहीत आहे त्याचा डोळ्यात भरेल असा महत्त्वाचा भाग स्वातंत्र्य आणि सत्ता ( authority ) यांच्यातील संघर्ष आहे. जुन्या काळी हा संघर्ष शासन (government) आणि प्रजाजन (subjects) अगर प्रजेचे काही वर्ग यांच्यामधील संघर्ष होता. राज्यकर्त्यांच्या

जुलुमाविरुद्ध संरक्षण असा त्यावेळी स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ होता. ग्रीसमधील काही लोकसत्ताक राज्ये सोडली तर इतर सर्व ठिकाणी ज्या प्रजेवर राज्यकर्ते राज्य करीत असत त्या प्रजेशी त्यांचे संबंध शत्रुत्वाचे असत असेच गृहीत धरले जात असे. राज्यकर्ता एक पुरुष असो अगर एखादी जात अगर जमात असो; राज्य करण्याचा अधिकार वारसाहक्काने अगर जेते म्हणून मिळालेला असे. निदान प्रजेच्या संमतीनुसार तो अधिकार मिळालेला नसे; आणि अधिकाराचा जुलमी पद्धतीने उपयोग होऊ नये म्हणून काळजी घेतलेली असो अगर नसो, राज्यकर्त्यांच्या त्या अधिकाराला विरोध करण्याची हिंमत, किंवा कदाचित् इच्छा देखील, कुणाच्याही ठिकाणी नसे. त्यांची सत्ता आवश्यक आहे असेच समजले जात असे; ती मोठी धोक्याची आहे याची देखील प्रजेला कल्पना होती. कारण बाहेरील शत्रूंच्या बरोबरीने आपल्यावर देखील शस्त्र म्हणून ती सत्ता वापरण्याचा प्रयत्न होईल याची तिला पूर्ण कल्पना होती. समाजातील दुबळी मंडळी गिधाडांच्या भक्ष्यस्थानी पडू नयेत म्हणून त्या सर्वांच्यापेक्षा बलवत्तर असा एखादा हिंस्र पशू त्या सर्वांना दडपून टाकण्यासाठी असणे आवश्यक आहे अशी समजूत होती. परंतु गिधाडांचा राजा त्याच्या कळपातील इतर गिधाडांपेक्षा कमी हिंस्र नसतो, त्यामुळे त्याची चोच आणि नखे यांच्यापासून आपला बचाव व्हावा म्हणून एक प्रकारची संरक्षक वृत्ती प्रजाजनांना नेहमीच कायम राखावी लागत असे. समाजावर सत्ता गाजविण्याचा जो अखत्यार राज्यकर्त्यांना द्यावा लागतो त्यावर मर्यादा घालण्याचे कार्य देशभक्तांना ( patriots ) करावे लागते आणि त्या मर्यादा म्हणजेच स्वातंत्र्य असे ते समजत असत. मर्यादा घालण्याच्या दोन पद्धती होत्या. राजकीय स्वातंत्र्य किंवा हक्क या नावाने काही कृत्यांना अभय ( immunity ) लाभले पाहिजे अशी मान्यता मिळवणे आणि त्या अभयाचा भंग करणे ही एक कर्तव्यच्युती आहे असे समजून तिला तिच्यापुरता विरोध करणे अगर तिच्याविरुद्ध सार्वत्रिक बंड

उभारणे समर्थनीय आहे असे मानणे हा एक मार्ग. दुसरा आणि साधारणपणे नंतरच्या काळात उपयोगात आणलेला मार्ग म्हणजे सनदशीर वा कायद्यावर आधारलेले (constitutional) निर्बंध निर्माण करण्याचा. या निर्बंधाप्रमाणे राज्यकर्त्यांच्या महत्त्वाच्या कृत्याला समाजाची अगर समाजाच्या हिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एखाद्या समितीची मान्यता लाभली पाहिजे असा दंडक घालून देण्यात येत असे. मर्यादा घालण्याच्या पहिल्या पद्धतीला युरपमधील देशांतील सर्व राज्यकर्त्यांना मान्यता देणे भाग पडले. दुसऱ्या पद्धतीला मात्र लवकर मान्यता लाभली नाही. ती मान्यता मिळवणे अगर जिथे ती थोडीबहुत लाभली असेल तिथे ती अधिक पूर्णांशाने मिळवणे हे स्वातंत्र्यभक्तांचे सगळीकडे प्रमुख उद्दिष्ट बनले, आणि जोवर मनुष्य जात एका शत्रूशी लढण्यासाठी दुसऱ्या शत्रूचा उपयोग करण्यात किंवा, जुलुमाविरुद्ध थोडेबहुत अभय लाभले, की एखाद्या हुकूमशहा-(master) च्या अमलाखाली नांदण्यात समाधान मानत होती, तोवर स्वातंत्र्यभक्तांना आपल्या आकांक्षा यापलीकडे नेता आल्या नाहीत.

मानवी व्यवहारांच्या विकासात एक काळ असा आला की ज्या वेळी आपले राज्यकर्ते आपल्या हिताला विरोधी अशी एक वेगळी स्वतंत्र शक्ती या नात्याचेच असले पाहिजेत असा काही सृष्टीचा नियम नाही असे मानवांना वाटू लागले. शासनाचे वेगवेगळे अधिकारी (magistrates) आपल्या इच्छेनुसार बदलता येतील असे आपले प्रतिनिधी अगर ताबेदार (tenants) असले तर बरे होईल असे त्यांना वाटू लागले. असे घडले तरच शासनाची सत्ता आपल्या हिताविरुद्ध वापरली जाणार नाही अशी पूर्ण खातरजमा लाभेल असे त्यांना वाटू लागले. जिथे लोकांचा पक्ष होता तिथे राज्यकर्ते निवडलेले व अस्थाई स्वरूपाचे असावे ही नवी मागणी त्या पक्षाच्या कार्याचे हळूहळू प्रमुख उद्दिष्ट बनले; आणि राज्यकर्त्यांच्या सत्तेवर मर्यादा असाव्या या जुन्या प्रयत्नांना त्यानंतर गौण स्वरूप प्राप्त झाले. प्रजेने वेळोवेळी व्यक्त केलेल्या

इच्छेतूनच राजसत्तेचा ( ruling power ) उगम झाला पाहिजे याबद्दलचा लढा जसा वाढत गेला तसे सत्तेवर नियंत्रणे लादण्याच्या प्रवृत्तीला जास्त महत्त्व दिले जात आहे असे काही मंडळींना वाटू लागले. लोकांच्या हिताशी विरोधी असे हितसंबंध असणाऱ्या राज्यकर्त्यांच्या बाबतीत ती प्रवृत्ती ठीक होती असे त्यांना वाटत असावे. आता गरज होती ती याची की राज्यकर्ते आणि जनता हे एकरूप व्हावे व राष्ट्राचे हित व इच्छा हीच राज्यकर्त्यांचे हित व इच्छा असावी. स्वतःची जी इच्छा तिच्याविरुद्ध राष्ट्राला संरक्षणाची गरज नाही. स्वतःवरच राष्ट्र जुलूम करील अशी धास्ती बाळगण्याचे कारण नाही. राज्यकर्ते राष्ट्राला पूर्णपणे जबाबदार असावेत, त्यांना लागेल त्यावेळी काढून टाकण्याचा राष्ट्राला अधिकार असावा; मग ज्या सत्तेचा वापर कसा करावा ते राष्ट्र स्वतः ठरवू शकते ती सत्ता त्या राज्य कर्त्यांच्या खुशाल हवाली करता येईल. राज्यकर्त्यांची सत्ता ही राष्ट्राची सत्ता, एकत्रित झालेली आणि वापरण्यासाठी जास्त सोयीचा असा आकार धारण केलेली. ही विचारसरणी किंवा भावना युरोपमधील उदारमतवाद्यांच्या गेल्या पिढीमधे बरीच प्रचलित होती. फ्रान्स, जर्मनी आदीकरून देशातील उदारमतवाद्यांमधे ती आजदेखील प्रबळ आहे असे दिसते. जी शासने अस्तित्वात राहूच नयेत अशी त्यांची धारणा आहे त्याखेरीज इतर शासनांच्या कृतीवर काही बंधने असावी असे मानणारे विचारवंत युरप खंडातील राजकीय विचारवंतांमधे फारच थोडे आहेत; ज्यांना उज्ज्वल अपवाद म्हणता येईल असे ते आहेत. या देशातही तीच भावना वाढलेली दृष्टीस पडली असती. ज्या परिस्थितीने तिच्या वाढीला काही काळ उत्तेजन दिले ती परिस्थिती तशीच बदल न होता टिकली नाही म्हणून तिची वाढ झाली नाही.

अपेशामुळे जे दोष आणि वैगुण्ये ( infirmities ) नजरेआड झाली असती ती पुष्कळ वेळा यशामुळे डोळ्यापुढे येतात. माणसांच्या बाबतीत जसे हे घडते, तसेच ते राजकीय आणि तत्त्वज्ञानविषयक

सिद्धांतांच्या ( theories ) बाबतीतही घडते. लोकमतानुवर्ती शासन ( popular government) हे जोवर केवळ स्वप्नासारखे होते किंवा खूपच दूरच्या पुराण काळामधे ते अस्तित्वात होते असे पुस्तकामधे जोवर त्याच्याविषयी वाचले जात होते; तोवर लोकांनी स्वतःवर गाजविण्याच्या सत्तेवर बंधन घालण्याचे कारण नाही ही गोष्ट स्वयंसिद्ध सत्यासारखी भासत होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळामधे जे तात्पुरत्या स्वरूपाचे अनाचार घडून आले त्यामुळे त्या कल्पनेला धक्का बसला नाही. ते अनाचार सत्ता बळकावणाऱ्या काही थोड्या लोकांच्या हातून घडले होते. राजेशाही आणि अमीरउमराव यांच्या जुलमाविरुद्ध जो आकस्मिक स्वरूपाचा उद्रेक उठला त्यामधे ते घडून आले, लोकमतानुवर्ती संस्थांच्या नेहमीच्या कामकाजाशी त्यांचा मुळीच संबंध नव्हता. थोड्याच काळात एका मोठ्या भूभागावर लोकशाहीच राज्य ( democratic republic ) उभे राहिले; राष्ट्रांच्या मालिकेमधे एक बलाढ्य राष्ट्र म्हणून त्याने स्वतःसाठी मानाचे स्थान मिळवले; आणि जगातील महत्त्वाच्या विद्यमान वस्तूवर जशी टीका आणि इतर निवेदने होतात तशीच त्या लोकनियुक्त आणि जबाबदार शासनावर होऊ लागली. त्या वेळी लक्षात आले की "स्वतःचे राज्य" ( self -government ) "जनतेची स्वतःवरील सत्ता" वगैरे वाक्प्रचार वस्तुस्थितीचे निदर्शक नसतात. सत्तेचा वापर करणारे लोक ( people ) आणि ज्यांच्यावर ती सत्ता वापरली जाते ते लोक हे दोघे पुष्कळ वेळा एक नसतात. आणि स्वराज्य म्हणून जे ओळखले जाते ते प्रत्येकाचे स्वतःवरील राज्य नसते, तर बाकीच्या सर्वांचे प्रत्येकावरील राज्य असते. लोकांची इच्छा ही त्यांच्यातील जे बहुसंख्य असतील अगर त्यांच्यातील जे चळवळे ( active ) असतील अगर जे स्वतःला बहुसंख्य म्हणून मान्यता मिळवून घेऊ शकतील त्यांची इच्छा असते. म्हणूनच आपल्यातील काही मंडळींवर जुलूम करण्याची लोकांना इच्छा होणे शक्य आहे. सत्तेच्या इतर कोणत्याही दुरुपयोगाइतकीच या इच्छे-

विरुद्धही खबरदारी घेणे अवश्य आहे. म्हणूनच सत्ताधारी समाजाला, म्हणजेच समाजातील सर्वात अधिक प्रबळ पक्षाला, नियमानुसार जबाबदारीने राज्य करण्याची सवय लागली. तरीदेखील व्यक्तीवरील शासनाच्या सत्तेला मर्यादा घालण्याचे महत्त्व तिळमात्रही कमी होत नाही. विचारवंतांच्या बुद्धीला पटणारा आणि ज्यांचे हितसंबंध लोकशाहीमुळे खरोखर किंवा आभासतः धोक्यात आले आहेत अशा युरोपिअन समाजातील प्रतिष्ठित वर्गांच्या भावनेला रुचणारा हा विचार बराचसा मान्य झाला आहे. आणि म्हणूनच राजकीय विवेचनामध्ये "बहुसंख्यांकांचा जुळूम" या गोष्टीचा समाजातील ज्या अनिष्ट प्रवृत्ती विरुद्ध खबरदारी घ्यावयाला हवी त्यामधे उल्लेख होऊ लागला आहे.

बहुसंख्यांकांच्या जुलुमाची सुरवातीला आणि आजदेखील पुष्कळांना अजाणतेपणी धास्ती वाटते ती तो इतर जुलुमाप्रमाणेच सार्वजनिक संस्थांच्या ( public authorities ) कृत्यामुळे घडून येतो असे वाटल्यामुळे. परंतु विचारी माणसांच्या लक्षात आले की जेव्हा समष्टिरूपाने समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींविरुद्ध समाज स्वतः जुळूम करू लागतो त्यावेळी त्या जुलुमाचे स्वरूप राजकीय नोकरदारांच्या (functionaries) कृत्यापुरते मर्यादित रहात नाही. स्वतःचे हुकूम समाज स्वतः अमलात आणतो. आणि समाजाने योग्य हुकुमाऐवजी चुकीचे हुकूम सोडले अगर ज्या क्षेत्रात त्याने ढवळाढवळ करू नये अशा क्षेत्राबद्दल त्याने हुकूम सोडले तर वेगवेगळ्या तऱ्हेच्या राजकीय दडपशाहीपक्षा जास्त प्रखर अशी सामाजिक दडपशाही सुरू होते. सामाजिक दडपशाहीमधे शिक्षा विशेष क्रूर स्वरूपाच्या नसतात; पण सुटकेचे मार्ग फार थोडे असतात आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात ती खूप खोलवर पसरते आणि काही वेळा आत्मशक्तीला देखील गुलाम करून टाकते. म्हणूनच केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलुमाविरुद्ध संरक्षण मिळून भागत नाही; प्रचलित विचार आणि कल्पना यांच्या विरुद्धही संरक्षण लाभले पाहिजे. नागरी

स्वरूपाच्या शिक्षांचा ( civil penalties ) अवलंब न करता, समाजामधे स्वतःचे विचार आणि आचार, सदाचाराचे नियम म्हणून, ज्यांना ते पटत नाहीत त्यांच्यावर लादण्याची जी प्रवृत्ती असते तिच्या विरुद्ध देखील संरक्षण लाभले पाहिजे. समाजाच्या या प्रवृत्तीमुळे विकासावर बंधन पडते; व्यक्तित्व बनू अगर वाढू शकत नाही; आणि समाजामधे समाजाला मान्य अशी एकाच साच्याची माणसे तयार होतात. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर समुदायाच्या विचारांनी ( collective opinion ) कुठवर अतिक्रमण करावे याला एखादी मर्यादा हवी. ती मर्यादा निश्चित करणे आणि तिचे उल्लंघन होणार नाही अशी खबरदारी घेणे हे मानवी व्यवहार नीट रीतीने चालावे यासाठी राजकीय जुलुमाचा प्रतिकार करण्याइतकेच अपरिहार्य आहे.

वरील विधानाला सर्वसाधारणपणे कुणीही विरोध करणार नाही. तरीदेखील ती मर्यादा कुठे असावी आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य व समाजाचे नियंत्रण यांचा मेळ कसा घालावा या व्यावहारिक प्रश्नाबद्दल अद्याप कुणीच काही केलेले नाही. जीवनाचे माणसाला जे मोल वाटते ते पुष्कळ वेळा इतरांच्या कृत्यावर जी नियंत्रणे घालण्यात येतील त्यावर अवलंबून असते. म्हणूनच कायद्याप्रमाणे आचाराचे काही नियम ठरले पाहिजेत; आणि ज्या बाबींबद्दल कायदा करणे इष्ट नाही त्या बाबींबद्दल लोकमताने काही संकेत रूढ झाले पाहिजेत. ते नियम कोणचे असावेत हा मानवी व्यवहारातील एक मोठा प्रश्न आहे. परंतु काही ढोबळ अपवाद सोडले तर तो प्रश्न सोडविण्याचे फारच थोडे प्रयत्न झाले आहेत. कोणच्याही दोन कालखंडांत आणि क्वचित्च कधी दोन देशांत त्या प्रश्नाचे एक उत्तर दिले गेलेले आहे असे आढळते. आणि एका कालखंडाने अगर देशाने दिलेले उत्तर दुसऱ्या कालखंडाला व देशाला आश्चर्यवत् वाटते. तरीदेखील कोणच्याही कालखंडातील अगर देशातील लोकांना त्या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे असा संशयदेखील येत नाही;

जणू काय सबंध मानवजातीचे त्या प्रश्नाबद्दल एकमत झालेले आहे. स्वतःच्या समाजामध्ये जे नियम प्रचलित असतील ते त्यांना स्वयंसिद्ध आणि चमत्कृतीजन्य ( magical ) आहेत असे वाटते. सर्वत्र आढळून येणारा हा जो भ्रम आहे त्याचे रूढीचा प्रभाव हे उत्तम उदाहरण आहे. रूढी हा दुसरा निसर्गनियम आहे असे म्हणतात. पण अनेक वेळा दुसरा पहिल्याची जागा घेतो. रूढीच्या प्रभावामुळे मनुष्यजात एकमेकांवर जे आचाराचे नियम लादते त्यांच्याबद्दल मनामधे शंका उपस्थित होत नाहीत. आचाराच्या नियमांबद्दल एकाने दुसऱ्याला किंवा स्वतःने स्वतःला कारणे विचारावयाची आवश्यकता नसते म्हणून देखील साशंक वृत्ती वाढत नाही. विश्वास ठेवण्याची लोकांना सवय लागलेली असते आणि, तत्त्वज्ञानी ही संज्ञा आपल्याला लाभावी अशी ज्यांची इच्छा असते, अशी पुष्कळ मंडळी त्या सवयीला उत्तेजन देतात व लोकांना असे सांगतात की या बाबीवरील तुमच्या भावना विचारापेक्षा श्रेष्ठ आहेत आणि म्हणून कारणे न शोधणे हेच अधिक श्रेयस्कर. आपल्या गोतवळ्यातील मंडळींना आपण जसे वागावे असे वाटत असेल तसे आपण वागावे ही प्रत्येक माणसाच्या मनातील इच्छा मानवी आचारांच्या नियमनाबद्दल त्यांचे जे विचार आहेत त्यांच्या बुडाशी असते. आपल्याला जे आवडते त्यावरून आपण आपले मत ठरवतो हे कुणीही स्वतःशी देखील कबूल करीत नाही. परंतु आचाराबद्दलचे कारणाविना दिलेले मत हे केवळ वैयक्तिक आवडीवर आधारलेले असते. आणि कारण म्हणून इतरांच्या आवडीचा जेव्हा उल्लेख केला जातो तेव्हा निष्कर्ष निघतो तो एवढाच की एका माणसाच्या आवडीऐवजी अनेक माणसांच्या आवडींचा त्याला आधार आहे. सर्वसाधारण माणसाला इतरांच्या आवडींचा पाठिंबा लाभलेली स्वतःची आवड हे समाधानकारक कारण आहे असे वाटते आणि जिथे धर्मग्रंथांचा आधार नाही तिथे नीतिमत्तेबद्दल, आवडीनिवडीबद्दल आणि शिष्टाचाराबद्दल त्याच्या ज्या कल्पना असतील त्यांना तो आधार

भरपूर आहे असे त्याला वाटते. धर्मग्रंथांतील विधिनिषेधांचा अर्थदेखील तो त्याच्या आधारानेच लावतो. इतरांच्या वर्तणुकीबद्दलच्या माणसांच्या अपेक्षा ज्या बहुविध कारणांनी निश्चित होतात त्याच कारणामुळे प्रशंसनीय काय आणि निषेधार्ह कोणते याबद्दलची त्यांची मते निश्चित होतात. कोणच्याही इतर गोष्टीबद्दलचे मत निश्चित करताना जसा बहुविध कारणांचा विचार होतो तसेच या बाबतीतही घडते. काही वेळा विवेकबुद्धीचा प्रभाव पडतो. तर इतर अनेक वेळा दुराग्रह आणि लोकभ्रम यांचा प्रभाव पडतो. पुष्कळ वेळा सामाजिक प्रेमाची नाती, कधीमधी समाजहिताविरोधी असे संबंध, असूया अगर मत्सर, उद्धटपणा अगर तिरस्काराची भावना यांचाही परिणाम होतो. पण बहुतेक वेळा निर्णायक स्वरूपाची ठरते ती त्यांची स्वतःबद्दलची आशा आणि चिंता व त्यांची न्याय्य किंवा अन्याय्य स्वार्थभावना. जिथे एखादा वर्धिष्णू वर्ग असतो तिथे देशाची बहुतेक सारी नीतिमत्ता त्या वर्गाच्या वर्गीय हितसंबंधानुसार किंवा वर्गीय श्रेष्ठतेच्या कल्पनेनुसार निश्चित होते. स्पार्टा शहरातील नागरिक आणि त्यांचे गुलाम यांच्यामधील नीतिनियम, तसेच मळेवाले आणि नीग्रो, राजेरजवाडे आणि त्यांची प्रजा, अमीर उमराव आणि त्यांचे बारगीर ( roturiers ) पुरुष आणि स्त्रिया यांच्यामधील नीतिनियम हे बहुतांशाने वर्गहित आणि वर्गभावना यांच्या अनुषंगाने ठरले जातात. या प्रकाराने ज्या भावना उत्पन्न होतात त्यांचा वर्धिष्णू वर्गातील व्यक्तींच्या नीतिकल्पना आणि परस्पर संबंधांवरही परिणाम होतो. उलटपक्षी जिथे एकेकाळी वरचढ असलेल्या वर्गाचे वर्चस्व नष्ट झालेले असते अगर त्याची लोकप्रियता नष्ट पावलेली असते तिथे प्रचलित नीतिनियमांवर श्रेष्ठतेबद्दलच्या नावडीची छाप पडलेली असते. कायदा अगर लोकमत यांच्या आधाराने विधिनिषेधाचे जे आचारविषयक नियम बनवले जातात त्यांना दुसरेही एक महत्त्वाचे अधिष्ठान असते. ते म्हणजे पृथ्वीतलावरील आपल्या स्वामींच्या ( masters ) किंवा देवांच्या आवडीनिवडीशी समरस

होण्याची मानवी समाजाची गुलामगिरीची वृत्ती. ही गुलामगिरी स्वार्थी स्वरूपाची असली तरी ती भोंदूपणाची नसते. तिच्यामुळे माणसाच्या मनामधे खरोखरीची तिरस्काराची भावना निर्माण होते. त्या भावनेमुळेच माणसांनी जादूगारांना आणि नास्तिकांना जिवंत जाळले. नैतिक भावनांना वळण लावण्यामधे अनेक हलक्या दर्जाच्या बनावांच्या ( influences ) बरोबरीने समाजाच्या सर्वसाधारण आणि ढोबळ हिताचाही वाटा होता; पुष्कळ वेळा तो वाटा मोठा असे; परंतु बुद्धीला पटले म्हणून नव्हे, तर समाजामधे जे मित्रत्वाचे व शत्रुत्वाचे संबंध निर्माण होतात त्यांच्यामुळे. समाजहिताशी ज्यांचा संबंध नाही अशा मित्रत्वाच्या व शत्रुत्वाच्या संबंधांचादेखील नीतिनियम निर्माण करण्यामधे बराच भाग असतो.

कायदा किंवा लोकमत यांच्या दडपणाखाली सर्वसाधारण व्यवहारासाठी जे नियम तयार होतात ते बनविण्यामधे येणेप्रमाणे समाजाच्या किंवा समाजातील प्रबळ गटाच्या आवडीनिवडींचा मोठा भाग असतो. ज्यांचे विचार आणि भावना सामाजिक विचार आणि भावना यांच्यापेक्षा प्रगत होते त्यांनी, स्वतःला काही बाबी जाचक वाटल्या तरी, ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला नाही. समाजाच्या आवडीनिवडींचे व्यक्तीवर कायद्यासारखे बंधन असणे कितपत योग्य आहे या प्रश्नाचा विचार करण्याऐवजी समाजाच्या आवडीनिवडी कोणच्या असाव्यात याचाच ते खल करीत बसले. स्वतंत्र बुद्धीने विचार करणाऱ्यांच्या बरोबरीने स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याऐवजी त्यांच्या मनाला ज्या गोष्टी पटत नव्हत्या त्यांच्या बाबतीत मनुष्यजातीच्या भावना बदलण्यासाठी खटपट करणे त्यांना अधिक श्रेयस्कर वाटले. एखाद दुसरा मनुष्य सोडला तर स्वातंत्र्यवादी अशी भूमिका घेऊन तिचा निर्धाराने पाठपुरावा केला गेला असेल तर तो धर्मश्रद्धेच्या बाबतीत. ही गोष्ट अनेक दृष्टीने बोधप्रद आहे; विशेषेकरून नैतिक भावना म्हणून जिचा उल्लेख होतो ती किती स्खलनशील असते त्याचा या गोष्टीवरून चांगला बोध होतो. धर्माबद्दल अतिरेकी आग्रह बाळगणाऱ्या

प्रामाणिक माणसाच्या मनातील इतर धर्मांबद्दलचा तिरस्कार ही एक स्पष्ट स्वरूपातील नैतिक भावना आहे. विश्वधर्माचे पीठ म्हणून ( universal church ) स्वतःची ख्याती सांगणाऱ्या पीठाचे जू ज्यांनी प्रथम झुगारून दिले ते धार्मिक विचारांच्या बाबतीत मतभेदांना वाव द्यायला त्या पीठा-इतकेच नाखूष होते. कोणच्याही एका पक्षाला पुरा विजय न मिळता जेव्हा लढाई संपली आणि प्रत्येक पीठाला आणि पंथाला अगोदरच व्यापलेल्या प्रदेशापुरते स्वतःचे क्षेत्र मर्यादित करावे लागले, तेव्हा मात्र जे अल्प-संख्याक होते आणि ज्यांना बहुसंख्य बनणे शक्य नव्हते त्यांना ज्यांना ते आपल्या बाजूला वळवू शकले नव्हते त्यांच्याजवळ विचारस्वातंत्र्याची मागणी करावी लागली. समाजाला मान्य होणार नाहीत असे व्यक्तीला काही हक्क असतात याची तात्त्विक स्वरूपाची घोषणा प्रथम झाली ती या धर्मस्वातंत्र्याच्या मर्यादित क्षेत्रात. ज्यांचे विचार वेगळे आहेत त्यांच्यावर आपला अधिकार गाजवण्याची समाजाला सत्ता नाही हा विचारदेखील या क्षेत्रामधे वाढला. ज्या महान् ग्रंथकारांच्यामुळे जगामधे थोडेबहुत धार्मिक स्वातंत्र्य विद्यमान आहे त्यांनी धर्मस्वातंत्र्यावर ( freedom of conscience) कोणचीही बंधने पडता कामा नयेत असा आग्रह धरला होता आणि धर्मनिष्ठेच्या बाबतीत मनुष्य दुसऱ्या कुणालाही मुळीदेखील जबाबदार नसतो असे प्रतिपादले होते. तरीदखील मनुष्यजातीमधे महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टीबद्दल एवढी असहिष्णुता असते की खरेखुरे धार्मिक स्वातंत्र्य अद्याप फारच क्वचित आढळते. जिथे धर्माबद्दल अनास्था असल्यामुळे धार्मिक भांडणांनी आपल्या शांततेचा भंग होऊ नये अशी भावना असते तिथेच मुख्यत्वेकरून त्या भावनेमुळे पारडे जड होते; म्हणून धार्मिक स्वातंत्र्य अस्तित्वात आलेले दृष्टीस पडते. अत्यंत सहिष्णु अशा देशातील धार्मिक प्रवृत्तीच्या मंडळींनी सहिष्णुता कर्तव्य म्हणून मान्य केली तरी त्यांच्या मनामधे तिच्याबद्दल पुष्कळ विकल्प असतात. धर्मपीठाच्या व्यवस्थेबद्दल एखादा मनुष्य मतभेद मान्य करू शकतो, पण धर्माचे जे सिद्धांत असतात

त्याबद्दलचे मतभेद त्याला पसंत पडत नाहीत. एखाद्या माणसाला पोपचा अभिमानी ( papist ) आणि एकेश्वरवादी ( unitarian ) यांच्याखेरीज बाकी सर्व चालतात; दुसऱ्याला परमेश्वराने प्रकट केलेला धर्म ( revealed religion ) मानणारी सर्व मंडळी चालतात; तर इतर काही मंडळी आपल्या सहानुभूतीचे क्षेत्र अधिक व्यापक करतात, पण त्यांचादेखील देव आणि परलोक यांच्यावर प्रत्येकाचा विश्वास असला पाहिजे असा आग्रह असतो. जिथे बहुसंख्य जनतेची भावना खरी आणि प्रखर असते तिथे ती भावना प्रत्येकाने मानलीच पाहिज हा अट्टहास कमी झालेला दिसत नाही.

राजकीय इतिहासातील अनेक घटनांमुळे इंग्लंडमधे युरपमधील इतर अनेक देशांपेक्षा कायद्याचे दडपण कमी आहे; लोकमताचे दडपण मात्र कदाचित् अधिक असेल. तसेच व्यक्तीच्या जीवनामधे कायदे करण्याच्या ( legislative ) अगर कार्यकारी ( executive ) सत्तेने प्रत्यक्षपणे ढवळाढवळ करण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध इंग्लंडमधे अधिक जागरूकता आहे. या गोष्टी इंग्लंडमधे आढळतात त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याबद्दल खरे प्रेम आहे म्हणून नव्हे तर जनहिताला विरोधी अशा शक्तींचा प्रतिनिधी म्हणून शासनाकडे पाहण्याची सवय अद्याप कायम आहे म्हणून. शासनाची शक्ती म्हणजे आपली शक्ती व शासनाची मते म्हणजे आपली मते असे बहुसंख्य जनता अद्याप समजू लागलेली नाही. ती समजूत वाढली की आज जसे लोकमताचे वैयक्तिक स्वातंत्र्यावर आक्रमण होते तसेच शासनाचेही होऊ लागेल. ज्या बाबतीत कायद्याने व्यक्तींचे नियंत्रण अद्यापपावेतो केलेले नाही अशा बाबतीत कायद्याने नियंत्रण करण्याचे प्रयत्न सुरू झाले तर त्यांना विरोध करण्यासाठी खवळून उठेल अशी भावना आजदेखील जनतेमधे मोठ्या प्रमाणावर विद्यमान आहे. ही भावना एखादी गोष्ट कायद्याच्या क्षेत्रात पडते की नाही याबद्दल विशेष विचार करत नाही. सर्वसाधारणपणे ती उपयुक्त स्वरूपाची असली तरी वेगवेगळ्या गोष्टींच्या बाबतीत तिचा वापर जितका योग्य प्रकारे होतो तितकाच अयोग्य

प्रकारानेही होऊ शकतो. शासनाच्या हस्तक्षेपाची योग्यायोग्यता अजमावण्याचे कार्य एखाद्या तत्त्वानुसार व्हायला हवे तसे ते साधारणतः होत नाही. वैयक्तिक आवडीनुसार लोक आपले धोरण ठरवतात. काही जण ज्या वेळी एखादी चांगली गोष्ट घडवून आणावयाची अगर एखादी वाईट गोष्ट सुधारायची असते त्या वेळी सरकारने एखादे कार्य अंगावर घ्यावे असे खुशाल म्हणतात. उलट इतर काही जण केवढाही मोठा सामाजिक अन्याय सहन करतील पण समाजहिताची जी अनेक कार्ये सरकारी हुकमतीखाली घडून येतात त्यामधे आणखी एखाद्या कार्याची भर घालायला ते तयार होणार नाहीत. आणि एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत मंडळी वेगवेगळ्या बाजू घेतात; बाजू घेतली जाते ती भावनेची जी सर्वसाधारण दिशा असेल तिच्या अनुषंगाने, किंवा जी गोष्ट सरकारने करावी असे सुचविले जात असेल तिच्याबद्दल वाटणाऱ्या आस्थेप्रमाणे, किंवा सरकार ती गोष्ट त्यांना पसंत पडेल अशा पद्धतीने कितपत करू शकेल याबद्दलच्या त्यांच्या अंदाजानुसार. कोणच्या गोष्टी सरकारने करण्यासारख्या आहेत याबद्दलचे, नेहमी ज्याचा पाठपुरावा करता येईल असे एखादे निश्चित मत ठरवून मात्र, एखादी बाजू कधीही घेतली जात नाही. असे कोणतेही तत्त्व अगर नियम नाही, म्हणून मला वाटते, की सध्या एक बाजू जितक्या वेळा चुकीची भूमिका घेते तितक्याच वेळा दुसऱ्या बाजूची भूमिकाही चुकीची असते. सरकारी हस्तक्षेपाचे जितक्या वेळा चुकीने आवाहन होते तितक्याच वेळा त्याचा चुकीने निषेध होतो. दोन्ही बाजूच्या चुका जवळ जवळ समसमान असतात.

समाजाने व्यक्तीवर जे नियंत्रण लादावयाचे ते एका साध्या तत्त्वानुसार असावे हे सांगणे हा या निबंधाचा उद्देश आहे. मग ते नियंत्रण कायदेशीर शिक्षेच्या पाशवी सत्तेने लादलेले असो किंवा जनमताच्या नैतिक दडपणाच्या उपयोगाने लादलेले असो. ते तत्त्व हे की मानवजातीला व्यक्तिशः किंवा सामुदायिकरीत्या समाजातील एखाद्या व्यक्तीच्या कृति-

स्वातंत्र्यामधे हस्तक्षेप करता येतो तो फक्त स्वसंरक्षणासाठी. ते तत्त्व हे की सुसंस्कृत समाजातील कोणत्याही व्यक्तीवर त्याच्या मर्जीविरुद्ध सत्ता गाजवता येते ती फक्त दुसऱ्याच्या जिवाला अगर वित्ताला धक्का पोचू नये म्हणून. त्याचे स्वतःचे कल्याण, शारीरिक अगर नैतिक, ह त्या हस्तक्षेपाचे समर्थन होऊ शकत नाही. एखादी गोष्ट करणे त्याच्या हिताच्या दृष्टीने चांगले आहे, किंवा ती गोष्ट केल्याने त्याला अधिक आनंद प्राप्त होईल, किंवा इतरांच्या दृष्टीने त्याने ती गोष्ट करणे शहाणपणाचे अथवा योग्य होय म्हणून एखाद्या व्यक्तीला एखादी गोष्ट करायला भाग पाडणे अगर त्याला ती गोष्ट करू न देणे न्यायाचे नाही. त्या व्यक्तीची कानउघाडणी करता येईल, त्याच्याशी चर्चा करता येईल, त्याची समजूत घालता येईल किंवा त्याची विनवणी करता येईल; पण जबरदस्तीने त्याला एखादी गोष्ट करायला लावणे किंवा त्याने ती गोष्ट केली नाही म्हणून त्याला एखादी शिक्षा भोगायला लावणे योग्य नव्हे. जी गोष्ट करण्या-पासून त्याला परावृत्त करावयाचे असेल ती केल्याने दुसऱ्या कुणाचे नुकसान होणार असेल तरच त्याच्यावर जबरदस्ती करणे किंवा त्याला शिक्षा लावणे समर्थनीय ठरेल. इतरांशी ज्या कृत्याचा संबंध येतो त्या कृत्यांच्या बाबती-तच माणसाने समाजाचा विचार करायला हवा. केवळ स्वतःशीच ज्या कृत्यांचा संबंध येतो त्यांच्याबाबतीत व्यक्तीचे स्वातंत्र्य, एक हक्क म्हणून, अबाधित राहिले पाहिजे. स्वतःपुरती, स्वतःचे शरीर आणि मन यापुरती व्यक्ती सार्वभौम आहे.

ज्यांच्या सर्व शक्तींची पुरी वाढ झालेली आहे अशा माणसांनाच वर उल्लेखिलेला सिद्धांत लागू पडतो हे वेगळे सांगावयास पाहिजेच असे नाही. इथे मुलांच्याबद्दल किंवा कायद्याप्रमाणे वयमानपरत्वे जे सज्ञान नाहीत अशा बायकापुरुषांबद्दल विचार चालू नाही. दुसऱ्यानी काळजी घेतली पाहिजे अशा अवस्थेत जे आहेत त्यांचे स्वतःच्या कृत्यापासून आणि बाहेरून त्यांना जी इजा दुखापत होईल तिच्यापासून संरक्षण

केले पाहिजे. त्याच कारणासाठी, सबंध जमात जिथे बाल्यावस्थेत आहे अशा मागासलेल्या समुदायांनादेखील या विवेचनातून वगळले पाहिजे. स्वयंस्फूर्त प्रगतीच्या मार्गांतील पहिल्या अडचणी एवढ्या मोठ्या असतात की त्या कशा दूर कराव्यात या बाबतीत मार्गांची निवड करायला संधी सापडत नाही; आणि मग सुधारणेची ज्याला तळमळ लागली आहे अशा एखाद्या राज्यकर्त्याने अप्राप्य असे उद्दिष्ट साधण्यासाठी कोणच्याही उपायांचा अवलंब केला तरी ते समर्थनीय मानावे लागते. रानटी अवस्थेतील समाजावर राज्य करण्याचा हुकूमशाही ( despotism ) हा योग्य मार्ग आहे. पण उद्दिष्ट मात्र त्याची सुधारणा हे असले पाहिजे आणि ज्या प्रमाणात ते उद्दिष्ट साध्य होईल त्या प्रमाणात जी साधने वापरण्यात आली ती समर्थनीय ठरतील. खुल्या व खेळीमेळीच्या चर्चेने माणसे आपली परिस्थिती बदलू शकण्याच्या पूर्वीच्या काळाला तत्त्व या नात्याने स्वातंत्र्य लागू पडू शकत नाही. तोवर सुदैवाने एखादा अकबर किंवा शार्लमन लाभला तर त्याच्या हुकुमांची बिनतक्रार अंमलबजावणी करणे याखेरीज त्या समुदायांना दुसरा मार्ग नसतो. परंतु मनाच्या निश्चयाने किंवा इतरांच्या शिकवणुकीने स्वतःची सुधारणा घडवून आणण्याइतपत समाजाची प्रगती ( या प्रबंधामधे ज्या राष्ट्रांचा विचार आहे त्या सर्व राष्ट्रांची तेवढी प्रगती कधीच झालेली आहे ) झाली की जबरदस्तीला स्थान उरत नाही, मग ती जबरदस्ती प्रत्यक्ष स्वरूपाची असो अगर नियमाचे पालन केले नाही म्हणून शिक्षेच्या रूपाने प्रगट होणारी असो. जबरदस्ती त्यांच्या स्वतःच्या हितासाठी जशी नको तशी इतरांच्या संरक्षणासाठीही नको.

उपयुक्ततेशी संबंध नाही अशी जी अमूर्त हक्कांची कल्पना आहे तिचा माझ्या युक्तिवादाला जो पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे तो मी आपण होऊन सोडून देत आहे हे या ठिकाणी नमूद करायला हवे. नीतीच्या सर्व प्रश्नांच्या बाबतीत उपयुक्तता हाच अखेरीचा

मानदंड आहे हे मी मानतो. पण ती उपयुक्तता म्हणजे व्यापक अर्थाची आणि प्रगतिशील अशा मानवाच्या चिरस्थाई हितसंबंधावर आधारलेली उपयुक्तता. त्या हितसंबंधानुसार व्यक्तीच्या उत्स्फूर्त कृतीवर इतरांच्या हिताशी संबंध येईल तेवढयापुरतेच बाहेरून बंधन घालता येते असे माझे म्हणणे आहे. दुसऱ्याला इजा होईल असे कृत्य जर कुणी केले तर त्याला शिक्षा झाली पाहिजे हे उघड आहे. शिक्षा कायद्याप्रमाणे होईल आणि कायदेशीर शिक्षा जिथे लागू करणे इष्ट नसेल तिथे सामाजिक नापसंती हे शिक्षेचे स्वरूप राहील. इतरांच्या हिताची या खेरीज अनेक कृत्ये आहेत की जी करणे त्याला भाग पाडता येईल; जसे न्यायालयात साक्ष देणे, सार्वत्रिक संरक्षणातील योग्य तो हिस्सा उचलणे, ज्या समाजाच्या संरक्षणाचा फायदा तो घेतो त्या समाजाच्या हितासाठी जी सामुदायिक स्वरूपाची कामे होत असतील त्यामधे भाग घेणे, तसेच जीव बचावणे, दुबळ्यांवर अन्याय होत असेल त्यावेळी त्यांच्या संरक्षणासाठी धाव घेणे – यासारखी परोपकाराची कामे करायलाही त्याला भाग पाडता येईल. जी कामे करणे हे उघड उघड माणसाचे कर्तव्य असेल ती कामे न केल्याबद्दल समाजाला व्यक्तीला जबाबदार धरता येईल. मनुष्य आपल्या कृत्याने तसेच कृत्य न करण्यानेही दुसऱ्यांचे नुकसान करू शकतो; आणि या दोन्ही प्रसंगी जे नुकसान होईल त्याबद्दल त्याला जबाबदार धरता येईल. एखादी गोष्ट न करण्याच्या प्रसंगी जी दंडशक्ती वापरायची ती फार काळजीपूर्वक वापरली पाहिजे. इतरांना अपाय होईल असे कृत्य करण्याबद्दल एखाद्याला जबाबदार धरणे हा नियम झाला; अपाय टाळण्यासाठी जे करणे अवश्य ते न केल्याबद्दल जबाबदार धरणे हे अपवादात्मक स्वरूपाचे आहे. परंतु पुष्कळ गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत व त्यांचे परिणाम इतके गंभीर होतात की अपवादात्मक स्वरूपाचा असा हा निमम करणेही समर्थनीय आहे. व्यक्तीचे इतरांशी जे संबंध येतात त्या बाबतीत कायद्याप्रमाणे विचार केला तर तो त्या इतरांना किंवा त्यांचे संरक्षण करणाऱ्या समाजाला जबाबदार

असतो. पुष्कळ वेळा योग्य कारणासाठी ती जबाबदारी त्याच्यावर टाकली जात नाही. प्रसंगानुसार ती कारणे उद्भवतात. काही प्रसंग असे असतात की ज्या बाबतीत सामाजिक नियंत्रणाऐवजी मनुष्य आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीनुसार अधिक चांगल्या तऱ्हेने वागतो. इतर प्रसंगी अनाचार टाळण्यासाठी म्हणून जे नियंत्रण लादण्यात येते त्याच्यातूनच इतके नवीन अनाचार निर्माण होतात की ते नियंत्रण लादणे इष्ट ठरत नाही. अशा काही कारणांमुळे जेव्हा जबाबदारीची अंमलबजावणी करता येत नाही त्यावेळी व्यक्तीच्या सदसद्‌विवेकबुद्धीनेच न्यायासनावर बसून इतरांच्या, ज्यांना बाहेरचे संरक्षण नाही, अशा हितसंबंधांचे संरक्षण केले पाहिजे. समाजामधील इतर मंडळींना या प्रसंगी आपले मत देता येत नाही हे लक्षात घेऊन माणसाने स्वतःच अशा वेळी करडी न्यायबुद्धी स्वीकारली पाहिजे.

पण असे एक क्षेत्र आहे की ज्या क्षेत्रात व्यक्तीपेक्षा वेगळा असा जो समाज त्या समाजाला लक्ष घालण्याचे मुळीच प्रयोजन नसते. ते क्षेत्र म्हणजे माणसाचे वैयक्तिक जीवन आणि त्या जीवनातील आचार, की ज्याचा परिणाम फक्त त्याच्यावरच घडून येतो; काही बाहेरच्या माणसांवर घडला तर तो त्यांनी खुशीने आणि स्वतंत्रपणे त्याच्या जीवनात सहभागी होण्याचे ठरविले म्हणून. परिणाम त्या माणसावरच घडून येतो असे मी म्हणतो ते प्रत्यक्ष आणि पहिल्या परिणामाबद्दल. माणसावर जे परिणाम होतात त्यांचा त्याच्या मार्फतीने इतरांवरही परिणाम होतो– या विधानावर आधारलेला जो युक्तिवाद आहे त्याचा नंतर विचार करू. मानवी स्वातंत्र्याला अत्यंत अनुकूल असे हे क्षेत्र आहे. त्यामधे पहिला समावेश होतो तो अंतरंगातील जाणिवेच्या प्रदेशाचा ( domain of consciousness ) तिथे हवे ते सर्वंकश असे सदसद्‌विवेकबुद्धीचे ( conscience ) स्वातंत्र्य; तसेच विचारांचे आणि भावनांचे स्वातंत्र्य; सर्व विषयावरील मतांचे आणि कल्पनांचे स्वातंत्र्य, मग ते विषय व्यावहारिक स्वरूपाचे असोत

की तात्त्विक स्वरूपाचे असोत, शास्त्रीय असोत किंवा नैतिक व धार्मिक असोत. मते व्यक्त करण्याचे व प्रसिद्ध करण्याचे स्वातंत्र्य यांना वेगळे तत्त्व लावायला पाहिजे असे वाटेल, कारण इतरांशी संबध आहे अशा आचारांच्या वेगळ्या गटात ते पडल्यासारखे दिसते. पण ते स्वातंत्र्य विचारस्वातंत्र्याइतकेच महत्त्वाचे आहे आणि दोन्ही स्वातंत्र्ये एकाच कारणावर आधारलेली असल्यामुळे एक दुसऱ्यापासून वेगळे करता येत नाही. दुसरे म्हणजे त्याच तत्त्वानुसार माणसाला आपल्या आवडी-निवडी व धंदा ठरविण्याचेही स्वातंत्र्य हवे. आपल्या स्वभावानुसार जीवनाचा आलेख तयार करण्याचे स्वातंत्र्य हवे. मर्जीला येईल त्याप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य हवे; अट एवढीच की त्याचे जे परिणाम होतील ते भोगण्याची तयारी हवी. जोवर अशा स्वतंत्र वागण्या-मुळे आजूबाजूच्या मंडळींना अपाय होत नाही तोवर त्यांनी त्यामधे अडथळे निर्माण करता कामा नये, त्यांना ते वागणे कितीही मूर्खपणाचे, दुराग्रहाचे व चुकीचे वाटले तरी. तिसरे म्हणजे व्यक्तींच्या या स्वातंत्र्यामुळे त्याच मर्यादेत त्यांच्या समुदायालाही स्वातंत्र्य लाभते. दुसऱ्यांना अपाय होणार नाही अशा कोणत्याही उद्दिष्टासाठी त्यांना संघटना करण्याचे स्वातंत्र्य लाभते. संघटना करणारी सर्व मंडळी मात्र पूर्ण वयाची असली पाहिजेत आणि त्यांना संघटनेमधे आणण्यासाठी जबरदस्ती किंवा फसवणूक यांचा उपयोग होता कामा नये.

ज्या समाजात या स्वातंत्र्याचा सर्वसाधारणपणे मान राखला जात नाही तो समाज स्वतंत्र आहे असे म्हणता येणार नाही, मग त्या समाजामधे शासन कोणच्याही पद्धतीचे असो. आणि ती स्वातंत्र्ये पूर्णपणे आणि अबाधित स्वरूपात नांदल्याखेरीज कोणताही समाज पूर्णतया स्वतंत्र होणार नाही. स्वतःचे हित स्वतःला पटतील अशा मार्गांनी, पण इतरांच्या हिताला धक्का न लावता व स्वतःचे हित साधण्याच्या त्यांच्या प्रयत्नात अडथळे न आणता, साधण्याची संधी म्हणजेच खरेखुरे स्वातंत्र्य. प्रत्येक

मनुष्य हाच स्वतःच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक आरोग्याचा योग्य राखणदार असतो. इतरांना चांगले वाटेल अशा पद्धतीने राहण्याची सक्ती करण्याऐवजी प्रत्येकाला त्याला जसे चांगले वाटते तसे राहण्याची संधी दिल्यानेच मनुष्यजातीचे अधिक कल्याण होणार आहे.

हा सिद्धांत तसा नवा नाही; आणि काही जणांना तर तो अति परिचयाच्या सत्यासारखा वाटणारा आहे. पण सध्या जी मते आणि व्यवहार प्रचलित आहेत त्यांच्या सर्वसाधारण प्रवृत्तीशी अधिक विरोधी असा दुसरा सिद्धांत सापडणार नाही. वैयक्तिक व तसेच सामाजिक उत्कृष्टपणाबद्दलच्या समाजाच्या ज्या कल्पना असतील त्या कल्पनानुसार लोकांनी वागावे म्हणून तो सदोदित खूप प्रयत्न करीत असतो. प्रत्येक नागरिकाच्या शारीरिक व मानसिक शिस्तीबद्दल शासनाला खूप आस्था वाटते म्हणून त्यांच्या खाजगी वर्तणुकीवरही सार्वजनिक अधिकाऱ्यांचे नियंत्रण लादणे हा आपला हक्क आहे अशी कल्पना जुन्या काळातील प्रजासत्ताक राज्यामधे प्रचलित होती. त्या काळातील तत्त्वज्ञान्यांचा तिला पाठिंबा होता. त्या राज्यांच्या परिस्थितीला ती कल्पना साजेशी होती. कारण ती प्रजासत्ताक राज्ये लहान होती, त्यांच्या सभोवती बलाढ्य शत्रू होते, परचक्र किंवा अंतर्गत बंडाळी यांनी राज्ययंत्र उलथून पडेल अशी त्यांना सारखी धास्ती वाटत असे. अशा त्या राज्यामधे जनता थोडा काळ जरी विसावली आणि स्वतःच व्यवहाराचे नियंत्रण करू लागली तरी ते फार धोक्याचे ठरण्यासारखे होते. म्हणून त्या राज्यांना स्वातंत्र्याची वाढ झाल्यानंतर त्याचे जे सुपरिणाम होतात ते अनुभवणे शक्य झाले नाही. आधुनिक जगामधे राज्ये ( political communities ) आकाराने मोठी आहेत. या राज्यांमधे ऐहिक आणि पारलौकिक सत्तांचे विभक्तीकरण झालेले आहे. ( त्यामुळे ऐहिक व्यवहारांचे नियंत्रण ज्यांच्या हाती त्यांच्या हाती धार्मिक व्यवहारांचे नियंत्रण उरलेले नाही. ) या कारणा-मुळे खाजगी व्यवहारामधे कायदा मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करू शकणार नाही. पण नैतिक दंडुकेशाहीचा वापर मात्र अधिकच वाढला. तिच्यामुळे

प्रचलित विचारसरणीपेक्षा वेगळी मते सामाजिक व्यवहारातच नव्हे तर वैयक्तिक क्षेत्रात देखील बाळगणे फार कठीण झाले. नैतिक भावना बनविण्यामध्ये धर्माचा मोठा हिस्सा होता. त्या धर्मांवर सध्या सत्ता आहे ती श्रेणीबद्ध अशा व सर्व मानवी व्यवहारावर नियंत्रण ठेवू इच्छिणाऱ्या धर्माधिकाऱ्यांची किंवा प्युरिटन संप्रदायाची. अलीकडच्या काळातील जुन्या धर्मांना विरोध करणाऱ्या सुधारकांचा देखील अध्यात्मिक वर्चस्वाला विरोध नाही. त्या बाबतीत ते धर्मपीठे अगर संप्रदाय यांच्या जोडीला बसतात. उदाहरणार्थ एम्. कॉम्ट. त्याच्या Traite de Politique Positive या पुस्तकामधे जी समाजव्यवस्था चित्रित केली आहे तिचे उद्दिष्ट आहे ते हेच की समाजाची व्यक्तीवर अधिसत्ता ( despotism ) प्रस्थापित व्हावी. कायद्यापेक्षा नीतिनियमांच्या आधाराने ते घडून यावे अशी कॉम्टची इच्छा दिसते. जुन्या काळातील तत्त्वज्ञान्यांपैकी अतिशय कर्मठ शिस्तवाद्याने देखील आपल्या राजकीय उद्दिष्टामधे अशी अधिसत्ता कल्पिलेली नाही.

काही विचारवंतांनी जे विचार प्रगट केले आहेत ते बाजूला सोडले तरी एकंदर जगामधे समाजाची व्यक्तीवरील सत्ता कारण नसता वाढविण्याकडेच सध्याची प्रवृत्ती आहे. ही सत्ता लोकमताच्या आणि तसेच कायद्याच्या आधाराने वाढावी अशी इच्छा दिसते. आणि सध्या जगामधे जे फेरबदल घडून येत आहेत त्यांचा रोखही समाजाची सत्ता वाढवून व्यक्तीची सत्ता कमी करण्याकडे आहे. व्यक्तीच्या सत्तेवरील हे अतिक्रमण आपोआप नष्ट होण्यासारखी अनिष्ट गोष्ट नसून ते सारखे वाढत जाऊन खूप मोठे होईल अशी धास्ती वाटते. मनुष्यमात्राची वृत्ती, मग ते राज्यकर्ते असोत की साधे नागरिक असोत, आपली मते व आवडी, आचाराचे नियम म्हणून, इतरांवर लादण्याची असते. मानवी स्वभावातील काही उत्कृष्ट आणि अत्यंत कनिष्ठ भावनांचा त्या वृत्तीला मोठा जोराचा पाठिंबा असतो. म्हणून ती वृत्ती इतकी बलवत्तर बनते की सत्तेचा अभाव याच एका

गोष्टीमुळे तिच्यावर थोडेबहुत तरी नियंत्रण राहते. पण सध्या सत्ता कमी होण्याऐवजी वाढते आहे. म्हणून नैतिक श्रद्धेचा मोठा अडथळा निर्माण केल्याखेरीज त्या अनिष्ट वृत्तीची वाढ थांबवता येणार नाही; आणि मग जगाच्या सध्याच्या परिस्थितीत ती कमी होण्याऐवजी वाढलेली आपल्या दृष्टीस पडेल.

सबंध युक्तिवादाचा प्रपंच एकदम मांडण्याऐवजी चर्चेच्या सोईसाठी त्याच्या एका भागाचाच सुरवातीला विचार करणे योग्य होईल; आणि तो भाग असा की त्याच्यापुरती तरी निदान इथे विशद केलेल्या तत्त्वाला सध्याच्या वैचारिक जगात पुरेपूर नसली तरी बहुशः मान्यता लाभलेली आहे. हा भाग म्हणजे विचारस्वातंत्र्याचा. विचारस्वातंत्र्यापासून त्याच्याशी संलग्न असे जे भाषणाचे व लेखनाचे स्वातंत्र्य आहे ते अलग करता येत नाही. धार्मिक सहिष्णुता आणि स्वतंत्र संस्था ज्या देशामधे मान्य झाल्या आहेत त्या देशातील राजकीय नीतिनियमात या स्वातंत्र्यांना मोठे स्थान आहे. परंतु त्यांचा जो तात्त्विक आणि व्यावहारिक आधार आहे त्याची सर्वसामान्य जनतेला विशेष माहिती नाही. जनतेच्या विचाराला जे वळण लावतात त्या विचारवंतांमधे देखील, अपेक्षा होती त्या प्रमाणात त्या आधाराबद्दल जाणीव आणि आवड दिसत नाही. तो आधार किंवा आधार-भूत अशी ती तत्त्वे, त्यांचा योग्य तो अर्थ ध्यानात घेतला तर, एकाच भागाला लागू पडतात असे नसून ती व्यापक स्वरूपाची आहेत. म्हणून त्यांची पुरी चर्चा झाली तर बाकीचा जो विषय ठरतो त्याची चांगली प्रस्तावना झाल्यासारखे होईल. मी जे यापुढे सांगणार आहे ते ज्यांना नवीन वाटणार नाही त्यांनी म्हणूनच गेली तीनशे वर्षे ज्या विषयाची चर्चा चालू आहे त्याची आणखी एक चर्चा आरंभिल्याबद्दल मला क्षमा करावी.

---

प्रकरण २

# विचार आणि चर्चास्वातंत्र्य

भ्रष्ट आणि जुलमी सरकारविरुद्ध संरक्षण लाभावे म्हणून मुद्रण-स्वातंत्र्य किती आवश्यक आहे ते पटवून देण्याची आवश्यकता आता उरली नाही अशी आशा आहे. हिताच्या दृष्टीने जे जनतेशी एकरूप झालेले नाहीत अशा कायदेमंडळाला किंवा कार्यकारी सत्तेला मते जनतेवर लादण्याची किंवा तिने कोणते सिद्धांत व कोणता युक्तिवाद ऐकावा ते ठरवण्याची परवानगी नसावी हे सिद्ध करण्यासाठी आता चर्चेची आवश्यकता उरलेली नाही. पूर्वीच्या ग्रंथकारांनी हा प्रश्न इतक्या वेळा आणि इतक्या यशस्वी रीतीने विशद केलेला आहे की त्यावर या ठिकाणी मुद्दाम भर देण्याची आवश्यकता नाही. इंग्लंडमधील वृत्तपत्राबद्दलचा कायदा टयुडर राजांच्या कारकीर्दीमधे जितका लाळघोटया ( servile ) वृत्तीचा होता तितकाच आज जरी असला तरी राजकीय चर्चेविरुद्ध तो आता अमलात आणला जाईल अशी धास्ती बाळगण्याचे कारण नाही. बंडाच्या धास्तीमुळे मंत्री आणि न्यायाधिकारी यांना तात्पुरत्या घबराटीच्या काळात योग्या-योग्यतेचा विसर पडतो तेवढा एक प्रसंग कदाचित् अपवाद म्हणून वगळता येईल.* सर्वसाधारणरीत्या असे म्हणता येईल की कायद्या प्रमाणे जिथे

---

* हे शब्द लिहिले गेले आणि त्याच वेळी जणू ते खोटे ठरण्यासाठी १८५८ सालचे सरकारी वृत्तपत्र खटल्यांचे ( Government Press Prosecutions ) प्रकरण घडले. सार्वजनिक चर्चेच्या स्वातंत्र्यातील त्या चुकीच्या हस्तक्षेपामुळे, लिहिलेल्या मजकुरातील अक्षरही बदलण्याची मला इच्छा झाली नाही. तसेच राजकीय चर्चेसाठी आपल्या देशात, घबराटीचे काही क्षण सोडले तर, कुणालाही यातना अगर शिक्षा सहन करावी

राज्य चालते अशा देशात सरकार, मग ते जनतेला पूर्णपणे जबाबदार असो की नसो, विचारप्रदर्शनावर नियंत्रण लादण्याचा फार वेळा प्रयत्न करील अशी धास्ती बाळगायला नको, जनतेच्या व्यापक असहिष्णुतेचे साधन म्हणून जेव्हा त्या सरकारला वागावे लागेल तेव्हाची गोष्ट

---

लागणार नाही अशी जी मला खात्री वाटते ती देखील कमी झाली नाही. कारण, एक तर, ते खटले पुढे चालवले गेले नाहीत. आणि दुसरे म्हणजे, खरे सांगायचे म्हणजे ते राजकीय खटले नव्हते. आरोप होता तो संस्था अगर राज्यकर्ते यांच्या कृतीवर अगर व्यक्तित्वावर टीका करण्याचा नव्हता. आरोप होता तो जुलमी राज्यकर्त्याचा खून करण्यास हरकत नसावी हा अनैतिक सिद्धांत प्रसृत करण्याचा.

या प्रकरणातील युक्तिवाद खरा असेल तर, कोणताही सिद्धांत, मग तो कुणाला कितीही अनैतिक वाटो, एक नैतिक श्रद्धा म्हणून स्वीकारण्याचे आणि त्याची चर्चा करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. म्हणून जुलमी राजाचा खून करण्याचा हक्क ( tyrannicide ) या तत्त्वाला सिद्धांत हे नाव देता येते की नाही या गोष्टीची इथे चिकित्सा करणे गैरलागू व अप्रस्तुत होईल. मी इथे एवढेच म्हणेन की नीतिशास्त्रातील अनिर्णीत ( open ) प्रश्नांपैकी तो एक जुना प्रश्न आहे. ज्या दुष्ट माणसाला, त्याने स्वतःला कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवल्यामुळे, कायदेशीर शिक्षा व नियंत्रण लागू पडत नाही, त्याला एखाद्या खाजगी नागरिकाने मारले तर, अनेक देशांनी आणि जगातील उत्कृष्ट व प्रज्ञावंत अशा पुरुषांनी ते कृत्य गुन्हा नसून उत्तम तऱ्हेचे पुण्यकृत्य आहे असे म्हटले आहे. आणि योग्य असो की अयोग्य असो, ते कृत्य खुनाच्या स्वरूपाचे नसून यादवी युद्धाच्या स्वरूपाचे आहे असे मत व्यक्त केले आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की एखाद्या वेळी त्या कृत्याला उत्तेजन देणे हा दंडार्ह गुन्हा ठरेल, पण उत्तेजनानंतर खरोखरच कृत्य घडून आले असेल तर आणि उत्तेजन आणि ते कृत्य यामधे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करता येत असेल तर. तरीदेखील ज्या सरकारविरुद्ध तो हल्ला असेल त्या सरकारलाच स्वसंरक्षणासाठी आपल्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल हल्लेखोराला शिक्षा करता येईल. परक्या सरकारला तो अधिकार नाही.

मात्र वेगळी. म्हणून आपण असे समजू या की सरकार आणि जनता एकविचाराची आहेत; असे सरकार जनतेचा आग्रह असेल त्या गोष्टी सोडून देऊन इतर कोणच्याही गोष्टीच्या बाबतीतील आपल्या दडपशाहीच्या अधिकाराचा उपयोग करण्याचे मनातही आणणार नाही, पण जनतेला देखील हा स्वतः किंवा सरकार मार्फतीने दडपशाही करण्याचा अधिकार असता कामा नये. हा अधिकारच मुळी बेकायदेशीर आहे. निकृष्ट सरकारला जसा या अधिकारावर हक्क सांगता येत नाही तसाच उत्कृष्ट सरकारलाही. लोकमताच्या विरुद्ध या अधिकाराचा उपयोग करणे जितके गर्ह्य (noxious) तितकेच किंवा थोडेबहुत अधिक गर्ह्य त्याचा लोक-मताच्या बाजूने उपयोग करणे आहे. एक माणूस सोडून बाकीच्या उरलेल्या सबंध मनुष्य जातीचे एक मत असले आणि फक्त त्या एका माणसाचे वेगळे मत असले, तरीदेखील ज्याप्रमाणे त्या एका माणसाने, त्याला अधिकार असता तर, सबंध जगाला गप्प बसवणे असमर्थनीय ठरले असते, तसेच सबंध जगाने त्या एका माणसाला गप्प बसवणे असमर्थनीय आहे. एखादे मत, ते धारण करणाऱ्या व्यक्तीखेरीज इतरांना ज्याचे मूल्य नाही अशी खाजगी मिळकत असती, त्या मताचा आस्वाद घेण्यामधे अडथळा निर्माण करणे एखाद्या व्यक्तीला अपाय करण्यासारखे असते, तरी देखील तो अपाय थोड्या मंडळींना होतो की पुष्कळांना ही गोष्ट महत्त्वाची आहे. विचारप्रदर्शन थांबविण्यामधील मोठा दोष आहे तो हा की त्याच्या योगाने मनुष्यजातीला, या पिढीला आणि पुढच्या पिढ्यांनाही, लुबाड-ल्यासारखे होते; ते मत मान्य असणाऱ्या इतकेच न मानणाऱ्यांचेही नुक-सान होते. ते मत खरे असेल तर खोट्याऐवजी खऱ्याचा स्वीकार करण्याची लोकांना संधी लाभत नाही. मत चुकीचे असेल तर, असत्याशी संघर्ष घडल्यानंतर सत्याचे जे स्पष्ट आणि अधिक बोलके दर्शन घडते त्याला ते मुकतात. असे हे दर्शन घडणे हे देखील फार हिताचे असते.

ह्या ज्या दोन गृहीत कल्पना ( hypothesis ) आहेत त्यांचा वेगवेगळा विचार करणे जरूरीचे आहे. प्रत्येक कल्पनेला अनुरूप असा वेगळा युक्तिवाद आहे. जे मत आपण दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असू ते चुकीचे आहे अशी आपल्याला कधीही खात्री बाळगता येणार नाही. आणि खरोखर ते चुकीचे आहे अशी आपली खात्री असली तर ते दडपून टाकण्याचा प्रयत्न करणे अधिकच दोषार्ह ठरेल.

प्रथमतः सत्तेचा उपयोग करून जे मत दडपण्याचा प्रयत्न होतो आहे ते मत कदाचित् खरे असेल. दडपण्याचा जे प्रयत्न करतात ते, ते मत चुकीचे आहे असे म्हणणारच; पण त्यांची चूक होत नसेल अशी खात्री कुणी द्यावी ? सबंध मनुष्यजातीसाठी एखाद्या प्रश्नाचा निर्णय देण्याचा त्यांना अधिकार नाही; निर्णय देण्याच्या प्रक्रियेतून इतरांना गाळण्याचाही त्यांना अधिकार नाही. म्हणून त्या मताला आपली बाजू पुढे मांडण्याची संधी न देणे म्हणजे स्वतःला वाटणारी खात्री ही निरपवाद खात्री आहे असे मानण्यासारखे आहे. चर्चेला खीळ घालणे हे आपली कधीही चूक होत नाही असा आग्रह धरण्यासारखे आहे– हा जो नेहमीचा युक्तिवाद आहे तो त्याच्या निषेधाला पुरेसा आहे. युक्तिवाद नेहमीचा म्हणून कमी परिणामकारक ठरत नाही.

मनुष्यजातीच्या सुविचाराचे हे दुर्दैव आहे की स्खलनशीलता ही तत्त्वतः मान्य असली तरी व्यवहारामधे निर्णय करताना तिला द्यावे तितके महत्त्व दिले जात नाही. प्रत्येकाला आपण चूक करणे शक्य आहे हे मान्य असते. तरीदेखील चूक होऊ नये म्हणून जी खबरदारी घ्यायला हवी ती घेतली जात नाही, तसेच ज्या मताबद्दल खात्री वाटते ते ज्या चुका आपल्या हातून होणे शक्य आहे त्याचेच कदाचित् एखादे उदाहरण असेल हा विचार त्यांना पटत नाही. अनियंत्रित राजे किंवा त्यांच्याच सारखी, लोकांनी आपले नेहमी ऐकावे अशी सवय लागलेली, मंडळी यांना बहुतेक सर्व विषयांवरील आपलीच मते खरी असा पूर्ण विश्वास वाटतो.

ज्यांना आपल्या मताबद्दल कधीमधी संशय व्यक्त केलेला ऐकायला मिळतो व चुकले असेल त्यावेळी खरे काय ते ज्यांना दाखविले जाते अशी जास्त अनुकूल परिस्थितीतील माणसे आजूबाजूच्या मंडळींना किंवा ज्यांच्याबद्दल त्यांना आदर वाटतो अशा गृहस्थांना पटतील अशा मताबद्दलच इतका अमर्याद विश्वास व्यक्त करू शकतात. कारण ज्या प्रमाणात माणसाचा स्वतःच्या वैयक्तिक निर्णयावर कमी विश्वास असेल त्या प्रमाणात तो नेहमी जग चुकणार नाही या कल्पनेवर विश्वास टाकून बसतो. प्रत्येक मनुष्य जग म्हणून जे मानतो ते म्हणजे त्याचा ज्याच्याशी संबंध येतो तो जगाचा भाग— त्याचा पक्ष, त्याचा पंथ, त्याचे धर्मपीठ, त्याचा सामाजिक वर्ग. ज्या माणसाला आपले जग हे आपला देश किंवा आपला कालखंड इतके व्यापक आहे असे वाटेल त्या माणसाला तुलनेने उदारमतवादी व उदारमनस्क म्हणता येईल. इतर कालखंड, देश, पंथ, धर्मपीठे, वर्ग आणि पक्ष यांची पूर्वीची आणि आजची त्या विषयावरील मते वेगळी व विरोधी स्वरूपाची आहेत असे जरी त्याला कळले तरी त्याने मान्य केलेल्या समुदायाच्या खरेपणावरील त्याचा विश्वास कमी होत नाही. इतरांच्या विसंवादी मते व्यक्त करणाऱ्या जगापेक्षा आपलेच जग अधिक खरे असा त्याचा विश्वास असतो; आणि अनेक जगांपैकी त्याच्या विश्वासाचा आधार झालेले जग कोणते हे केवळ योगायोगाने ठरते व ज्या कारणांनी त्याला लंडनमधे प्रतिष्ठित धर्मपीठाचा सभासद ( churchman ) बनविले त्याच कारणांनी त्याला पीकिनमधे बुद्धधर्मी किंवा कन्फुसिअनपंथी बनवले असते या विचारांनी त्याच्या मनाला कधी त्रास होत नाही. कालखंड हे माणसाइतकेच प्रमादशील असतात हे उघड सत्य आहे आणि युक्तिवादाने ते अधिक उघड करता येईल असे नव्हे. प्रत्येक कालखंडात अशी अनेक मते प्रचलित होती की जी पुढच्या कालखंडात चुकीची एवढेच नव्हे तर हास्यास्पद ठरली. पूर्वीच्या काळात प्रचलित असलेली बरीचशी मते जशी विद्यमान काळाने चुकीची म्हणून सोडून दिली

तशीच आजची पुष्कळशी मते उद्याच्या जगात त्याज्य ठरण्याची शक्यता आहे हे निश्चितपणे धरून चालावयास हवे.

या युक्तिवादाविरुद्ध जो आक्षेप घेण्यात येईल त्याचे स्वरूप साधारण-पणे पुढीलप्रमाणे असण्याची शक्यता आहे. सार्वजनिक सत्तेने ( public authority ) स्वतःच्या विचाराने व जबाबदारीवर केलेल्या इतर कृत्या-इतकीच असत्याचा ( error ) प्रचार थांबविण्यासाठी केलेल्या कृत्यामधे प्रमाद घडून घेण्याची शक्यता आहे. माणसाना विवेकबुद्धी ( judgment) दिलेली आहे ती वापरण्यासाठी. कधीमधी ती चुकीने वापरली जाईल म्हणून तिचा उपयोगच मुळी करू नका असे माणसांना सांगावयाचे का ? जे दुष्ट आहे असे त्यांना वाटत असेल ते थांबविणे म्हणजे आपली कधी चूक होणार नाही असा दावा करण्यासाखे नाही; ते म्हणजे आपल्या सदसद्विवेकबुद्धीला पटलेल्या तत्त्वानुसार, प्रमादशीलता मान्य करूनही, कर्तव्य बजावण्यासारखे आहे. आपली मते चुकीची असण्याचा संभव आहे म्हणून जर त्या मतानुसार कधीच वागायचे नसेल तर आपल्या हित-संबंधांची आपल्याला काळजी घेता येणार नाही व आपली कर्तव्ये आप-ल्याला बजावता येणार नाहीत. सर्व कृत्यांना जो आक्षेप लागू पडतो तो एकाच कृत्याच्या बाबतीत अधिक यथार्थ असे म्हणता येणार नाही. शक्य तेवढे खरे असे मत बनवणे, ते काळजीपूर्वक बनवणे आणि ते खरे आहे अशी पूर्ण खात्री पटल्याखेरीज ते इतरांवर न लादणे हे सरकारचे आणि व्यक्तींचे कर्तव्य आहे. पण अशी ज्या वेळी खात्री असेल त्यावेळी आपल्या मतानुसार वागण्यापासून परावृत्त होणे म्हणजे भ्याडपणा आहे, विवेकबुद्धीची कदर न करण्यासारखे आहे. आजच्या इतके ज्ञान वाढले नव्हते अशा काळात काही लोकांनी आज सत्य म्हणून मान्यता पावलेल्या विचारांची छळणूक केली म्हणून आज जे विचार जनतेच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाला विरोधी आहेत असे प्रामाणिकपणे वाटते त्या विचारांचा अनिर्बंध प्रचार होऊ देणे हा भ्याडपणा आहे ( असा ती मंडळी युक्तिवाद

मांडतील ). ती पूर्वीची चूक आपल्या हातून घडणार नाही एवढी आपण काळजी घ्यावी असे सांगण्यात येईल. पण शासनानी व देशांनी इतर बाबतीतही चुका केलेल्या आहेत; पण म्हणून त्या गोष्टीच्या बाबतीत सत्तेचा वापर करू नये असे कोणी म्हणत नाही. त्यांनी चुकीचे कर बसवलेले आहेत; अन्याय्य लढाया केलेल्या आहेत. पण त्यावरून कर बसवू नयेत व कितीही त्रास झाला तरी लढाई करू नये असे कुणी म्हणेल का ? माणसांनी आणि सरकारने शक्य तितके शहाणपणाने वागले पाहिजे. शंभर टक्के अशी खात्री कोणच्याही बाबतीत देता येत नाही; पण मानवी जीवनाला जो निश्चितपणा आवश्यक तो मिळू शकतो. आपल्या वर्तनाची दिशा निश्चित करण्यासाठी आपण आपली मते खरी आहेत असे धरावे, नव्हे धरलेच पाहिजे आणि आपल्याला जी मते चुकीची व अनर्थकारक वाटतात त्यांचा प्रसार करून समाजाला अनीतीच्या मार्गाने नेण्याचा जी दुष्ट माणसे प्रयत्न करतात त्यांना रोखून आपण दुसरे काही करीत आहो असे म्हणता येणार नाही.

माझा जबाब आहे तो असा की ते करण्याने आपण इतर अनेक गोष्टी आपल्या बाजूने जमेस धरतो. एखादे मत ते खोडून काढण्याची पुरी संधी दिल्यानंतरही खोडले गेले नाही म्हणून ते खरे आहे असे मानणे व ते खोडून काढण्याची कुणालाही संधी लाभू नये म्हणून ते खरे आहे असे मानणे या दोघामधे खूप फरक आहे. आपले मत खोडून काढण्यासाठी व चुकीचे आहे हे सिद्ध करण्यासाठी पुरी संधी दिल्यानंतरच ते सत्य आहे असे समजून त्याप्रमाणे काम करणे योग्य ठरेल. मानवी गुण ज्याच्या ठिकाणी आहेत अशा कुणालाही ती खबरदारी घेतल्याखेरीज आपल्या मताच्या खरेपणाबद्दल जी बुद्धिनिष्ठ अशी खात्री हवी ती लाभणार नाही.

विचारांचा इतिहास किंवा मानवी जीवनाची सर्वसाधारण पद्धत लक्षात घेतली की त्या दोन्ही गोष्टी सध्याच्या पेक्षा जास्त वाईट परिस्थितीत नाहीत याचे कारण काय असावे ? मानवी बुद्धीच्या

अंगभूत शक्तीला हे श्रेय खात्रीने देता येणार नाही. उघड उघड स्पष्ट नसलेली अशी कोणतीही गोष्ट घेतली तर एक मनुष्य ती जाणणारा निघाला तर नव्याण्णव माणसे अशी आढळतील की ज्यांना तिच्या-बद्दल मतप्रदर्शन करता येणार नाही. आणि त्या शंभराव्या माण-साच्या ठिकाणी जाणण्याची शक्ती आहे असे म्हणावयाचे ते तुलना-त्मक दृष्टीने. प्रत्येक मागच्या पिढीतील अनेक नामवंत मंडळींचा आज चुकीच्या ठरलेल्या अनेक विचारांवर विश्वास होता, आज ज्या गोष्टींचे कुणीही समर्थन करणार नाही अशा कित्येक गोष्टींना त्यांची मान्यता होती; मग सर्वसाधारणपणे मनुष्यजातीमधे बुद्धिवादी विचार व बुद्धि-वादी आचार यांचे प्राधान्य आढळते ते कशामुळे? हे प्राधान्य जर खरोखरच आढळत असेल— आणि ते आढळत नसते तर मानवी जीवन आजच नव्हे तर कायमचे संकटाच्या गर्तेत खितपत पडले असते— तर ते मानवी मनाच्या एका विशिष्ट गुणामुळे. तो गुण हा की मनुष्याला आपल्या चुका नेहमी दुरुस्त करता येतात. बौद्धिक किंवा नैतिक जीव म्हणून माणसामधे आदरणीय असे जे काही आहे त्याचा उगम त्या गुणामधे आहे. चर्चा व अनुभव यांच्या योगाने तो आपल्या चुका सुधारू शकतो. केवळ अनुभवामुळे नव्हे; अनुभवाचा अर्थ काय लावायचा ते ठरवण्यासाठी चर्चा हवी. चुकीची मते आणि आचार यांना वस्तुस्थिती व युक्तिवाद यांच्या-पुढे क्रमाक्रमाने हार खावी लागते; परंतु वस्तुस्थिती व युक्तिवाद यांचा परिणाम होण्यासाठी ती मनापुढे यावी लागतात. अर्थ विशद करणाऱ्या टिपणीखेरीज आपण होऊन आपली हकीकत सांगतील अशा घटना थोड्या असतात. माणसाच्या निर्णयाची सारी शक्ती आणि मोल तो निर्णय चुकीचा असेल तर तो दुरुस्त करता येतो या एका गुणावरच अवलंबून आहे. ज्या वेळी एखादा निर्णय दुरुस्त करण्याची सर्व साधने सतत जवळ उपलब्ध असतील त्याचवेळी त्याच्यावर विश्वास टाकता येईल. एखाद्या माणसाची विवेकबुद्धी विश्वासार्ह आहे असे समजले जाते ते कशामुळे? आपली मते व आचार

यावरील टीकेला त्याने आपले मन मोकळे ठेवले म्हणून; स्वतःविरुद्ध जे जे काही बोलले जाईल ते ऐकून घेण्याची त्याने सवय लावून घेतली म्हणून; टीकेतील जे काही योग्य असेल त्याचा फायदा घेतल्यामुळे आणि जे काही चुकीचे होते त्याच्यातील चुका स्वतःला आणि प्रसंगानुसार इतरांना समजावून दिल्यामुळे. एखाद्या विषयाबद्दल वेगवेगळ्या मतांच्या मंडळींनी जे काही म्हटले असेल ते ऐकून घेऊन आणि मनाच्या वेगवेगळ्या कक्षातून तो कसा दिसतो त्याचा अभ्यास करूनच मनुष्याला त्याचे समग्र ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करता येतो. कुणाही शहाण्या माणसाने याखेरीज दुसऱ्या कोणत्याही मार्गाने शहाणपण मिळवलेले नाही. दुसऱ्या कोणच्याही मार्गाने शहाणे होणे माणसाच्या बुद्धीच्या स्वभावातही नाही. दुसऱ्यांच्या मताशी पडताळून पाहून स्वतःचे मत सुधारण्याची व पूर्ण बनवण्याची कायमची सवय आपले मत कार्यान्वित करण्याच्या मार्गात संशय आणि टाळाटाळी निर्माण करत नाही; उलट तिच्या योगाने त्या मतावर योग्य तो विश्वास ठेवण्यासाठी जो भक्कम आधार हवा तो उपलब्ध होतो. आपल्या मताविरुद्ध उघडपणे जे काही बोलले जाते त्याची माहिती असल्याकारणाने, ज्यांना विरुद्ध बोलायचे असेल त्यांच्याशी सामना केल्याकारणाने, आक्षेप व अडचणी टाळण्याऐवजी त्या शोधून काढल्याकारणाने आणि विषयावरील प्रकाशाचा स्रोत, मग तो कुठूनही येवो, न अडवल्याकारणाने जी माणसे किंवा समुदाय त्या प्रक्रियेतून गेले नसतील त्यांच्यापेक्षा आपण अधिक खरे आहो असे मानण्याचा अधिकार लाभतो.

मनुष्यजातीतील, स्वतःच्या विवेकबुद्धीवर विश्वास ठेवण्याचा ज्यांना सर्वात अधिक अधिकार आहे, अशा प्रज्ञावंतांना आपल्या निर्णयावर भरवसा ठेवण्यापूर्वी ज्या गोष्टी करणे आवश्यक वाटते त्या गोष्टी सरमिसळ स्वरूपाच्या सर्वसामान्य जनतेने—जिच्यामधे थोडी शहाणी मंडळी आणि अनेक अनाडी व्यक्ती यांचा समावेश होतो—कराव्या असा आग्रह धरणे अनुचित ठरणार नाही. रोमन कॅथलिक धर्मपीठासारखे अत्यंत

असहिष्णु धर्मपीठ देखील एखाद्या माणसाला संत ( saint ) म्हणून जाहीर करण्यापूर्वी " सैतानाच्या वकीलाला " ( devil's advocate ) बोलवते आणि त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेते. पवित्रातील पवित्र माणसाला देखील मृत्यूनंतरचा मान त्याच्या विरुद्ध सैतानाला जे काही सांगावयाचे असेल ते समजाऊन घेतल्याखेरीज व त्याचा विचार केल्याखेरीज देण्यात येत नाही. न्यूटनप्रणीत तत्त्वज्ञानाविरुद्ध आक्षेप घेण्याची परवानगी नसती तर आज त्या तत्त्वज्ञानाच्या खरेपणाबद्दल जी पुरी खात्री वाटते ती वाटली नसती. आपल्याला ज्या समजुती खऱ्या आहेत असे वाटते त्यांच्या खरेपणाचा सबळ आधार जर कोणता असेल तर तो सबंध जगाला त्या निराधार आहेत हे सिद्ध करण्याचे कायमचे आव्हान. आव्हान जर स्वीकारले गेले नाही अगर स्वीकारले जाऊन तो प्रयत्न फसला तरी आपल्याला पुरी निश्चिती लाभली असे म्हणता येत नाही; म्हणता येते ते एवढेच की मानवी बुद्धीच्या आजच्या परिस्थितीत जे शक्य होते ते सारे आपण केले; सत्य आपल्याला गवसावे म्हणून जे काही करणे शक्य होते ते करणे आपण टाळले नाही; चर्चेचे मैदान खुले ठेवले की आपल्याला अशी आशा बाळगता येते की वरचढ असे एखादे सत्य असेल तर मानवी बुद्धीला ते स्वीकारणे शक्य होईल त्यावेळी त्याचा शोध लागू शकेल; आणि तोवर आपल्या काळात सत्याच्या जितके जवळ जाणे शक्य असेल तितके आपण गेलो आहो एवढी खात्री आपल्याला बाळगता येईल. स्खलनशील अशा माणसांना जी निश्चिती प्राप्त करता येणे शक्य आहे ती एवढीच आणि प्राप्त करण्याचा जर कोणचा मार्ग असेल तर तो हाच.

माणसांनी खुल्या चर्चेच्या आवश्यकतेबद्दलचा युक्तिवाद मानावा पण दुसऱ्या टोकाला ढकलू नका असा आग्रह धरावा हे चमत्कारिक आहे. शेवटच्या टोकावरील बाबीला जो नियम लागू पडत नाही तो इतर कोणच्याही बाबीला लागू पडणार नाही हे ते विसरतात. ज्यांच्याबद्दल संशय वाटणे शक्य आहे अशा सर्व विषयांची खुली चर्चा व्हावी हे मान्य

केल्यानंतर, एखाद्या तत्त्वाची किंवा सिद्धांताची मात्र तो निश्चित आहे म्हणून–आणि तो निश्चित का तर त्यांना तो निश्चित आहे असे निश्चितपणे वाटते म्हणून– ती नाकारण्याची किंवा त्याच्याबद्दल प्रश्न उपस्थित करण्याची कुणालाही मुभा नसावी असा आग्रह धरणे म्हणजे स्वतःच्या ठिकाणी अस्खलनशील बुद्धी आहे असे कल्पिण्यासारखे आहे हे त्यांच्या ध्यानात येत नाही याचे आश्चर्य वाटते. परवानगी मिळाली तर एखाद्या सिद्धांताचा खरेपणा नाकारणारी एखादीही व्यक्ती जोवर विद्यमान आहे– आणि त्या व्यक्तीला ती परवानगी दिली जात नाही– तोवर तो सिद्धांत खरा आहे असे धरून चालणे म्हणजे आपण व आपल्याशी सहमत असलेली मंडळी हीच केवळ सत्य काय ते ठरवू शकतात, आणि ते देखील दुसरी बाजू ऐकून घेतल्याखेरीज, असे मानण्यासारखे आहे.

सध्याच्या युगाचे श्रद्धेला पारखे, पण संशयवादाला घाबरलेले असे वर्णन करण्यात येते. या युगामधे लोकांना खात्री वाटते ती त्यांच्या मतांच्या खरेपणाची नव्हे तर त्या मताविना काय करावे ते आपल्याला समजणार याची. या युगात एखाद्या मतावर सार्वजनिक हल्ला होऊ नये असे ठरवण्यात येते ते त्याच्या खरेपणावरून नव्हे तर समाजाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे म्हणून. सांगण्यात येते ते असे की काही समजुती समाजकल्याणाच्या दृष्टीने इतक्या उपयुक्त आणि इतक्या अवश्यक असतात की त्या अबाधित राखणे हे सरकारचे, समाजाच्या इतर हितांचे रक्षण करण्याइतकेच महत्त्वाचे, कर्तव्य आहे. अशी जिथे अवश्यकता आहे आणि कर्तव्यपालनाचीच जिथे ही पुढची पायरी आहे अशा ठिकाणी एखादे मत खरे आहे अशी शंभर टक्के खात्री पटली नाही तरी देखील सर्वसामान्य जनतेच्या मताशी ते जुळते आहे हे लक्षात घेऊन त्या मतानुसार काम करणे समर्थनीय आहे एवढेच नव्हे तर सरकारवर बंधनकारक आहे. समाजधारणेसाठी आवश्यक अशा या समजुतीवरील विश्वास कमी व्हावा असे जे वाटेल ते फक्त दुष्ट माणसांना. अशा या दुष्ट माणसांवर बंधने लादण्यात व केवळ तेच

ज्या गोष्टी करू इच्छितील त्या बंद करण्यात कोणचेही पाप नाही असे अनेक वेळा सांगण्यात येते आणि त्याहीपेक्षा अधिक वेळा मनामधे बाळगण्यात येते. या विचारसरणीमुळे सिद्धांतांच्या चर्चेवर बंधन पडते ते त्यांच्या खरेपणाऐवजी त्यांच्या उपयुक्ततेमुळे. तिच्या योगाने विचारांच्या खरेखोटेपणाबद्दल अचूक निर्णय देणारी व्यक्ती म्हणून मिरवण्याची जबाबदारी देखील टळते. या विचाराने जे स्वतःचे समाधान करून घेतात त्यांच्या लक्षात ही गोष्ट येत नाही की या मार्गाने अस्खलनशीलता एका मुद्याऐवजी दुसऱ्या मुद्याला चिकटते एवढेच. एखाद्या मताची उपयुक्तता देखील हे एक मतच आहे. हे दुसरे मत पहिल्या मताइतकेच विवाद्य असते, ते चर्चेचा विषय होऊ शकते व आणि त्याची पहिल्या मताइतकीच चर्चा होणेही अवश्यक असते. एखादे मत ते चुकीचे अगर विषारी आहे असे त्या मताला आपली बाजू मांडण्याची पुरी संधी दिल्याखेरीज ठरवायचे झाले तर तो निर्णय देण्यासाठी ज्याच्या हातून चूक अशी घडणार नाही अशा एखाद्या निर्लेप न्यायाधीशाची आवश्यकता असते. आणि एखाद्या वेगळे मत मांडणाऱ्या माणसाला त्याच्या मताची उपयुक्तता किंवा निरुपद्रवीपणा सिद्ध करू द्यावयाचा परंतु त्याची सत्यता मात्र सिद्ध करू द्यावयाची नाही असे करून चालणार नाही. एखाद्या मताची सत्यता हा त्याच्या उपयुक्ततेचा भाग असतो. एखाद्या मतावर विश्वास ठेवणे योग्य की अयोग्य हे ठरविताना ते मत खरे आहे की नाही हे पाहणे वगळता येईल का? दुष्ट माणसांच्या विचारानेच नव्हे तर उत्तम माणसांच्या विचाराने देखील जे मत खरे नसते ते उपयुक्त ठरण्यासारखे नसते. त्यांना जो विचार असत्य वाटतो, पण तो उपयुक्त आहे असे त्यांना सांगण्यात येते, तो नाकारल्याबद्दल त्यांच्यावर आक्षेप घेण्यात आला तर वर उल्लेखिलेला युक्तिवाद त्यांनी करू नये असे म्हणता येईल का? मान्य अशा विचारांचे जे पक्षपाती असतात ते या युक्तिवादाचा पुरा फायदा घेतल्यावाचून रहात नाहीत. उपयुक्ततेचा मुद्दा सत्यापासून वेगळा करून

विवेचन करताना ते कधी दृष्टीस पडत नाहीत. उलट तो विचार सत्य आहे म्हणूनच त्याचे ज्ञान व त्याच्यावरील श्रद्धा अवश्यमेव आहे असे सांगण्यात येते. जोवर एका बाजूला अतिशय महत्त्वाचा असा हा मुद्दा मांडता येतो पण दुसऱ्या बाजूला मात्र ते करता येत नाही तोवर उपयुक्ततेच्या प्रश्नाचा नीट विचार होणे शक्य नाही. आणि खरी गोष्ट अशी आहे की ज्यावेळी कायदा अगर लोकांच्या भावना एखाद्या मताच्या सत्यतेबद्दल शंका उपस्थित करू देत नाहीत त्या वेळी उपयुक्ततेबद्दल शंका उपस्थित करणेही त्यांना सहन होत नाही. त्या विचारांच्या निरपवाद आवश्यकतेबद्दल किंवा तो विचार नाकारण्यामधे जे पाप आहे त्याबद्दल थोडा सौम्यपणा दाखवणे एवढेच ते फार फार तर करू शकतात.

आपण आपल्या मतानुसार एखादा विचार निषिद्ध ठरवला म्हणून त्या विचाराला आपले म्हणणे पुढे मांडण्याची संधी न देणे यामधे जो दोष (mischief) आहे तो नीट लक्षात यावा म्हणून चर्चेसाठी प्रत्यक्षातील एखादे उदाहरण घेणे सोईचे होईल. मी मुद्दाम मला मुळीच अनुकूल नसलेली अशी काही उदाहरणे घेतो. या उदाहरणांमधे सत्य व उपयुक्तता या दोन्ही दृष्टींनी विचारस्वातंत्र्याला विरोधी असे जे मुद्दे आहेत ते फार सबळ आहेत असे समजले जाते. ज्या विचारांवर आक्षेप घेण्यात येतो ते विचार परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दलचे, परलोकाबद्दलचे, किंवा सर्व-मान्य अशा नीतिनियमांबद्दलचे आहेत असे आपण समजू या. अशा विचारांच्या बाबतीत वाद घालणे म्हणजे अयोग्य रीतीने भांडणाऱ्या विरुद्ध पक्षांला मोठी सवलत देण्यासारखे आहे. कारण तो जरूर असे विचारील —आणि ज्यांना अयोग्य रीतीने भांडायचे नाही ते देखील मनातल्या मनात तेच विचारतील— देव, परलोक, नीतिनियम वगैरेबद्दलचे विचार पुरेसे निश्चित नाहीत म्हणून त्यांना कायद्याचे संरक्षण लाभू नये असे खरोखरच तुम्हाला वाटते काय ? देव मानणे हा असा एखादा विचार आहे का की जो पूर्णतया खरा मानणे म्हणजे स्वतःला अस्खलनशील

समजण्यासारखे आहे ? पण मला हे सांगितले पाहिजे की एखाद्या विचाराबद्दल (मग तो विचार कोणताही असो) मनाला खात्री वाटणे म्हणजे माझ्या दृष्टीने स्वतःला अस्खलनशील कल्पिण्यासारखे नाही. विरुद्ध बाजूने जे काही बोलता येणे शक्य असेल ते दुसऱ्यांना ऐकण्याची संधी न देता त्यांच्यासाठी विचाराबद्दल निर्णय देण्याची जबाबदारी पत्करणे म्हणजे सर्वज्ञाचा आव आणण्यासारखे आहे. मला स्वतःला अत्यंत पवित्र वाटणाऱ्या अशा विचाराबद्दल जरी कुणी असा आव आणला तरी देखील मी त्याबद्दल नापसंती व निषेध व्यक्त करीन. एखाद्या विचाराच्या असत्यतेबद्दल, एवढेच नव्हे तर त्याच्या घातुक परिणामाबद्दल, किंवा घातुक परिणाम सोडा त्या विचाराच्या अनैतिकता व अधार्मिकता (या शब्दांचा उपयोग मला अत्यंत निषिद्ध वाटतो) याबद्दलची माणसाची मते कितीही ठाम असली, तरी स्वतःच्या या खाजगी मतानुसार, त्या मताला देशातील जनतेमधे किंवा समकालीनांमधे कितीही पाठिंबा लाभला तरी, त्या माणसाने आपल्याला न आवडणाऱ्या मताला स्वतःचा बचाव करण्याची संधी न देणे म्हणजे आपण अस्खलनशील आहो असे मानण्यासारखे आहे. त्या विचारांना अनैतिक व अधार्मिक म्हटले म्हणून तो सर्वज्ञपणाचा आव कमी आक्षेपार्ह किंवा कमी धोकादायक ठरत नाही; उलट याप्रसंगी तो इतर वेळेपेक्षा अधिक मारक ठरतो. अशाच प्रसंगी एका पिढीतील माणसे पुढच्या पिढीतील माणसांना आश्चर्य आणि घृणा वाटेल अशा महाभयंकर चुका करतात. उत्तम माणसे व उदात्त सिद्धांत यांचा नाश करण्यासाठी कायद्याचा उपयोग झाल्याची इतिहासातील चिरस्मरणीय अशी उदाहरणे अशाच प्रसंगामधे आढळतात. माणसे नष्ट करण्यात त्या प्रयत्नांना शोचनीय असे यश लाभले. काही सिद्धांत मात्र जिवंत राहिले; आणि (जणू त्यांची थट्टा करण्याच्या हेतूने) वेगळे मत अगर स्वीकृत अर्थापेक्षा वेगळा अर्थ प्रतिपादन करणारांची मुस्कटदाबी करण्यासाठी त्यांचाच आता उपयोग करण्यात येत आहे.

सॉक्रेटिस नावाचा एक इसम होऊन गेला आणि त्याच्यामधे व कायद्याने प्रस्थापित झालेल्या संस्था व तत्कालिन लोकमत यांच्यामधे एक संस्मरणीय असा संघर्ष घडून आला या गोष्टीची लोकांना जितक्या वेळा आठवण द्यावी तितकी थोडीच होईल. व्यक्तिश: मोठी अशी अनेक माणसे निर्माण करणाऱ्या देशात आणि युगात तो जन्मला. त्याला आणि त्याच्या युगाला उत्तम रीतीने ओळखणाऱ्या मंडळींनी त्या युगातील अत्यंत सद्‌गुणी मनुष्य म्हणून त्याची प्रशंसा करून ठेवलेली आहे. आपण तर त्याला नंतरच्या सद्‌गुणांची शिकवण देणाऱ्या सर्व शिक्षकांचा मेरुमणी आणि आदर्श समजतो. नीतिशास्त्र आणि इतर तत्त्वज्ञाने यांचे उगमस्थान असे जे प्लेटो व ॲरिस्टॉटल, त्यांपैकी प्लेटोच्या उदात्त विचारांना आणि ॲरिस्टॉटलच्या विवेकी उपयुक्ततावादाला स्फूर्ती देणारा म्हणून आपण त्याला ओळखतो. तेव्हापासून आतापर्यंत जे नामांकित विचारवंत होऊन गेले त्या सर्वांचा सर्वमान्य असा गुरू; दोन हजार वर्षे उलटली तरी देखील ज्याची कीर्ती सारखी वाढते आहे आणि त्याच्या जन्मस्थानी जे अनेक प्रख्यात विचारवंत जन्मले त्या सर्वांच्या कीर्तीपेक्षाही ज्याची कीर्ती मोठी वाटते, त्या सॉक्रेटिसला त्याच्या देशबांधवांनी तो अनीतिमान् व अश्रद्ध आहे असा न्यायालयाचा निवाडा मिळवून ठार मारले. तो अश्रद्ध का तर शासनसंस्थेने मान्यता दिलेल्या देवांना तो मानत नव्हता. देव असा तो मानत नव्हता असा देखील त्याच्याविरुद्ध आक्षेप होता. अनीतिमान् का तर आपल्या विचारांनी व शिकवणुकीने तो तरुणांना बिघडवतो म्हणून. सॉक्रेटिसवर ठेवण्यात आलेले आरोप सिद्ध झाले आहेत असे न्यायालयाला प्रामाणिकपणे वाटले असावे आणि मग त्याने मनुष्यजातीकडून ज्याची सर्वात अधिक वाहवा व्हायला हवी होती अशा त्या माणसाला गुन्हेगार म्हणून देहांताचे शासन दिले.

सॉक्रेटिसच्या देहांताच्या शिक्षेनंतर ज्या न्यायालयीन अन्यायाचा उल्लेख करणे शिखरावरून दरीत उडी घेतल्यासारखे वाटणार नाही तो अन्याय

म्हणजे अठराशे वर्षांपूर्वी घडून आलेला कॅल्व्हारी येथील अन्याय. जीवनामधे ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध आला त्या सर्वांना आपल्या नैतिक श्रेष्ठतेने ज्याने असे भारून टाकले की पुढच्या अठरा शतकांनी मनुष्यदेहातील परमेश्वर म्हणून ज्याची पूजा बांधली त्याचा विटंबना करून वध करण्यात आला. आणि काय म्हणून तर देवाची हेटाळणी करणारा म्हणून. माणसांनी आपल्या कल्याणकर्त्याला ओळखले नाही; तो होता त्याच्याबरोबर उलट तो आहे असे लोकांना वाटले; धर्मविरोधी वर्तनाचा पुतळा म्हणून त्यांनी त्याला वागवले; आणि आता त्याला त्यांनी जी वागणूक दिली तिच्यामुळेच जग त्यांना धर्मविरोधी, पाखंडी म्हणून समजते आहे. त्या शोचनीय घटनांबद्दल, विशेषेकरून नंतरच्या दुसऱ्या घटनेबद्दल जगाची आता जी भावना आहे तिच्यामुळे त्या घटनांमधे ज्या दुर्दैवी व्यक्तींनी भाग घेतला त्यांच्याकडे मोठ्या अन्याय्य दृष्टीने पाहिले जाते. तसे पाहिले तर ती माणसे वाईट नव्हती; माणसे सर्वसाधारणपणे जशी असतात त्या मानाने तर मुळीच वाईट नव्हती; उलट इतरांच्या मानाने ती अधिक चांगली होती; त्या काळातील व त्या लोकसमुदायातील धार्मिक, नैतिक व देशभक्तिपर भावना त्यांच्या ठिकाणी पुऱ्या किंवा पुऱ्यापेक्षाही थोड्या अधिक प्रमाणात नांदत होत्या. ती माणसे अशी होती की ज्यांनी कोणच्याही काळात– अगदी आजच्या देखील – निर्दोष व आदरणीय म्हणून आपले आयुष्य घालवले असते. देशातील रूढ कल्पनांनुसार अत्यंत निषिद्ध असे शब्द उच्चारले गेल्याबरोबर ज्या उच्च धर्मगुरूने आपले कपडे फाडले त्याला वाटलेली धास्ती व संताप प्रामाणिक स्वरूपाचे होते. आजच्या युगातील धार्मिक व प्रतिष्ठित मंडळींना त्यांच्या धार्मिक व नैतिक भावनांबद्दल जितका मनापासून अभिमान वाटतो तितकाच त्या धर्मगुरूलाही त्याच्या काळातील भावनांबद्दल वाटला असेल. आणि आज त्या धर्मगुरूच्या कृत्याबद्दल त्या मंडळींच्या अंगावर शहारे येतात. ही मंडळी जर त्या काळात विद्यमान असती व धर्माने ज्यू असती तर त्या धर्मगुरूप्रमाणेच ती वागली असती. ज्यांनी

पहिल्या हुतात्म्यांना दगडांचा वर्षाव करून ठार मारले ते आपल्यापेक्षा फार वाईट अशी माणसे होती असे ज्या धर्मनिष्ठ ख्रिश्चनांना वाटते त्यांनी हे लक्षात ठेवावे की त्या हुतात्म्यांचा छळ करणारांमधील सेंट पॉल हा एक होता.

आपण आणखी एक सर्वात डोळ्यात भरण्यासारखे उदाहरण घेऊ या. चूक करणाऱ्याचा शहाणपणा आणि सद्गुण यांच्या तुलनेने ती चूक खूपच डोळयात भरण्यासारखी आहे. समकालीनांमधे स्वतःला उत्तम आणि अत्यंत सुसंस्कृत म्हणविण्याचा सत्ताधारी मंडळींपैकी कुणाला सर्वात अधिक अधिकार असेल तर तो मार्कस ऑरेलिअस याचा. सर्व सुसंस्कृत जगाचा निरंकुश सम्राट अशा त्या ऑरेलिअसने सबंध जन्मभर निर्दोष असे न्यायदान तर केलेच पण ज्या स्टॉइक (Stoic) परंपरेमधे तो वाढला त्या परंपरेशी अत्यंत विसंगत असा मनाचा कोवळेपणाही त्याने निरंतर राखला. त्याच्या ठिकाणी जे दोष होते असे सांगण्यात येते ते आत्मरंजनाच्या वृत्तीमुळे निर्माण झालेले दोष होते. जुन्या युगातील मानवी मनाचे सर्वोत्कृष्ट नतिक फळ असे जे त्याचे लिखाण आणि ख्राइस्टची विशेष महत्त्वाची अशी जी शिकवण त्यामधे कुठे फरक असलाच तर तो दृष्टीस पडेल असा नाही. स्वतःला ख्रिश्चन म्हणविणाऱ्या इतर सर्व सम्राटांपेक्षा, पंथीय स्वरूपाचा असा अर्थ घेतला नाही तर, तो अधिक ख्रिश्चन होता. पण त्याने ख्रिश्चन धर्माचा छळ केला. मानवी समाजाच्या पूर्वीच्या सर्व गुणसंपत्तीच्या शिखरावर तो आरूढ झालेला होता; त्याची बुद्धी खुली आणि बेलगाम होती; त्याची वृत्ती अशी होती की आपल्या सर्व नीतिविषयक लिखाणांमधून त्याने आपण होऊन ख्रिश्चन नीतीचा आदर्श निर्माण केला; परंतु ख्रिश्चन धर्मामुळे ज्या जगाशी तो कर्तव्य भावनेने बांधला गेलेला होता त्या जगाचे कल्याण होईल, अकल्याण होणार नाही, हे त्याच्या ध्यानात आले नाही. सध्याचा समाज शोचनीय अवस्थेत आहे हे त्याला माहित होते. परंतु समाज जो एकत्र राहिला आहे आणि तो अधिक अवनत होत नाही तो केवळ

समाजमान्य अशा देवदेवतांवरील श्रद्धेमुळे व त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या भक्तिभावामुळे हे तो पहात होता किंवा आपल्या दृष्टीस पडत आहे असे त्याला वाटत होते. मानवजातीचा सम्राट म्हणून समाजाचे तुकडे पडणार नाहीत अशी खबरदारी घेणे हे आपले कर्तव्य आहे अशी त्याची कल्पना होती. विद्यमान बंध नष्ट झाले तर समाजाला एकत्र बांधणारे नवे बंध कसे निर्माण होतील हे त्याला कळत नव्हते. जुने बंध नष्ट करणे हे नवीन धर्माचे उघड उघड उद्दिष्ट होते. नवीन धर्माचा स्वीकार करणे हे जर आपले कर्तव्य नसल तर तो नष्ट करणे आपले कर्तव्य आहे अशी त्याची भावना झाली. ख्रिश्चन धर्माचे धर्मशास्त्र सत्य अगर परमेश्वरप्रणीत आहे असे त्याला वाटले नाही; क्रूसावर चढलेल्या देवाची नवलपूर्ण कथा त्याला विश्वासार्ह वाटली नाही; सर्वस्वी अविश्वसनीय अशा पायावर आधारलेली संस्था समाजाचे पुनरुज्जीवन करू शकेल याची पूर्वकल्पना त्याला आली नाही; मागाहून बऱ्याच अंशी ते घडून आले ही गोष्ट वेगळी. अत्यंत मृदु आणि प्रेमळ वृत्तीचा असा तो तत्त्वज्ञानी व राज्यकर्ता होता. परंतु कळकळीच्या कर्तव्यभावनेने प्रेरित होऊन त्याने ख्रिश्चन धर्माचा छळ करण्याचा हुकूम दिला. माझ्या मते इतिहासातील ही एक अत्यंत दुःखाची अशी घटना आहे. कॉन्स्टंटाइन-ऐवजी मार्कस ऑरेलिअसच्या नेतृत्वाखाली ख्रिश्चन धर्माचा धर्म म्हणून स्वीकार झाला असता तर जगातील ख्रिश्चन धर्माचे स्वरूप किती वेगळे झाले असते हा दुःखदायक विचार मनात आल्यावाचून रहात नाही. ख्रिश्चन-धर्मविरोधी प्रचार दंडनीय ठरविताना जी कारणे पुढे मांडली जातात ती सर्व कारणे मार्कस ऑरेलिअसने ख्रिश्चन धर्मप्रचार दंडनीय ठरविला त्या-वेळी विद्यमान होती हे नाकारणे त्याच्यावरती अन्याय करण्यासारखे आणि तसेच सत्यावर पांघरूण घालण्यासारखे आहे. निरीश्वरवाद खोटा आहे व त्याच्या योगाने समाजाचे विघटन होते असे ख्रिश्चन माणसाला जितके ठामपणाने वाटते तितक्या ठामपणाने ख्रिश्चन धर्माबद्दल मार्कस ऑरेलिअसला तेच वाटत होते. पण तत्कालिनामध्ये ख्रिश्चन

धर्माची गोडी चाखण्याची खरी पात्रता त्याच्याच ठिकाणी अधिक होती. त्या काळातील सर्व ज्ञान मार्कस ऑरेलिअसला अवगत होते; त्याच्या बुद्धीची भरारी त्या ज्ञानापलीकडे जाणारी होती; सत्याचा तो उत्कट शोधक होता; आणि जे सत्य हाती येईल त्या सत्याची तो एकाग्र चित्ताने सेवा करत असे. असा जो मार्कस ऑरेलियस त्याच्यापेक्षा आपण अधिक जाणते व चांगले आहो असा आव आणल्याखेरीज कोणत्याही मतप्रदर्शनाला शिक्षा करणे योग्य ठरवता येणार नाही. तसा आव कुणीही आणू नये आणि स्वत: आणि त्याच बरोबर सर्व सामान्य जनता कधीही चूक करत नाही असे समजू नये. ॲन्टोनिनस या महापुरुषाने तो चुकीचा समज करून घेतला आणि त्याचा परिणाम दुर्दैवी ठरला.

मार्कस अँटोनिनसचे समर्थन होणार नाही असा कोणताही युक्तिवाद अधार्मिक विचारांचे नियंत्रण करण्यासाठी दंडशक्ती वापरावी असे म्हणणारांना सापडणार नाही. ही गोष्ट लक्षात आल्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचे विरोधी अडचणीत सापडले की ती गोष्ट कबूल करतात आणि डॉ. जॉनसन म्हणतो त्याप्रमाणे म्हणतात की ख्रिश्चनांचा छळ करणारांच्या कृतीत अयोग्य असे काहीच नव्हते. त्यांचे म्हणणे असे की सत्याला छळाच्या दिव्यातून जावे लागते; सत्य त्यातून यशस्वीपणे बाहेर पडते; कायदेशीर कारवाया अखेर सत्यापुढे दुबळ्या पडतात; पण समाज-हितविरोधी चुकांच्या बाबतीत मात्र त्यांचा चांगला उपयोग होतो. धार्मिक असहिष्णुतेचा पुरस्कार करणारा हा युक्तिवाद डोळ्यात भरण्यासारखा आहे म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

छळाने सत्याला इजा होत नाही, म्हणून सत्याचा छळ झाला तरी बिघडत नाही हा युक्तिवाद नव्या सत्यांना बुद्धया विरोध करणारा आहे असे म्हणता येत नाही. पण नवीन सत्यांचा शोध लावून ज्यांनी मनुष्य-जातीला उपकृत करून ठेवले आहे त्या महाभागांशी वागण्याची या युक्तिवादाची पद्धत उदारपणाची आहे असे मात्र म्हणता येत नाही.

निकटचा संबंध असलेल्या पण आजवर अज्ञात अशा एखाद्या बाबीचे जगाला दर्शन घडविणे, एखाद्या महत्त्वाच्या भौतिक अगर अध्यात्मिक वस्तूबद्दल आजवरचा विचार कसा चुकीचा होता हे जगाला पटवून देणे हे मनुष्य आपल्या बांधवांची जी सेवा करू शकतो त्यातील उत्तमातील उत्तम सेवा आहे. काही काही वेळा, डॉ. जॉनसन यांनी म्हटल्याप्रमाणे, आणि पहिल्या पिढीच्या खिश्चनांच्या बाबतीत व नंतर सुधारकांच्या ( Reformers ) बाबतीत घडले तसे, जी सत्ये दाखविली गेली ती मनुष्यजातीला दिलेल्या बहुमोल देणग्याच होत्या. अशा बहुमोल देणग्या देणारांचे जगाने ऋण फेडले ते त्यांना हुतात्मा बनवून; त्यांना बक्षीस मिळाले ते हेच की त्यांना नीचातील नीच गुन्हेगाराप्रमाणे वागविण्यात आले. हे जे प्रकार घडले ते, ज्याच्यासाठी मानवजातीने पोती लेवून आणि राख फासून प्रायश्चित्त घ्यावे अशा तऱ्हेचे पाप किंवा शोचनीय अशी चूक अगर दुर्दैव नसून, जगामध्ये नेहमी घडून येणारी आणि समर्थनीय अशी घटना आहे असे या युक्तिवादाचे म्हणणे. लोक्रियन्स लोकांच्या कायदेमंडळामध्ये ज्याप्रमाणे नवीन कायदा सुचविणाऱ्या माणसाला गळ्याभोवती फास लावून उभे रहावे लागत असे आणि त्याने सुचविलेला कायदा, त्याने सांगितलेली कारणे ऐकल्यानंतर, लोकसभेला तावडतोब पसंत पडला नाही तर त्याच्या गळ्याभोवती पडलेला फास जसा तात्काळ आवळला जाई तशीच गत जगाला नवीन सत्याचे दर्शन घडविणाऱ्या तत्त्वदर्शकांची व्हावी, अशी या युक्तिवादाची भूमिका. समाजाचे कल्याण करणाऱ्यांना या पद्धतीने वागविण्याचे जे समर्थन करतात त्यांना त्या कल्याणप्रद वस्तूंची विशेष किंमत वाटत नसावी असे सहज म्हणता येते. नवीन सत्ये एकेकाळी हवी असली तरी आता मात्र ती पुष्कळ झाली असे ज्यांना वाटते तेच या युक्तिवादाचे समर्थक असावेत असा माझा समज आहे.

सत्य छळावरती मात करणे हे एक मनाला गोड वाटणारे पण खरे नसलेले असे विधान आहे. माणसे एकामागून एक त्याची घोकंपट्टी करतात

त्यामुळे सर्वांच्या ते परिचयाचे होते, पण अनुभवाची ग्वाही आहे ती वेगळीच. छळामुळे सत्य दडपले गेल्याची इतिहासात पुष्कळ उदाहरणे आहेत. कायमचे दडपले गेले नाही तर काही शतके तरी ते दडपले जाते. धार्मिक विचारांच्या बाबतीतच पहा ना : ल्यूथरच्या पूर्वी कमीतकमी वीस वेळा सुधारणेची चळवळ (Reformation) सुरू झाली होती, पण प्रत्येक वेळी ती दडपली गेली. ब्रेसिआच्या अर्नाल्डला दडपण्यात आले. फ्रा डॉलचिनोची तीच गत झाली. सॅव्हनरोलाची गय झाली नाही. अल्बिगियोना, व्हाडीयोना आणि हसाइट्सना त्याच पद्धतीने वागविण्यात आले. ल्यूथरच्या काळानंतरही जिथे जिथे छळ निग्रहाने चालू राहिला जिथे तिथे तो यशस्वी ठरला. स्पेनमधे, इटलीमधे, फ्लँडर्समधे, ऑस्ट्रियन साम्राज्यामधे प्रॉटेस्टंट धर्मपंथाची पाळेमुळे नष्ट करण्यात आली. मेरी राणी जगली असती किंवा एलिझबेथ राणी मेली असती तर इंग्लंडमधे देखील बहुतकरून तेच घडले असत. वेगळे मत प्रतिपादन करणारांचा पक्ष प्रबळ होता म्हणून त्याचा परिणामकारक पद्धतीने छळ करणे शक्य नव्हते, अशी काही थोडी उदाहरणे सोडली तर इतर प्रत्येक ठिकाणी छळच विजयी झाला असे दृष्टीस पडते. रोमन साम्राज्यामधे खिश्चन धर्माची पाळेमुळे उद्ध्वस्त होणे शक्य होते हे कुणाही विचारी माणसाला नाकारता येणार नाही. तो वाढला आणि शक्तिशाली बनला कारण त्याचा छळ झाला तो केवळ मधून मधून; प्रत्येक वेळी छळ थोडाच वेळ घडला; आणि मध्यंतरीच्या काळात त्याला प्रचाराचे खूप स्वातंत्र्य लाभत असे. सत्याच्या ठिकाणी सत्य म्हणून, असत्याच्या ठिकाणी नसलेली, तुरुंगवास व जाळून मारणे यासारख्या शिक्षावर मात करणारी एखादी अंगभूत शक्ती असते असे मानणे हा शुष्क भावनावाद आहे. असत्यापेक्षा सत्याबद्दल माणसांना जास्त आस्था वाटते हे खरे नाही आणि कायदेशीर किंवा सामाजिक दंडयोजनेचा योग्य त्या प्रमाणात उपयोग करून सत्याचा काय किंवा असत्याचा काय प्रचार थांबवता येतो. सत्याला अनुकूल गोष्ट आहे ती एवढीच

की एखादा विचार खरा असला तर तो एकदा, दोनदा किंवा अनेक वेळा दडपला जाईल, पण कालांतराने केव्हा तरी कुणी त्याचा शोध लावील. असा पुनरावतार ज्या वेळी होईल त्या वेळी आजूबाजूची परिस्थिती प्रतिकूल नसल्यामुळे काही काळ तरी त्या विचारांचा छळ होणार नाही आणि तेवढ्या वेळात तो अशी प्रगती करील की नंतर त्याला दडपण्याचे जे प्रयत्न होतील त्यांच्याशी त्याला चांगला सामना करता येईल.

असे म्हटले जाईल की नवीन विचारांच्या प्रवर्तकांना आपण आता ठार मारत नाही; प्रेषितांचा ( prophets ) आपल्या वाडवडीलांप्रमाणे आपण खून करत नाही; उलट ते मेल्यानंतर आपण त्यांची थडगी उभारतो. पाखंडी मंडळींना आपण ठार मारत नाही हे खरे आणि अत्यंत निंद्य अशा विचाराविरुद्ध देखील आधुनिक जग जी शिक्षा क्षम्य मानेल ती शिक्षा देऊन कोणच्याही विचाराचे निर्मूलन होणार नाही हे देखील तितकेच खरे. पण कायदेशीर म्हणता येईल अशा छळाचा देखील आपल्याला कलंक लागलेला नाही अशी आपण बढाई मारू नये. कायद्या-प्रमाणे आज देखील विचाराविरुद्ध व निदान विचारप्रदर्शनाविरुद्ध शिक्षा आहेत. त्या शिक्षांची अंमलबजावणी होणे आज देखील कुणालाही जगावेगळे वाटत नाही. म्हणून एखादे वेळी त्यांचे भर जोरात पुनरुज्जीन झाले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. १८५७ साली कॉर्नवॉल परगण्यात उन्हाळ्याच्या कोर्टात ( summer assizes ) एका दुर्दैवी इसमाला खिश्चन धर्माविरुद्ध काही अपशब्द बोलल्याबद्दल आणि प्रार्थना मंदिराच्या दारावर ते लिहिल्याबद्दल एकवीस महिन्यांची सजा झाली. त्या दुर्दैवी माणसाच्या इतर सर्व क्षेत्रांतील वर्तनामध्ये आक्षेपार्ह असे काही नव्हते असे सांगण्यात आले होते.* ही गोष्ट घडल्यापासून एक महिन्याच्या आतच, ओल्ड बेली येथील न्यायालयात दोन माणसांना दोन वेगवेगळ्या

* थॉमस पूली, बॉडमिन येथील कोर्ट, जुल ३१, १८५७. पुढच्या डिसेंबरमधे शासनाने त्याला बिनशर्त माफी दिली.

वेळी त्यांनी धार्मिक श्रद्धांवर आपला विश्वास नाही असे प्रामाणिकपणे सांगितले म्हणून ज्यूररचे काम करू दिले नाही. त्यांच्यापैकी एकाचा न्यायाधीशाने आणि वकीलांपैकी एकाने खूप अपमान केला.[†] आणि तिसऱ्या एका माणसाला, एका परदेशीयाला, त्याच कारणासाठी चोरा-विरुद्ध न्याय नाकारण्यात आला.[§] देव (मग तो कोणचाही देव असो) आणि परलोक यांच्यावर विश्वास आहे असे जाहीर केल्याखेरीज न्यायालयात कुणालाही साक्ष देता येणार नाही असा जो एक कायद्याचा सिद्धांत आहे त्या सिद्धांतानुसार न्याय नाकारण्यात आला. याचाच अर्थ असा की ते समाजबहिष्कृत (outlaws) आहेत, न्यायालयांचे संरक्षण त्यांना लाभणार नाही, त्यांना शिक्षेची धास्ती न बाळगता कुणीही लुटावे किंवा ठोकावे. गुन्हेगाराने काळजी घ्यायला पाहिजे ती एवढीच की त्यावेळी त्यांच्याखेरीज किंवा त्यांच्यासारखीच मते असणारांखेरीज दुसरे कुणीही हजर असता कामा नये. एवढेच नव्हे तर गुन्हा सिद्ध होणे त्यांच्याच साक्षीवर अवलंबून असेल तर दुसऱ्या कुणालाही त्याने तसेच लुबाडावे व ठोकावे. परलोकावर विश्वास नसणाऱ्या माणसाच्या शपथेला किंमत नसते हा विचार याच्या बुडाशी आहे. जे हा विचार मानतात त्यांना इतिहास माहीत नाही असेच म्हणावे लागते. (प्रत्येक युगातील पाखंडी माणसांपैकी बहुसंख्य मंडळी नीतिमत्तेच्या व चारित्र्याच्या दृष्टीने नामवंत होती अशी इतिहासाची साक्ष आहे) ज्ञानी व पुण्यवान् म्हणून जगामधे ज्यांची ख्याती झालेली आहे अशा मंडळींपैकी पुष्कळ जणांचा परमेश्वरावर विश्वास नसतो ही गोष्ट सर्वांना, निदान त्यांच्या निकट सहवासातील लोकांना, माहित आहे. या सत्याची ज्यांना थोडीशी देखील

† जॉर्ज जेकब होलिओक, ऑगस्ट १७, १८५७; एडवर्ड ट्रुलव्ह, जुलै १८५७.

§ बॅरन द ग्लायकन, मार्लबरो रस्त्यावरील पोलीस कोर्ट, ऑगस्ट ४, १८५७.

जाणीव आहे ते वरील विचार मानणार नाहीत. हा विचार आत्मघातक आहे आणि आपला आधार तो स्वतःच नष्ट करतो. नास्तिक खोटे बोलणारे असतात ही कल्पना; पण खोटे बोलायला तयार असणाऱ्या नास्तिकांची साक्ष स्वीकारली जाते; त्याज्य समजली जाते ती त्या नास्तिकांची साक्ष की जे खोटे बोलण्याऐवजी लोक ज्याचा तिरस्कार करतात अशा नास्तिक-वादाचा उघडपणे स्वीकार करण्याचे धैर्य दाखवतात. ज्या हेतूने नियम बनवण्यात आला तो हेतू तर साध्य होत नाही, उलट नियम हास्यास्पद आहे असे उघड होते; असा तो नियम जारी ठेवायचा म्हणजे केवळ द्वेषाचे चिन्ह म्हणून किंवा छळाची एक आठवण म्हणून; आणि छळ अशा तऱ्हेचा की ज्यांचा छळ होणे जरूरीचे नाही असे सिद्ध झालेले असते अशा मंडळींना तो सहन करावा लागावा. तो नियम आणि त्याच्या-मधे अनुस्यूत झालेले तत्त्व अश्रद्ध माणसाइतकेच श्रद्धाळू माणसांनाही अपमानकारक आहेत. परलोकावर विश्वास नसणारा माणूस नेहमीच खोटे बोलतो असे मानले तर ज्याचा विश्वास आहे तो खोटे बोलण्याचे टाळतो— जर खरोखर टाळत असेल तर — ते केवळ नरकाच्या धास्तीने. हा नियम ज्यांनी तयार केला ते आणि त्याचा जे पाठपुरावा करतात ते या दोघांनीही आपल्या जाणीवेनुसार ख्रिश्चन सद्‌गुणांची कल्पना बनवली असे मानणे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल.

जो छळ झाला त्याचे हे केवळ भग्न अवशेष आहेत. त्यांच्यावरून छळ करण्याची इच्छा दिग्दर्शित होते असे नव्हे; एखादे वाईट तत्त्व अंम-लात आणण्याइतका दुष्टपणा अंगी नसताही त्या वाईट तत्त्वाचा पुरस्कार करण्यामधे एक प्रकारचा विचित्र आनंद मानणे हा इंग्रजी माणसांच्या मनामधे पुष्कळ वेळा आढळून येणारा जो दुबळेपणा त्याचे हे नियम उदाहरण आहेत असे मानता येईल. पण दुःखाची गोष्ट आहे ती ही की जनमानसाच्या सध्याच्या अवस्थेत गेल्या पिढीभर कायदेशीर छळणुकीचे अतिशय जाचक प्रकार जे बंद पडले ते पुन्हा सुरू होणार

नाहीत अशी खात्री वाटत नाही. या युगामधे नेहमीच्या व्यवहारांच्या संथ पृष्ठ भागावर लाटा उठतात त्या जितक्या नव्या सवलती रूढ करण्यासाठी उठतात तितक्याच वेळा त्या जुन्या अनिष्ट गोष्टींच्या पुनरुज्जीवनासाठी उठतात. सध्या धर्माचे पुनरुज्जीवन म्हणून ज्याची प्रशंसा होते आहे ते खरे पाहिले म्हणजे, आणि विशेषेकरून संकुचित व असंस्कृत मनाच्या मंडळीमधे, धर्मवेडाचे पुनरुज्जीवन आहे. या देशातील मध्यम वर्गामधे नेहमीच आढळून येणारी जनतेच्या भावनेतील असहिष्णू वृत्ती जोवर जागृत आहे तोवर लहानसहान कारणाने ती प्रज्वलित होऊन ज्यांचा छळ व्हायला पाहिजे असा जनतेचा समज असतो त्यांचा पुन्हा छळ सुरू होणे शक्य आहे.* आपल्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या श्रद्धा जे

* शिपायांच्या बंडाच्या वेळी छळ करणारांच्या क्रोधाची भर पडून आपल्या राष्ट्रीय स्वभावाच्या वाईट बाजूचे जे दर्शन घडले ते आपल्याला सावधगिरीची भरपूर सूचना देऊ शकते. धर्मवेड्या किंवा लब्धप्रतिष्ठित मंडळींनी व्यासपीठावरून केलेल्या बडबडीकडे लक्ष देण्याचे कारण नाही; परंतु धर्मवादी ( Evangelical ) पक्षाच्या पुढाऱ्यांनी केलेल्या घोषणांकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यांच्या मताप्रमाणे हिंदु व मुसलमान यांच्यावर राज्य करावयाचे तर ज्या शाळेतून बायबल शिकवले जात नाही त्या शाळांना सरकारी खजिन्यातून मदत मिळू नये आणि याचाच अर्थ असा की खऱ्या किंवा ढोंगी ख्रिश्चन धर्मीयांखेरीज दुसऱ्या कुणालाही सरकारी नोकरीत जागा मिळू नये. आपल्या मतदारांपुढे १२ नोव्हेंबर १८५७ रोजी केलेल्या भाषणात एक उपमंत्री ( Under Secretary of State ) असे म्हणाल्याचे प्रसिद्ध झाले आहे की "इंग्रज सरकारने त्यांच्या ( शंभर दशलक्ष इंग्रजी प्रजाजनांच्या ) धर्माबद्दल, भ्रामक समजुती म्हणजेच जो धर्म, त्या धर्माबद्दल सहिष्णुता दाखवली म्हणून इंग्रजांचा जो दरारा वाढायला हवा होता तो वाढला नाही आणि ख्रिश्चन धर्माची जी वाढ व्हायला हवी होती ती झाली नाही. या देशातील धार्मिक स्वातंत्र्याचे सहिष्णुता अधिष्ठान आहे. परंतु सहिष्णुता या बहुमोल शब्दाचा त्यांना दुरुपयोग करू देऊ नये. माझ्या दृष्टीने सहिष्णुता म्हणजे सर्वांचे स्वातंत्र्य, ख्रिश्चन धर्मीयांचे वाटेल त्या

मानत नाहीत त्यांच्याबद्दल लोकांची जी मते आणि भावना आहेत त्यांच्यामुळे या देशामधे मानसिक स्वातंत्र्य नांदत नाही असे म्हणावे लागते. समाजाच्या दृष्टीने जो कलंक लागतो तो वाढविणे हेच गेली कित्येक वर्षे कायद्याप्रमाणे होणाऱ्या शिक्षेचा मुख्य दुष्परिणाम आहे. सामाजिक कलंक हाच जास्त परिणामकारक ठरतो; आणि तो इतका परिणामकारक आहे की समाजाला नापसंत अशा विचारांच्या उच्चाराबद्दल ज्या देशात कायदेशीर शिक्षा दिली जाते त्या देशापेक्षा इंग्लंडमधे तो उच्चार कमी होतो. आर्थिक परिस्थितीमुळे ज्यांना इतरांच्या सद्भावनेवर अवलंबून रहावे लागत नाही अशी थोडी मंडळी सोडली तर इतरांच्या बाबतीत जनमत हे कायद्याइतकेच बंधनकारक असते. उदरनिर्वाहाच्या साधनां-पासून माणसांना वंचित करणे हे त्यांना तुरुंगात टाकण्यासारखेच आहे, ज्यांच्या उदरनिर्वाहाची सोय झालेली आहे, आणि ज्यांना सत्ताधाऱ्यांकडून किंवा लोकसमुदायाकडून किंवा जनतेकडून आपल्याला काही लाभ व्हावा अशी अपेक्षा नाही, त्यांना त्यांनी कोणचेही विचार प्रदर्शित केले तरी धास्ती बाळगण्याचे कारण नाही; त्यांच्या बाबतीत घडेल ते एवढेच की लोक त्यांना वाईट समजतील किंवा त्यांच्याबद्दल वाईट बोलतील; आणि लोकापवाद सहन करण्यासाठी मोठी धैर्यशील वृत्ती लागते असे म्हणता येणार नाही.

---

पद्धतीने उपासना करण्याचे स्वातंत्र्य, पण उपासनेचा आधार मात्र एकच असला पाहिजे. सहिष्णुता म्हणजे ख्रिश्चन धर्मातील सर्व पंथांना आणि शाखांना मोकळीक. कारण ते सर्व एका ख्राइस्टचीच मध्यस्थी (mediation) मान्य करतात. उदारमतवादी (liberal) मंत्रीमंडळांमधे या देशाच्या शासनयंत्रणेतील उच्च पद विभूषित करण्यासाठी लायक ठरलेल्या या सद्गृहस्थांच्या भाषणाकडे मी मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. कारण त्यांनी जो सिद्धांत प्रतिपादन केला आहे त्याचा अर्थ हा होतो की ज्यांचा ख्राइस्टच्या दैवी स्वरूपावर विश्वास नसेल ते सहिष्णुतेच्या कक्षेबाहेरील आहेत असे मानले पाहिजे. या बालिश प्रदर्शनानंतर धार्मिक छळाचे युग संपले, ते आता परत कधी उगवणार नाही असा भ्रम कोण मनाशी बाळगू शकेल ?

अशा मंडळींच्या वतीने त्यांना दुःख देऊ नका अशी विनंती करायला हवी असे नाही. आपल्यापेक्षा वेगळा विचार करणारांवर पूर्वीच्या आपल्या सवयी इतके दुःख आपण आता लादत नाही हे खरे; तरी देखील आपण त्यांच्याशी ज्या पद्धतीने वागतो तिच्यामुळे आपण स्वतःवर कमी दुःख लादून घेतो असे म्हणता येणार नाही. सॉक्रेटिसला जीवे मारण्यात आले, पण आकाशामधे सूर्य चढावा तसे त्याचे तत्त्वज्ञान वाढले आणि बुद्धि-जीवनाचे सारे जग त्याने उजळून टाकले. ख्रिश्चन धर्मीयांना सिंहापुढे टाकण्यात आले, पण ख्रिश्चन धर्मपीठ (church) प्रचंड वृक्षाप्रमाणे वाढले, आजूबाजूच्या कमजोर वृक्षांना त्याने उंचीमधे मागे टाकले आणि त्याच्या छायेमधे त्यांची वाढ खुंटली. सामाजिक असहिष्णुतेमुळे कुणी मरत नाही व कोणच्याही विचाराचे निर्मूलन होत नाही; होते ते एवढेच की माणसे आपले विचार लपवून ठेवतात व त्याच्या प्रसारासाठी जे प्रत्यक्ष कार्य करायला हवे ते करत नाहीत. आपल्या काळात पाखंडी मते प्रत्येक दशकात किंवा पिढीमधे वाढत नाहीत किंवा मागेही पडत नाहीत; त्यांनी दिप्यमान बनून मोठा प्रदेश प्रकाशवान् करावा तसे होत नाही; जिथे त्यांचा उदय झाला त्या विचारी व अभ्यासू बुद्धिवंतांच्या लहान वर्तुळामधे ती धुमसत राहतात; मनुष्यजातीच्या सर्वसाधारण व्यवहारांवर त्यांचा खरा किंवा खोटा प्रकाश पडत नाही. आणि अशा रीतीने काही मंडळींना समाधानकारक वाटते अशी परिस्थिती कायम राहते. या परिस्थितीमधे कुणालाही दंड करण्याचे किंवा तुरुंगात टाकण्याचे अप्रिय काम न करता सध्या जे विचार प्रचलित आहेत त्यांना धक्का न पोचता ते कायम राहतात; बरे ज्यांना विचारांचे वेड लागले आहे अशा विरोधी विचारवंतांना तुम्ही विचार करू नका असे सांगावेही लागत नाही. बौद्धिक जगामधे शांतता राखण्याचा आणि त्या जगातील व्यवहार आहे त्या परिस्थितीत कायम राखण्याची ही एक सोईस्कर अशी योजना आहे. पण या तऱ्हेच्या बौद्धिक निर्वेधपणासाठी किंमत द्यावी लागते ती मानवी मनाचे

नीतिधैर्य संपूर्णपणे खच्ची होण्याची. ज्या परिस्थितीत उत्साही व जिज्ञासू अशा बुद्धिवंतांपैकी पुष्कळांना आपल्या दृढ विश्वासांची आधारभूत अशी तत्त्वे व कारणे स्वतःशीच गुप्त ठेवावी लागतात आणि जनतेशी बोलताना स्वतःच्या मनाला न पटणाऱ्या अशा सिद्धांताशी आपल्या निर्णयांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करावा लागतो, त्या परिस्थितीत विचारशील जगाला भूषणभूत होतील अशा मुक्त व निर्भय व्यक्ती आणि तर्कनिष्ठ व सुविहित असे विचारवंत तयार होणे शक्य नाही. त्या परिस्थितीत अशीच माणसे सापडतील की जी प्रचलित नियमांनुसार वागतात किंवा वेळ येईल तशी पगडी फिरवतात आणि सर्व महत्त्वाच्या विषयांची चर्चा करताना स्वतःच्या मनाला पटतील असे नव्हे तर लोकांना पटतील असे युक्तिवाद वापरतात. ज्यांना हा मार्ग टाळायचा असतो ते आपल्या विचारांचा व आवडींचा संकोच करतात आणि तात्त्विक विचारांच्या क्षेत्रापासून दूर राहून स्वतःचे मन व्यावहारिक क्षुल्लक गोष्टींमधे गुंतवून ठेवतात. त्या क्षुल्लक गोष्टी अशा तऱ्हेच्या की ज्यांचा सर्वसाधारणपणे माणसांची मने सुदृढ व विकसित झाली तर आपसूक उलगडा होऊ शकेल. आणि ते घडल्याखेरीज त्या गोष्टींचा उलगडा कायम स्वरूपाचा असा कधी घडून येत नाही. परंतु माणसांची मने सुदृढ व विकसित होण्यासाठी उच्च विषयांवरील जे खुले आणि अनंताचा ठाव घेणारे तत्त्वचिंतन हवे ते मात्र कुणीही करण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

पाखंडी मंडळींनी असे गप्प राहणे ज्यांना अयोग्य वाटत नाही त्यांनी पहिला विचार केला पाहिजे तो हा की या गप्प राहण्यामुळे पाखंडी मतांची जी खुली व खोल चर्चा व्हायला हवी ती होत नाही आणि त्यामुळे, चर्चेमधे जी मते टिकली नसती ती वाढत नाहीत हे जरी खरे असले, तरी ती नष्ट होत नाहीत. समाजमान्य असे निर्णय जिच्यातून निघत नाहीत अशा चर्चेवर बंदी घातल्यामुळे केवळ पाखंडी लोकांच्या मनाची अवनती होते असे नाहीं. सर्वात जास्त नुकसान होते जे पाखंडी नाहीत

रजिस्टर नंबर
वर्गीकरण नंबर

त्यांचे. पाखंडाच्या धास्तीमुळे त्यांच्या मनाची वाढ कुंठित होते आणि त्यांची बुद्धी घाबरी होते. अधार्मिक व अनीतिमान अशा निर्णयाप्रत पोचण्याच्या धास्तीने अंगी कुवत असलेले पण वृत्तीने भ्याड असे अनेक विद्वान धीटाईने आणि जोमदारपणाने स्वतंत्र विचारांचा पाठपुरावा करत नाहीत. त्यामुळे जगाचे किती नुकसान होते याची कुणाला गणती करता येईल का ? त्यांच्यामधे कधीकधी असा एखादा कर्तव्याची तीव्र जाणीव असलेला आणि सूक्ष्म व शुद्ध ज्ञानाची आवड असलेला मनुष्य आढळतो की ज्याला आपले सबंध आयुष्य बुद्धीची टोचणी शांत करण्यामधे आणि मनाला जे पटते व समाजाला जे ग्राह्य त्यामधे एकवाक्यता निर्माण करण्याच्या प्रयत्नामधे वाया घालवावे लागते. हे प्रयत्न शेवटी यशस्वी होतातच असेही नाही. विचारवंत म्हणून बुद्धीची कास धरणे, मग ती कोणच्याही निर्णयाप्रत पोचो, हे आपले पहिले कर्तव्य आहे हे मान्य केल्याखेरीज कुणालाही महान् विचारवंत बनता येणार नाही. जे विचार करण्याची तसदी घेत नाहीत त्यांच्या खऱ्या मतापेक्षाही जे योग्य तो अभ्यास आणि तयारी करून स्वतःच्या बुद्धीने विचार करतात त्यांच्या चुका देखील सत्याला जास्त उपकारक ठरतात. विचारस्वातंत्र्य हवे ते केवळ, किंवा मुख्यत्वेकरून, मोठे विचारवंत निर्माण करण्यासाठी नको. त्याची अवश्यकता आहे ती बहुतांशाने सामान्यमंडळींना त्यांच्या कुवतीनुसार स्वतःची बौद्धिक पातळी वाढविण्यासाठी. बौद्धिक गुलामगिरीच्या वातावरणामधे काही मोठे विचारवंत निर्माण झाले आहेत व यापुढेही होतील. पण त्या वातावरणात सामान्य जनतेची बुद्धी मात्र आजवर कधीही क्रियाशील झालेली नाही व यापुढेही कधी होणार नाही. परंपरेला अमान्य अशा तत्त्वचिंतनाची धास्ती जेव्हा कमी होते तेव्हा आणि त्या काळामधेच जनतेला आपल्या बुद्धीचा विकास थोडाबहुत साधता येतो. जिथे मूलभूत तत्त्वाबद्दल संशय व्यक्त करायचा नाही असा नियम असतो, जिथे मनुष्यजातीला सदोदित विचारार्ह

वाटतील अशा मोठ्या प्रश्नांची चर्चा बंद करण्यात आलेली असते, अशा समाजाची बौद्धिक पातळी वाढत नाही. बौद्धिक व्यवहार वाढले म्हणूनच इतिहासातील काही कालखंडास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ते महत्त्व अशा समाजांना लाभणे शक्य नसते. जे विषय मोठे व महत्त्वाचे आहेत आणि ज्यांच्याबद्दल मनामधे उत्साह वाढू शकतो, अशा विषयांची चर्चाच करावयाची नाही असे ठरविल्यानंतर, माणसांची मने मुळापासून ढवळणार तरी कशी आणि सर्वसामान्य बुद्धीच्या माणसांना देखील विचारवंताचे उच्च स्थान मिळवून देणाऱ्या विवेकशक्तीची लाट उसळणार तरी कशी ? सुधारणेनंतरच्या ( Reformation ) काळामधे युरपमधे अशी लाट उसळल्याचे एक उदाहरण आपल्या दृष्टीस पडते. दुसरे उदाहरण आढळते ते अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील तत्त्वचिंतनाच्या चळवळीमधे. ही चळवळ युरप खंडातील काही देशापुरती आणि त्या देशातील सुसंस्कृत वर्गापुरतीच मर्यादित होती. आणि तिसरे व फारच थोड्या कालावधीचे उदाहरण म्हणजे जर्मनीतील गटे व फिश्ते यांच्या कालखंडाचे. या तिन्ही कालखंडात जे विचार वाढले ते वेगवेगळे होते; त्यांच्यामधे सारखेपणा होता तो एवढाच की तिन्ही कालखंडात सत्तेचे जू झुगारून देण्यात आले होते. प्रत्येक कालखंडात जुनी मानसिक हुकूमशाही झुगारून देण्यात आली आणि नवी हुकूमशाही तेवढ्या त्या अवधीत स्थापन झाली नाही. त्या तीन कालखंडांनी जी प्रेरणा दिली तिच्यामुळे आजचा युरप निर्माण झाला. मानवी मनामधे किंवा संस्थांमधे ज्या सुधारणा घडून आल्या आहेत त्यापैकी प्रत्येकीचा संबंध त्या कालखंडाशी उघड उघड जोडता येतो. विद्यमान परिस्थितीवरून असे वाटते की त्या तिन्ही कालखंडांकडून जी प्रेरणा मिळाली ती आता नष्ट झाली आहे; आणि आपल्या मानसिक स्वातंत्र्याचा आपण पुन्हा एकदा आग्रह धरल्याखेरीज प्रगतीच्या रथाला नवी गती लाभेल असे वाटत नाही.

आता आपल्या युक्तिवादाच्या दुसऱ्या भागाकडे वळू या. प्रचलित मतांपैकी एखादे मत खोटे आहे असे समजण्याऐवजी ती सर्व मते खरी आहेत असे आपण समजू या आणि त्यांच्या खरेपणाबद्दल जर खुली आणि उघड चर्चा झाली नाही तर लोकांची त्या मताबद्दलची काय भावना असते त्याचा जरा विचार करू या. एखाद्या मतावर दृढ विश्वास असला की ते चुकीचे असण्याची शक्यता आहे हे मानायला मनुष्य सहसा तयार होत नाही; तरी देखील जर त्याच्या सत्यतेबद्दल सदोदित व निर्भयपणे खुली चर्चा झाली नाही तर जिवन्त सत्य म्हणून त्याला मान्यता मिळण्याऐवजी बाबा वाक्यम् प्रमाणम् या पद्धतीने लोक त्याच्याकडे बघू लागतील हे कुणालाही कबूल करावे लागेल.

अशी काही माणसे आहेत ( पूर्वीच्या मानाने त्यांची संख्या आता कमी आहे ही आनंदाची गोष्ट आहे ) की ज्यांना असे वाटते की एखाद्याने जे मत खरे आहे त्याला संशय न बाळगता मान्यता दिली म्हणजे पुष्कळ झाले; ते मत का खरे ते त्याला सांगता आले नाही किंवा आक्षेपा-विरुद्ध देखील त्याला त्या मताचे समर्थन करता आले नाही तरी काही बिघडत नाही. या माणसांना असे वाटते की अधिकृतरीत्या एखादे मत सत्य म्हणून शिकवल्यानंतर त्याच्याबद्दल आक्षेप उपस्थित करू देण्याने फायदा तर काही घडत नाही उलट नुकसान मात्र होते. त्यांचे म्हणणे जिथे प्रभावी ठरते तिथे समाजमान्य मते शहाणपणाने आणि विचार-पूर्वक अग्राह्य ठरविणे जवळ जवळ अशक्य होते. परंतु चर्चा पुरती अशी कधी थांबवता येत नाही त्यामुळे ती मते अविचाराने आणि अज्ञानाने अग्राह्य ठर-ण्याची मात्र धास्ती असते. चर्चा एकदा सुरू झाली की ज्या मतांना पुऱ्या विचाराचा आधार नसतो ती युक्तिवादाच्या नुसत्या देखाव्यासमोर देखील कोलमडण्याची धास्ती असते. ही शक्यता जरी सोडून दिली आणि खरे मत, दुराग्रहाप्रमाणे का होईना, मनावर पुरते बिंबले आहे आणि, ते युक्तिवादापलिकडील श्रद्धेसारखे असल्यामुळे, युक्तिवादाने हलण्यासारखे

नाही असे जरी मानले तरी प्रश्न उभा राहतो तो हा की बुद्धिवादी माणसाने या पद्धतीने एखादे मत खरे मानणे कितपत योग्य आहे. सत्य, सत्य म्हणून जाणण्याची, ही योग्य पद्धत नाही. या पद्धतीने जाणलेले सत्य हे लोकभ्रमासारखे असते. फरक एवढाच की ज्या शब्दांमधे ते ग्रथित केलेले असते ते शब्द योगायोगाने सत्य व्यक्त करणारे असतात.

मनुष्यजातीच्या बुद्धीची व विचारशक्तीची वाढ केली पाहिजे हे प्रॉटेस्टंट्स तरी निदान अमान्य करत नाहीत. ही वाढ घडवून आणण्यासाठी ज्या गोष्टीबद्दल, त्या महत्त्वाच्या म्हणून, व्यक्तीने मते बाळगणे जरूरीचे समजले जाते त्या गोष्टीबद्दलच तिने विचार करणे श्रेयस्कर नाही का? स्वतःची जी मते आहेत त्यांना आधार कोणता त्याचा शोध घेऊन माणसाला आपल्या बुद्धीचा चांगला विकास घडवून आणता येईल. ज्या विषयावरील मते योग्य असणे अगत्याचे असते निदान त्या मताविरुद्ध येणाऱ्या सामान्य आक्षेपांना तरी माणसाला उत्तर देता आले पाहिजे. कुणी यावर असे म्हणेल की "त्या मतांची जी कारणे असतील ती त्याला नीट पटवावी. मताविरुद्ध आक्षेप घेतले नाहीत म्हणून त्यांची केवळ पोपटपंची व्हावी हे योग्य नव्हे. भूमितीचा जे अभ्यास करतात ते त्यातील सिद्धांत केवळ पाठ करत नाहीत. ते सिद्धांत सिद्ध कसे करावयाचे ते देखील ते नीट समजावून घेतात. भूमितीचे सिद्धांत खोटे आहेत असे कुणी म्हणत नाही किंवा ते खोटे आहेत असे ठरवण्याचा कुणी प्रयत्न करत नाही म्हणून ते सिद्धांत मानणाऱ्यांना त्यांची आधारभूत अशी कारणे (grounds) माहीत नसतात असे मानणे वेडेपणाचे ठरेल." हे म्हणणे खरे आहे; गणितासारख्या शास्त्रांच्या बाबतीत, जिथे दुसऱ्या बाजूने बोलण्यासारखे असे काही नसते, पढिक विद्या पुरेशी होते. गणिती सत्यांचे वैशिष्ट्य हे आहे की त्यांच्या बाबतीत युक्तिवाद होऊ शकतो तो फक्त एकाच बाजूचा असतो. तिथे आक्षेप नसतात आणि आक्षेपांना उत्तरेही नसतात. पण मतभेद होऊ शकतो अशा इतर अनेक विषयांच्या

बाबतीत सत्य शोधावे लागते ते दोन विरोधी युक्तिवादामधे कोणचा वरचढ आहे त्याचा तपास काढून. निसर्गाच्या तत्त्वज्ञानामधे देखील एकाच वस्तुसमुदायाची ( facto ) अनेक कारणे ( explanation ) असू शकतात.

आणि मग ती उपपत्ती ( theory ) का बरोबर नाही ते दाखवावे लागते. आणि ते सिद्ध केल्याखेरीज व ते कसे सिद्ध होते ते आपल्याला दाखविल्याखेरीज आपल्या मतांचे आधार आपल्याला समजत नाहीत. भौतिक शास्त्रांचा प्रदेश सोडून आपण नीतिशास्त्र, धर्म, राजकारण, सामाजिक संबंध आणि मनुष्यजीवन या सारख्या अनेक पटीने जटिल विषयांकडे वळलो की असे दिसते की वादविषय झालेल्या मताच्या बाजूने करण्यात येणाऱ्या युक्तिवादांपैकी तीनचतुर्थांश युक्तिवाद वरवर पाहिले असता दुसऱ्या मताला अनुकूल भासणाऱ्या गोष्टींचे निरसन करण्यामधे खर्च करावा लागतो. पुराण काळातील फक्त एक अपवाद वगळला तर बाकीच्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ अशा वक्त्याने लिहून ठेवले आहे की स्वतःच्या बाजूपेक्षाही प्रतिपक्ष्याच्या बाजूचा तो नेहमी जास्त लक्षपूर्वक अभ्यास करत असे. वक्तृत्वामधे यश मिळवण्यासाठी जे सिसरोने केले त्याचे कोणत्याही विषयाचा सत्यशोधनासाठी अभ्यास करणाऱ्या माणसाने अनुकरण केले पाहिजे. ज्याला केवळ स्वतःची बाजू माहिती असते त्याला ती बाजूही फारच थोडी कळलेली असते. त्याचे मुद्दे मोठे चांगले असतील आणि ते कुणीही खोडून काढू शकला नसेल, परंतु विरुद्ध बाजूचे मुद्दे तो खोडून काढ शकत नसेल किंवा ते काय आहेत हे देखिल त्याला माहित नसेल तर, दोघांपैकी एका मताची निवड तो कोणच्या आधाराने करू शकेल? बुद्धिवादी भूमिका घ्यावयाची तर निवड करता येत नाही असेच त्याला म्हणावे लागेल; ते केले नाही तर त्याला आप्त वाक्य ( authority ) प्रमाण मानावे लागेल किंवा सामान्य माणसाप्रमाणे ज्या बाजूबद्दल जास्त ओढा वाटतो ती बाजू निवडावी लागेल. तसेच प्रतिपक्षाची बाजू केवळ

स्वतःच्या शिक्षकाकडून, ते सांगतील तशी व ती खोडून काढण्यासाठी त्यांनी वापरलेल्या युक्तिवादासहित, ऐकून भागणार नाही. प्रतिपक्षाच्या युक्तिवादाचा योग्य तऱ्हेने विचार करण्याचा किंवा स्वतःच्या मनाशी त्याचा खरा संबंध प्रस्थापित करण्याचा तो मार्ग नव्हे. ज्यांचा खरोखरच त्याच्यावर विश्वास असेल, मनापासून जे त्याचे समर्थन करू शकतील आणि त्याच्यासाठी शक्य ते सारे करण्याची ज्यांची तयारी आहे त्यांच्याच तोंडून तो युक्तिवाद ऐकला पाहिजे. विरुद्ध बाजू तिच्या आकर्षक व समर्पक स्वरूपात समजावून घेतली पाहिजे. विषयाच्या खऱ्या बाजूला ज्या अडचणींना तोंड देऊन त्यांचे निराकरण करायचे आहे त्या अडचणींच्या पुऱ्या शक्तीची त्याला कल्पना हवी. नाहीतर त्या अडचणींवर मात करणारा जो सत्याचा भाग आहे त्याचे त्याला पुरे आकलन होणार नाही. आपल्या मतांची सफाईदार रीतीने तरफदारी करणाऱ्या सुशिक्षितांपैकी नव्याण्णव टक्के मंडळी या परिस्थितीत आहेत. त्यांचा निर्णय खरा असण्याची शक्यता आहे; पण त्यांचे ज्ञान पाहिले तर तो कदाचित् खोटाही असेल; ज्यांचे विचार वेगळे आहेत त्यांच्या मनोभूमिकेची त्यांना माहिती नसते आणि त्यामुळे त्यांच्या म्हणण्याचा त्यांनी विचार केलेला नसतो; व म्हणूनच त्यांचा स्वतःचा असा जो सिद्धांत असतो त्याचे खऱ्या अर्थाने त्यांना ज्ञान झालेले नसते. त्यांना इतर भागांचे स्पष्टीकरण व समर्थन करणारे महत्त्वाचे भाग माहित नसतात; तसेच वरवर विरोधी स्वरूपाची भासणारी गोष्ट इतर गोष्टींशी कशी जुळणारी आहे याची कल्पना नसते; किंवा वरवर समर्पक भासणाऱ्या दोन कारणांपैकी एकाऐवजी दुसरे का स्वीकारावयाचे ते कळत नाही. पुरी माहिती असलेल्या माणसाचा निर्णय सत्याच्या ज्या निर्णायक भागावर आधारलेला असतो तो सत्याचा भाग त्याला अपरिचित राहतो. दोन्ही बाजू निःपक्षपात बुद्धीने व समान उत्सुकतेने ज्याने ऐकल्या नाहीत आणि दोन्ही बाजूंच्या आधारांचा उत्तम भाग ज्याने समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही

त्याला देखील सत्य समजले आहे असे म्हणता येत नाही. नैतिक आणि मानव्यविषयक विषयांचे पुरे ज्ञान होण्यासाठी मनाला ही शिस्त लागणे इतके अवश्यक आहे की प्रत्येक महत्त्वाच्या सत्याला विरोध करणारे जर कुणी नसतील तर ते आहेत असे कल्पिले पाहिजे आणि हुषारातील हुषार अशा सैतानाच्या वकिलाला ( devil's advocate ) सुचतील असे सर्व अमोघ युक्तिवाद त्यांना बहाल केले पाहिजेत.

या विचाराला प्रतिरोध करण्यासाठी खुल्या चर्चेचा विरोधक असे म्हणण्याचा संभव आहे की सर्व सामान्य मंडळींना त्यांनी स्वीकारलेल्या मताबद्दल तत्त्वज्ञ व धर्मज्ञ उलट सुलट काय म्हणतात ते माहिती असण्याची आवश्यकता नसते. कौशल्यपूर्ण विरोधकाने केलेल्या सर्व चुकीच्या विधानांचा व अपसिद्धांतांचा खोटेपणा सिद्ध करणे प्रत्येक सामान्य माणसाला शक्य झालेच पाहिजे असे नाही. त्यांना उत्तर देऊ शकेल असा कुणी एखादा इसम असला म्हणजे पुष्कळ झाले. अशिक्षित मंडळींची दिशाभूल करतील अशा चुकीच्या विधानांचे तो निराकरण करू शकेल. सत्य म्हणून त्यांच्या मनावर जे बिंबवले जाते त्याचे उघड उघड लक्षात येतील असे आधार सामान्य जनतेला समजले म्हणजे पुरे; बाकीच्यांसाठी त्यांनी आप्तजनांच्या व शास्त्री पंडितांच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा; त्या सत्याविरुद्ध घेण्यात येणाऱ्या आक्षेपांना उत्तर देण्यासाठी जे ज्ञान व बुद्धी हवी ती आपल्याजवळ नाही हे तिला कळते, पण त्या सर्व आक्षेपांना अधिकारी मंडळींनी अगोदरच उत्तरे दिलेली आहेत व नसतील तिथे दिली जातील एवढी तिच्या मनाची खात्री असली म्हणजे पुष्कळ झाले.

ज्या गोष्टीवर विश्वास ठेवायचा त्या गोष्टीचे इतके अपुरे ज्ञान झाले तरी चालेल असे मानून वरील युक्तिवादाला शक्य ते सारे महत्त्व दिले तरी देखील खुल्या चर्चेच्या बाजूचा जो युक्तिवाद आहे त्याचा जोर कमी होत नाही. सर्व आक्षेपांचे समाधानकारक स्वरूपाचे निराकरण झाले आहे अशी

विचारनिष्ठ खात्री जनतेला लाभली पाहिजे हे पहिल्या युक्तिवादालाही मान्य आहे. पण आक्षेपांचा उच्चार केल्याखेरीज त्यांना उत्तर देणे कसे शक्य आहे ? किंवा दिलेली उत्तरे समाधानकारक आहेत असे आक्षेप ज्यांनी घेतले त्यांना ते असमानधारक आहे हे सिद्ध करण्याची संधी दिल्यावाचून कसे मानता येईल ? सामान्य जनतेला बाजूला ठेवले तरी निदान तत्त्वज्ञ आणि धर्मज्ञ यांना तरी निदान ज्या अडचणी त्यांना दूर करावयाच्या आहेत त्यांच्या अगदी जटिल स्वरूपात त्यांची पूर्ण कल्पना असायला हवी. अडचणी खुलेपणाने आणि त्यांना अत्यंत अनुकूल अशा स्वरूपात सांगण्यात आल्याखेरीज हे घडणार नाही. कॅथलिक धर्मपीठाने या समस्येचा उलगडा स्वतःच्या अशा वेगळ्या मार्गाने केला आहे. आपले सिद्धांत श्रद्धा म्हणून ज्यांनी स्वीकारले पाहिजेत आणि ज्यांना ते विचारपूर्वक स्वीकारता येतात त्यांच्यामधे धर्मपीठाने ढोबळ स्वरूपाचा भेद केला आहे. दोघांपैकी कुणालाही काय स्वीकारावयाचे त्याची निवड करता येत नाही. धर्मप्रचारकांना, निदानीला त्यांच्यापैकी ज्यांच्यावर विश्वास टाकता येईल त्यांना, विरोधकांचे जे आक्षेप आहेत, त्यांचे, त्यांना उत्तर देण्यासाठी, ज्ञान करून घेता येते. हे ज्ञान करून घेण्यामधे त्यांनी आज्ञेचे उल्लंघन केले किंवा धर्माचे अतिक्रमण केले असे मानले जात नाही. ज्ञान करून घेण्यासाठी त्यांना पाखंडी पुस्तकेही वाचता येतात. इतरेजनांना ( laity ) परवानगी मिळवल्याखेरीज हे करता येत नाही. आणि ती परवानगी मिळणे फार फार कठीण असते. अध्यापकांना शत्रूची बाजू माहिती असणे जरूरीचे आहे हे धर्मपीठाला कळते. पण त्याच वेळी, त्याच्या आड न येता, त्यांच्या खेरीज इतरांना ते ज्ञान होऊ नये अशी धर्मपीठ खबरदारी घेते. या योगाने सामान्य जनतेपेक्षा समाजातील वरिष्ठ वर्गाला ( elite ) अधिक मानसिक संस्कृती लाभते; मानसिक स्वातंत्र्य मात्र नव्हे; स्वतःच्या कार्यासाठी जे बौद्धिक श्रेष्ठत्व हवे ते या उपायाने धर्मपीठाला प्राप्त होते. स्वातंत्र्यविहिन संस्कृतीमुळे माणसांची मने विशाल व उदार होत नाहीत; पण एखाद्या

पंथाचा पुरस्कार मात्र ती हुशारीने करू शकतात प्रॉटेस्टंट धर्म मानणाऱ्या देशामधे या मार्गाचा अवलंब करता येत नाही. कारण प्रॉटेस्टंट धर्माचे तत्त्व असे आहे की धर्माची निवड प्रत्येकाने स्वतः केली पाहिजे, उपदेशकावर ती जबाबदारी टाकून त्याला मोकळे होता येत नाही. शिवाय सध्याच्या परिस्थितीत जी पुस्तके वरिष्ठ शिक्षण प्राप्त झालेल्यांना वाचता येतात ती इतरांपासून दूर ठेवणे शक्य नाही. मनुष्यजातीच्या शिक्षकांना जे जे जाणणे अवश्य त्याचे पुरे ज्ञान व्हावयाचे तर कोणच्याही तऱ्हेच्या बंधनाविना वाटेल ते लिहिता व प्रसिद्ध करता येईल अशी सोय हवी.

प्रचलित मते खरी असतात तेव्हा खुली चर्चा झाली नाही तर माणसांना त्या मतांची कारणे जी आहेत ती कळत नाहीत. पण एवढेच जर घडत असेल तर बौद्धिकदृष्ट्या ते कितीही अनिष्ट असले तरी नैतिक-दृष्ट्या ते अनिष्ट मानता येणार नाही. कारण मनुष्याच्या स्वभावाची जडण-घडण करण्याच्या दृष्टीने त्या मतांचे जे महत्त्व आहे ते त्याच्या योगाने कमी होत नाही, परंतु चर्चेच्या अभावामुळे मताच्या कारणांचा विसर पडतो; एवढेच नव्हे तर पुष्कळ वेळा त्याच्या अर्थाचाही विसर पडतो. मत ज्या शब्दामधे ग्रथित केलेले असते त्या शब्दामधून अर्थ प्रतीत होत नाही, निदान सुरवातीला जो अर्थ व्यक्त करण्यासाठी शब्द वापरले गेले त्याचा लहान अंशही त्यांच्यामुळे प्रतीत होत नाही. ठळक कल्पना किंवा जिवन्त श्रद्धा यांच्याऐवजी घोकलेली काही वाक्ये मात्र उरतात; अर्थाचे उरलेच तर फक्त कवची व टरफल उरते, त्याचे जे तत्त्व असते ते नाहीसे झालेले असते. मानवी इतिहासातील जो मोठा भाग या प्रक्रियेने भरलेला आहे त्याचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास व्हायला हवा आणि त्याचे मनन व्हायला हवे.

सर्व नैतिक मते व धार्मिक पंथ यांच्या अनुभवामधे या प्रक्रियेचे उत्तम उदाहरण आढळते. ज्यांनी ते सुरवातीला प्रतिपादन केले त्यांना आणि त्यांच्या अगदी जवळच्या शिष्यवर्गाला त्यांचा आशय पूर्ण स्वरूपात

आणि जिवंत सत्य म्हणून माहित असतो. दुसऱ्या मताविरुद्ध किंवा पंथाविरुद्ध सरशी मिळवण्यासाठी जोवर झगडा चालू असतो तोवर एखादा पंथ अगर मत अर्थपूर्ण राहते, एवढेच नव्हे तर कधी कधी त्याचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. शेवटी एक तर त्याचा विजय होऊन त्याला सर्वमान्यता लाभते किंवा त्याची प्रगती कुंठित होते. जिथवर त्या मताचा प्रचार झाला असेल तिथवर ते प्रचलित राहते, पण पुढचा विस्तार मात्र बंद पडतो. या दोहोंपैकी कोणचीही एक गोष्ट ज्या वेळी घडते त्या वेळी त्या मताबद्दलचा वाद कमी कमी होत अखेरीला स्तब्ध होतो. त्या मताला सर्वमान्य मत म्हणून नसली तरी अधिकृत पंथ अगर उपपंथ म्हणून प्रतिष्ठा लाभते; त्या मताचे जे उपासक असतात त्यांनी ते आपण होऊन स्वीकारलेले नसते, त्यांना ते आईबापाकडून लाभलेले असते; एक मत सोडून दुसरे मत स्वीकारणे आता अपवादात्मक झाल्यामुळे त्या मताचा त्याच्या उपासकांमधे फारसा विचार देखील होत नाही. पहिल्याप्रथम जगापासून आपले संरक्षण व्हावे म्हणून किंवा जग आपलेसे करावे म्हणून ते जसे जागरुक असत ती जागरुकता नष्ट होते आणि ते उदासीन बनतात; आपल्या मताच्या विरोधी असा जो युक्तिवाद असेल तो ऐकण्याची ते तसदी घेत नाहीत, तसेच वेगळे मत प्रतिपादन करणारांना आपल्या मताच्या बाजूचा युक्तिवाद ऐकवत नाहीत. मताच्या जिवंत शक्तीचा क्षय सुरू होतो तो या वेळेपासून. नावाला मान्य केलेल्या सत्याची जाणीव उपासकांच्या मनामधे नेहमी जागृत रहावी आणि भावनांच्या द्वारे आचरणावर त्याचा पगडा पडावा ही गोष्ट साधणे फार फार कठिण असते असे सर्व पंथांचे प्रचारक शोकपूर्ण स्वरात सांगताना आपण पुष्कळ वेळा ऐकतो. पंथ आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडत असतो तोवर अशी तक्रार ऐकू येत नाही. आपण कशासाठी झगडतो आहो आणि आपला पंथ व इतर पंथ यांच्यामधील फरक कोणते त्याची झगडणारांमधील अगदी दुबळ्या मंडळींनाही कल्पना असते. प्रत्येक पंथाच्या इतिहासातील त्या काळामधे

अशी पुष्कळ माणसे आढळतात की ज्यांनी त्या पंथाच्या मूल तत्त्वांचा विचारांच्या वेगवेगळ्या शाखांमधे कसा आविष्कार होतो ते पाहिलेले असते, त्यांची जी वेगवेगळी अंगे आहेत त्यांचा समग्र अभ्यास केलेला असतो आणि ज्यांच्या मनामधे ती पुरी बिंबलेली असतात त्यांच्या आचरणावर त्या तत्त्वांचा जो परिणाम घडून येतो त्याचा पुरा अनुभव घेतलेला असतो. वडिलार्जित मिळकत म्हणून बापाकडून मुलाकडे येणारा पंथ अशी जेव्हा त्या पंथाची अवस्था होते व तो पंथ, विचारपूर्वक स्वीकारला जाण्या-ऐवजी, सहजगत्या स्वीकारला जातो त्या वेळी त्याच्यावरील श्रद्धेमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा मनाला पूर्वीप्रमाणे सूक्ष्म दृष्टीने विचार करावा लागत नाही. अशा वेळी क्रियाकर्माखेरीज बाकीच्या सर्व गोष्टींचा विसर पडू लागतो, त्यांना एक प्रकारची निस्तेज व सुस्त अशी मान्यता दिली जाते. जणू काय, आप्तवाक्य म्हणून तो पंथ स्वीकारल्यामुळे, जाणीवपूर्वक तो समजावून घेण्याची किंवा वैयक्तिक जीवनामधे त्याचा पडताळा पाहण्याची आवश्यकता नष्ट होते. शेवटी माणसाच्या आंतरिक जीवनाशी त्याचा काही संबंधही उरत नाही. नंतर सध्याच्या जगात वारंवार, बहुसंख्य स्वरूपात आढळून येणारा पंथ जणू मनाच्या बाहेर आहे असा प्रकार दृष्टीस पडतो. पंथाच्या दडपणामुळे मनावर इतके पापुद्रे चढतात आणि ते इतके दगडासारखे बनते की स्वभावातील उच्चतर भावनांना ते प्रतिसाद देऊ शकत नाही व इतर नव्या आणि जिवंत विचारांना तिथे थारा सापडत नाही. हृदय किंवा मन यासाठी पंथ स्वतः काही करत नाही; फक्त राखणदाराप्रमाणे पहारा करून ती दोन्ही रिकामी राहतील एवढी मात्र पंथ खबरदारी घेतो.

मनावर सहजगत्या उत्कट छाप पाडू शकतील अशा सिद्धांतांना देखील पुष्कळ वेळा निर्जीव श्रद्धेचे स्वरूप कसे प्राप्त होते आणि त्यांचा कल्पनाशक्तीवर, भावनेवर किंवा विवेकबुद्धीवर कसा परिणाम होत नाही ते ख्रिश्चन धर्माचे बहुसंख्य अनुयायी त्या धर्माचे सिद्धांत ज्या पद्धतीने

मनाशी बाळगतात त्या वरून चांगले स्पष्ट होईल. सर्व धर्मपीठे आणि पंथ यांना मान्य असलेल्या नव्या करारातील ( New Testament ) उक्ती ( maxims ) आणि उपदेश हेच मला याठिकाणी ख्रिश्चन धर्म म्हणून अभिप्रेत आहे. ख्रिश्चन धर्म मानणारे सर्व ते पवित्र आणि बंधनकारक आहेत असे मानतात. तरी देखील त्या नियमांचे आपल्या वैयक्तिक आचरणामधे पालन करणारा हजारामधे एखादाही ख्रिश्चन आढळणार नाही असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. देशाच्या, वर्गांच्या अगर धार्मिक गटांच्या चालीरीती यांनीच तो आपले आचरण नियमित करतो. म्हणजे एका बाजूला त्याच्यापुढे मानवी जीवनाच्या नियमनासाठी सर्वज्ञानी अशा सत्तेने तयार केलेले नीतिनियम असतात, तर दुसऱ्या बाजूला दररोजच्या आयुष्यातील रीतीभाती आणि आवडीनिवडी असतात. या रीतिभाती व आवडीनिवडी काही काही नीतिनियमांशी बऱ्याचशा जुळतात, काहींशी फार थोड्या प्रमाणात जुळतात, तर काहींमधे आणि त्यांच्यामधे समूळ विरोध असतो. सर्वसाधारणपणे, भौतिक जीवनातील हितसंबंध व अपेक्षा आणि ख्रिश्चन धर्माचे मूळ तत्त्व यांच्यामधे दवाणघेवाण करून तयार झालेला व्यवहारधर्म, असे या रीतिभातीचे व आवडीनिवडीचे स्वरूप असते. पहिल्या आदर्शाची पूजा बांधली जाते तर दुसरा आदर्श आपुलकीने स्वीकारला जातो. सर्व ख्रिश्चन धर्मीयांचा असा विश्वास आहे की गरीब आणि नम्र व जगाने लाथाडलेले यांच्यावर परमेश्वराची कृपा होते, की उंटाला सूईच्या भोकातून जाता येईल पण श्रीमंत माणसाला परमेश्वराच्या राज्यात (kingdom of heaven) प्रवेश करता येणार नाही, की आपल्या गुणदोषांची चर्चा होईल म्हणून आपणही कुणाच्या गुणदोषांची चर्चा करू नये, की कुणीही वृथा परमेश्वराचे नाव घेऊ नये, की स्वतः सारखेच शेजाऱ्यावरही प्रेम करावे, की कुणी मोठा कोट घेतला की त्याला छोटा कोटही द्यावा, की उद्याचा विचार करू नये, की उत्तम बनावयाचे तर जवळ जे काही असेल ते विकावे आणि ते गरीबांना द्यावे. या

उपदेशावर आपला विश्वास आहे असे ते म्हणतात त्यावेळी ते अप्रामाणिकपणे वागतात असे नव्हे. ज्यांची नेहमी प्रशंसा केली जाते पण चर्चा मात्र कधीही होत नाही अशा गोष्टींवर जसा विश्वास ठेवला जातो तसाच त्यांचाही त्या उपदेशावर असतो. तो आचरणाचे नियम करील असा विश्वास मात्र, समाजामधे त्या उपदेशानुसार वागणे जितपत रूढ असेल, त्या मर्यादेपलिकडे जात नाही. विरोधकांच्यावर हल्ला करण्यासाठी पूर्णांशातील त्या सिद्धांतांचा चांगला उपयोग होतो; आणि लोकांमधे जे प्रशंसनीय मानले जाते ते केल्यानंतर त्याचे कारण म्हणूनही त्या सिद्धांतांचा उल्लेख करावे असे ठरले आहे. परंतु ते सिद्धांत खरे मानावयाचे तर मनाला कधी सुचल्या नसतील अशा अनेक गोष्टी करणे जरूर आहे अशी कोणी आठवण दिली तर त्या आठवण देणाराची इतरांपेक्षा आपण मोठे चांगले आहो असे भासवणाऱ्या अप्रिय व्यक्तीमधे गणना होईल. सर्वसामान्य श्रद्धाळू मंडळींच्या मनावर त्या सिद्धांतांची छाप पडलेली नाही, त्यांच्या मनावर ते सत्ता गाजवू शकत नाहीत. त्या सिद्धांतांचे श्रवण ते परंपरेनुसार आदरयुक्त भावनेने करतात; पण शब्दांनी निर्दिष्ट केलेल्या वस्तूबद्दल शब्दांना मनामधे घुसवणारी व शब्दानुसार कृतीला प्रवृत्त करणारी जी भावना निर्माण व्हायला हवी ती होत नाही. कृतीची गोष्ट निघाली की ते अ कडे किंवा ब कडे पाहून ख्रिस्ताची आज्ञा कितपत मानायची ते ठरवतात.

प्राथमिक काळातील ख्रिश्चन या पद्धतीने वागत नव्हते, अगदी वेगळ्या पद्धतीने वागत होते असे आपल्याला साधार म्हणता येते. तसे नसते तर तुच्छ मानले गेलेले जे हिब्रू त्यांच्यामधील अप्रसिद्ध पंथातून ख्रिश्चन धर्माचे रोमन साम्राज्याच्या धर्मामधे रूपांतर झाले नसते. ख्रिश्चन धर्मीयांचे शत्रू ज्यावेळी म्हणत असत, "पहा हे ख्रिश्चन्स एकमेकावर कसे प्रेम करतात," (आता मात्र कुणीही असे विधान करणार नाही) त्यावेळी आपल्या धर्माचे तत्त्व जितक्या उत्कटतेने समजले होते तितके त्यानंतर त्यांना कधीही समजले नसेल. ख्रिश्चन धर्माचा प्रदेश वाढविण्यामधे त्यानंतर

जी फारच थोडी प्रगती झाली आणि अठरा शतकांनंतरही तो जो युरपि-अन्स आणि त्यांचे वंशज यांच्यापुरता मर्यादित राहिलेला आहे त्याचेही मुख्यत्वेकरून हेच कारण असावे. अगदी धार्मिक असे ज्यांना म्हणता येईल व धर्मसिद्धांतांना जे खूप महत्त्व देतात आणि सर्व साधारण जनतेपेक्षा जे त्यातून अधिक अर्थ काढतात त्यांच्या बाबतीतही असे म्हणता येते की ख्रिश्चन धर्माच्या ज्या भागाचा त्यांच्या मनावर अधिक पगडा आहे तो भाग काल्व्हिन अगर नॉक्स अगर वृत्तीने त्यांच्याशी अधिक जवळ असलेल्या एखाद्या माणसाने बनवलेला असतो. ख्रिस्ताच्या उक्ती (sayings) मनामधे बरोबरीने नांदत असतील, पण गोड आणि सौम्य शब्द ऐकल्यानंतर जो परिणाम होतो त्याच्यापेक्षा अधिक परिणाम त्या उक्तींचा त्याच्या मनावर होत नसेल. समाजाला मान्य अशा सर्व पंथांमधे आढळून येणाऱ्या सर्वमान्य सिद्धांतांपेक्षा एखाद्या पंथालाच मान्य अशा सिद्धांतामधे अधिक जिवंतपणा का आढळतो व त्यांचा अर्थ कायम टिकवण्यासाठी त्यांचे प्रचारक जास्त कष्ट का करतात त्याची अनेक कारणे असू शकतील. पण एक महत्त्वाचे कारण आहे ते हे की त्या सिद्धांतावर अनेक वेळा आक्षेप घेतले जातात व नाकारणाराविरुद्ध त्यांचे सारखे संरक्षण करावे लागते. रंगणामधे कुणी शत्रू नसला की शिकवणारे व शिकणारे दोघेही आपल्या जागी झोपी जातात.

जीवनाचे ज्ञान व शहाणपणा असो किंवा नीती व धर्म असो, सर्व विषयांवरील परंपरागत सिद्धांताच्या बाबतीत हा नियम खरा आहे. जीवन म्हणजे काय व ते कसे व्यतीत करावे याबद्दलची सर्वसाधारण विधाने प्रत्येक भाषेत व वाङ्मयात आढळतात. ही विधाने सर्वांच्या परिचयाची असतात, सर्वजण त्यांचा उच्चार करतात व ऐकू आली की माना डोलव-तात. ती खरी आहेत असे सर्वजण मानतात, परंतु त्यांचा खरा अर्थ बहुतेकांना कळतो तो साधारणपणे दुःखदायक स्वरूपाच्या अनुभवामुळे त्यांचे सत्य अनुभवाला येते तेव्हा. अनपेक्षित संकट किंवा निराशा यांचा

फटका बसल्यानंतर माणसाला सबंध जन्मभर माहित असलेली एखादी म्हण किंवा उक्ती आठवते. तिचा अर्थ त्या क्षणी जसा मनाला प्रतीत झाला तसा पूर्वी झाला असता तर कदाचित् ही आपत्ती टळली असती. चर्चेच्या अभावा खेरीज इतर कारणेही या घटनेला जबाबदार असतील; वैयक्तिक अनुभवामुळे मनावर बिंबल्याखेरीज ज्यांचा अर्थ कळणार नाही अशी पुष्कळ सत्ये आहेत. परंतु जाणत्या मंडळींनी केलेली दोन्ही बाजूंची चर्चा ऐकण्याची संवय असली तर या सत्यांचा अर्थ देखील अधिक चांगला समजतो व मनावर अधिक चांगला बिंबतो. एखाद्या वस्तूबद्दल, ती संशयास्पद नाही असे ठरल्यानंतर, विचार करण्याचे सोडून देणे ही जी मनुष्यमात्राची घातुक वृत्ती आहे तिच्यामुळे निम्म्याहून अधिक चुका घडून येतात. निर्णीत मनाची गाढ झोप असे जे एका सद्यःकालीन लेखकाने म्हटले आहे त्याच्यामधे खूप तथ्य आहे.

पण काय ? ( कुणी असे विचारील ) खरे ज्ञान एकमताच्या अभावाशिवाय नांदूच शकत नाही का ? सत्याचे ज्ञान होण्यासाठी मनुष्य-जातीचा एखादा भाग सदोदित अज्ञानात राहिलाच पाहिजे का ? एखादे मत सर्वमान्य झाल्याबरोबर खरे आणि सजीव राहूच शकत नाही का ? आणि एखादे विधान त्याच्याबद्दल काही शंका राहिल्याखेरीज पुरे समजले गेले व मनाला पटले असे म्हणताच येणार नाही ? मनुष्यजातीने एखादे सत्य एकमताने स्वीकारल्याबरोबर त्याच्यातील सत्यत्व नष्ट होते का ? सर्व महत्त्वाची सत्ये अधिकाधिक प्रमाणात मान्य करण्यामधे मनुष्यजातीला एकत्र आणणे हे सुसंस्कृत बुद्धिमत्तेचे महान् उद्दिष्ट व अंतिम फळ आहे असे इतके दिवस समजले जात असे. पण ती बुद्धिमत्ता तिचे उद्दिष्ट सफळ होईपर्यंतच टिकून राहते का ? विजयाची फळे संपूर्ण विजय प्राप्त झाल्या-बरोबर नष्ट पावतात का ?

मी असे काही म्हणत नाही. मनुष्यजातीची सुधारणा होईल तशी ज्यांच्याबद्दल आक्षेप अगर शंका उरल्या नाहीत अशा सिद्धांतांची संख्या

सारखी वाढत जाईल. विरोधरहित अशा सत्यांची संख्या व त्यांचे महत्त्व यावरून मनुष्यजातीच्या कल्याणाचे मोजमाप देखील करता येणे शक्य आहे. एखादे मत संसिद्ध बनते त्यावेळी त्या मतातून उत्पन्न होणाऱ्या प्रश्नाबद्दलचे वाद बंद पडलेले असतात. खरे मत संसिद्ध बनणे जितके हितावह आहे तितकेच खोटे मत संसिद्ध बनणे धोक्याचे व अपकारक आहे. मतभेदांच्या मर्यादा संकुचित होत जाणे हे जरी आवश्यक असले, आवश्यक दोन्ही अर्थांनी, अपरिहार्य म्हणून व अटळ म्हणून, तरी देखील त्याचे सर्व परिणाम हितावह होतीलच असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. सत्य समजावून सांगण्याने व विरोधकाविरुद्ध त्याचे समर्थन करण्याने त्याचे जे ज्ञान होते ते अधिक जिवंत असते व बुद्धीला ते अधिक पटते. त्या सत्याला सार्वत्रिक मान्यता मिळाल्यानंतर ते समजावून सांगण्याची आवश्यकता उरत नाही. हा जो अभाव आहे त्याने सार्वत्रिक मान्यता मिळाल्यामुळे जो फायदा होतो त्यामधे बरीचशी न्यूनता निर्माण होते. हा अभाव दूर करण्यासाठी मी तर म्हणतो की, जगातील शिक्षकांनी काही तरी दुसरा मार्ग शोधला पाहिजे की ज्याच्या योगाने शिकणारांना एखाद्या विषयाच्या बाबतीत निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांची पुरी जाणीव व्हावी. ती जाणीव इतकी तीव्र स्वरूपाची असावी की जणू काय एखादा विरोधक शिकणारांचे मन वळविण्यासाठी त्यांच्यापुढे सारे प्रश्न आग्रहाने मांडत आहे.

यासाठी काही उपाय योजण्याऐवजी जुने जे उपाय होते ते देखील ते हरवून बसले आहेत. प्लेटोच्या संभाषणामधे ( Dialogues of Plato ) जिचे उत्तम दर्शन घडते ती सॉक्रेटिसची प्रश्नोत्तरांच्या रूपाने विषयाचे विवरण करण्याची पद्धत ( Socratic dialectics ) हा एक त्या स्वरूपाचा उपाय होता. जीवन आणि तत्त्वज्ञान यामधील मूल प्रश्नांचे त्या संभाषणामधे नकारात्मक पद्धतीचे विवेचन आहे. प्रचलित मते विचार न करता स्वीकारणाऱ्या माणसाला विषय मुळीच कळलेला नसतो हे त्या संभाषणात मोठ्या खुबीने दाखविलेले आहे. अशा माणसाने मान्य केलेल्या

सिद्धांतांना निश्चित असा अर्थ दिलेला नसतो. हे दाखविण्याचा उद्देश हा की आपल्या अज्ञानाची ओळख पटून, सिद्धांतांचे अर्थ आणि त्या विषयीचे पुरावे यांचे सम्यग् ज्ञान घडून, त्या ज्ञानावर आधारलेली स्थिर श्रद्धा त्याला प्राप्त करून घेता यावी. मध्ययुगातील ( Middle Age) चर्चाविद्यालयांचेही (school of disputations ) तेच उद्दिष्ट असे. विद्यार्थ्यांना स्वतःचे मत नीट कळावे आणि ( त्याच्याशी अवश्यमेव संबंधित म्हणून ) विरोधी मतही कळावे व स्वतःच्या मताला परिपोषक अशा कारणांचा ऊहापोह करता यावा आणि विरोधी कारणांचा विध्वंस करता यावा हा त्या चर्चाविद्यालयांचा उद्देश असे. हे जे वाद होत त्यामधे एक मोठा दोष असे. तो हा की गृहित कृत्ये ( premises) म्हणून जी स्वीकारली जात ती बुद्धीच्याऐवजी आप्त-वाक्यावर आधारलेली असत. मनाला शिस्त लावण्याच्या दृष्टीने सॉक्रेटिस-काळातील विचारवंतांना ज्या प्रश्नोत्तर पद्धतीचे सहाय्य झाले त्याच्या-मानाने ही कृत्ये खूपच कमी दर्जाची होती. तरी देखील सध्याच्या काळा-तील बुद्धिवंतांवर त्या दोन्ही पद्धतीचे जे ऋण आहे ते जसे मान्य करायला हवे तसे मान्य केले जात नाही. सध्याच्या काळातील शिक्षणपद्धतीमधे त्या दोन्ही पद्धतींची उणीव भरून काढील असे काही देखील नाही. शिक्षका-कडून किंवा पुस्तकामार्फतीने ज्याचे सारे शिक्षण होते त्याने घोकम-पट्टीचा मोह जरी टाळला तरी दोन्ही बाजू ऐकण्याची त्याच्यावर सक्ती नसते; त्यामुळे दोन्ही बाजू माहित असण्याचा गुण विचारवंतांमधे देखील क्वचितच आढळतो. स्वतःच्या मताच्या समर्थनार्थ जे सांगितले जाते त्यातील सर्वात कमकुवत भाग जर कोणता असेल तर तो विरोध-कांना उत्तर म्हणून जे दिले जाते तो. एखादे अस्तिपक्षी विधान सिद्ध करण्याऐवजी विचारातील उणेपणा किंवा कृतीतील चुका दाखविणे हेच केवळ ज्याचे कार्य त्या नास्तिपक्षी तर्कशास्त्राचा (negative logic) अधिक्षेप करणे ही सध्याची एक प्रथा आहे. या तऱ्हेची नास्तिपक्षी टीका हाच केवळ जर अखेरचा निष्कर्ष असेल तर

त्याने कुणाचेही समाधान होणार नाही. परंतु खरेखुरे ज्ञान व खरीखुरी श्रद्धा प्राप्त करण्याच्या दृष्टीनेही त्या टीकेचे खूप महत्त्व आहे. त्या तऱ्हेच्या टीकेची लोकांना पद्धतशीर शिकवण दिल्याखेरीज मोठे विचारवंत निर्माण होणार नाहीत आणि तत्त्वचिंतनाच्या, गणित व नैसर्गिक शास्त्रे या शाखांखेरीज, इतरत्र बुद्धीची जी वाढ होईल ती मर्यादित स्वरूपाची असेल. बाकीच्या या क्षेत्रामध्ये, विरोधकाबरोबर वाद घालण्यासाठी मनाची जी तयारी करावी लागते ती आपण होऊन किंवा दुसऱ्याने भाग पाडले म्हणून केल्याखेरीज, एखाद्याने आपली मते सांगितली तर त्यांना ज्ञानाचा दर्जा प्राप्त होणार नाही. वाद बंद पडला म्हणजे तो कसा अपरिहार्य आहे हे ध्यानात येते; पण तो मुद्दाम निर्माण करणे फार कठीण असते; अशा परिस्थितीत वाद आपण होऊन रंगत असता तो बंद पाडणे मूर्खपणाचे नाही का? प्रचलित मताविरुद्ध आक्षेप घेणारी कुणी मंडळी असतील, किंवा कायदा अगर लोकमत यांनी परवानगी दिली तर आक्षेप घेण्याची कुणाची तयारी असेल, तर आपण त्यांचे स्वागत करू या, आपली मने खुली करून आपण त्यांचे म्हणणे ऐकू या आणि त्यांनी केले नसते तर, जे आपल्याला आपल्या मतांच्या खरेपणावर व जिवंतपणावर आपला खरोखर विश्वास असला तर, अधिक परिश्रमाने करावे लागले असते ते केल्याबद्दल आपण त्यांना धन्यवाद देऊ या.

मतवैचित्र्य का हितावह असते त्याचे एक प्रमुख कारण अद्याप सांगावयाचे राहिले आहे. सध्या जे अनंत योजने दूर आहे अशा बौद्धिक विकासाच्या युगामधे मनुष्यजातीचा प्रवेश होईपर्यंत मतवैचित्र्याची हितावहता कमी होणार नाही. आतापावेतो आपण दोनच विकल्पांचा विचार केला आहे: प्रचलित मत खोटे असेल व म्हणूनच दुसरे एखादे मत खरे असेल; किंवा प्रचलित मत खरे असले तरी देखील त्याच्या खरे-पणाचे चांगले दर्शन व जाणीव होण्यासाठी त्याचा विरोधी चुकीच्या मताशी वाद व्हावा. पण या दोन्ही घटनांऐवजी नेहमी व्यवहारात आढ-

ळून येते ती एक तिसरीच वेगळी घटना. ती अशी की एखादे मत खरे व दुसरे खोटे असे घडण्याऐवजी दोन्ही मतांमधे काही खरे व काही खोटे असे असते आणि मान्य झालेल्या मतामधे जी सत्याची उणीव असते ती भरून काढण्यासाठी विसंवादी मताची आवश्यकता भासते. इंद्रियांना अगोचर अशा विषयावरील लोकमान्य मते पुष्कळ वेळा खरी असतात, पण शंभर टक्के सत्य मात्र त्यामधे बहुशः आढळत नाही. सत्याचा काही भाग त्याच्यामधे असतो, कधी मोठा तर कधी लहान, पण सत्याच्या ज्या इतर भागांची त्यांना संगत लाभायला हवी व ज्यांच्यामुळे त्यांच्यावर मर्यादा पडायला हवी त्या भागापासून ते अलग झालेले असतात व त्यामुळे त्यांना पुष्कळवेळा अतिरिक्त व विद्रूप असे स्वरूप प्राप्त झालेले असते. उलट पाखंडी मतामधे पुष्कळ वेळा सत्याचे ते दडपलेले व दुर्लक्षिलेले स्वरूप दृष्टीस पडते. ते सत्य ज्या बंधनांनी त्याला बांधून टाकले ते बंध तोडण्यासाठी धडपडत असते; कधी ते प्रचलित मतातील सत्याशी जुळते घेण्याचा प्रयत्न करते तर कधी ते त्याला शत्रू मानून, त्याचा निःपात करून स्वतःचा एकमेवाद्वितीय सत्य म्हणून पूर्णतया स्वीकार व्हावा म्हणून आग्रह धरून बसते. दुसरा प्रकार वारंवार घडलेला दृष्टीस पडतो, कारण मनुष्यस्वभावामधे एकांगीपणा हा नियम आहे व बहुढंगीपणा हा अपवाद आहे. म्हणून मतांच्या आवर्तांमधे नेहमी सत्याच्या एका भागाचा उदय होतो तर दुसऱ्याचा अस्त होतो. प्रगती म्हणजे एका सत्यामधे दुसऱ्या सत्याची भर पडायला हवी, पण प्रगतीमधेही बहुतेक वेळा घडते ते एवढेच की एका अर्धवट व अपूर्ण सत्याची जागा दुसरे अर्धवट व अपूर्ण सत्य घेते; सुधारणा होते ती बहुशः एवढीच असते की मागे पडलेल्या सत्याच्या अंशापेक्षा नवीन सत्याचा अंश लोकांना अधिक हवासा वाटतो व काळाच्या ज्या गरजा असतात त्या तो अंश अधिक चांगल्या रीतीने भागवू शकतो. चांगल्या पायावर उभे राहिलेल्या प्रचलित मतांचे स्वरूप हे असे अर्धसत्यासारखे

असल्याकारणाने त्या मतातून गळलेला सत्याचा अंश ज्यामधे अंतर्भूत झाला आहे असे दुसरे मत बहुमोल समजले जाणे आवश्यक आहे. त्या दुसऱ्या मतात कितीही चुकीच्या समजुती व गोंधळ जमा झालेला असला तरी त्याचे मोल कमी होत नाही. ज्या सत्याकडे आपले दुर्लक्ष झाले असते ती सत्ये मुद्दाम आपल्या नजरेस आणून देणाराचे आपल्या माहितीच्या काही सत्याकडे दुर्लक्ष झाले म्हणून, मानवी व्यवहारांचा शांतपणे विचार करणारा मनुष्य त्याच्यावर रागावणार नाही. उलट त्याला असे वाटेल कीं लोकमान्य सत्य ज्या अर्थी एकांगीं स्वरूपाचे असते त्या अर्थी लोकांना अमान्य अशा सत्याचे प्रचारक देखील एकांगी असलेले अधिक बरे. असे एकांगी प्रचारक खूप उत्साही असतात आणि आपल्या मतातील सत्याच्या अंशाचा संपूर्ण सत्य म्हणून प्रचार करीत असले तरी तेच सत्याच्या त्या अंशाकडे लोकांना, नाईलाजाने का होईना, लक्ष द्यायला भाग पाडतात.

अठराव्या शतकामधे सर्व सुशिक्षित मंडळी व त्यांच्या पाठीशी असलेली सर्व अशिक्षित मंडळी आधुनिक विज्ञान, वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचे विक्रम व जिला सुधारणा असे म्हणतात ती सुधारणा यांची वाहवा करण्यात दंग झाली होती. त्यांना असे वाटत होते की आधुनिक काळातील माणसे व जुन्या काळातील माणसे यांच्यामधे खूप फरक आहे आणि तो सारा फरक आधुनिक काळातील माणसांना अनुकूल असा आहे. रुसोच्या विरोधाभासात्मक अशा लेखनाने त्या मंडळींना केवढा जबरदस्त हादरा दिला. त्या हादऱ्यामुळे एकांगी स्वरूपाचा असा एक मताचा जो गठ्ठा बनला होता त्याचे तुकडे झाले आणि ते तुकडे नंतर अधिक चांगल्या स्वरूपात व नवीन गोष्टींची भर पडून एकत्रित झाले. प्रचलित मते रुसोच्या मतापेक्षा सत्यापासून अधिक दूर नव्हती; उलट ती सत्याला अधिक जवळ होती; त्यांच्यामधे विधायक स्वरूपाचे सत्य अधिक होते व अशुद्धता बरीच कमी होती. तरी देखील रुसोच्या विचारामधे तत्कालिन जनतेला आवश्यक असलेले बरेचसे सत्य होते; ते सत्य त्याच्या विचार-

प्रवाहातून वहात आले आणि पूर ओसरल्यानंतर मागे राहिले ते तेच सत्य. रुसोने लेखन केले तेव्हापासून, जीवनाच्या साधेपणाची श्रेयस्करता व कृत्रिम समाजाच्या बंधनांचा व दांभिकपणाचा मनाला शक्तिहीन व नीतिहीन बनवणारा परिणाम या कल्पना सुसंस्कृत मनामधे कायमच्या रुजल्या आहेत. त्या कल्पनांचा कालांतराने योग्य तो परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. त्यांचा सध्याच्या काळात पुनरुच्चार होणे जरूरीचे आहे; शब्दापेक्षा कृतीने, कारण शब्दांचे सामर्थ्य तोकडे पडते.

राजकारणामधे देखील, राजकीय जीवन निरोगी राहण्यासाठी सुव्यवस्था अगर स्थैर्य यांचा पुरस्कार करणारा पक्ष व प्रगती अगर सुधारणा यांचा पुरस्कार करणारा पक्ष दोघांचीही गरज असते. जेव्हा दोघांपैकी कोणचा तरी एक पक्ष, त्याची मानसिक कक्षा विस्तृत झाल्याकारणाने, सुव्यवस्थेच्या बरोबरीने सुधारणेचाही पक्ष बनतो तेव्हा ती गरज सरते. त्यावेळी त्या पक्षाला काय टाकून द्यायला हवे आणि काय राखून ठेवण्यासारखे आहे याचे ज्ञान झालेले असते आणि दोघामधे फरक करता येतो. विचारांच्या या दोन पद्धतींपैकी एका पद्धतीची गरज दुसरीतील उणीवांमुळे निर्माण होते व एकमेकांच्या विरोधामुळे दोन्ही पद्धतींना विवेक व शहाणपणा यांच्या मर्यादा ओलांडता येत नाहीत. लोकशाही व उमरावशाही (aristocracy), मालमत्ता व समता, सहकार व स्पर्धा, विलास व मितभोग, समाजनिष्ठा (sociality) व व्यक्तिनिष्ठा (individuality), स्वातंत्र्य व शिस्त या अशाच तऱ्हेच्या इतर अनेक गोष्टी ही व्यावहारिक जीवनातील द्वंद्वे आहेत. दोघांचाही पुरस्कार करणारी मते व्यक्त करण्याची सारखीच मुभा असल्याखेरीज आणि दोघांचेही समर्थन सारख्याच उत्साहाने व कौशल्याने झाल्याखेरीज, दोघांनाही योग्य ते महत्त्व लाभणार नाही; एकाचे पारडे जड होईल तर दुसऱ्याचे खाली जाईल. जीवनातील महत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतीत सत्य सापडते ते विरोधी प्रवृत्तींना एकत्र आणून व त्यांच्यामधे मेळ निर्माण करून. अगदी बरोबर असा मेळ

घालण्यासाठी जो मनाचा मोठेपणा व निःपक्षपाती वृत्ती हवी ती फारच थोड्यांच्या ठिकाणी असते. म्हणून जो मेळ घालावयाचा तो विरोधी निशाणे घेऊन भांडणारांच्या दंगलीमधून स्थूल स्वरूपाचा मार्ग काढून घालावा लागतो. वर उल्लेखिलेल्या अनिर्णीत प्रश्नावरील दोन मतांपैकी ज्या मताला विवक्षित जागी व काळात फारसा पाठिंबा नसेल त्यालाच जगण्याचा, एवढेच नव्हे तर सर्व तऱ्हेचे उत्तेजन लाभण्याचा, अधिक हक्क आहे. ते मत त्या वेळी दुर्लक्षित हितसंबंधांच्या वतीने व न्यायाने जे मिळायला हवे ते मानवी कल्याणाच्या ज्या बाजूला मिळत नाही तिच्या वतीने बोलत असते. या देशामधे या प्रश्नावरील बहुतेक मत-भेदाबाबत कोणचीही असहिष्णुता नाही हे मला माहित आहे. मानवी बुद्धीच्या सध्याच्या अवस्थेत सत्याच्या वेगवेगळ्या बाजूंचे दर्शन होऊ शकते ते केवळ मतवैचित्र्याला वाव आहे म्हणून हा सार्वत्रिक स्वरूपाचा नियम सर्वमान्य व अनेकविध स्वरूपाचीं उदाहरणे देऊन सिद्ध करण्यासाठीच त्याचा इथे उल्लेख केलेला आहे. कोणच्याही एखाद्या विषयावर जगाचे एक-मत झाले असताना, त्या विषयावर वेगळे मत प्रदर्शित करणारी जर काही मंडळी निघाली तर, जगाचे मत खरे असताना देखील, त्यांना आपले मत प्रदर्शित करण्याची संधी देणे अवश्य आहे. कारण इतरांनी ऐकावे असे त्यांच्याजवळ काही सांगण्यासारखे असण्याची शक्यता आहे. त्यांना गप्प बसायला लावले, तर सत्याचीच हानी होते असा अनुभव आहे.

याविरुद्ध आक्षेप घेण्यात येईल तो असा : "काही जनसंमत अशी तत्त्वे, विशेषे करून उदात्त व महत्त्वाच्या विषयावरील, अर्धसत्याच्या वरच्या पायरीवरील असतात. उदाहरणार्थ ख्रिश्चन म्हणून ओळखली जाणारी नीति-मत्ता, नीतीच्या बाबतीतील पूर्ण सत्य तिच्यामधे भरलेले आहे. तिच्या-पेक्षा वेगळी अशी नीती जर कुणी शिकवू लागला तर तो निखालस चूक करतो आहे असेच म्हणावे लागेल." व्यवहारात नेहमी आढळणारे असे हे महत्त्वाचे उदाहरण असल्याकारणाने सर्वसाधारण नियम तपासून

पाहण्यासाठी या उदाहरणापेक्षा जास्त चांगले उदाहरण सापडणार नाही. ख्रिश्चन नीतिमत्ता म्हणजे काय हे ठरविण्यापूर्वी ख्रिश्चन नीतिमत्ता हा शब्दप्रयोग कोणच्या अर्थाने वापरला जातो हे पाहिले पाहिजे. नव्या करारातील ( New Testament ) नीतिमत्ता असा जर त्याचा अर्थ असेल, तर ते पुस्तक वाचून ज्याने त्या नीतितत्त्वाबद्दल माहिती मिळवली असेल तो त्या पुस्तकात नीतिशास्त्राचा पुरा सिद्धांत सांगितलेला आहे अगर सांगण्याचा हेतू होता असे कधीही म्हणणार नाही. त्या धर्मग्रंथामधे जुन्या अस्तित्वात असलेल्या नीतिमत्तेबद्दल अनेक ठिकाणी लिहिले आहे. त्या धर्मग्रंथामधे जे नवीन नियम सांगितले आहेत ते जुन्या नीतिनियमामधे सुधारणा करणे आवश्यक वाटले किंवा त्यांच्यापैकी काही-ऐवजी नवीन अधिक श्रेष्ठ व व्यापक नियम रूढ करावेसे वाटले तेवढ्यापुरतेच आहेत. ते नियम सर्वसाधारण शब्दात सांगितले आहेत; पुष्कळ वेळा त्यांचा नक्की अर्थ सांगता येत नाही; त्यांच्या ठिकाणी कायद्याच्या निश्चितपणाऐवजी काव्याचा मनावर छाप पाडण्याचा गुण किंवा वक्तृत्व आहे. जुन्या कराराची ( Old Testament ) मदत घेतल्याविना नव्या करारातून नीतीचे शास्त्र असे काढता येत नाही. जुन्या करारामधे श्रम घेऊन तयार केलेले नीतिशास्त्र आहे, पण ते बरेचसे वन्य स्वरूपाचे ( barbarous ), वन्य अवस्थेतील समाजाला साजेसे नीतिशास्त्र आहे. सेंट पॉलला जुन्या कराराची मदत घेऊन ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा अर्थ लावण्याची व त्यामधे भर घालण्याची ज्यू समाजाची पद्धत मान्य नव्हती, त्या पद्धतीचा तो उघड उघड शत्रू होता. परंतु त्याच्या डोळ्यापुढेही जुने नीतिनियम होते. ते ग्रीक व रोमन लोकांचे नीतिनियम होते. त्यानी जो ख्रिश्चन लोकांना उपदेश केलेला आहे तो त्या नीतिनियमांना बराचसा मिळता जुळता असा आहे. म्हणूनच त्यामधे गुलामगिरीचे देखील समर्थन आढळते. ज्याला ख्रिश्चन असे म्हणण्यात येते, पण जे खरोखर धार्मिक स्वरूपाचे आहेत, ते नीतिनियम ख्रिस्ताने किंवा त्याच्या शिष्यांनी ( Apostles ) तयार

केलेले नाहीत. ते नंतरचे आहेत. पहिल्या पाचशे वर्षांच्या काळात कॅथलिक धर्मपीठाने ते तयार केले; प्रॉटेस्टंट्सनी व इतर आधुनिक काळातील मंडळींनी जरी ते सहीशिक्क्यानिशी मान्य केले नसले तरी त्यांनी त्यामधे अपेक्षेच्या मानाने फारच कमी दुरुस्त्या केल्या आहेत. बहुशः त्यांनी त्यातून मध्य युगामधे घालण्यात आलेली भर काढून टाकली व प्रत्येक पंथाने आपला स्वभाव व प्रवृत्ती यांना साजेल अशी त्यांच्यामधे नवी भर घातली. त्या नीतिनियमांचे आणि त्यांची शिकवण ज्यांनी दिली त्या शिक्षकांचे मनुष्यजातीवर मोठे ऋण आहे हे मी तरी कधी नाकारणार नाही. परंतु ते नीतिनियम अनेक महत्त्वाच्या बाबतीत अपूर्ण आणि एकांगी आहेत हे मात्र मला सांगितल्यावाचून राहवत नाही. त्यांना अमान्य अशा कित्येक विचारांची व भावनांची यूरपचे जीवन आणि स्वभाव बनविण्यात भर पडली नसती तर मानवी व्यवहारांची आजच्यापेक्षा अधिक वाईट अवस्था झाली असती. ख्रिश्चन म्हणून मानले गेलेले नीतिनियम हे प्रतिक्रियात्मक स्वरूपाचे आहेत. पेगन संप्रदाय ( peganism ) म्हणून ज्याला म्हणतात त्यांच्या विरुद्ध प्रतिक्रिया म्हणून ते अस्तित्वात आले. त्यांचे जे उद्दिष्ट आहे ते क्रियात्मक नसून नकारात्मक स्वरूपाचे ( negative ) आहे; क्रियाशील नसून निष्क्रिय आहे. उदात्ततेच्या ( Nobleness ) ऐवजी निर्दोषता ( Innocence ), श्रेयसाच्या ( Good ) जोमदार शोधाऐवजी कुकर्मांचा ( Evil ) त्याग (Abstinence) ही त्यांची उद्दिष्टे आहेत. त्या नियमामधे (योग्य रीतीने म्हटले गेले आहे त्याप्रमाणे) असुक गोष्टी कर असे सांगण्याऐवजी असुक गोष्टी करू नकोस हेच प्राधान्येकरून सांगितलेले आहे. सुखलालसेचे मोठे भय वाटल्यामुळे वैराग्याचे मोठे प्रस्थ माजवण्यात आले. हलके हलके त्याला कायद्याचा आधार देण्यात आला, पण त्यामुळे त्याचे महत्त्व मात्र कमी झाले. सदाचारी जीवनाची योग्य प्रेरणा म्हणून ते नीतिनियम माणसापुढे स्वर्गाचे प्रलोभन किंवा नरकाची धास्ती उभी करतात. या बाबतीत हे नीतिनियम जुन्या नीति-

नियमांपेक्षा खालच्या दर्जाचे आहेत. मानवी नीतीला ते मूलतः स्वार्थी बनवतात; आपल्या बांधवांच्या हिताचा विचार करणे हे जे माणसाचे कर्तव्य त्याच्याशी तिचा संबंध उरत नाही; स्वार्थ साधण्यासाठीच मग इतरांच्या हिताचा जो काही विचार होईल तेवढाच बाकी राहतो. ते नियम म्हणजे सारतः निष्क्रीय आज्ञापालनाची ( passive obedience) शिकवण आहे. अधिष्ठित अशा ज्या सत्ता असतील त्यांच्यापुढे शरणागती पतकरावी हा विचार ते मनावर बिंबवतात. धर्माने जे निषिद्ध ठरवले ते करण्याचा सत्तेने हुकूम केला तर त्या हुकूमाची आपण होऊन अंमलबजावणी करू नये, पण सत्तेचा प्रतिकार मात्र कधी करू नये, आणि आपले सत्तेने कितीही नुकसान केले तरी तिच्या विरुद्ध बंड असे कधीही करू नये, अशी त्या नियमांची शिकवण आहे. खिस्तपूर्व ( Pagan ) राष्ट्रांपैकी उत्तम राष्ट्रांच्या नीतिनियमांमधे शासनाबद्दलचे जे कर्तव्य आहे त्याला व्यक्तीच्या न्याय्य स्वातंत्र्याला धक्का पोचेल एवढे मोठे स्थान दिलेले आहे; पण ख्रिश्चन नीतिनियमांमधे मात्र त्या अत्यंत महत्त्वाच्या कर्तव्याकडे मुळीच लक्ष देण्यात आलेले नाही व त्याला मान्यताही दिलेली नाही. "जो राजा एखाद्या माणसाची, देशामधे अधिक चांगला इसम विद्यमान असताना, एखाद्या जागेवर नेमणूक करतो तो देवाच्या आणि राज्यशासनाच्या दृष्टीने पाप करतो " हे वचन कुराणात आढळते, नव्या करारात नव्हे. आधुनिक नीतिनियमांमधे समाजाबद्दलच्या कर्तव्यांना जी किंचित् मान्यता लाभलेली आहे तिला आधार सापडतो तो ख्रिश्चन नव्हे तर ग्रीक व रोमन लोकांच्या नीतिनियमांमधे. वैयक्तिक जीवनातील नीतिमत्तेमधेही औदार्य, मनाचा मोठपणा, वैयक्तिक प्रतिष्ठा एवढेच नव्हे तर शिष्टाचाराची कल्पना (sense of honour ) यांचा आढळ होतो तो शिक्षणातील धार्मिक भागामुळे नव्हे तर मानवतावादी भागामुळे. ज्या नीतिनियमांमधे आज्ञापालन हाच एक महत्त्वाचा गुण म्हणून मानलेला आहे त्या नीतिनियमांमधून वर उल्लेखिलेल्या गुणांची वाढ होणे शक्य नाही.

ख्रिश्चन नीतिनियमांकडे कसेही पाहिले तरी त्यांचे हे अंगभूत असे दोष आहेत असे मी कधीही मानणार नाही. किंवा संपूर्ण नीतिशास्त्रासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या नियमांशी सुसंगत ठरणार नाहीत असेही माझे मत नाही. ख्रिस्ताचे स्वतःचे जे विचार व उपदेश आहेत त्यांच्याबद्दल तर मी तसे कधीही म्हणणार नाही. ख्रिस्ताच्या उक्तींमधे त्यांच्यातून जे जे काही काढण्याचा प्रयत्न झाला आहे ते ते सारे आहे असा माझा विश्वास आहे; व्यापक नीतिशास्त्राला जे जे काही लागते त्याच्याशी मेळ घालता येणार नाही असे त्यांच्यामधे काहीही नाही; नीतिमत्तेमधे जे उत्कृष्ट असेल ते सारे त्यांच्यामधे आढळते; आणि आचरणाचे नियम तयार करण्यासाठी त्या उक्तींच्या शब्दांची आजवर जी ओढाताण करण्यात आलेली आहे त्याच्यापेक्षा कोणतीही अधिक ओढाताण त्यासाठी करावी लागणार नाही. हे मान्य करण्यामधे आणि त्या उक्तींमधे सत्याचा केवळ एक भाग आहे आणि सत्याचा एक भाग सांगणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट होते असे म्हणण्यात विसंगती नाही. तसेच उच्चतम नीतीचे काही भाग ख्रिश्चन धर्माच्या संस्थापकाच्या लिहून ठेवलेल्या त्या उक्तींमधे नाहीत व त्यांचा त्यांच्यामधे अंतर्भाव करण्याची इच्छा देखील नव्हती हे म्हणण्यातही विसंगती नाही. ख्रिश्चन धर्मपीठाने त्या उक्तींच्या आधाराने जे नीतिनियम बनवले त्यांच्यातून मात्र ते भाग मुद्दाम वगळले. अशी ही परिस्थिती असल्या कारणाने ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वामधे, आपल्याला सर्व बाबतीत मार्गदर्शक होईल असा, नियम शोधण्याचा प्रयत्न करण्याचा अट्टाहास धरणे हे, मला वाटते, अत्यंत चुकीचे आहे. धर्मपीठाने असा नियम करावा व त्याची अंमलबजावणी करावी अशी ख्रिस्ताची इच्छा होती असा देखावा करण्यात येतो; पण ख्रिस्ताने मात्र तो नियम पूर्ण स्वरूपात कुठेही सांगितलेला नाही. हा संकुचित विचार व्यवहारामधे अनेक अडचणी निर्माण करीत आहे असे मला वाटते. त्याच्या योगाने पुष्कळ सत्प्रवृत्त मंडळींनी आता बऱ्याच

कालावधीनंतर जे नैतिक शिक्षणाचे कार्य सुरू केले आहे त्या कार्याचे महत्त्व कमी होते. बुद्धी आणि भावना यांना केवळ धार्मिक स्वरूपाचे वळण लावल्यामुळे व आतापर्यंत ख्रिश्चन नीतिनियमांच्या बरोबर एकत्र नांदणाऱ्या निधर्मी (दुसरे चांगले विशेषण आढळत नाही म्हणूनच या विशेषणाचा उपयोग केला आहे) मानदंडांचा (standards) त्याग केल्यामुळे निधर्मी मानदंड ख्रिश्चन नीतिनियमांमधे भर घालत असत. त्याच्यामुळे त्या नियमांमधील काही चैतन्य त्यांच्यामधे मुरत असे व त्यांच्यामधील काही चैतन्य ख्रिश्चन नीतिनियमांमधे मुरत असे. नीच, क्षुद्र आणि खुषामती स्वरूपाची माणसे तयार होतील व आज देखील तयार होऊ लागली आहेत अशी मला धास्ती वाटते. ही माणसे त्यांना जी परमोच्च शक्ती (Supreme Will) वाटते तिला शरण जातील परंतु परमोच्च कल्याणाची (Supreme Goodness) कल्पना त्यांना कधी सुचणार नाही व तिच्याबद्दल त्यांना कधी आपलेपणा वाटणार नाही. ख्रिश्चन धर्माखेरीज वेगळ्या तत्त्वावर आधारलेले नीतिनियम ख्रिश्चन नीतिनियमांच्या बरोबरीने नांदले तरच मनुष्यसमाजाचे नैतिक पुनरुज्जीवन होईल असा माझा विश्वास आहे. मानवी मनाच्या अपूर्ण अवस्थेत मतवैचित्र्य नांदणे सत्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. हा नियम ख्रिश्चन नीतिनियमांना देखील लागू पडतो. ख्रिश्चन धर्मामधे नसलेल्या नैतिक सत्याकडे लक्ष पुरवणे म्हणजे त्या धर्मातील नैतिक सत्याकडे दुर्लक्ष करणे नव्हे. असे दुर्लक्ष अगर हेळसांड घडली तर ती निःसंशय दोषास्पद आहे. पण कदाचित् ते घडणे आपल्याला अजिबात टाळता येईलच असे नाही. म्हणून यदाकदाचित् ते घडले तर अतिशय मौल्यवान अशी एक चांगली गोष्ट साध्य करण्यासाठी आपण ती किंमत दिली असे समजायला हवे. सत्याच्या एखाद्या अंशाने आपण पुरे सत्य आहो असे मिरवण्याचा प्रयत्न केला तर त्याचा निषेध केला पाहिजे आणि, प्रतिक्रिया म्हणून, निषेध करणारे स्वतः अन्याय करू लागले तर त्यांच्या एकांगीपणाबद्दल दुःख प्रदर्शित करावे लागेल. पण निषेध करण्याचा

त्यांचा हक्क मात्र नाकारता कामा नये. ख्रिश्चन धर्माकडे न्यायदृष्टीने पाहण्याची शिकवण ख्रिश्चन धर्मीयांना इतरांना द्यावयाची असेल तर त्यांनी स्वतः ख्रिश्चनेतर धर्माकडे न्यायदृष्टीने पहायला तयार झाले पाहिजे. उदात्त व बहुमोल अशा नैतिक शिकवणुकीपैकी महत्त्वाचा भाग ज्यांना ख्रिश्चन धर्माची माहिती नव्हती किंवा माहिती असून देखील ज्यांना तो पटला नाही अशा थोर विचारवंतांनी निर्माण केलेला आहे ही, वाङ्मयीन इतिहासाशी ज्यांच्या अल्पसा परिचय आहे अशा सर्वांना माहित असलेली, गोष्ट दृष्टिआड करण्याने सत्याला मदत होत नाही.

सर्व तऱ्हेची मते प्रतिपादन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिल्याने धार्मिक किंवा तत्त्वज्ञानविषयक सांप्रदायिकता नष्ट होईल अशी मला खात्री नाही. संकुचित दृष्टिकोनाच्या मंडळींचा ज्या सत्याबद्दल उत्कट भाव आहे ते सत्य, जणू काय दुसरे कोणतेही सत्य, निदान पहिल्या सत्याला मर्यादित करील अगर मुरड घालील असे सत्य, जगामधे अस्तित्वात नाही, अशा आविर्भावाने आग्रहाने सांगितले जाईल, लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होईल व या नाही त्या मार्गाने कृतीत उतरवण्याचाही प्रयत्न होईल. मतांच्या ठिकाणी सांप्रदायिकता निर्माण करण्याची प्रवृत्ती आहे, ती खुल्या चर्चेने दूर होत नाही; उलट पुष्कळ वेळा वाढते व अनिष्ट स्वरूप धारण करते हे मला मान्य आहे. ज्यांना विरोधक लेखले त्यांनी त्याचा प्रचार केला म्हणून, सहजगत्या जे लक्षात यायला हवे होते पण आले नाही, अशा सत्याचा देखील पुष्कळ वेळा जोरदार रीतीने धिक्कार केला जातो. मतामतामधील संघर्षाचा उत्तम परिणाम होतो तो एखादी बाजू घऊन आवेशाने लढणाऱ्यावर नव्हे तर बाजूला उभे राहून शांतपणे व निःपक्षपात बुद्धीने संघर्षाकडे पाहणारावर. सत्याच्या वेगवेगळ्या भागांमधील तीव्र संघर्षापेक्षाही जास्त वाईट गोष्ट कोणची असेल तर तो सत्याचा अर्धा भाग शांतपणे दडपून टाकण्याची. लोकांना दोन्ही बाजू ऐकाव्या लागतात तोवर आशेला जागा असत; एक

बाजू जेव्हा त्यांना ऐकायला मिळते त्यावेळी चुकांचे दुराग्रहात रूपांतर होते आणि सत्य देखील अतिशयोक्तीमुळे असत्य बनते व त्याचा सत्यासारखा परिणाम होत नाही. वकीलामार्फतीने एकच बाजू पुढे मांडली गेल्यानंतर दोन्ही बाजूंचा विचार करून बुद्धीला पटेल असा निर्णय देणारी न्यायबुद्धी इतकी विरळा आहे की सत्याला देखील समर्थक लाभल्याखेरीज न्याय मिळेल अशी खात्री देता येत नाही. ज्या प्रमाणात ते समर्थक सत्याची प्रत्येक बाजू, सत्याचा अणुमात्र अंश असणारे प्रत्येक मत, ऐकावे लागेल अशा पद्धतीने प्रतिपादन करतील त्याच प्रमाणात सत्याला न्याय मिळू शकेल.

मनुष्यजातीच्या मानसिक कल्याणासाठी (त्या कल्याणावरच इतर सर्व क्षेत्रातील सुस्थिती अवलंबून आहे) विचारांचे स्वातंत्र्य व विचार-प्रदर्शनाचे स्वातंत्र्य आवश्यक आहे ही गोष्ट आता आपल्याला पटली आहे. चार वेगवेगळ्या कारणांसाठी ते स्वातंत्र्य अवश्यक आहे. त्या कारणांचा पुन्हा संक्षेपाने उल्लेख करू या.

पहिले कारण असे की ज्या एखाद्या मताची मुस्कटदाबी केली ते, आपले ज्ञान इतके कोते असते की, कदाचित् खरे असू शकेल, हे नाकारणे म्हणजे आपली कधी चूक होणारच नाही असे मानण्यासारखे आहे.

दुसरे कारण असे की ज्या मताची मुस्कटदाबी केली ते चुकीचे असले तरी, आणि पुष्कळ वेळा तसे असते, त्याच्यात सत्याचा अंश असण्याची शक्यता आहे. कोणच्याही विषयावरील प्रचलित मतामधे पूर्ण सत्य कधीच किंवा बहुश: नसते. त्यामुळे भिन्न भिन्न मतांमधे संघर्ष होईल त्याच वेळी उरलेले सत्य पुढे येऊ शकेल.

तिसरे कारण असे की लोकमान्य मत खरे आहे, एवढेच नव्हे तर त्यामधे संपूर्ण सत्य आहे असे मानले तरी, जोवर त्याच्या विरुद्ध जोरदार व तळमळीचे आक्षेप घेण्याची मुभा नसते व ते प्रत्यक्षपणे घेतले जात नाहीत तोवर त्या मताच्या बहुसंख्य अनुयायांच्या मनात ते एखाद्या दुराग्रहासारखेच नांदेल आणि त्यांना त्याची आधारभूत अशी जी विवेक-

निष्ठ कारणे असतील त्यांची जाणीवही होणार नाही. आणि चवथे कारण म्हणजे असे की एवढे होऊनच थांबणार नाही तर त्या मताचा जो अर्थ आहे तो देखील कदाचित् नष्ट होईल आणि ते मत दुबळे बनून स्वभावावर व आचरणावर त्याचा जो परिणाम व्हायला हवा तो होणार नाही. ते मत ही एक वरवरची बडबड होईल, त्याचा कोणताही चांगला परिणाम होणार नाही. मनामधे ते एक अडगळीसारखे होऊन पडेल आणि विचारामुळे किंवा प्रत्यक्ष अनुभवामुळे मनामधे जी खरीखुरी व जीवाला पटलेली श्रद्धा वाढायला हवी ती वाढणार नाही.

विचारस्वातंत्र्याच्या विषयाची चर्चा पुरी करण्यापूर्वी कोणताही विचार व्यक्त करण्याचे पुरे स्वातंत्र्य असावे पण विचारप्रदर्शन सौम्य रीतीने व्हावे व योग्य चर्चेच्या मर्यादा कुणीही ओलांडू नये असे काही मंडळी म्हणतात त्याची दखल घेतली पाहिजे. चर्चेची योग्य मर्यादा निश्चित करणे किती कठीण आहे त्याबद्दल पुष्कळ बोलता येण्यासारखे आहे. ज्यांच्या मतांवर टीका होते त्यांचे मन दुखवले जाऊ नये ही मर्यादा घालण्याचे ठरविले तर अनुभव असा येतो की टीका परिणामकारक व प्रभावी ठरली की ताबडतोब मताचा जे पाठपुरावा करतात त्यांचे मन दुखवले जाते आणि त्यांच्यावर मात करणारा व ज्याला उत्तर देणे त्यांना कठीण जाते असा प्रत्येक विरोधक, त्या विषयावरील त्याच्या भावना उत्कट असतील तर, बेताल विरोधक आहे असे त्यांना वाटते. व्यवहारी दृष्टीने विचार केला तर महत्त्वाच्या वाटणाऱ्या या मुद्यावद्दल मूलभूत स्वरूपाचा एक आक्षेप आहे. एखादे मत, मग ते खरे असले तरी, व्यक्त करण्याची पद्धत निःसंशय आक्षेपार्ह असण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे तिची तीव्र निंदा होणे साहजिक आहे. परंतु या तऱ्हेचे मुख्य अपराध अशा प्रकारचे असतात की दैववशात् कुणी स्वतः होऊन आपल्यावर आरोप शाबित करून घेतल्याखेरीज तो शाबित होणे कठीण असते.

खोटे खरे भासविणारा युक्तिवाद करणे, घटना अगर मुद्दे दडपून टाकणे, एखाद्या प्रकरणातील वेगवेगळ्या भागांबद्दल चुकीची विधाने करणे अगर विरोधी मताबद्दल गैरसमज पसरवणे हे या बाबतीतील मोठे अपराध. परंतु हे सर्व प्रकार, त्यांच्या अतिशय आक्षेपार्ह स्वरूपात देखील, ज्यांना अज्ञानी अगर अयोग्य म्हणता येणार नाही व म्हणणे योग्य ठरणार नाही अशा मंडळींकडून, इतके वेळा व इतक्या सद्भावनेने घडत असतात, की त्यांच्यावर नैतिकदृष्ट्या ते शिक्षार्ह आहेत असा सर्व गोष्टींचा विचार करून छाप मारणे सदसद्विवेक बुद्धीला पटणार नाही. अशा तऱ्हेच्या वादातील दुर्वतनाबद्दल हस्तक्षेप करणे कायद्याला तर मुळीच जमणार नाही. कडक शब्द वापरणे, टोमणे मारणे, वैयक्तिक स्वरूपाचे उल्लेख करणे वगैरे जहाल चर्चेचे प्रकार आहेत ते दोन्ही पक्षांनी निषिद्ध मानले तर त्या निषेधाबद्दल सहानुभूती वाटेल, पण सध्या जी इच्छा दिसते ती प्रचलित मतांच्या विरोधकांनाच ते प्रकार निषिद्ध असावेत अशी आहे. जी मते लोकमान्य नाहीत त्यांच्याविरुद्ध ते प्रकार वापरले तर लोकांना त्याचा राग येणार नाही. एवढेच नव्हे तर जो त्या प्रकारांचा उपयोग करील त्याची त्याने खूप कळकळ दाखवली व सात्विक संताप व्यक्त केला म्हणून बहुधा स्तुती देखील होईल. चर्चेला जहाल स्वरूप दिल्यामुळे अधिक नुकसान होते ते चर्चेचा रोख ज्यांना आपले संरक्षण करणे जास्त कठीण असते अशांच्याकडे वळतो तेव्हा. आणि या प्रकारांच्या उपयोगामुळे जो गैरफायदा मिळतो तो जवळजवळ नेहमीच लोकमान्य मतांच्या पदरात पडतो. अशा तऱ्हेच्या वादविवादात अत्यंत मोठा गुन्हा जर कोणता असेल तर तो वेगळे मत प्रतिपादन करणारे दुष्ट व अनीतिमान् माणसे आहेत असा त्यांच्यावर आरोप करण्याचा. लोकांना न आवडणारी मते प्रतिपादन करणारांची नेहमीच अशी निंदा होते, कारण सर्वसाधारणपणे त्यांची संख्या लहान असते व त्यांचे समाजात वजन नसते आणि त्यांना न्याय मिळावा अशी इच्छा बाळगणारे त्यांच्याखेरीज दुसरे कुणीही नसतात. प्रचलित मताविरुद्ध

आक्षेप घेणारांना मात्र हे शस्त्र वापरता येत नाही. स्वतःला धक्का पोचणार नाही अशा बेताने त्यांना ते वापरता येत नाही व वापरलेच तर ते त्यांच्या स्वतःच्या उद्दिष्टावरच उलटण्याची धास्ती असते. सर्वसाधारणपणे प्रचलित मतांच्या विरुद्ध जी मते आहेत त्यांच्या पुरस्कर्त्यांनी मुद्दाम सौम्य भाषा वापरली तरच त्यांचे म्हणणे कुणी ऐकून घेते, तसेच निष्कारण कुणालाही न दुखवण्याची खबरदारी त्यांनी कटाक्षाने घेतली पाहिजे. ही पथ्ये पाळण्यात थोडीशी जरी कुचराई झाली तरी त्यांचे पाऊल मागे पडल्यावाचून रहात नाही. प्रचलित मतांच्या बाजूने दुसऱ्या मतांची इतकी बेसुमार निंदानालस्ती होत असते की तिच्यामुळे अनेकांना वेगळी मते बाळगण्याचे व त्यांच्या प्रचारकांचे म्हणणे ऐकण्याचे धाडस होत नाही. सत्य आणि न्याय यांच्या दृष्टीने विरोधकांच्या जहाल टीकेपेक्षा ही निंदानालस्ती थांबविणे अधिक अगत्याचे आहे. आणि जर निवडच करायची झाली तर धर्मावर होणाऱ्या आक्षेपार्ह हल्ल्यापेक्षा पाखंडी माणसे व मते यावर होणाऱ्या आक्षेपार्ह हल्ल्यांना उत्तेजन मिळणार नाही अशी खबरदारी घेणे जास्त जरूरीचे आहे. कायदा आणि सत्ता यांनी या दोन्ही प्रकारांवर निर्बंध घालण्याच्या भानगडीत पडू नये हे उघड आहे. लोकमताने मात्र प्रत्येक बाबतीतील परिस्थिती काय आहे ते पाहून निर्णय द्यावा. वादातील कोणच्याही बाजूला एखादा मनुष्य असो, जर त्याच्या प्रतिपादनात दुष्टावा, हटवादीपणा, असहिष्णुता अगर सरळपणाचा अभाव दृष्टीस पडला तर त्याचा निषेध व्हायला हवा. आपल्या बाजूपेक्षा वेगळी बाजू एखाद्याने घेतली असली तरी देखील त्याच्या प्रतिपादनात वरील दोष आहेत की नाहीत हे त्याच्या बाजूचा विचार न करता ठरविले पाहिजे. तसेच विरोधक आणि त्यांची मते यांच्याकडे शांतपणे पाहणारा व ती असतील तशी प्रामाणिकपणे सांगणारा जो कुणी मनुष्य असेल, मग त्याची बाजू कोणतीही असो, त्याचा लोकमताने गौरव करायला हवा. त्या माणसाने मात्र विरोधी मतांना जे प्रतिकूल असेल त्याची अतिशयोक्ति

करता कामा नये व जे त्यांना अनुकुल असेल अगर अनुकुल आहे असे वाटत असेल ते मागे ठेवता कामा नये. सार्वजनिक चर्चेमधे जी नीती पाळायला हवी ती ही. तिचा पुष्कळ वेळा भंग होतो; तरी देखील आनंदाची गोष्ट ही की वादविवाद करणारी अनेक मंडळी ती नीती बऱ्याच मर्यादेपर्यंत पाळतात आणि त्यांच्याहूनही अधिक मंडळी ती मनोभावे पाळण्याचा प्रयत्न करतात.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रं/ 69/2
मंत्रालय.

प्रकरण ३ रे

# व्यक्तित्व, सुखी जीवनाची एक आवश्यकता

माणसांना मते बनविण्याचे आणि ती मते निःशंकपणे प्रदर्शित करण्याचे स्वातंत्र्य असणे किती आवश्यक आहे ते आपण पाहिले. तसेच ते स्वातंत्र्य मिळाले नाही अगर निर्बंध असतानाही त्याचा उपयोग केला गेला नाही तर माणसाच्या बौद्धिक व त्यामुळेच नैतिक स्वभावावरही कसा दुष्परिणाम होतो ते देखील आपण पाहिले आहे. आता त्याच कारणामुळे माणसाला आपल्या मताप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य लाभावे की नाही, ती मते कुणाचाही शारिरीक किंवा नैतिक अडथळा न होता कृतीत उतरण्याची संधी, जोवर त्यापासून होणारे सर्व नुकसान व दुष्परिणाम सहन करण्याची त्याची तयारी आहे तोवर, त्याला लाभावी की नाही याचा विचार करू या. शेवट उल्लेखिलेली जी अट आहे ती मात्र अपरिहार्य आहे. कृती मताइतकीच मोकळी असावी असे कुणीही म्हणत नाही. उलट ज्या मतप्रदर्शनामुळे गैर गोष्टी घडून येण्याला प्रत्यक्ष उत्तेजन लाभते त्या वेळी मतांना सर्वसाधारणपणे लाभणारे संरक्षण देखील नष्ट होते. धान्याचा व्यापारी गरीबांना भुके ठेवतो हे मत किंवा खाजगी मालमत्ता ही चोरलेली वस्तू आहे हे मत वर्तमानपत्रातून प्रदर्शित केले जाईल त्यावेळी त्याच्याविरुद्ध कोणचीही कारवाई होऊ नये; परंतु धान्यव्यापाऱ्याच्या घरासमोर जमलेल्या प्रक्षुब्ध जमावासमोर त्या मताचा पुकारा केला किंवा एखाद्या फलकावर ते मत लिहून त्यांच्यामधे तो फलक फिरवला तर ते कृत्य दंडार्ह ठरणे योग्य आहे असे म्हणावे लागते. योग्य कारणाशिवाय इतरांचे नुकसान घडवून आणणाऱ्या कृत्याबद्दल माणसांना नापसंती वाटणे

साहजिक आहे; आणि महत्त्वाच्या कृत्यांच्या बाबतीत माणसांनी ती प्रत्यक्ष हस्तक्षेप करून थांबवणे देखील जरूरीचे असते. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर ही मर्यादा अवश्य हवी की तिने दुसऱ्याला त्रास होईल असे काही करता कामा नये. दुसऱ्याचा ज्यांच्याशी संबंध येतो अशा बाबतीत एखाद्याने दुसऱ्याला त्रास दिला नाही तर स्वतःशीच ज्यांचा संबंध येतो अशा बाबतीत स्वतःच्या मर्जीप्रमाणे व विचाराप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य त्याला का लाभू नये ? मतस्वातंत्र्याची इष्टता ज्या कारणामुळे सिद्ध होते त्याच कारणामुळे, जोवर मनुष्य कृतीचे परिणाम सहन करायला तयार आहे तोवर, आपली मते कृतीत उतरवण्याचे स्वातंत्र्य त्याला लाभले पाहिजे. माणसांच्या चुका होतात, त्यांनी स्वीकारलेली सत्ये पुष्कळ वेळा अर्धसत्ये असतात, वेगवेगळ्या विरोधी मतांचा पुरा व अनिर्बंध विचार केल्याखेरीज मतैक्य निर्माण करणे इष्ट नसते, आणि सत्याच्या सगळ्या बाजू समजण्यासाठी जी कुवत लागते ती आजच्यापेक्षा पुष्कळपटीने वाढल्याखेरीज मतवैचित्र्य अनिष्ट नसून इष्ट आहे हे विचार माणसांच्या मताला जितके लागू पडतात तितकेच त्यांच्या कृतींनाही लागू पडतात. माणसे अपूर्ण आहेत तोवर मतवैचित्र्य जसे इष्ट, तसेच त्यांच्या जीवनाच्या वेगवेगळ्या तऱ्हा देखील इष्ट; तोवर वेगवेगळ्या स्वभावांना, दुसऱ्यांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने, पुरा वाव लाभावा; तोवर एखाद्याला विशिष्ट पद्धतीने आयुष्य कंठायचे असेल तर त्याला ती मुभा असावी आणि त्या पद्धतींचे मूल्यमापन प्रत्यक्ष अनुभवाने व्हावे. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे असे की ज्या गोष्टींचा प्रामुख्याने दुसऱ्यांशी संबंध येत नाही त्या बाबतीत व्यक्तीची इच्छा निर्णायक ठरावी. जिथे स्वतःच्या इच्छेऐवजी परंपरा अगर रूढी यांच्या-प्रमाणे माणसाला वागावे लागते तिथे त्याच्या सुखाला आवश्यक असा जो एक महत्त्वाचा भाग तो नष्ट होतो आणि वैयक्तिक व सामाजिक प्रगतीसाठी ज्याची मोठी गरज तो भागही नष्ट होतो.

या तत्त्वाबद्दल आग्रह धरण्यात मोठी अडचण येते ती साध्य साधण्यासाठी कोणते साधन वापरावे ही नसून साध्याबद्दलच आढळून येणारी सार्वत्रिक अनास्था. व्यक्तित्वाची अनिर्बंध वाढ होणे हा सुखाचा एक महत्त्वाचा भाग आहे हे मान्य झाले असते, सुधारणा, बोध, शिक्षण, संस्कृती यांचा ती वाढ ही केवळ गोळाबेरीज नसून तिच्याखेरीज त्या नांदूच शकत नाहीत हे देखील मान्य झाले असते, तर स्वातंत्र्याला कमी लेखले जाईल अशी धास्ती निर्माण झाली नसती व स्वातंत्र्य आणि सामाजिक निर्बंध यांच्यामधील मर्यादा निश्चित करणे फारसे कठीण झाले नसते. पण अडचण आहे ती ही की प्रचलित विचार वैयक्तिक स्वयंस्फूर्तीला महत्त्व देत नाहीत, तिच्या ठिकाणी तिचे स्वतःचे असे काही गुण आहेत असे मानत नाहीत, आजच्या मनुष्यजातीच्या ज्या चालीरीती आहेत त्याच बहुसंख्य लोकांना योग्य वाटत असल्याकारणाने (कारण त्यांनीच त्या बनवलेल्या असतात), सर्वांनाच त्या चांगल्या आहेत असे का वाटू नये ते त्यांना समजत नाही. तसेच नैतिक व सामाजिक सुधारकांपैकी बहुसंख्य मंडळींनी स्वयंस्फूर्ती हे आपले उद्दिष्ट म्हणून स्वीकारलेले नसते; उलट ते तिच्याकडे असूयेच्या दृष्टीने पाहतात; स्वतःच्या विचाराने मानवी समाजासाठी उत्तम असे म्हणून त्यांनी ज्या काही गोष्टी ठरवलेल्या असतात त्यांच्यामधे विघ्न उत्पन्न करणारी बंडखोर वृत्ती या दृष्टीनेच ते स्वयंस्फूर्तीकडे पाहतात. राजकारणी पुरुष व विद्वान् या दोन्ही नात्यांनी विख्यात अशा विल्हेम फॉन हम्बोल्ट या तत्त्वज्ञाने एका निबंधाचे प्रमुख तत्त्व म्हणून जे पुढील विचार मांडले आहेत त्यांचा अर्थ जर्मनी बाहेरील फारच थोडयांच्या ध्यानात आला आहे : "मानव परिपूर्ण आणि सुसंवादी होईल अशा तऱ्हेचा त्याच्या अंगभूत शक्तींचा पुरा व समतोल विकास हेच मानवी जीवनाचे, क्षणिक आणि अस्पष्ट वासनांनी नव्हे तर शाश्वत व अचल बुद्धीने निर्दिष्ट केलेले, उद्दिष्ट आहे." म्हणून "व्यक्ती-व्यक्तीची शक्ती आणि

प्रगती यांची वाढ करण्याकडेच प्रत्येक माणसाने लक्ष पुरवले पाहिजे. ज्यांना आपल्या सभोवतालील मंडळींना वळण लावायचे असेल त्यांनी तर विशेषेकरून ते केले पाहिजे." हे करण्यासाठी "स्वातंत्र्य व परिस्थिति-वैचित्र्य" या दोन गोष्टींची आवश्यकता आहे. या दोन गोष्टी एकत्र आल्या की "वैयक्तिक जोम व नानातऱ्हेचे वैचित्र्य" निर्माण होतात आणि त्यांच्या संयोगातूनच "स्वतंत्र प्रज्ञेचा" जन्म होतो.

फॉन हम्बोल्ट याच्या सारख्या तत्त्वज्ञाचे विचार फारच थोड्या लोकांना माहीत असले आणि व्यक्तित्वाला त्याने दिलेल्या बहुमोल महत्त्वाबद्दल त्यांना आश्चर्य वाटत असले तरी विचार करावा लागतो तो तरतम भावाबद्दलच. एक-मेकांचे अनुकरण करणे हाच वरिष्ठ दर्जाचा सदाचार आहे अशी कुणाचीही कल्पना नाही. स्वतःचा स्वभाव किंवा स्वतःचा विचार यांची जीवनपद्धतीवर अगर व्यक्तिगत व्यवहारावर छाप पडू नये असे कुणीही म्हणणार नाही. उलट, आपण जन्माला येण्यापूर्वी जगामधे कुणाला काही माहीत नव्हते अशा पद्धतीने माणसाने रहावे अशी कल्पना करणे मूर्खपणाचे ठरेल; जणू काय एका जीवनपद्धतीपेक्षा दुसरी बरी अगर एका आचारापेक्षा दुसरा बरा हे अनुभवावरून कुणाला अद्याप कळलेलेच नाही. मानवी अनुभवाचे निष्कर्ष कळावे व त्यांचा फायदा घेता यावा अशा पद्धतीचे शिक्षण माणसांना तरुणपणी मिळावे हे कुणीही नाकारणार नाही. परंतु अनुभवाचा आपल्या पद्धतीने उपयोग करणे व त्याचा अर्थ लावणे हा ज्याची बुद्धी प्रगल्भ झाली आहे अशा प्रत्येक मनुष्याचा अधिकार आहे आणि त्यातच त्याचे मानव्य आहे. स्वतःच्या परिस्थितीला व स्वभावाला ज्ञात अनुभवांपैकी कोणता भाग योग्य रीतीने लागू पडतो हे पाहणे हे त्याचे काम आहे. इतरांच्या परंपरा व आचार यावरून अनुभवाने त्यांना काय शिकविले ते कळते; त्यांच्या शिक्षणाची पटण्यासारखी साक्ष, म्हणूनच त्या परंपरांकडे व आचारांकडे कुणीही आदराने पहावे. परंतु एकतर त्यांचा अनुभव संकुचित असण्याची शक्यता आहे आणि त्यांनी कदाचित् त्याचा अर्थ बरोबर लावला नसेल.

दुसरे म्हणजे अर्थ बरोबर असला तरी विवक्षित माणसाच्या परिस्थितीला तो लागू पडण्यासारखा नसेल. साधारण परिस्थितीसाठी आणि साधारण स्वभावाच्या माणसासाठी रूढी तयार होतात, आणि त्याची परिस्थिती व स्वभाव असाधारण स्वरूपाचा असेल. तिसरे म्हणजे रूढी जरी रूढी म्हणून चांगल्या व त्याला लागू पडणाऱ्या असल्या, तरी केवळ रूढी म्हणून त्यांचा स्वीकार केल्याने मनुष्याचे जे विशिष्ट गुण आहेत ते त्याच्या ठिकाणी वाढतील असे शिक्षण त्याला मिळत नाही किंवा त्याचा विकास होत नाही. मनुष्याच्या ठिकाणी जाणीव, सारासारविचार, तरतमभाव, बुद्धी, नैतिक आवड हे जे गुण आहेत त्यांची निवड करायची असेल त्याच वेळी उपयोग होऊ शकतो. रूढी आहे म्हणून जो एखादी गोष्ट करतो तो निवड करत नाही. चांगले कोणते ते शोधून काढण्याची व ते मिळावे अशी इच्छा बाळगण्याची त्याला सवय लागत नाही. आणि शारीरिक शक्तीप्रमाणे बौद्धिक व नैतिक शक्तीदेखील वापरामुळेच सुधारतात. दुसरे करतात म्हणून एखादी गोष्ट केल्याने किंवा दुसऱ्यांचा विश्वास आहे म्हणून एखाद्या गोष्टीवर विश्वास टाकल्याने स्वतःच्या ठिकाणी जी शक्ती आहे तिचा वापर होत नाही. एखाद्या मताची कारणे स्वतःच्या बुद्धीला न पटता जर त्या मताचा स्वीकार केला तर बुद्धीची शक्ती वाढण्याऐवजी ती कमी होते. आणि स्वतःच्या भावनाकडून व स्वभावाकडून ज्याला साथ मिळत नाही असे एखादे कृत्य केले ( ज्या कृत्याशी इतरांचे हक्क अगर जिव्हाळा यांचा संबंध नसतो ), तर त्याच्यायोगाने भावना व स्वभाव कृतिशील व उत्साही बनण्याऐवजी शिथिल व सुस्त बनतात.

आपल्या आयुष्याची योजना जो जगाला किंवा स्वतःशी संबंध येणाऱ्या जगाच्या भागाला आखू देतो त्याला माकडाच्या ठिकाणी आढळणाऱ्या नक्कल करण्याच्या गुणाखेरीज दुसऱ्या कोणत्याही गुणाची आवश्यकता नसते. आपल्या आयुष्याची योजना जो स्वतः ठरवतो त्याला आपल्या सर्व शक्तींचा उपयोग करावा लागतो. पाहण्यासाठी त्याला निरीक्षणशक्ती

वापरावी लागते, पुढे काय होईल त्याचा अंदाज घेण्यासाठी बुद्धी व सारासार विचार, निर्णयासाठी व आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी हालचाल, एखादी गोष्ट ठरवण्यासाठी विवेकबुद्धी व विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयानुसार वागण्यासाठी खंबीरपणा व आत्मसंयमन हे सारे गुण लागतात. स्वतःच्या विचारानुसार व भावनानुसार निश्चित केलेले आचरणाचे क्षेत्र जितके लहानमोठे असेल त्या प्रमाणात त्याला त्या गुणांची आवश्यकता भासेल व तो त्यांचा उपयोग करील. या गुणांचा उपयोग न करता त्याला चांगल्या मार्गाने जाता येईल व धोका टाळता येईल, पण मनुष्य म्हणून इतरांच्या तुलनेने त्याची किंमत काय राहील ? मनुष्ये काय करतात याच्या इतकेच कार्य करणारी माणसे कोणच्या तऱ्हेची आहेत याला महत्त्व आहे. मानवाच्या कृती निर्दोष व सुंदर बनवणे हे जे मानवाचे कार्य आहे त्यामध्ये पहिले महत्त्व जर कशाला द्यावयाचे असेल तर ते मानवाने स्वतःला सुधारण्याला. यंत्राने, किंवा यंत्रस्वरूपी मानवाने, घरे बांधता आली असती, धान्य वाढवता आले असते, लढाया लढवता आल्या असत्या, खटले चालवता आले असते, एवढेच नव्हे तर प्रार्थनामंदिरे उभारून तिथे प्रार्थना म्हणवता आल्या असत्या, तरी देखील आज जगातील अधिक सुधारलेल्या देशांमधे जी सदोष व अपूर्ण माणसे आढळतात-- ती माणसे खरोखरच निसर्ग ज्या तऱ्हेचा मनुष्य निर्माण करू शकतो किंवा शकेल त्याच्या निष्प्राण नमुन्यासारखी आहेत--त्यांच्याऐवजी ती यांत्रिक माणसे स्वीकारण्याने मोठे नुकसान होईल. नमुन्याबरहुकूम यंत्र बनवावे तसा मनुष्य व त्याचा स्वभाव बनवता येत नाही. अंगभूत शक्तीमुळे जिवंत बनलेले झाड जसे वाढते व सर्व बाजूंनी त्याचा विकास होतो तसे माणसाचे आहे.

माणसानी आपली बुद्धी वापरणे चांगले आणि, आंधळेपणाने व यांत्रिक पद्धतीने रूढीला चिकटून राहण्याऐवजी, जाणीवपूर्वक रूढी-नुसार वर्तन होणे आणि क्वचित् कधी जाणीवपूर्वक तिचा भंग होणे अधिक बरे हे सर्वसामान्यपणे मान्य होण्यासारखे आहे. जाणीव ही

स्वतःची असावी हे एका मर्यादेपर्यंत मान्य होते; पण आपल्या इच्छा व भावना या देखील आपल्या स्वतःच्या असाव्या हे तितके मान्य होत नाही. भावना स्वतःच्या असणे व त्या जोरदार असणे धोक्याचे आहे व तो एक पाश आहे अशीच सर्वसाधारण समजूत आहे. परिपूर्ण माणसाच्या ठिकाणी श्रद्धा आणि निर्बंध यांच्या बरोबरीने इच्छा आणि भावना यांचा देखील आढळ होतो; समतोल रहात नाही त्याच वेळी प्रबळ भावनामुळे धोका उत्पन्न होतो; ज्या वेळी एका तऱ्हेची उद्दिष्टे व प्रवृत्ती जोरदार होतात व त्यांच्यासह वाढायला पाहिजेत अशी दुसरी उद्दिष्टे व प्रवृत्ती कमजोर राहतात त्याच वेळी तो धोका निर्माण होतो. माणसांच्या इच्छा प्रबळ म्हणून ते वाईट रीतीने वागत नाहीत; त्यांची सदसद्विवेक बुद्धी कमजोर असते म्हणून ते तसे वागतात. प्रबळ भावना आणि कमजोर सदसद्विवेक बुद्धी यांच्यामधे कोणतेही नैसर्गिक नाते नाही. नैसर्गिक नाते असेल तर ते वेगळ्या तऱ्हेचे आहे. एखाद्या माणसाच्या इच्छा आणि भावना दुसऱ्याच्या इच्छाभावनापेक्षा बलवत्तर व बहुविध आहेत असे म्हणणे म्हणजे त्याच्या ठिकाणी मनुष्य-स्वभावासाठी लागणारा कच्चा माल अधिक प्रमाणात आहे असे म्हणण्यासारखे आहे. त्यामुळे तो कदाचित् अधिक दुर्वर्तनी होईल परंतु अधिक सद्वर्तनी होण्याचाच जास्त संभव आहे. प्रबळ भावना हे जोमदारपणाचे वेगळे नाव आहे. जोमदारपणाचा वाईट गोष्टीसाठी उपयोग होण्याची शक्यता आहे; पण आळशी व निष्क्रिय प्रवृत्तीपेक्षा जोमदार प्रवृत्तीमुळेच चांगल्या गोष्टी अधिक घडतात. नैसर्गिक भावना ज्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात असतात त्यालाच त्यांना वळण लावून जोरदार बनवता येते. ज्या तीव्र जाणिवेमुळे वैयक्तिक भावना स्पष्ट व जोरदार बनतात तिच्यामुळेच सद्वर्तनाबद्दल निरतिशय आवड व कठोर आत्मसंयमन निर्माण होते. हे गुण वाढवूनच समाजाला आपले कर्तव्य पार पाडता येते व हिताचे संवर्धन करता येते; मोठी माणसे ( heroes ) कशी तयार होतात ते माहीत नाही

म्हणून मोठी माणसे ज्यातून वाढतात त्या गुणांचा त्याग करून नव्हे. ज्यांच्या इच्छा आणि भावना स्वतःच्या आहेत– स्वतःच्या या अर्थाने की ज्या संस्कृतीत तो वाढला त्या संस्कृतीने घडवलेल्या त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्यांच्यामधे पडलेले असते– त्याला स्वत्व ( character ) आहे असे म्हणता येते. ज्याच्या इच्छा व भावना स्वतःच्या नसतात त्याला स्वत्व नसते, वाफेच्या एंजिनाला जसे स्वत्व नसते. भावना त्याच्या स्वतःच्या आहेत एवढेच नव्हे तर त्या जोराच्या आहेत, आणि त्यांच्यावर प्रबळ इच्छाशक्तीचे नियंत्रण आहे, असे घडले म्हणजे त्याच्याठिकाणी जोमदार स्वत्व आहे असे म्हणता येईल. व्यक्तिव्यक्तींच्या इच्छा व भावना वाढायला उत्तेजन लाभू नये असे जे म्हणतात त्यांना समाजामध्ये उत्कट प्रवृत्तीची माणसे वाढू नयेत व समाजातील व्यक्तींचा जोमदारपणा सर्वसाधारणपणे कमी असावा असे वाटते असे म्हणावे लागते. त्यांच्या दृष्टीने समाजामधे जोरदार स्वत्वाची माणसे कमी असणे समाजाच्या हिताचे असावे.

समाजाच्या पहिल्या काही अवस्थेमधे या जोरदार प्रवृत्तीच्या माणसांना शिस्त लावण्याएवढी व नियंत्रणात ठेवील अशी समाजाजवळ शक्ती नव्हती. एक काळ असा होता की ज्या वेळी स्वयंस्फूर्ती आणि व्यक्तित्व जरूरीपेक्षा जास्त वाढले होते आणि समाजाला त्यांना काबूत ठेवणे जड जात होते. शक्तिशाली शरीराच्या व मनाच्या व्यक्तींना त्यांच्यावर निर्बंध लादणाऱ्या नियमांचे पालन करायला लावणे कठीण जात होते. ही अडचण दूर करण्यासाठी कायदा व शिस्त यांना संपूर्ण माणसावर, त्याच्या संपूर्ण जीवनावर, सत्ता प्रस्थापित करावी लागली. सम्राटांच्या विरुद्ध झगडताना पोप्सना तेच करावे लागले. समाजाजवळ शक्तिशाली माणसांना काबूत ठेवण्यासाठी दुसरा मार्ग नव्हता म्हणून त्यांच्या स्वभावावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या सबंध जीवनावर नियंत्रण ठेवावे लागले. परंतु आता समाजाची व्यक्तीवरील सत्ता खूप वाढली आहे आणि सध्या धास्ती आहे ती, व्यक्तीच्या भावना व आवडीनिवडी या बेसुमार

वाढतील ही नसून, त्या फारच कमी होतील ही आहे. स्थानामुळे किंवा वैयक्तिक गुणामुळे वरचढ असलेल्या प्रबळ मंडळींच्या अनावर भावनांचे समाजाच्या कायद्याविरुद्ध व नियमाविरुद्ध नेहमी बंड चाललेले असे त्या काळातील परिस्थिती व आजची परिस्थिती यामधे महदंतर आहे. त्या वेळी त्या प्रबळांच्या कक्षेत येतील अशा सर्व मंडळींना थोडीशी तरी सुरक्षितता लाभावी म्हणून त्यांच्या भावनांवर कडक नियंत्रण ठेवावे लागत असे. आपल्या काळामधे समाजाच्या अगदी खालपासून वरच्या थरापर्यंत सर्वांना कठोर समालोचकाच्या कडक व विरोधी दृष्टीखाली रहावे लागते; दुसऱ्यांशी संबंध येईल अशा गोष्टींच्या बाबतीतच नव्हे तर स्वतःशी संबंध येईल अशा बाबतीतही. व्यक्ती व कुटुंब स्वतःला प्रश्न विचारतात ते असे नसतात की, मला काय आवडेल ? माझ्या स्वभावाला व तब्येतीला काय आवडेल ? किंवा माझ्यामधे जे उत्तम आहे त्याला योग्य वाव कसा मिळेल आणि त्याचा विकास कसा होईल ? हे प्रश्न विचारण्या-ऐवजी प्रश्न विचारले जातात ते असे : माझ्या दर्जाला शोभेसे काय आहे ? माझ्यासारखा ज्यांचा दर्जा व सांपत्तिक परिस्थिती आहे ते नेहमी काय करतात ? किंवा ( अधिक वाईट म्हणजे ) माझ्यापेक्षा ज्यांचा दर्जा व सांपत्तिक परिस्थिती वरचढ आहे ते सर्वसाधारणपणे काय करतात ? स्वतःच्या आवडीला रुचेल त्याऐवजी जे रूढ असेल तेच ते निवडतील असे म्हणावयाचे नाही; परंतु रूढ असेल त्या खेरीज दुसरे काही निवडण्याचे त्यांना सुचणारच नाही. याप्रमाणे मनच जुवाला जुंपलेले असते. आनंदासाठी म्हणून लोक जे करतात त्यामधे देखील चाकोरी-बाहेर पाऊल पडणार अशी खबरदारी घेतली जाते. गर्दीमधे राहण्यातच त्यांना आनंद वाटतो. सर्वसाधारणपणे ज्या गोष्टी केल्या जातात त्यांच्यातूनच ते एखादी निवडतात. आवडीनिवडीतील वैशिष्ट्य, वर्तनातील तऱ्हेवाईक-पणा, गुन्ह्यापासून दूर रहावे तसे त्यांच्यापासून दूर राहते. शेवटी असे होते की स्वभावानुसार कधीही न वागल्यामुळे त्यांना स्वतःचा स्वभाव

असा काही उरत नाही. त्यांच्यामधील मानवी गुण त्यांचे भरणपोषण न झाल्यामुळे विदीर्ण होतात. जोरदार भावना त्यांच्या मनात निर्माण होणे अशक्य होते; स्वाभाविक आनंदाचा त्यांना उपभोग घेता येत नाही; त्यांची स्वतःची अशी काही मते उरत नाहीत; तसेच स्वतःच्या मनात वाढलेल्या अशा काही भावनाही उरत नाहीत. मनुष्यस्वभावाची अशी गत होणे कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे ?

काल्व्हिनच्या सिद्धांतानुसार ही गोष्ट इष्ट आहे असे म्हणावे लागते. त्या सिद्धांताप्रमाणे माणसाचा मोठा गुन्हा जर कोणता असेल तर तो आत्मप्रवृत्तीचा ( self-will ). मनुष्यजातीमधे जर काही चांगले असेल तर ते सारे आज्ञापालनामधे सामावलेले आहे; तुम्हाला निवड करता येत नाही; अमुक एक तुम्हाला केलेच पाहिजे, दुसरे काहीही तुम्हाला करताच येणार नाही; " जे कर्तव्य म्हणून करणे नसेल ते सारे पाप आहे." मनुष्याचा स्वभाव मूलतःच दुष्ट आहे, म्हणून मनातील तो स्वभाव नष्ट केल्याखेरीज कुणालाही मुक्ती लाभणार नाही. जीवनाचे हे तत्त्वज्ञान स्वीकारलेल्या माणसाला मानवी गुण, शक्ती व जाणीव नष्ट करण्यात पाप आहे असे वाटणार नाही. परमेश्वरी इच्छेपुढे शरणागती पतकरण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही शक्तीची माणसाला गरज नाही. आणि परमेश्वरी इच्छेची परिणामकारक अमलबजावणी करण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कामासाठी तो आपल्या शक्तीचा उपयोग करणार असेल तर त्याच्याठिकाणी ती शक्ती नसणेच अधिक श्रेयस्कर. काल्व्हिनसंप्रदायाची ही विचारसरणी आहे. स्वतःला काल्व्हिनसंप्रदायी न म्हणवणाऱ्या अनेकांची देखील किंचित् मवाळ स्वरूपात तीच विचारसरणी आहे. मवाळ स्वरूप जे दृष्टीस पडते ते परमेश्वरी इच्छेवर संन्यस्त वृत्ती जरा कमी प्रमाणात लादण्यामधे. या मवाळ भाष्याप्रमाणे माणसांनी आपल्या काही आशाआकांक्षा पुऱ्या कराव्या अशी परमेश्वराची इच्छा असते. आशाआकांक्षा पुऱ्या करावयाच्या, पण त्या स्वतःला आवडेल अशा मार्गाने नव्हे तर आज्ञाधारकपणाने; जो मार्ग

निश्चित केला असेल त्या मार्गाने. म्हणजेच सर्वांनी आपल्या आशा-आकांक्षा पुरवाव्या, पण त्या एकाच पद्धतीने.

जीवनाकडे कोत्या दृष्टीने पाहण्याची पद्धत सध्या अशा या लबाडीच्या मार्गाने जोरात रूढ केली जात आहे. या पद्धतीमुळे उत्तेजन लाभते ते निस्तेज व संकुचित अशा मनुष्यस्वभावाला. पुष्कळांना खरोखरच असे वाटते की परमेश्वराने माणसे घडवली ती अशीच खुजी व बंदिस्त राहण्यासाठी. झाडांना नैसर्गिक पद्धतीने वाढू देण्याऐवजी त्यांची काटछाट केली, त्यांना वेगवेगळ्या प्राण्यांचे आकार दिले म्हणजे जशी काही मंडळींना ती झाडे अधिक आवडतात, तशातला हा प्रकार आहे. पण दयाळ देवाने माणसाला बनविले अशी जर धर्माची शिकवण असेल, तर त्या देवाने माणसाला ज्या शक्ती ( faculties ) दिल्या त्या त्यांचा उपयोग करून वाढवण्यासाठी, हे मानणे त्या कल्पनेशी अधिक सुसंगत होईल. त्या मुळापासून उपटून काढून नष्ट कराव्या अशी त्याची योजना असणे शक्य नाही. समजण्याची, कार्य करण्याची व आनंद उपभोगण्याची जी, त्याने निर्मिलेल्या मानवांच्या ठिकाणी शक्ती आहे, ती वाढून, निर्मितीच्या वेळी जे उद्दिष्ट पुढे ठेवले होते, त्या उद्दिष्टाच्या दिशेने माणसानी प्रगती केली तर देवाला आनंद होईल असे मानणेच अधिक सयुक्तिक होईल. काल्व्हिन-संप्रदायापेक्षा वेगळा असा एक मानवी उत्कर्षाबद्दलचा दृष्टिकोण आहे. या दृष्टिकोनाप्रमाणे मानवाला जे गुण लाभतात ते केवळ त्यांचा त्याग करण्यासाठी नव्हे तर इतर वेगळ्या कारणासाठी. ख्रिश्चन धर्मामधे सांगितलेल्या स्वसुखत्यागाइतकेच पेगन संस्कृतीतील सुखोपभोगालाही मानवी जीवनाच्या सार्थकतेत महत्त्वाचे स्थान आहे.* ग्रीक संस्कृतीमधे आत्मविकास हे एक उद्दिष्ट आहे. प्लेटोने व ख्रिश्चन धर्माने सांगितलेल्या आत्मनियंत्रणाच्या (self – government) उद्दिष्टाशी ते जुळते आहे. या दुसऱ्या उद्दिष्टाने ते पहिले उद्दिष्ट रद्द ठरवलेले नाही. आल्सिबिआंडिसपेक्षा जॉन नॉक्स होणे

* स्टर्लिंगचे निबंध ( Sterling's *Essays* )

अधिक बरे, परंतु त्या दोघांपेक्षाही पेरिक्लिस होणे अधिक चांगले. आणि आज जर आपल्यामधे पेरिक्लिस असता तर जॉन नॉक्समधे जे चांगले गुण होते ते त्याच्याही ठिकाणी दिसल्यावाचून राहिले नसते.

मनुष्य चिंतनाचा उदात्त व सुंदर विषय बनतो तो स्वतःच्या व्यक्तित्वाला घासून घासून सारखेपणाचा आकार देऊन नव्हे तर त्याची जोपासना करून व दुसऱ्यांचे हक्क व हितसंबंध यावर अतिक्रमण होणार नाही अशा रीतीने त्याचा विकास करून. आणि ज्याप्रमाणे कृती करणारांचे गुण कृतीला चिकटतात त्याच न्यायाने मनुष्यजीवन देखील व्यक्तित्वाच्या त्या विकासामुळे अधिक संपन्न, वैचित्र्यपूर्ण व सजीव बनते. ते जीवन उच्च विचार व उदात्त भावना यांचे पोषण करते व व्यक्ती आणि वंश (race) यांच्यामधील नाते दृढ करते. आणि त्याच्या योगाने वंशाच्या मोठेपणात भर पडून त्या वंशात आपण जन्मलो याचा प्रत्येक व्यक्तीला अधिक अभिमान वाटतो. ज्या प्रमाणात व्यक्तित्वाची वाढ होते त्या प्रमाणात स्वतःच्या दृष्टीने देखील माणसाचे महत्त्व वाढते आणि त्यामुळेच इतरांसाठी देखील तो अधिक मौल्यवान बनतो. त्याचे स्वतःचे जीवन अधिक संपन्न बनते. अशा तऱ्हेने व्यक्तीव्यक्तीमधे अधिक जिवंतपणा नांदू लागला की त्या सर्वांचा मिळून जो समाज बनतो तो समाज देखील अधिक जिवंत बनतो. बलवान् माणसानी दुसऱ्यांच्या हक्कावर अतिक्रमण करू नये यासाठी जे नियंत्रण हवे ते टाळता येत नाही, पण मानवी विकासाच्या दृष्टीने त्याची देखील थोडी भरपाई करता येते. इतरांना इजा होईल अशा पद्धतीने माणसाने आपल्या प्रवृत्तीनुसार वागू नये यासाठी त्याच्यावर जे बंधन घालावे लागते त्यामुळे विकासाच्या काही साधनांना तो मुकतो; पण ती साधने त्याने बहुशः दुसऱ्यांचा विकास रोखूनच मिळवलेली असतात. आणि स्वतःच्या दृष्टीने देखील त्याला बंधनाचा पुरा मोबदला मिळतो, कारण स्वतःपुरते पाहण्याच्या वृत्तीवर नियंत्रण पडल्याकारणाने स्वभावामधे जी समाजाभिमुख वृत्ती असते तिची चांगली वाढ होते. दुसऱ्यांच्या

हितासाठी न्यायाच्या कडक नियमांचे पालन केल्यामुळे मनुष्याच्या ठिकाणी दुसऱ्यांचे हित हेच ज्यांचे उद्दिष्ट आहे अशा भावना आणि शक्ती वाढू लागतात. पण त्यांच्या हिताशी संबंध नसलेल्या गोष्टींच्या बाबतीत, केवळ त्यांची गैरमर्जी होईल म्हणून, बंधने लादली गेली तर त्यापासून मोलाचा असा कोणताही परिणाम घडत नाही; कधी कधी घडते ते एवढेच की बंधनाविरुद्ध बंड पुकारण्याची वृत्ती निर्माण होते. बंधन बिनतक्रार मान्य केले तर स्वभाव मंद आणि बोथट होतो. वेगवेगळ्या मंडळींना आपले जीवन वेगवेगळ्या पद्धतीने घालवू दिले तरच प्रत्येकाला आपल्या प्रवृत्तींना खुला वाव देता येईल. ज्या कालखंडात माणसांना हे स्वातंत्र्य लाभले त्या कालखंडाचीच पुढच्या पिढ्यांना आठवण राहील. व्यक्ती प्रधान आहे ही कल्पना जोवर नांदत असते तोवर जुलुमशाहीमधे देखील तिचे वाईटातील वाईट परिणाम घडून येत नाहीत. व्यक्तित्व जी पद्धत नष्ट करते ती जुलुमशाही, तिला कोणच्याही नावाने संबोधले जावो आणि व्यक्तित्व नष्ट करण्यासाठी ती देवाची आज्ञा किंवा माणसांचा हुकूम कशाचाही उपयोग करो.

विकासानंतरही व्यक्तित्व तेच राहते. आणि व्यक्तित्वाच्या विकासामुळेच परिपूर्ण मनुष्य तयार होतो अगर होऊ शकतो एवढे सांगितल्यानंतर या मुद्यावरील युक्तिवाद पुरा होऊ शकतो. मानवी जीवनाची जी सर्वोत्कृष्ट अवस्था त्या अवस्थेजवळ माणसांना नेणारी ही परिस्थिती आहे. याखेरीज एखाद्या परिस्थितीबद्दल अधिक आणि जास्त चांगले काय बोलता येण्यासारखे आहे? आणि हे होऊ देत नाही या खेरीज चांगल्याला अडवणाऱ्या परिस्थितीबद्दल अधिक वाईट काय बोलता येईल? ज्यांना या गोष्टी पटवून देणे अगत्याचे आहे त्यांची बहुतेक या युक्तिवादाने खात्री पटणार नाही. त्यांच्यासाठी म्हणून आणखी हे दाखविणे जरूरीचे आहे की या विकसित माणसांचा अविकसित माणसांना खूप उपयोग होतो. ज्यांना स्वातंत्र्य नको आणि जे स्वातंत्र्य मिळाले तरी

त्याचा उपयोग करणार नाहीत त्यांना हे दाखवून द्यायला हवे की त्यांनी दुसऱ्यांना स्वातंत्र्य निर्वेधपणे उपभोगू दिले तर त्याचा फायदा, त्यांना कळेल अशा पद्धतीने, आज ना उद्या मिळाल्यावाचून राहणार नाही.

मग पहिल्याप्रथम मी असे सुचवू इच्छितो की पहिल्या मंडळींना दुसऱ्या मंडळींपासून काही शिकता येईल अशी शक्यता आहे. मानवी व्यवहारात कल्पकता ही मोठी मोलाची गोष्ट आहे हे कुणालाही नाकारता येणार नाही. नव्या सत्यांचा शोध लावण्यासाठी, व एकेकाळी जी सत्ये म्हणून समजली जात होती त्यांच्या ठिकाणी आता सत्यत्व उरले नाही हे दाखवण्यासाठी नेहमी माणसे लागतातच. ती माणसे नव्या चालीरीती देखील सुरू करू शकतात, आणि सुसंस्कृत आचार व अधिक सौंदर्यपूर्ण व अर्थपूर्ण जीवन यांचा आदर्श उभा करू शकतात. वागण्याच्या पद्धती व चालीरीती यांमधे उत्कृष्ट ते सारे जगाने अगोदरच मिळवलेले आहे असा ज्यांचा आग्रह असेल तेच फक्त ही गोष्ट नाकारू शकतील. समाजाला वळण लावण्याचे हे कार्य सर्वांनाच करता येत नाही हे खरे; सबंध मनुष्यजातीचा विचार केला तर अशी माणसे थोडीच निघतील की ज्यांनी केलेल्या प्रयोगांचे इतरांनी अनुकरण केले तर रूढ चालीरीतीमधे सुधारणा होऊ शकेल. पण ही थोडी माणसे महा मोलाची असतात; त्यांच्याविना मानवी जीवन हे कुजलेल्या पाण्याच्या डबक्यासारखे होईल. पूर्वी अस्तित्वात नसलेल्या कित्येक चांगल्या गोष्टी ते रूढ करतात, एवढेच नव्हे तर अस्तित्वात असलेल्या चांगल्या गोष्टीतील जिवंतपणा कायम ठेवतात. नवीन गोष्टी करण्याची जर आवश्यकता नसेल तर मानवी बुद्धीची आवश्यकता नष्ट होईल का? जुन्या गोष्टी करणारांनी त्या का करावयाच्या हे विसरून जावे आणि माणसाप्रमाणे त्या करण्याऐवजी जनावराप्रमाणे त्या कराव्या हे इष्ट आहे का? उत्तम समजुती आणि आचार यांना देखील पुष्कळ वेळा तांत्रिक कृतींचे स्वरूप प्राप्त होते आणि सदोदित नव्याचा शोध घेणारी मंडळी वरचेवर जन्माला आली नसती आणि त्यांनी

या समजुती व आचार यांच्या आधारांना केवळ परंपरागत स्वरूप येऊ दिले नसते तर त्यांच्यातील जिवंतपणा नष्ट झाला असता आणि या मृत समजुतींना व आचारांना जिवंत शक्तीकडून मिळालेला लहान धक्काही सहन करता आला नसता. आणि मग बायझंटाइनचे साम्राज्य कोसळले तशी आजची संस्कृती देखील कोसळली असती. अलौकिक प्रतिभेची मंडळी नेहमीच थोडी असतात, पूर्वी थोडी होती व यापुढेही थोडीच जन्माला येतील; पण ती हवी असतील तर ज्या परिस्थितीत ती वाढू शकतात ती परिस्थिती कायम ठेवली पाहिजे. प्रतिभावंतांना श्वासोच्छ्वास करता येतो तो स्वातंत्र्याच्या वातावरणात. इतरांच्या मानाने प्रतिभावंतांच्या ठिकाणी व्यक्तिवैशिष्ट्य अधिक असते. तापदायक अशा संकुचित अवस्थेत राहणे त्यांना अधिक कठीण जाते; सर्वसामान्य माणसांना आपला स्वभाव बनविणे कष्टाचे होऊ नये म्हणून समाजाने जे लहान लहान साचे तयार केलेले असतात त्यामधे स्वतःला बांधून घेणे त्यांना अशक्य होते. भित्रेपणामुळे त्यांनी जर एखाद्या साच्यामधे स्वतःला मारूनमुटकून बंदिस्त करून घेतले, तर त्या बंधनामुळे विकसित न होऊ शकणारा त्यांच्या प्रतिभेचा अंश तसाच अविकसित राहील आणि मग त्यांच्या प्रतिभेचा समाजाला जो फायदा मिळायला हवा होता तो मिळणार नाही. ज्यांची मनोवृत्ती कणखर असेल ते ती बंधने तोडतील; आणि मग त्यांना सर्वसामान्यांसारखे बनवण्यात अयशस्वी ठरलेला समाज, दुसऱ्यांना सावधगिरीची सूचना मिळावी म्हणून, त्यांना "रानटी," "तऱ्हेवाईक" अशी दूषणे देऊ लागेल. समाजाची ही तऱ्हा, डच लोकांनी बनवलेल्या कालव्याप्रमाणे दोन्ही बाजूंच्या बांधामधून संथपणे न वाहिल्याबद्दल, नायगारा नदीला दूषण देण्यासारखी आहे.

प्रतिभावंतांचे महत्त्व आणि विचारामधे व कृतीमधे देखील आपल्या प्रतिभेचा फुलोरा निर्बंधपणे फुलविण्याची त्यांना संधी देण्याची आवश्यकता यावर मी विशेष जोर देऊ इच्छितो. तत्त्व म्हणून ही भूमिका

कुणी नाकारणार नाही हे मी जाणतो, पण मला हे देखील माहीत आहे की साधारणपणे सर्वजण या बाबतीत खरोखर बेफिकीर असतात. प्रतिभेमुळे मन उद्दीपित करणारी कविता लिहिता आली अगर एखादे चित्र रंगवता आले तर प्रतिभा ठीक आहे असे लोकांना वाटते. विचारामधे व कृतीमधे नाविन्य निर्माण करणारी शक्ती हे जे प्रतिभेचे खरे स्वरूप ते लक्षात आले की तिचे कौतुक करू नये असे कुणी म्हणत नाही, पण बहुतेक सर्वांना मनापासून वाटते ते हेच की तिच्यावाचून आपले अडणार नाही. दुःखाची गोष्ट ही की ही समजूत इतकी नैसर्गिक आहे की तिचे कुणालाही आश्चर्य वाटू नये. जुन्या चाकोरीतून विचार करणारांना नाविन्याचा काही उपयोग असतो हेच पटत नाही. नाविन्य निर्माण करणारी शक्ती आपल्या काय उपयोगाची असे त्यांना वाटते. त्यांना तसे का वाटू नये? आपल्यासाठी ती काय करू शकते हे जर त्यांना कळले तर ती नवनिर्मात्री अशी शक्ती मुळी उरणारच नाही. नाविन्य निर्माण करणाऱ्या शक्तीचे पहिले काम त्यांचे डोळे उघडण्याचे. डोळे पुरे उघडले गेले म्हणजे ते देखील नवनिर्माते बनण्याची शक्यता आहे. प्रत्येक गोष्ट ही अगोदर कुणातरी एका इसमाने केलेली असते. आज अस्तित्वात असलेल्या सर्व चांगल्या गोष्टी शोधक बुद्धीमुळेच निर्माण झालेल्या आहेत हे लक्षात घेऊन व थोडा नम्रपणा मनात बाळगून त्यांनी ही धारणा बाळगावी की शोधक बुद्धीचे कार्य संपलेले नाही, तिला अद्याप काही गोष्टी साधावयाच्या आहेत. शोधक बुद्धीची उणीव ज्या प्रमाणात त्यांना भासत नाही त्या प्रमाणात त्यांना तिची गरज असते हे त्यांनी धरून चालावे.

खरोखरीच्या अगर कल्पिलेल्या मानसिक श्रेष्ठतेचा कितीही गौरव केला जावो किंवा केला जात आहे असे दाखविले जावो, जगभर जी प्रथा रूढ आहे ती सामान्यांच्या हाती समाजातील अधिकार

सोपवण्याची. पुराण काळात व मध्ययुगात आणि कमी कमी होत जाणाऱ्या प्रमाणात सरंजामदारीचे आजच्या युगात परिवर्तन होण्याच्या दीर्घ कालावधीत व्यक्तीच्या हातात काही सत्ता असे. आणि व्यक्ती बुद्धिशाली असली अगर समाजामधे तिचे स्थान मोठे असले तर तिच्या हातातील सत्ता मोठी असे. सध्याच्या काळात व्यक्ती गर्दीमधे हरवल्या जातात. लोकमत जगावर राज्य करते असे म्हणणे ही राजकारणातील एक क्षुल्लक गोष्ट आहे. जिला सत्ता असे नाव देता येईल ती सत्ता लोकांच्या हाती आहे आणि लोकांच्या प्रवृत्ती व भावना यांना मूर्त स्वरूप देणाऱ्या शासनसंस्थांच्या हाती आहे. सार्वजनिक व्यवहाराच्या बाबतीत हे जितके खरे आहे तितकेच खाजगी जीवनातील नैतिक व सामाजिक संबंधांच्या बाबतीत. ज्यांच्या मतांना लोकमत म्हणून मान्यता लाभते ते नेहमी एकाच तऱ्हेचे असतात असे नाही; अमेरिकेमधे लोक म्हणजे गोऱ्या कातडीची प्रजा, इंग्लंडमधे त्याचा अर्थ मध्यम वर्ग असा होतो. परंतु त्यांचा मिळून नेहमीच एक समुदाय बनलेला असतो, म्हणजेच सामान्य मंडळींचे एकत्र येणे घडलेले असते. आणि मोठ्या नवलाची गोष्ट ही की हा समुदाय आपली मते बनवतो तो राज्यसंस्थेतील किंवा धर्मपीठातील अधिकारी व्यक्ती, पुढारी अगर पुस्तके यांच्या सल्ल्याने नव्हे तर त्यांच्याच पैकी त्यांच्या सारख्याच, वर्तमानपत्रद्वारे आयत्या वेळी सुचेल तसे त्यांच्या नावाने बोलणाऱ्या, व्यक्तींच्या सल्ल्याने. त्यांची मते बनवितात त्या या व्यक्ती. मी या गोष्टीविरुद्ध तक्रार करतो असे नव्हे. मानवी मन सध्या ज्या निकृष्ट अवस्थेत आहे त्या अवस्थेत अधिक चांगले असे दुसरे काही सर्वसाधारणपणे संभवनीय आहे असे मी म्हणत नाही. परंतु सामान्यांचे शासन त्यामुळे सामान्य शासन झाल्यावाचून रहात नाही. लोकशाहीचे किंवा बहुसंख्य उमरावांचे राज्य, राजकीय कार्याच्या बाबतीत म्हणा किंवा ज्या मतांची, गुणांची वा मनाच्या कलाची ते जोपासना करते त्या बाबतीत म्हणा,

नेहमीच सामान्य दर्जाचे असते. याला अपवाद एकच की ज्या वेळी सर्व-सत्ताधारी बहुसंख्य लोक अनेक गुणसंपन्न व बहुशिक्षित अशा एकाच्या किंवा मूठभर मंडळींच्या सल्ल्याने व धोरणाने वागायला तयार होतात. (उर्जितावस्थेच्या काळात ते हा मार्ग नेहमीच स्वीकारतात.) सर्व शहाण-पणाच्या व उदात्त गोष्टींची प्रेरणा नेहमी व्यक्तींकडूनच मिळते आणि बहुतेक वेळी पहिली प्रेरणा तर एखाद्या व्यक्तीची असते. त्या प्रेरणेनुसार काम करणे यातच साधारण माणसाचा मान व वैभव आहे. चांगल्या गोष्टींना प्रतिसाद देणे व उघड्या डोळ्यांनी त्यांच्याकडे जाणे यातच त्याचे कल्याण आहे. बलशाली अशा प्रतिभावान् माणसाने जगाचे राज्य हस्तगत करावे आणि जगाच्या मनात नसतानाही आपल्या हुकुमाची त्याला ताबेदारी करायला लावावी असे मानणाऱ्या व त्याबद्दल बलशाली माणसाची वाहवा करणाऱ्या विभूतिपूजेची मला तरफदारी करावयाची नाही. बलशाली मनुष्य मागू शकतो ते फक्त मार्गदर्शनाचे स्वातंत्र्य. त्या मार्गाचा अवलंब केलाच पाहिजे अशी सक्ती करणे म्हणजे इतरांचे स्वातंत्र्य व विकास यांचा अवमान करण्यासारखे आहे. अशा सक्तीमुळे बलशाली माणसाचीही अवनती होते. सामान्य माणसांच्या समुदायांच्या मतांना जेव्हा निर्णायक महत्त्व प्राप्त होते अगर होऊ लागते त्या वेळी त्यांचे पारडे जड होऊ नये म्हणून व त्या प्रवृत्तीवर इलाज म्हणून विचारांच्या बाबतीत जे उन्नत पदावर आहेत त्यांनी आपल्या व्यक्तिवैशिष्ट्याचा अधिकाधिक आग्रह धरणे हाच एक उपाय आहे असे म्हणावे लागते. विशेषकरून अशा परिस्थितीत असामान्य व्यक्ती समुदायाच्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने वागल्या तर त्यांना रोखण्याऐवजी उत्तेजन द्यायला हवे. इतर वेळी त्यांनी तसे वागण्यात फायदा नाही, विशेषेकरून त्यांचे वागणे वेगळे आणि तसेच अधिक चांगले नसेल तर. या युगात वेगळ्या पद्धतीने वागणे, रूढी-पुढे मान वाकवायला नाकारणे हीच मोठी मोलाची गोष्ट आहे. मतांची अरेरावी माजल्यामुळे वेगळेपणा हा एक दुर्गुण बनलेला आहे. ती

अरेरावी नष्ट करण्यासाठी काही मंडळींनी वेगळे व तऱ्हेवाईक बनणे आवश्यक झाले आहे. कणखर वृत्तीची माणसे जिथे अधिक तिथे तऱ्हेवाईकपणाही अधिक दृष्टीस पडतो. समाजामधे ज्या प्रमाणात प्रतिभा, मानसिक जोम व नैतिक धैर्य असेल, त्या प्रमाणात तिथे तऱ्हेवाईकपणा वाढलेला दृष्टीस पडतो. फार थोडी माणसे तऱ्हेवाईक होऊ धजतात हे या काळातील मोठे संकट आहे.

रूढीबाहेरील आचरणाला पुरा वाव असावा असे मी म्हणतो ते याच उद्देशाने की कालांतराने कोणचे नवे आचरण रूढीमधे सामावून घेता येईल ते ठरविता यावे. कामाच्या अधिक चांगल्या पद्धती व सर्वांना स्वीकारता येतील अशा नव्या रूढी निर्माण व्हाव्या म्हणूनच केवळ कृतिस्वातंत्र्य लाभावे आणि रूढीबाह्य अशा वर्तनाला उत्तेजन दिले जावे असे माझे म्हणणे नाही. तसेच वरिष्ठ दर्जाची मानसिक श्रेष्ठता ज्यांच्या ठिकाणी आहे त्यांनाच आपल्या मर्जीनुसार जीवनाचा क्रम ठरविण्याचा हक्क आहे असे मला सांगावयाचे नाही. एकाच किंवा मूठभर साच्यानुसार सर्वांनी आपले आयुष्य चालवले पाहिजे असा आग्रह धरण्याचे कारण नाही. सर्वसाधारण ज्ञान व अनुभव असलेल्या माणसाने आपल्या आयुष्याची जी योजना आखली असेल ती उत्तम; वस्तुत: ती उत्तम आहे म्हणून ती उत्तम नव्हे; त्याने स्वत: ती तयार केली म्हणून ती उत्तम. माणसे मेंढरासारखी नसतात; आणि मेंढरे देखील एक दुसऱ्यापासून वेगळे करता येणार नाही इतकी सारखी नसतात. माणसाला बरोबर होईल असा कोट अगर बूट मिळणार नाही, त्याच्यासाठी ते बनवल्याखेरीज किंवा निवड करण्यासाठी हजारो कोट व बूट त्याच्यापुढे ठेवल्याखेरीज. बरोबर मापाचा कोट देण्यापेक्षा जीवनाचा आराखडा देणे सोपे आहे का ? माणसांच्या पायाच्या आकारातील सारखेपणापेक्षा शारीरिक व मानसिक गुणसमुच्चयामधे अधिक सारखेपणा असतो का ? माणसांच्या रुची भिन्न भिन्न असतात हे एक कारण देखील त्यांना एका नमुन्याबरहुकूम बनव-

ण्याचा प्रयत्न का करू नये ते सांगण्यास पुरेसे आहे. वेगवेगळ्या माणसांना त्यांच्या अध्यात्मिक विकासासाठी वेगवेगळ्या परिस्थितींची आवश्यकता असते. वेगवेगळ्या वनस्पती जशा एकाच भौतिक परिस्थितीत व हवामानात जगू शकत नाहीत त्याचप्रमाणे वेगवेगळी माणसे एकाच नैतिक वातावरणा-मध्ये निरोगी रीतीने राहू शकत नाहीत. एका माणसाला आपल्यामधील चांगुलपणाची जोपासना करण्यासाठी जे सहाय्यभूत ठरते तेच दुसऱ्या माणसाला पीडादायक ठरू शकेल. जीवनाच्या एका पद्धतीमुळे एखाद्या माणसाला निरोगी उत्तेजन लाभेल आणि कार्याच्या व उपभोगाच्या त्याच्या सर्व शक्ती उत्तम अवस्थेत राहतील; परंतु दुसऱ्याला तीच पद्धत आपले आंतरिक जीवन दडपून टाकणारी व मनाचा गोंधळ उडवून देणारी ओझ्यासारखी वाटेल. माणसांच्या अशा या नाना तऱ्हा असतात; त्यांची सुखाची कारणे वेगळी असतात, दुःखाच्या वेदना वेगळ्या असतात, आणि वेगवेगळ्या भौतिक व नैतिक कारणांमुळे त्यांच्यावर घडून येणारे परिणामही वेगळे असतात. म्हणून त्यांच्या जीवनाच्या पद्धतीत त्यांच्या स्वभावानुरूप वेगळे-पणा असल्याखेरीज जे सुख त्यांना मिळायला हवे ते त्यांना मिळणार नाही आणि त्यांच्या अंगभूत गुणानुरूप त्यांचा मानसिक, नैतिक व सांस्कृतिक दर्जा जसा वाढायला हवा तसा वाढणार नाही. मग, जनतेच्या भावना लक्षात घेता, बहुसंख्य लोकांचा पाठिंबा आहे म्हणून ज्या आवडीनिवडींना व जीवनपद्धतीला मान्यता लाभते त्यांच्यापुरतीच सहिष्णुता का मर्यादित रहावी? (मठांची गोष्ट सोडून दिली तर) रुचीवैचित्र्याला कुठेही मान्यता नाही असे दिसत नाही. वल्हविणे, धूम्रपान, संगीत, शक्तीचे प्रयोग, बुद्धिबळे, पत्ते किंवा वाचन कुणाला आवडो अगर न आवडो, त्या आवडीनिवडीबद्दल कुणी कुणाला दोष देत नाही. या गोष्टीं-पैकी प्रत्येक गोष्ट आवडणारे व न आवडणारे लोक इतके आहेत की त्यांना दडपून टाकता येणार नाही. परंतु एखाद्या पुरुषाने, विशेषेकरून एखाद्या स्त्रीने, "दुसरे कुणी करत नाही" अशी एखादी गोष्ट केली किंवा "सर्व

जण करतात " अशी एखादी गोष्ट केली नाही, तर त्याने अगर तिने एखादा गंभीर स्वरूपाचा नैतिक गुन्हा केला अशा तऱ्हेची निंदाव्यंजक ओरड त्याच्या अगर तिच्या विरुद्ध सुरू होते. एखादी पदवी असली अगर दुसरे एखादे मान्यतेचे चिन्ह असले किंवा प्रतिष्ठित लोकांचा पाठिंबा असला तरच एखाद्याला समाजातील प्रतिष्ठेला धक्का न पोचता, आपल्या मनासारखे वागण्याचे ऐश्वर्य थोडेबहुत भोगता येते. थोडेबहुत असे मी मुद्दाम पुन्हा सांगतो, कारण जो कुणी ते मोठ्या प्रमाणावर करील त्याला निंदेच्या भाषणापेक्षा जास्त मोठ्या शिक्षेला तोंड देण्याची तयारी ठेवावी लागेल. त्याच्या बाबतीत एखादी समिती नेमून त्याला वेड लागले आहे असे ठरवण्यात येईल व त्याची मालमत्ता नातेवाइकांमधे वाटली जाईल. त्याच्यावर हे संकट देखील गुदरण्याची शक्यता आहे.*

---

* गेल्या काही वर्षांत ज्या पुराव्याच्या बळावर एखाद्याला कोर्टा-मार्फतीने आपल्या व्यवहारांची काळजी घेण्यास असमर्थ ठरवण्यात येते त्यामधे तिरस्कारार्ह आणि भीतिदायक असे बरेच आहे. आणि त्याच्या मरणानंतर त्याने केलेली आपल्या मालमत्तेची व्यवस्था फिर्याद करून रद्द ठरवता येते. फिर्यादीचा खर्च बाहेर पडेल एवढी मालमत्ता मात्र असली पाहिजे कारण तो खर्च मालमत्तेतून वसूल व्हावयाचा असतो. त्या माणसाच्या दैनंदिन जीवनातील लहानसहान गोष्टींचीही तपासणी होते आणि कनिष्ठा-तील कनिष्ठ मंडळींच्या पाहण्याच्या व वर्णन करण्याच्या शक्तींच्या द्वारे पाहता जे नेहमीपेक्षा थोडेसेही वेगळे आढळेल ते पंचांपुढे वेडेपणाचा पुरावा म्हणून ठेवले जाईल. पुष्कळ वेळा हा पुरावा निर्णयिक समजला जातो कारण पंच पुष्कळ वेळा साक्षीदाराइतकेच अडाणी व बाष्कळ असतात. इंग्रज वकीलामधे जे आश्चर्यकारक स्वरूपाचे मानवी स्वभावाबद्दल व जीवनाबद्दल अज्ञान आढळते, तेच न्यायाधीशांचे ठिकाणी आढळते आणि त्यामुळे पंचांची दिशाभूल करण्याच्या कामी त्यांची खूप मदत होते. गावंढळ मंडळींच्यामधे मानवी स्वातंत्र्याबद्दल जे विचार व भावना प्रचलित आहेत त्यांचा या खटल्यावरून चांगला पत्ता लागतो. त्यांच्या हिशेबी व्यक्ति-

व्यक्तिवैशिष्ट्याचा तीव्रतेने प्रत्यय घडवील अशा कोणच्याही आचरणाकडे असहिष्णु दृष्टीने पाहण्याचा लोकमताचा सध्याचा रोख आहे. सर्वसाधारण माणसाची बुद्धिमत्ता सुमार असते व त्यांच्या प्रवृत्तीही तीव्र नसतात. कोणचीही जगावेगळी गोष्ट करावीशी वाटेल अशा त्यांच्या आवडीनिवडी व इच्छा नसतात. म्हणून तशा ज्यांच्या ठिकाणी असतात त्यांना ते जाणू शकत नाहीत आणि मग ज्यांच्याकडे तुच्छतेने पाहण्याची त्यांना सवय जडलेली असते अशा जंगली व बेशिस्त लोकांमधे ते त्यांची गणना करतात. या सर्वत्र आढळून येणाऱ्या प्रवृत्तीच्या बरोबरीने नीतिमत्ता सुधारण्याची जोरदार चळवळ सुरू झाली की मग काय घडून येईल त्याची सहज कल्पना करता येईल. सध्या अशी चळवळ सुरू झालेली आहे. सर्वांचे आचरण एकाच तऱ्हेचे असावे या दृष्टीने बरीच खटपट चालू आहे. तसेच अतिरेकी किंवा वेगळ्या तऱ्हेच्या आचरणाविरुद्ध नाखुषी प्रदर्शित केली जात आहे. शिवाय एक प्रकारची परोपकारी वृत्ती वाढली आहे. आपल्या बांधवांची नैतिक व व्यावहारिक सुधारणा घडवून आणण्याच्या

---

वैशिष्टयाला मोल नसते. तसेच ज्यांचे विशेष महत्त्व नाही अशा बाबतीत आपल्या विवेकशक्तीला व प्रवृत्तीना चांगले वाटेल त्याप्रमाणे वागण्याचा व्यक्तीला जो हक्क आहे त्याला देखील त्यांच्या हिशेबी मान नाही. त्यामुळे न्यायाधीश व पंच या दोघांनाही, वेड लागले, नसताही माणूस या स्वातंत्र्याची अपेक्षा करू शकतो हे मुळी पटतच नाही. पूर्वीच्या काळी पाखंडी मंडळींना जाळून टाकण्याचे योजिले जात असे त्यावेळी परोपकारी मंडळी त्या ऐवजी त्यांना वेडयाच्या इस्पितळात ठेवा असे म्हणत असत. सध्याच्या काळात ते घडले आणि लोकांनी टाळया वाजवून आपण होऊन आपले अभिनंदन करून घेतले तर नवल वाटायला नको. कारण धर्मासाठी कुणाचा छळ करण्याऐवजी त्या दुर्दैवी पाखंडी मंडळींना वागविण्याचा त्यांनी हा नवीन दयाळू व ख्रिश्चन धर्माला आवडेल असा मार्ग शोधून काढलेला आहे. हे करताना आपले फळ आपल्या पदरात पडले हे समाधान देखील त्यांना शांतपणे लाभते.

क्षेत्राइतके चांगले क्षेत्र त्या वृत्तीला दुसरे कोणते आढळणार ? आजच्या काळातील या प्रवृत्तीमुळे पूर्वी कधीही वाटले नसेल इतक्या तीव्रतेने लोकांना सध्या असे वाटते की आचरणाचे सर्वसाधारण नियम घालून द्यावे आणि मान्य केलेल्या मानदंडानुसार प्रत्येक जण वागेल अशी तजवीज करावी. आणि कोणचीही इच्छा जोरदार नसावी असा तो मानदंड आहे. कोणचेही डोळ्यात भरण्यासारखे वैशिष्ट्य अंगी नसावे ही त्या मानदंडाची चांगुलपणाची व्याख्या आहे. चीनी बायकांचे पाय बांधतात तसे स्वभावातील लक्षात येण्यासारखे आणि ज्यामुळे मनुष्य इतरापेक्षा फार वेगळा दिसतो असे जे गुण असतील त्यांची गळचेपी करून त्यांना निकामी बनवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

जे हवेसे असते त्याच्यापैकी निम्मा भाग वगळणाऱ्या आदर्शांबाबतीत नेहमी जे घडते ते सध्याच्या या लोकमान्यतेच्या मानदंडाबाबत घडत आहे. दुसरा जो अर्धा भाग आहे त्याची हिणकस नक्कल उठवली जात आहे. जोमदार विवेकबुद्धी जिला वळण लावते अशी प्रचंड कार्यशक्ती व सत्प्रवृत्त इच्छाशक्तीच्या नियंत्रणाखालील प्रबळ भावना निर्माण होण्याऐवजी आज निर्माण होत आहेत त्या दुबळ्या भावना व दुबळी कार्यशक्ती. बुद्धी अगर इच्छाशक्ती यांचा विशेष वापर न करता त्यांचे वरवर तरी निदान नियमाबरहुकूम वर्तन घडेल अशी तजवीज करता येते. उत्साहपूर्ण अशा व्यक्ती आजकाल मोठ्या प्रमाणावर दिसणे अगोदरच विरळ झाले आहे. या देशात क्रियाशक्ती (energy) दाखवण्यासाठी उद्योगधंद्याखेरीज दुसरे क्षेत्रही उरले नाही. त्या क्षेत्रात अद्याप देखील मोठ्या प्रमाणावर शक्ती खर्च केली जाते. नंतर जी काही उरते ती या नाही त्या छंदावर (hobby) खर्च केली जाते. तो छंद उपयोगी असू शकेल, क्वचित् प्रसंगी तो परोपकारी स्वरूपाचा असतो. परंतु तो नेहमी कोणच्या तरी एका गोष्टीबद्दलचा असतो आणि ती गोष्ट बहुतेक वेळा छोटी असते. इंग्लंडचा सध्याचा मोठेपणा आहे तो सर्व सामुदायिक

स्वरूपाचा आहे, पण एकत्र येऊन काम करण्याच्या सवईमुळे आपण काही मोठ्या गोष्टी करू शकू असा देखावा दिसतो. आपल्यातील जे नैतिक धार्मिक परोपकारवादी आहेत ते या परिस्थितीवर पुरे संतुष्ट आहेत. परंतु यापेक्षा वेगळ्या तऱ्हेच्या मंडळींनी आज जे इंग्लंड आहे ते निर्माण केले; आणि त्या इंग्लंडची अवनती थांबवायची असेल तर जी माणसे लागतील ती देखील वेगळ्या तऱ्हेची असावी लागतील.

रूढींचा जुलूम प्रत्येक ठिकाणी मानवी प्रगतीच्या आड येतो. परंपरागत गोष्टीपेक्षा काहीतरी नवीन चांगली गोष्ट करावी अशी जी प्रवृत्ती असते तिला रूढीचा कायमचा विरोध असतो. या प्रवृत्तीलाच परिस्थितीनुरूप स्वातंत्र्याची, प्रगतीची किंवा सुधारणेची आकांक्षा म्हणतात. सुधारणेची आकांक्षा ही नेहमीच स्वातंत्र्याची आकांक्षा असते असे नव्हे; कारण ज्याला सुधारणा नको आहेत त्याच्यावर त्या लादण्याचा कदाचित् तो प्रयत्न असेल. आणि त्या प्रयत्नाला विरोध करण्यासाठी स्वातंत्र्याच्या आकांक्षेची कदाचित्, सुधारणेला विरोध करणारी जी मंडळी असतील त्यांच्याशी, तात्पुरती व स्थानिक स्वरूपाची दोस्तीही घडून येईल. परंतु स्वातंत्र्य हेच सुधारणेचे कायम स्वरूपाचे आणि कधीही खंडित न होणारे असे उगमस्थान आहे. कारण स्वातंत्र्य प्रस्थापित झाले की जितक्या व्यक्ती तितकी सुधारणेची केंद्रे निर्माण होतात. प्रगतीचे तत्त्व, मग ते स्वातंत्र्याच्या आवडीच्या स्वरूपाचे असो की सुधारणेच्या आवडीच्या स्वरूपाचे असो, आणि रूढीचे स्वामित्व यामधे नेहमीच कट्टर विरोध असतो. रूढीच्या गुलामगिरीपासून मुक्तता लाभावी अशी त्या तत्त्वाची नेहमीच खटपट चाललेली असते. प्रगतीचे तत्त्व व रूढी यांच्यामधील संघर्ष हाच मानवी इतिहासाचा प्रमुख भाग आहे. जगाच्या मोठ्या भागाला इतिहास असा नाही कारण त्या भागावर रूढीचे संपूर्ण साम्राज्य होते. पूर्वेकडील देशांच्या बाबतीत तर हे पूर्णतया खरे आहे. तिथे रूढी हेच अखेरचे न्यायालय; रूढीप्रमाणे वागणे हाच न्याय आणि

तोच सदाचार; सत्तेने मदांध बनलेल्या जुलमी राजाखेरीज दुसऱ्या कुणालाही रूढीच्या विरुद्ध बोलण्याचा विचारदेखील सुचणार नाही आणि त्याचा परिणाम आपल्या दृष्टीस पडतो. त्या देशामधे सुरवातीला केव्हातरी कल्पकता होती. पुष्कळ लोकांची वस्ती असलेले, सुशिक्षित व जीवनातील अनेक कलांमधे वाकबगार अशी राष्ट्रे या नात्याने ते देश पृथ्वीच्या पोटातून काही एकदम वर आले नाहीत. त्या गोष्टी त्यांनी स्वतःच्या प्रयत्नांनी मिळवल्या आणि एकेकाळी ते देश जगातील मोठी व प्रबळ अशी राष्ट्रे होती. आता त्यांची काय अवस्था आहे? ज्या वेळी त्यांच्या पूर्वजांनी टोलेजंग राजवाडे व मंदिरे बांधली त्यावेळी ज्यांचे पूर्वज रानावनात भटकत होते त्या टोळ्यांचे ते आज प्रजाजन किंवा आश्रित बनून राहिले आहेत. त्या टोळ्यांचे वैशिष्ट्य एवढेच होते की रूढीचे जरी त्यांच्यावरती वर्चस्व असले तरी स्वातंत्र्य आणि प्रगती यांना देखील तिथे वाव होता. एखादा लोकसमुदाय काही काळ प्रगतीशील असू शकतो; आणि नंतर त्याची प्रगती एकदम बंद पडते. बंद पडण्याची ही क्रिया केव्हा घडते? जेव्हा त्या लोकसमुदायाच्या ठिकाणी व्यक्तित्व उरत नाही. युरपमधील देशांच्यावर ते संकट कोसळले तर त्याचा परिणाम अगदी सारखाच होईल असे नाही. रूढीच्या जुलुमामुळे त्यांच्यापुढे जे संकट उभे राहिले आहे ते स्थितिनिष्ठतेचे ( stationariness ) नाही. रूढी वेगळेपणावर ( singularity ) बंदी घालते; बदल ( change ) तिला चालतो, अट एवढीच की सर्वांनी एकदम बदलले पाहिजे. पूर्वजांच्या ठरलेल्या कपड्यांचा आपण त्याग केला आहे; प्रत्येकाला इतरांच्यासारखा पोषाख करावा लागतो, पोषाखाची तऱ्हा वर्षातून एकदा किंवा दोनदा बदलू शकते. जेव्हा बदल होईल तेव्हा केवळ बदलासाठी बदल घडून येईल, सौंदर्यासाठी किंवा सोईसाठी घडून येणार नाही अशी आपण काळजी घेतो. कारण सौंदर्य किंवा सोय यांच्याबद्दलची एकच कल्पना जगामधे सर्वांना एकाच वेळी सुचणार नाही आणि एकाच वेळी सर्व जण मिळून तिचा

त्याग करणार नाहीत. आपण प्रगतीशील आहो आणि परिवर्तनशील देखील आहो. तांत्रिक बाबतीत आपण सदोदित नवीन शोध लावत असतो आणि अधिक चांगल्या गोष्टींनी त्या मागे पडेपर्यंत आपण त्या कायम ठेवतो. राज-कारण, शिक्षण आणि नैतिक व्यवहार यामधे सुधारणा व्हावी अशी आपली उत्कट इच्छा आहे. नैतिक व्यवहारामधेही सुधारणा व्हावी असे वाटते, पण त्या सुधारणेबद्दलची कल्पना मात्र ही की इतरांनी आपल्यासारखे चांगले व्हावे. प्रगतीला आपला विरोध नाही; उलट आजवर होऊन गेलेल्या लोकांपेक्षा आपणच अधिक प्रगतीशील आहो अशी आपली फुशारकी आहे. आपले युद्ध आहे ते व्यक्तिवैशिष्ट्याशी. सगळ्यांना जर आपण एकसारखे बनवू शकलो असतो तर आपण एक चमत्कार घडवून आणला असे आपण समजलो असतो. ही समजूत करून घेताना आपण विसरतो ते हे की माणसामाणसामधे जो फरक असतो त्यामुळेच पहिल्या प्रथम आपल्या गटामधे ( type ) जे दोष आहेत त्यांच्याकडे, दुसऱ्या गटाच्या वरिष्ठपणाकडे आणि दोन्ही गटातील गुणांचे एकत्रीकरण करून दोघांपेक्षा चांगले असे काही तरी नवीन निर्माण करण्याकडे सर्वांचे लक्ष जाते. चीनच्या उदाहरणावरून आपल्याला सावध होता येईल. त्या राष्ट्रामधे पुष्कळ गुण होते आणि काही बाबतीत शहाणपणा देखील होता. अगदी सुरवातीच्या काळात काही रूढी प्रस्थापित होण्याचे भाग्य त्याला लाभले होते. अत्यंत सुबुद्ध अशा युरपिअन माणसाने देखील ज्यांना तत्त्वज्ञ म्हणून, काही एका मर्यादेपर्यंत, मान्यता द्यायला हवी अशा माण-सांचे ते थोड्याबहुत प्रमाणात कार्य होते. समाजातील सर्वांच्या मनावर जितके होईल तितके उत्तम ज्ञान बिंबवण्यासाठी व ते ज्ञान मोठ्या प्रमाणात ज्यांनी ग्रहण केले असेल त्यांनाच मानाच्या व सत्तेच्या जागा मिळवून देण्यासाठी त्यांनी जी उत्कृष्ट यंत्रणा निर्माण केली तिच्यावरूनही त्यांचे वैशिष्ट्य ध्यानात येते. ज्यांनी हे केले त्यांना मानवाची प्रगति-शीलता कशात आहेत त्याचा शोध लागायला हवा होता. आणि बदलत्य

जगाच्या अग्रभागी ते सदोदित असायला हवे होते. उलट ते जागच्या जागी उभे आहेत, गेली हजारो वर्षे त्याच परिस्थितीत आहेत, आणि यापुढे जर त्यांच्यामधे काही सुधारणा व्हायची असेल तर ती परदेशीयांनीच घडवून आणली पाहिजे. इंग्लंडमधील परोपकारी माणसे जे घडवून आणण्यासाठी— म्हणजेच सर्वांना एकसारखे बनवून सर्वांचे विचार व कृती एकाच उक्तीनुसार व नियमानुसार घडून येतील अशी योजना तयार करणे— म्हणूनच धडपडत आहेत ते घडवून आणण्यात त्यांनी अपार यश मिळविले; आणि त्याचे जे फळ त्यांच्या पदरात पडले ते हे असे, वर वर्णन केलेले. चीनमधील राजकीय व शैक्षणिक पद्धतीने संघटित रीतीने जे केले ते आजच्या युगातील लोकमताची राजवट असंघटित रीतीने करू पहात आहे. व्यक्तिवैशिष्टय या जुलमाला यशस्वी रीतीने तोंड देऊ शकले नाही तर युरपची चीनसारखी गत झाल्यावाचून राहणार नाही. उज्ज्वल इतिहास आणि ख्रिश्चन धर्म युरपला त्या दुर्गतीपासून बचावू शकणार नाहीत.

या अवस्थेपासून युरपचा आजवर जो बचाव झाला आहे तो कशामुळे ? मानवजातीचा स्थितिनिष्ठ भाग होण्याऐवजी युरपमधील राष्ट्रे प्रगतीशील भाग बनली आहेत ती कशामुळे ? त्या राष्ट्रामधे काही वरच्या दर्जाचे उत्तम गुण होते म्हणून नव्हे. हे उत्तम गुण जिथे ते अस्तित्वात असतील तिथे ते कारण म्हणून नसून परिणाम म्हणून आहेत. युरपमधील राष्ट्रे अशी बनली आहेत ती त्यांच्यामधे स्वभाव व संस्कृती यांचे डोळ्यात भरण्यासारखे जे वैचित्र्य दृष्टीस पडते त्यामुळे. व्यक्ती, वर्ग व राष्ट्रे एकमेकांपासून फार वेगळी आहेत. अनेक वेगवेगळे मार्ग त्यांनी स्वीकारले आहेत; प्रत्येक मार्गाच्या अखेरीस मौल्यवान/ असे काहीतरी असतेच; प्रत्येक कालखंडात एका मार्गाने जाणाऱ्यांना दुसऱ्या मार्गाने जाणाऱ्यांबद्दल दुःस्वास वाटत असला आणि सर्वांना आपल्याच एका मार्गाने जायाला लावता आले असते तर किती चांगले झाले असते असे वाटत असले तरी देखील एकमेकांचा विकास थांबविण्याचे कुणाचेही प्रयत्न कायमचे यशस्वी

झाले नाहीत व कालांतराने दुसऱ्यामधे जे काही चांगले असेल ते सामावून घेऊन प्रत्येक गट आपआपल्या परीने जिवंत राहू शकला. युरपची जी विकासात्मक व बहुविध स्वरूपाची वाढ झाली आहे ती मार्गांच्या या अनेकत्वामुळे असे माझे मत आहे. परंतु हितावह असे हे वैशिष्ट्य आता मोठ्या प्रमाणात कमी होऊ लागले आहे. सर्वांना सारखे बनवणे हे जे चीनचे उद्दिष्ट होते त्या दिशेने आता त्याची निश्चित वाटचाल सुरू झाली आहे. एम्. द. तॉकव्हिल यांनी आपल्या शेवटच्या महत्त्वाच्या पुस्तकात सध्याची फ्रान्समधील मंडळी मागच्या पिढीच्या मानाने देखील कशी अधिक एकमेकासारखी दिसतात त्याबद्दल लिहिले आहे. इंग्रजी माणसाबद्दलही ते विधान अधिक यथार्थतेने करता येईल. विल्हेल्म फॉन् हंम्बोल्टचे काही उद्‌गार अगोदरच उद्धृत केले आहेत. त्यामधे मानवी विकासासाठी स्वातंत्र्य आणि अनेकविध परिस्थिती या दोन गोष्टींची, त्यांच्यामुळे माणसे एकमेकापेक्षा वेगळी बनतात म्हणून, आवश्यकता आहे असे त्याने सांगितले आहे. दुसरी गोष्ट या देशात दिवसेदिवस कमी होत चालली आहे. वेगवेगळे वर्ग व व्यक्ती यांच्या भोवतालील परिस्थिती, ज्या परिस्थितीमुळे त्यांचे स्वभाव बनतात ती, दिवसेदिवस एकसारखी बनत चालली आहे. पूर्वीच्या काळी, वेगवेगळ्या दर्जाची मंडळी, वेगवेगळ्या मोहल्यात राहणारी मंडळी, वेगवेगळे कामधंदे करणारी मंडळी ज्यांना वेगवेगळे जग म्हणता येईल अशा भिन्न भिन्न जगात रहात होती. आता ते सर्व एकाच जगात राहू लागले आहेत. तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर आता ते सारखीच पुस्तके वाचतात, सारख्याच गोष्टी ऐकतात, सारख्याच गोष्टी पाहतात, सारख्याच ठिकाणी जातात, त्यांची आशा व धास्ती सारख्याच गोष्टीबद्दलची असते, त्यांचे हक्क आणि स्वातंत्र्ये एकसारखीच आहेत आणि ती हस्तगत करण्यासाठी जे उपाय योजावे लागतात ते देखील एकसारखेच आहेत. अद्याप देखील त्यांच्या परिस्थितीमधे खूप फरक आहेत, पण जे फरक नष्ट झाले त्याच्या मानाने आजचे फरक मह-

त्याचे नाहीत आणि एकीकरण वाढत चालले आहे. या युगातील राजकीय फेरबदलामुळे त्याला अधिक चालना मिळते, कारण त्या फेरबदलामुळे खाल-च्यांना वरती आणले जात आहे आणि वरच्यांना खाली ढकलले जात आहे. शिक्षणाच्या वाढीमुळेही एकीकरणाला मदत होते. शिक्षणामुळे माणसावर परिणाम होतो तो एकाच तऱ्हेचा असतो, त्यामुळे घटना आणि भावना यांचे जे एकच भांडार असते ते सर्वांना खुले होते. दळणवळणाच्या साधनां-तील सुधारणामुळे दूरदूर राहणाऱ्या मंडळींमधे वैयक्तिक संबंध प्रस्थापित होतात आणि माणसांना आपल्या रहाण्याच्या जागा वारंवार बदलता येतात. या घटनांचीही एकीकरणाला मदत होते. व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या वाढीमुळे बऱ्या स्थितीतील जीवनाचे फायदे आता अनेकांना मिळू लागले आहेत. महत्त्वाकांक्षेसाठी अनेक दालने खुली झाली असून चढाओढीच्या मार्गाने समाजातील वरीष्ठ जागा देखील कुणालाही मिळवता येतात. आपली परिस्थिती सुधारावी ही इच्छा एखाददुसऱ्या वर्गापुरती मर्यादित राहिली नसून सर्व वर्गांमधे ती इच्छा दृष्टीस पडते. माणसामधे सारखेपणा निर्माण करण्याच्या बाबतीत सर्वात अधिक परिणामकारक अशी शक्ती जर कोणची असेल तर ती या देशात व इतर सर्व स्वतंत्र देशात संपूर्णपणे प्रस्थापित झालेली राज्यव्यवस्थेतील लोकमताची अधिसत्ता. समाजातील वरिष्ठ दर्जामुळे काही जणांना लोकसमुदायाच्या मताकडे दुर्लक्ष करता येत असे, पण तो वरिष्ठ दर्जा आता क्रमाक्रमाने नष्ट होऊ लागला आहे. लोकांचे एक विशिष्ट मत आहे हे निश्चितपणे माहित झाल्यानंतर त्या मताला विरोध करण्याची प्रवृत्ती राजकारणी मंडळींच्या मनातून मोठ्या प्रमाणावर नष्ट होत चालली आहे. या कारणामुळे रूढीविरोधी वागणुकीला आता समाजामधे पाठिंबा लाभत नाही. समाजामधे आता अशी कोणतीही शक्ती नाही की जी, तिचा स्वतःचा केवळ संख्येच्या बळावर धोरणे निश्चित करण्याच्या पद्धतीला विरोध असल्याकारणाने, लोकमताशी विसंगत अशा मतांना व प्रवृत्तींना संरक्षण देऊ शकेल

या वेगवेगळ्या प्रवृत्तींची मिळून व्यक्तित्वाला विरोधी अशी एक प्रचंड शक्ती बनते की तिच्यापुढे व्यक्तित्व कसा टिकाव धरू शकेल ते समजणेही कठीण जाते. समाजातील बुद्धिमान् मंडळींना व्यक्तित्वाचे महत्त्व पटले नाही, समाजामधे वेगवेगळ्या प्रवृत्ती नांदणे— त्यांच्यापैकी काही कदाचित् जास्त चांगल्या नसतील व काही कदाचित् त्यांच्या मताप्रमाणे अधिक वाईट असतील— फायद्याचे आहे हे जर त्यांच्या ध्यानी आले नाही, तर व्यक्तित्वाला आपले आसन टिकवणे दिवसेदिवस जास्त जड जाणार आहे. व्यक्तित्वाची बाजू जर ठासून मांडावयाची असेल तर ती आताच मांडली पाहिजे, कारण धरून बांधून सर्वांना एकसारखे बनविण्याची क्रिया अद्याप पुरी झालेली नाही, तिच्यामधे अद्याप खूप पळवाटा आहेत. व्यक्तीत्वावर होणाऱ्या अतिक्रमणाला यशस्वी रीतीने आळा घालावयाचा असेल तर तो सुरवातीलाच घातला पाहिजे. सर्वांनी आपल्या सारखे बनावे या मागणीचा यश पदरात पडेल तसा जोर वाढत जातो. सगळे जीवन जवळजवळ एका साच्याचे होईपर्यंत जर वाट पाहिली आणि नंतर विरोधाला सुरवात केली, तर त्या साच्यापासून वेगळे असे जे जे काही दृष्टीस पडेल ते ते अधार्मिक, अनैतिक, राक्षसी व अनैसर्गिक आहे अशी ओरड सुरू होईल. वैचित्र्य पाहण्याची सवय बरेच दिवस मोडली म्हणजे माणसांना वैचित्र्याची कल्पनाही सुचेनाशी होते.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्र/५९/२
मंत्रालय

प्रकरण ४ थे

# व्यक्तीवरील समाजाच्या सत्तेच्या मर्यादा

व्यक्तीची स्वतःवर जी सत्ता असते तिच्या मग मर्यादा कोणत्या ? समाजाच्या सत्तेची सुरवात कुठे होते ? मानवी जीवनातील व्यक्तीच्या मालकीचा भाग कोणता व समाजाच्या सत्तेचा भाग कोणता ?

ज्याच्याशी त्याचा विशेष संबंध येतो त्याला तो भाग मिळाला की प्रत्येकाला योग्य तो भाग मिळाला असे म्हणता येईल. आयुष्याच्या ज्या भागाशी व्यक्तीचा विशेष संबंध येत असेल तो भाग व्यक्तीकडे जावा आणि ज्या भागाशी समाजाचा विशेष संबंध येत असेल तो समाजाकडे जावा.

समाज करारावर आधारलेला नाही हे खरे; तसेच सामाजिक जबाबदाऱ्या निष्पन्न व्हाव्या म्हणून करार शोधून काढण्यातही विशेष अर्थ नाही. तरी देखील समाजाचे संरक्षण ज्याला लाभते त्याने त्या फायद्याच्या बदल्यात समाजाला काहीतरी दिले पाहिजे व समाजामधे राहण्याबद्दल प्रत्येकाने दुसऱ्याशी वागण्याबद्दलचे काही नियम पाळले पाहिजेत हे स्पष्ट आहे. एकमेकांच्या हितसंबंधांना धक्का न लावणे, हितसंबंधांना म्हणजे कायद्याप्रमाणे किंवा सर्वांच्या समजुतीनुसार ज्यांना हक्कांचे स्वरूप प्राप्त झाले आहे त्यांना, हा त्या आचरणाचा पहिला भाग झाला. दुसरा भाग हा की समाजाच्या संरक्षणासाठी किंवा समाजातील व्यक्तींचे इजा आणि त्रास यापासून संरक्षण करण्यासाठी जो कष्ट आणि त्याग सहन करावा लागेल त्याच्यापैकी योग्य त्या भागाची जबाबदारी उचलणे. ( ही जबाबदारी न्याय्य तत्त्वानुसार निश्चित झाली पाहिजे. ) जी माणसे ही जबाबदारी पार पाडणार नाहीत त्यांच्यावर ती सक्तीने

लादण्याचा समाजाला अधिकार आहे. समाजाने एवढेच करावे असेही म्हणता येणार नाही. एखाद्या व्यक्तीच्या कृतीने दुसऱ्याला इजा पोचण्याचा संभव आहे, किंवा हक्कावर अतिक्रमण न करता ती करताना त्याने दुसऱ्याच्या सुखाकडे पुरेसे लक्ष पुरविले नसेल, अशा वेळी गुन्हा करणाराला कायद्याच्याऐवजी लोकमताने शिक्षा करणे योग्य ठरेल. माणसाच्या कृतीने दुसऱ्यांच्या हितसंबंधांना धक्का पोचला की ती बाब समाजाच्या अधिकाराच्या कक्षेत येते आणि मग त्या कृतीमधे ढवळाढवळ करून सार्वत्रिक हित साधते की साधत नाही याबद्दल वाद घालता येतो. पण जिथे एखाद्या माणसाच्या कृतीचा स्वतःखेरीज दुसऱ्याशी संबंध पोचत नाही किंवा त्यानी मनात आणल्याखेरीज त्यांच्याशी संबंध येण्याची आवश्यकता नाही तिथे हा प्रश्नच उपस्थित होत नाही. ( सर्व माणसे वयात आलेली आहेत आणि त्यांच्या ठिकाणी सर्वसाधारण ज्ञान आहे हे या बाबतीत गृहीत धरले आहे. ) अशा कृत्यांच्या बाबतीत ती कृत्ये करण्याचे व त्यांचे परिणाम भोगण्याचे व्यक्तीला पुरे कायदेशीर आणि सामाजिक स्वातंत्र्य हवे.

स्वतःचा स्वार्थ गुंतला नसेल तर माणसाना एकमेकांच्या चांगल्या आचरणाबद्दल किंवा स्वास्थ्याबद्दल काळजी करण्याचे कारण नाही अथवा माणसांचा एकमेकांच्या जीवनाशी काही संबंध नाही असे आपमतलबी औदासिन्य या सिद्धांतातून निष्पन्न होते असा अर्थ कुणी काढला तर ते अत्यंत चुकीचे ठरेल. इतरांचे भले व्हावे यासाठी निरपेक्ष प्रयत्न करणे कमी होण्याऐवजी वाढायला हवे. लोकांचे भले करण्यासाठी निरपेक्ष परोपकार बुद्धीने, खरेखुरे किंवा अलंकारिक, चाबूक व आसूड न वापरता दुसरी साधने वापरली पाहिजेत. आत्मनिष्ठ ( self-regarding ) सद्‌गुणांची मी कधीही अवहेलना करणार नाही; महत्त्वाच्या दृष्टीने सामाजिक सद्‌गुणांशी, त्यांची बरोबरी होत नसेल, तर दुसऱ्यापेक्षा खालचा क्रमांक लागणार नाही. दोन्ही सद्‌गुणांची जोपासना करणे

हे शिक्षणाचे कार्य आहे. पण शिक्षणाचे कार्य देखील खात्री पटवून देऊन व समजूत घालून जसे होते तसेच धाकधपटशहा दाखवून देखील होते. शाळेतील शिक्षणाची मुदत संपल्यानंतर आत्मनिष्ठ सद्‌गुण मनावर बिंबवण्याचा जो प्रयत्न व्हावयाचा तो खात्री पटवून देऊन किंवा समजूत घालूनच व्हायला हवा. माणसांनी चांगले आणि वाईट यामधे फरक करण्याच्या कामात एकमेकांना मदत केली पाहिजे आणि एकमेकांना चांगले स्वीकारण्याच्या व वाईट टाकण्याच्या बाबतीत उत्तेजन दिले पाहिजे. चांगल्या गुणधर्मांचा (higher faculties) अधिकाधिक विकास व्हावा यासाठी सर्वांनी एकमेकांना उत्तेजन द्यावे आणि माणसांच्या भावना आणि लक्ष वाढत्या प्रमाणात मूर्खपणाच्या ऐवजी शहाणपणाच्या व अवनत करणाऱ्याऐवजी उन्नत करणाऱ्या गोष्टींकडे व विचारांकडे आकृष्ट होईल अशी प्रत्येकाने खटपट करावी. परंतु ज्यांचे वय वाढले आहे अशा माणसांना स्वतःच्या फायद्यासाठी त्यानी आपल्या मर्जीप्रमाणे आपल्या जीवनाची व्यवस्था लावू नये असे सांगण्याचा एकाला किंवा अनेकांना अधिकार नाही. आपल्या खुशालीची प्रत्येक मनुष्य काळजी घेतो; त्याला वाटणाऱ्या काळजीच्या मानाने, व्यक्तिशः त्याच्यावर खूप प्रेम करणारी माणसे सोडली तर, इतरांना वाटणारी काळजी क्षुल्लक असते; समाजाला त्याच्याबद्दल जी काळजी (इतरांबरोबरील त्याचे आचरण सोडून) वाटते ती अल्प असते आणि अगदी अपरोक्ष स्वरूपाची असते; स्वतःच्या भावना व परिस्थिती याबद्दलचे ज्ञान मिळविण्याची साधने अगदी साधारण माणसाची अगर स्त्रीची गोष्ट घेतली तरी त्याच्या अगर तिच्या स्वतःजवळ जेवढी असतात त्यांच्या अल्पांशानेही दुसऱ्या कुणाजवळ असणे शक्य नाही. स्वतःशीच ज्यांचा संबंध आहे अशा गोष्टीबद्दलची एखाद्या व्यक्तीची मते आणि उद्दिष्टे त्याज्य ठरवण्यासाठी समाजाला जो हस्तक्षेप करावा लागेल तो केवळ सर्वसाधारण समजुतींच्या आधाराने. त्या सर्वसाधारण समजुती चुकीच्या असण्याची शक्यता आहे; आणि चुकीच्या नसल्या तरी प्रत्येक

बाबतीमध्ये त्या योग्य रीतीने लागू केल्या जातील अशी खात्री देता येत नाही. कारण बाहेरून त्या बाबतीकडे पाहणारांना संबंधित व्यक्तीपेक्षा त्यांच्याविषयी जास्त माहिती असणे शक्य नसते. म्हणूनच मानवी व्यवहारांच्या या क्षेत्रामध्ये वैयक्तिक निर्णयाला पुरा वाव मिळणे इष्ट आहे. माणसांचा एकमेकांशी जो व्यवहार होतो त्या व्यवहारात सर्वसाधारण नियमांचे बहुतांशाने पालन व्हावे, कारण दुसरा इसम आपल्याशी कसा वागेल या बाबतीत प्रत्येकाला काही अंदाज बांधता येणे आवश्यक आहे. परंतु वैयक्तिक बाबीपुरते मात्र प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विचारानुसार वागण्याचे पुरे स्वातंत्र्य हवे. निर्णय घेता यावा यासाठी विचार सुचविणे, इच्छाशक्ती बळकट करण्यासाठी उपदेश करणे या गोष्टीला मनाई नाही, वेळप्रसंगी त्या एखाद्या माणसावर लादता देखील येतील; पण निर्णय करण्याचा शेवटचा अधिकार हा त्याचा आहे. उपदेश आणि सूचना ध्यानात न घेता तो कदाचित् चुका करील; परंतु इतरांच्या समजुतीप्रमाणे जे चांगले ते त्याला त्याच्या मर्जीविरुद्ध करायला लावण्यात जे नुकसान आहे त्याच्यापुढे त्या चुकांमुळे घडून येणारे नुकसान काहीच नव्हे.

एखाद्या माणसाबद्दल इतरांचे जे मत बनते त्याच्यावर त्याच्या आत्मनिष्ठ गुणावगुणांचा परिणाम घडू नये असे माझे म्हणणे नाही. हे शक्य नाही व इष्टही नाही. स्वतःचे कल्याण साधेल अशा गुणांमध्ये जर तो वरचढ असेल तर साहजिकपणेच इतरांना त्याच्याबद्दल कौतुक वाटेल. मनुष्यस्वभावाच्या उत्कृष्टतेचा जो आदर्श आहे त्याच्या तो अधिक जवळ आहे असे मानले जाईल. ते गुण जर त्याच्या ठिकाणी फारच कमी प्रमाणात असतील तर त्याच्याबद्दल कौतुकाखेरीज वेगळी भावना निर्माण होईल. काही मंडळी इतकी मूर्ख असतात आणि त्यांच्या आवडीनिवडी (tastes) इतक्या हलक्या दर्जाच्या ( हा शब्द वापरणे विशेष योग्य नाही हे खरे ) व भ्रष्ट स्वरूपाच्या असतात की त्यांच्याबद्दल मनात नावड उत्पन्न होणे साहजिकच आहे; अगदी वाईट

मंडळींच्या बाबतीत मनामधे तिरस्कार देखील उत्पन्न होतो. हे क्षम्य असले तरी त्या कारणामुळे त्यांना इजा पोचेल असे मात्र काही घडता कामा नये. ती नावड किंवा तिरस्कार मनात उत्पन्न झाल्याखेरीज दुसरे जे स्वागतार्ह असे गुण आहेत त्यांची जशी पाहिजे तशी वाढ होणार नाही. कुणालाही त्रास न देता देखील मनुष्य अशा पद्धतीने वागू शकेल की जिच्यामुळे तो मूर्ख आहे किंवा हलक्या दर्जाचा आहे अशी त्याच्याबद्दल आपली भावना आणि समज होऊ शकेल. आणि आपली अशी भावना व समजूत होणे टळावे अशी त्याची इच्छा असल्याकारणाने त्याच्या कृतींच्या इतर अनिष्ट परिणामाप्रमाणेच या धोक्याची त्याला पूर्वसूचना देणे म्हणजे त्याचेच काम करण्यासारखे आहे. सध्याच्या शिष्टाचाराच्या संकेतामुळे अशी पूर्वसूचना देणे जड जाते. ही अडचण दूर झाली तर फार बरे होईल. एखाद्या माणसाला, शिष्टाचाराचा भंग न करता किंवा अहंमन्यतेचा देखावा न करता, दुसऱ्याला तू चुकतो आहेस असे प्रामाणिकपणे सांगता येण्याची सोय हवी. तसेच दुसऱ्याबद्दल आपला जो अनिष्ट ग्रह झाला असेल त्यानुसार वेगवेगळ्या तऱ्हेने वागण्याचेही आपल्याला स्वातंत्र्य हवे. ते स्वातंत्र्य हवे ते त्याचे व्यक्तित्व दडपण्यासाठी नव्हे तर आपल्या व्यक्तित्वाच्या आविष्कारासाठी. उदाहरणार्थ, त्याची संगत आपण केलीच पाहिजे असे नाही, त्याची संगत टाळण्याचा आपल्याला अधिकार आहे (त्या टाळण्याचा उगीच गाजावाजा मात्र करू नये.). कारण आपल्याला सर्वांत जास्त आवडेल अशा लोकांचीच संगत शोधणे हा आपला हक्क आहे. त्याच्या वर्तनाचा किंवा संभाषणाचा ज्यांच्याशी त्यांचा संबंध येतो, त्यांच्यावर दुष्परिणाम होण्याची धास्ती आहे असे आपल्याला वाटले तर त्याच्याबद्दल लोकांना सावधगिरीची सूचना देण्याचा आपल्याला हक्क आहे, एवढेच नव्हे तर कधी कधी ते आपले कर्तव्य देखील होईल. आपल्या मर्जीनुसार जी मदत आपण लोकांना देतो ती देण्यात त्याच्यापेक्षा इतरांना आपण

अग्रहक्क देऊ शकू. त्याच्यामधे सुधारणा घडवून आणतील अशा बाबीमधे मात्र तसा अग्रहक्क देऊ नये. अशा अनेक तऱ्हांनी केवळ स्वतःशीच संबंधित अशा दोषांसाठी एखाद्या माणसाला शासन सहन करावे लागेल. पण त्याला हे शासन सहन करावे लागते ते त्या दोषांचा साहजिक आणि सहजस्फूर्त परिणाम म्हणून, मुद्दाम दिलेली शिक्षा म्हणून नव्हे. ज्याच्या ठिकाणी उतावळेपणा, दुराग्रह, आणि आत्मप्रौढी आहे, जो मर्यादित उत्पन्नात आपला संसार चालवू शकत नाही, अपायकारक चैनबाजीपासून जो निवृत्त होऊ शकत नाही, भावना व बुद्धी यांच्या सुखाऐवजी जो केवळ इंद्रियसुखांच्या मागे धावतो त्याने लोकांमधे आपल्याला मान राहणार नाही व लोकांच्या अनुकूल मताचा फारच थोडा हिस्सा आपल्या वाट्याला येईल हे समजूनच चालायला हवे. पण याबद्दल त्याला तक्रार करता येणार नाही. सामाजिक संबंध उत्कृष्ट ठेवल्यामुळे त्याने लोकमत अनुकूल करून घेतले असेल तर मात्र गोष्ट वेगळी. मग स्वतःशीच संबद्ध असे जे त्याचे अवगुण असतील ते त्याला लोकांची मदत मिळण्याच्या आड येणार नाहीत.

स्वतःच्या हिताशीच ज्याचा संबंध आहे व स्वतःबरोबरील संबंधातून निर्माण होणाऱ्या इतरांच्या हिताशी ज्याचा संबंध पोचत नाही अशा एखाद्या माणसाच्या वागणुकीबद्दल व स्वभावाबद्दल इतरांच्या प्रतिकूल मतामुळे जी काय त्याची गैरसोय व्हायची असेल तेवढीच व्हावी, इतर कोणचीही होऊ नये एवढेच मला आग्रहाने सांगावयाचे आहे. इतरांच्या हिताला बाधक होतील अशा कृत्याबद्दल मूलतः वेगळा विचार केला पाहिजे. इतरांच्या हक्कावरील अतिक्रमण, स्वतःच्या हक्करक्षणासाठी केले असे देखील ज्याचे समर्थन करता येणार नाही असे दुसऱ्यांचे नुकसान करणे, दुसऱ्यांच्या बरोबर वागण्यातील खोटेपणा व दुटप्पीपणा, त्यांच्यातील कमीपणाचा अयोग्य व अनुदार फायदा, नुकसानीपासून त्यांचा बचाव करण्याच्या बाबतीत स्वार्थी माघार, ही सर्व कृत्ये नैतिकदृष्ट्या

निंद्य आहेत. विशेष गंभीर प्रसंगी नैतिकदृष्टया त्यांच्याबद्दल बदला घेणे अगर शिक्षा करणेही योग्य ठरेल. ही कृत्येच नव्हेत तर ती करण्याच्या पाठीमागील मनोवृत्ती देखील खरोखर अनैतिक असून त्यांच्याबद्दल नापसंती एवढेच नव्हे तर तिटकारा देखील वाटणे साहजिक आहे. क्रूर स्वभाव, हेवादावा व दुर्वर्तन, मनोविकारातील सर्वात अधिक समाजहित-विरोधी व ओंगळ असा मत्सराचा विकार, लपंडाव व खोटेपणा, अपुऱ्या कारणासाठी भांडखोरपणा, कारणाच्या मानाने अवास्तव असा संताप, दुसऱ्यांच्यावर अधिकार गाजवण्याची हाव, आपल्या हिश्याला येणाऱ्या फायद्यापेक्षा अनेक पटीने अधिक गिळंकृत करण्याची इच्छा, इतरांच्या अवनतीबद्दल आनंद बाळगणारा गर्व, स्वतःला व स्वतःच्या व्यवहारांना इतर सर्व गोष्टींपेक्षा अधिक महत्त्व देणारी आणि सर्व विवाद्य मुद्यांचा आपल्या बाजूने निकाल देणारी आत्मप्रौढी ( egotism ) हे सर्व नैतिक दुर्गुण आहेत आणि या दुर्गुणामुळेच मनुष्य नैतिकदृष्ट्या वाईट व अमंगळ ठरतो. पूर्वी उल्लेखिलेले आत्मनिष्ठ दोष नैतिक दुर्गुणामध्ये मोडत नाहीत. ते दोष कितीही वाढले तरी त्यांचे पर्यवसान दुष्टपणात होत नाही. त्यांच्यावरून एखादा मनुष्य खूप मूर्ख आहे अगर त्याच्या ठिकाणी आत्मप्रतिष्ठा किंवा स्वाभिमान नाही असे ठरत असेल; पण त्यांच्याविरुद्ध नैतिक निषेध व्यक्त करण्याखेरीज दुसरे काहीही करता येणार नाही, आणि तो निषेध देखील जेव्हा व्यक्तीने ज्यांच्यासाठी स्वतःची काळजी घ्यावयाची त्यांच्याविषयीच्या कर्तव्यात त्याची चूक होईल तेव्हाच व्यक्त करता येईल. स्वतःविषयीची जी कर्तव्ये असतात ती दुसऱ्या विषयीची कर्तव्ये बनतात तेव्हाच सामाजिकदृष्ट्या ती व्यक्तीवर बंधनकारक ठरतात. स्वतःविषयक कर्तव्याचा शहाणपणाखेरीज दुसरा जर काही अर्थ असेल तर तो स्वाभिमान व आत्मविकास एवढाच होऊ शकेल. या तिन्ही गोष्टींसाठी माणसाला दुसऱ्यापुढे जाब देण्याची आवश्यकता नाही. कारण मानवजातीच्या हिताच्या दृष्टीने विचार केला तर अशा गोष्टींच्या

बाबतीत माणसावर दुसऱ्यांना जाब दिला पाहिजे अशी जबाबदारी टाकणे जरूरीचे नाही.

शहाणपणा किंवा आत्मप्रतिष्ठा यांच्या कमीपणामुळे माणसाला जो अवमान सहन करावा लागतो त्याच्यामधे आणि दुसऱ्यांच्या हक्कावर अतिक्रमण केल्यामुळे जी निंदा सहन करावी लागते तिच्यामधे जो फरक आहे, तो केवळ शाब्दिक स्वरूपाचा नाही. ज्या बाबतीत निर्बंध लादण्याचा आपल्याला अधिकार आहे त्या बाबतीत आपल्या मनाविरुद्ध वर्तन घडले तर आपल्याला जे वाटेल आणि आपण ज्या पद्धतीने वागू त्याच्यामधे आणि तेच मनाविरुद्ध वर्तन आपल्याला ज्या बाबतीत बोलण्याचा अधिकार नाही हे आपल्याला माहिती आहे अशा बाबतीत घडले तर आपल्याला जे वाटेल आणि आपले जे वर्तन घडेल त्याच्यामधे खूप अंतर आहे. आपल्या मनासारखे घडले नाही तर आपण नापसंती व्यक्त करू आणि त्या माणसापासून अगर गोष्टीपासून आपण दूर राहू; परंतु त्यामुळे त्याचे जीवन असुखावह केले पाहिजे असे आपल्याला वाटणार नाही. स्वतःच्या चुकीची शिक्षा तो भोगत आहे किंवा भोगू लागेल असा आपण आपल्या मनाशी विचार करू; गैरव्यवस्थेमुळे त्याने आपले जीवन बिघडवले असेल तर त्याच कारणासाठी ते आणखी बिघडवले पाहिजे असे आपण इच्छिणार नाही; त्याला शासन करावे अशी इच्छा बाळगण्याऐवजी स्वतःच्या वर्तनामुळे तो स्वतःवर जी दुःखे लादून घेत आहे ती कशी टाळावी अगर दुरुस्त करावी हे त्याला दाखवून त्याच्या शासनाची तीव्रता कमी करण्याचीच आपण खटपट करू. त्याची आपल्याला दया येईल, कचित् प्रसंगी आपल्याला नावड उत्पन्न होईल; परंतु त्याच्याबद्दल आपल्याला राग किंवा संताप वाटणार नाही; आपण त्याला समाजाच्या शत्रूप्रमाणे वागवणार नाही. दयाळू दृष्टीने त्याच्या हिताकडे लक्ष पुरविणे अगर त्याच्याबद्दल काळजी वाटणे हे जर आपल्याला शक्य झाले नाही तर वाईटातील वाईट गोष्ट जी आपण करू ती हीच की त्याच्याकडे

दुर्लक्ष करून आपण त्याला मोकळे सोडू. समाजबांधवांच्या वैयक्तिक किंवा सामुदायिक संरक्षणासाठी केलेल्या नियमांचा त्याने भंग केला असता तर त्याला अगदी वेगळ्या पद्धतीने वागविले गेले असते. त्याच्या कृत्यांचे दुष्परिणाम मग त्याच्यापुरते मर्यादित रहात नाहीत, इतरांना त्यांची झळ लागते. समाजातील सर्व व्यक्तींच्या संरक्षणासाठी म्हणून मग समाजाला त्याच्याविरुद्ध कारवाई करावी लागते, शासन व्हावे म्हणून त्याला दुःख द्यावे लागते आणि ते दुःख जरूर तितके गंभीर स्वरूपाचे असेल अशी काळजी घ्यावी लागते. या वेळी तो गुन्हेगार म्हणून आपल्यापुढे उभा असतो; त्याच्या गुन्ह्याचा विचार करणे व आपण दिलेल्या शिक्षेची या नाही त्या तऱ्हेने अंमलबजावणी करणे हे आपले कर्तव्य ठरते. दुसऱ्या वेळी त्याला शिक्षा करणे हे आपले काम नसते. जे स्वातंत्र्य आपण त्याला देतो त्याच, व्यवहारांचे नियमन करण्याच्या आपल्या स्वातंत्र्याच्या उपयोगामुळे, जी काही त्याची गैरसोय होईल त्या पलीकडे दुसरे दुःख त्याच्यावर लादणे हे आपल्या कर्तव्यात मोडत नाही.

मनुष्याच्या जीवनामधे केवळ स्वतःशीच संबंधित आणि दुसऱ्याशी संबंधित असा जो फरक इथे केला आहे तो पुष्कळांना पटण्यासारखा नाही. समाजातील एका व्यक्तीच्या कोणत्याही वर्तनाबाबतीत इतर मंडळी अगदीच बेफिकीर कशी राहू शकतील ? ( असा प्रश्न विचारला जाईल ). कुणाशीही कसलाही संबंध नाही अशा अवस्थेत कुणालाही राहता येत नाही. स्वतःशी संबद्ध अशा मंडळींना व पुष्कळ वेळा इतर अनेक मंडळींना त्याचे दुष्परिणाम सहन करायला लावल्याविना स्वतःला गंभीर व कायम स्वरूपाची इजा होईल अशा तऱ्हेने कुणालाही वागता येत नाही. स्वतःच्या मालमत्तेची जर त्याने नुकसानी केली तर त्या मालमत्तेवर जे प्रत्यक्षपणे अगर अप्रत्यक्षपणे अवलंबून असतील त्यांना त्याने इजा केल्यासारखे होईल; आणि त्या नुकसानीमुळे समाजाचे जे धन ( resources ) असते त्याचीही कमी अधिक प्रमाणात हानी होते. स्वतःच्या शारीरिक व बौद्धिक

शक्तीचा जर त्याने क्षय होऊ दिला, तर ज्यांचे सुख त्याच्यावर अवलंबून आहे त्यांना तो दुःख देतो, एवढेच नव्हे तर सर्वसाधारणपणे आपल्या बांधवांची त्याने जी सेवा करायची ती सेवा करणेही त्याला अशक्य होते. त्याचा त्यांच्या प्रेमावर व मायाळूपणावर भार पडतो. आणि असे वर्तन जर नेहमीच घडत गेले, तर इतर कोणत्याही गुन्ह्यामुळे समाजहिताची जेवढी हानी होणार तेवढी त्याच्या त्या वर्तनामुळे होईल. आणि शेवटी दुर्गुणामुळे किंवा मूर्खपणामुळे त्याने इतरांचे प्रत्यक्ष नुकसान केले नाही तरीदेखील वाईट उदाहरण घालून दिल्यामुळे तो धोकादायक आहे (असे म्हटले जाईल.) म्हणून त्याचे वर्तन पाहून अगर त्याच्याबद्दल माहिती मिळाल्याने इतर मंडळी भ्रष्ट होऊ नयेत अगर कुमार्गाला लागू नयेत, यासाठी स्वतःवर निर्बंध लादून घेणे त्याला भाग पाडले पाहिजे.

शिवाय दुर्वर्तनाचे परिणाम जरी दुष्ट आणि अविवेकी माणसापुरते राहिले, तरी ज्यांना स्वतःला वळण लावता येत नाही हे उघड आहे, त्यांच्यावरतीच ती जबाबदारी समाजाने टाकणे योग्य होईल का, (असेही आणखी विचारले जाईल). मुले आणि वयात न आलेली माणसे यांचे त्यांच्या स्वतःपासून रक्षण करणे जर योग्य असेल, तर वयाने मोठी पण त्यांच्याच सारखी स्वतःचे नियंत्रण करण्यास असमर्थ अशा माणसाना ते संरक्षण देणे हे समाजाचे कर्तव्य नाही का ? जुगार, दारूने बेहोश होणे, बेताल वागणे, आळशीपणा किंवा अस्वच्छता यांच्यामुळे कायद्याने निषिद्ध ठरविलेल्या पुष्कळ अगर बहुतेक कृत्यांइतकाच सुखाला बाध येत असेल किंवा सुधारणेला व्यत्यय येत असेल, तर शक्य असेल तोवर व समाजाला सोईचे होईल तोवर कायद्याने त्या गोष्टी बंद पाडण्याचा प्रयत्न का करू नये ? (असेही विचारले जाईल). आणि कायद्यामध्ये अटळ अशा ज्या उणीवा असतात त्या भरून काढण्याच्या दृष्टीने लोकमताने त्या दुर्गुणांचा कडक बंदोबस्त का करू नये आणि ते दुर्गुण आचरणात आणणारी जी मंडळी असतील त्यांना सामाजिक स्वरूपाच्या जालिम शिक्षा का देऊ नयेत ? हे

करण्याने व्यक्तित्व नियंत्रित होते अगर जीवनाचे नवीन प्रयोग करण्यामधे अडचणी निर्माण होतात असे कुणालाही म्हणता येणार नाही ( असाही मुद्दा मांडला जाईल ). जगाच्या सुरवातीपासून आतापर्यंत ज्या गोष्टी करण्याचा प्रयत्न झाला व ज्या चुकीच्या आहेत असे ठरले व ज्या कुणाच्याही व्यक्तित्वाला उपयुक्त वा पोषक नाहीत असा अनुभव आला त्या आणि तेवढ्याच गोष्टी बंद पाडण्याचा हा प्रयत्न आहे. काही एका अवधीनंतर व अनुभवानंतर एखादे नैतिक वा शहाणपणाचे सत्य सिद्ध झाले असे म्हणता आले पाहिजे आणि हा जो प्रयत्न आहे तो पूर्वीच्या पिढ्यांनी ज्या चुका केल्या त्या पिढीमागून पिढीच्या हातून घडू नयेत एवढी खबरदारी घेण्याचा आहे.

एखादा मनुष्य स्वतःचे जे नुकसान करून घेतो त्याचा परिणाम हितसंबंधामुळे किंवा नात्यामुळे ज्यांच्याशी त्याचा जवळचा संबंध आहे त्यांच्यावर आणि लहान प्रमाणात समाजावरही होतो हे मला पूर्णपणे मान्य आहे. अशा तऱ्हेच्या वर्तनामुळे जेव्हा दुसऱ्याबद्दलची एखादी स्पष्ट व निश्चित जबाबदारी पार पाडता येत नसेल त्यावेळी ते कृत्य आत्मनिष्ठ अशा कृत्यांच्या सदरातून वगळावे लागेल आणि नैतिक निषेधाला ते वाच्यार्थाने देखील योग्य ठरेल. उदाहरणार्थ, असंयमामुळे किंवा उधळपट्टीमुळे एखादा मनुष्य आपले कर्ज फेडू शकत नसेल अगर कुटुंबाची नैतिक जबाबदारी पतकरल्यानंतर त्याच कारणामुळे त्याचे पालनपोषण वा शिक्षण करू शकत नसेल, तर त्याची निंदा होणे योग्य आहे; एवढेच नव्हे तर त्याला शिक्षा करणेही योग्य ठरेल. पण हे जे त्याला शासन घडते ते उधळपट्टीबद्दल नसून कुटुंबाबद्दलचे वा धनकोबद्दलचे कर्तव्य पार न पाडल्याबद्दल. हे कर्तव्य पार पाडण्यासाठी उपयोगात आणावयाचा पैसा त्या कामासाठी खर्च न करता फायदेशीर अशा उद्योगधंद्यात गुंतवला असता, तरी नैतिकदृष्ट्या ते तितकेच गर्ह्य ठरले असते. जॉर्ज बार्नवेलने रखेलीसाठी पैसा हवा होता म्हणून आपल्या चुलत्याचा

खून केला; धंदा उभारण्यासाठी म्हणून त्याने ते कृत्य केले असते तरी देखील त्याला फाशीचीच शिक्षा झाली असती. तसेच, पुष्कळ वेळा घडते तसे, वाईट सवईमुळे आपल्या कुटुंबाला दुःख देणाऱ्या माणसाची कठोरपणाबद्दल किंवा कृतघ्नपणाबद्दल निंदा होणे योग्य आहे. परंतु सवई वाईट नसल्या, पण ज्यांच्याबरोबर तो राहतो अगर वैयक्तिक संबंधामुळे ज्यांचे सुख त्याच्यावर अवलंबून आहे त्यांना त्या तापदायक असल्या, तर त्या सवईबद्दलही त्याची निंदा होऊ शकेल. इतरांचे हितसंबंध व भावना यांची जी कदर करावयास हवी ती करण्यात जो चुकेल त्याची त्या कृतीबद्दल नैतिक निंदा होणे साहजिक आहे. ती चूक त्याच्या हातून दुसऱ्या एखाद्या जास्त महत्त्वाच्या कर्तव्यामुळे किंवा ज्याबद्दल त्याला दोष देता येणार नाही अशा एखाद्या स्वतःच्या पसंतीच्या कृत्यामुळे घडली असेल तर मात्र गोष्ट वेगळी. पण जी नैतिक निंदा होते ती त्या कृत्याच्या कारणासाठी नव्हे किंवा ज्या वैयक्तिक दोषामुळे ते कृत्य घडून आले त्या दोषासाठी नव्हे. त्याचप्रमाणे केवळ आत्मनिष्ठ अशा आचरणामुळे एखादा मनुष्य नेमून दिलेले सामाजिक कर्तव्य करू शकत नसेल तर त्याने सामाजिक गुन्हा केला असे म्हणता येईल. दारू पिऊन बेहोष झाल्याबद्दल कुणालाही शिक्षा होऊ नये, पण कामावर असताना एखादा पोलिस शिपाई अगर सैनिक बेहोष झाला तर त्याला मात्र शिक्षा झाली पाहिजे. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे असे की ज्यावेळी प्रत्यक्ष नुकसान घडते किंवा नुकसान घडेल असा स्पष्ट धोका निर्माण होतो त्यावेळी ती बाब स्वातंत्र्याच्या कक्षेत उरत नाही, तिचा नीती अगर कायदा यांच्या कक्षेत समावेश होतो.

परंतु ज्या वर्तनामुळे एखाद्या सामाजिक कर्तव्याचा भंग होत नाही किंवा स्वतःखेरीज दुसऱ्या कोणत्याही बोट दाखवता येईल अशा व्यक्तीला इजा पोचत नाही त्या वर्तनामुळे समाजाची जर केवळ संभवनीय किंवा दूरान्वयी (constructive) स्वरूपाची हानी होण्याची धास्ती असेल, तर

ती गैरसोय मानवी स्वातंत्र्याच्या हिताच्या दृष्टीने समाजाला सहज सहन करता येईल. स्वतःची नीट काळजी घेतल्याबद्दल जाणत्या मंडळींना शिक्षा करावयाची असेल तर, जी सेवा मागण्याचा समाजाला मुळी देखील अधिकार नाही, ती सेवा करायला ती मंडळी असमर्थ ठरतात या सबबीखाली शिक्षा करण्याऐवजी त्यांच्या स्वतःच्या हितासाठी शिक्षा केली जात आहे असे म्हणणे, मला वाटते, योग्य ठरेल. पण समाजातील दुबळ्या मंडळीना, समाजामधे रूढ अशा विवेकनिष्ठ पद्धतीने वागायला शिकवण्याचा, ते अविवेकी पद्धतीने वागतील तोवर थांबून नंतर त्यांना कायदेशीर अगर नैतिक शिक्षा देण्याखेरीज दुसरा मार्ग समाजाजवळ नाही हा युक्तिवाद मांडणे मला मान्य नाही. आयुष्याच्या सुरवातीच्या काळात समाजाची त्यांच्यावर अमर्याद सत्ता असते; बाल्यावस्थेच्या व किशोरा-वस्थेच्या काळात विवेकनिष्ठ मार्गाने जीवनाचे व्यवहार चालविण्यासाठी त्यांना समर्थ बनविण्याचे समाजाला खूप प्रयत्न करता आले असते. पुढच्या पिढीला शिक्षण देण्याच्या बाबतीत व तिच्या भोवतालील वातावरण तयार करण्याच्या बाबतीत आजच्या पिढीच्या हाती सारी सत्ता आहे. स्वतःच्याच ठिकाणी चांगुलपणा व शहाणपणा यांचा खूप अभाव असल्याकारणाने आजच्या पिढीला चांगुलपणामधे व शहाणपणामधे उत्कृष्ट बनण्याचे शिक्षण पुढच्या पिढीला देता येणार नाही हे खरे. आणि अगदी उत्तम प्रयत्न केले तरी काही व्यक्तींच्या बाबतीत ते यशस्वी ठरतीलच असे देखील नाही. परंतु नव्या पिढीला सर्वसाधारणपणे आपल्याइतके व आपल्या-हून थोडेबहुत अधिक चांगले बनविणे मात्र या पिढीला सहज शक्य आहे. आपल्यातील अनेकाना जर समाजाने मुलासारखेच राहू दिले, म्हणजेच दूरच्या हेतूंच्या पूर्तीसाठी जो विचार करता यायला हवा तो विचार करण्याची शक्ती जर त्यांच्याठिकाणी वाढली नाही, तर त्याचे जे परिणाम होतील त्याबद्दल समाजाने स्वतःलाच दोष दिला पाहिजे. शिक्षणाची सारी सत्ता समाजाच्या हाती आहे; आपल्या बुद्धीने जे विचार करू शकत नाहीत

त्यांच्या मनावर जे लोकमान्य मताचे दडपण पडते ते समाजाच्या बाजूने उभे आहे; ओळखीच्या मंडळींची नापसंती अगर तिरस्कार ज्यांनी स्वतःवर ओढवून घेतला त्यांना साहजिकपणेच अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते अशी परिस्थिती आहे; या साऱ्या गोष्टींची मदत असताना, या खेरीज व्यक्तींना त्यांनी आपले खाजगी व्यवहार कसे चालवावे याबद्दल हुकूम सोडण्याची व त्यांची अंमलबजावणी करण्याची सत्ता आपल्या हाती असणे आवश्यक आहे असा खोटा आग्रह समाजाने धरू नये. खाजगी व्यवहारांच्या बाबतीत ज्याना त्यांचे परिणाम सहन करावे लागतात त्यानीच निर्णय घ्यावे हे न्यायाच्या व धोरणाच्या दृष्टीने योग्य आहे. आचरणावर परिणाम घडवून आणण्याचे चांगले मार्ग निष्प्रभ व निष्फळ ठरतात ते वाईट मार्गाचा अवलंब केल्यानेच. शहाणपणाने व संयमीपणाने वागावे म्हणून ज्यांच्यावर जबरदस्ती केली जाते त्यांच्यामधे जोरदार व स्वतंत्र वृत्तीची माणसे असतील, तरी ती बंधनाविरुद्ध बंड केल्यावाचून राहणार नाहीत. आपल्या खाजगी व्यवहारांचे नियंत्रण करण्याचा इतरांचा अधिकार असा मनुष्य कधीही मान्य करणार नाही. आपण इतरांच्या व्यवहारात हस्तक्षेप करून त्यांचे नुकसान करू लागलो तर मात्र आपल्याला थांबविण्याचा त्याना अधिकार आहे हे तो जरूर मान्य करील. अशा परिस्थितीत बळकावलेल्या सत्तेच्या विरुद्ध वागणे तेजस्वीपणाचे व धैर्याचे लक्षण आहे अशी कल्पना सहज प्रसृत होते. आणि मग त्या सत्तेने जे सांगितले असेल त्याच्या बरोबर विरुद्ध वर्तन करण्याचा क्रम मोठ्या दिमाखाने सुरू होतो. प्युरिटन लोकांच्या कडव्या नैतिक असहिष्णुतेची प्रतिक्रिया म्हणून त्या नंतर आलेल्या दुसऱ्या चार्लस राजाच्या राजवटीमधे भ्रष्टाचाराची जी प्रथा पसरली ती याचे उत्तम उदाहरण आहे. दुर्गुणी अगर स्वेच्छाचारी ( self-indulgent ) यांच्या वाईट उदाहरणामुळे इतर मंडळी बिघडू नयेत यासाठी समाजाला जे संरक्षण हवे त्याचा विचार करता असे दिसते की वाईट उदाहरणाचा दुष्परिणाम होणे शक्य आहे हे खरे, विशेषतः दुसऱ्यांचे नुकसान केल्यानंतरही नुकसान

करणाराला शिक्षा झाली नाही असे उदाहरण असेल तर. पण सध्या आपण ज्या वर्तनाचा विचार करतो आहो ते असे आहे की त्याने इतरांचे नुकसान होत नाही, खूप नुकसान होते, असे म्हणतात, ते फक्त ते कृत्य करणाराचे. हे जर खरे असेल, तर त्या उदाहरणाने नुकसान होण्याऐवजी एक चांगला धडा शिकवला असेच कुणालाही वाटायला हवे. कारण उदाहरणामुळे दुर्वर्तन जसे स्पष्ट होते तसेच, जर ते खरोखरच दुर्वर्तन असेल, तर त्याच्यामुळे घडून येणारे त्रासदायक व अवनतीकारक परिणामही स्पष्ट होतात.

केवळ खाजगी असे जे व्यवहार त्यामधे समाजाने हस्तक्षेप करण्याच्या विरुद्ध जी कारणे आहेत त्यातील सर्वात मोठे कारण हे आहे की जेव्हा तो हस्तक्षेप होतो त्यावेळी बहुधा तो चुकीचा असतो व चुकीच्या ठिकाणी घडलेला असतो. सामाजिक नीतिमत्तेबद्दल किंवा इतरांविषयीच्या कर्तव्या-बद्दल लोकमत, म्हणजेच बहुसंख्य लोकांचे मत, जरी काही वेळा चुकीचे असले, तरी अधिक वेळा बरोबर असण्याची शक्यता आहे. कारण या बाबतीत त्यांना फक्त स्वतःच्या हिताचा विचार करावयाचा असतो, वर्तनाची एखादी तऱ्हा जर रूढ झाली तर तिचा आपल्यावर काय परिणाम होईल तेवढेच पहावयाचे असते. परंतु त्याच बहुसंख्यांकांचे आत्मनिष्ठ वर्तनाबद्दलचे मत कायदा म्हणून अल्पसंख्यांकावर लादले, तर ते जितके खरे तितकेच चूकही असू शकेल. कारण या बाबतीत, अगदी उत्तम परिस्थितीमधेही, लोकमत म्हणजे काही मंडळींचे दुसऱ्यांचे हित अगर अहित कशात आहे याबद्दलचे मत. पुष्कळ वेळा त्याला तेवढाही अर्थ नसतो. केवळ स्वतःला काय आवडते ते लक्षात घेऊन आणि ज्यांच्या वर्तनाची ते निंदा करतात त्यांच्या सुखसोईकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून, कोणचीही काळजी न घेता, काही मंडळी जे मत बनवतात त्यालाच पुष्कळ वेळा लोकमत ही संज्ञा प्राप्त होते. ज्या वर्तनाबद्दल त्याना नावड असते त्याने आपले नुकसान होते असे मानणारी पुष्कळ मंडळी आहेत; आणि मग त्या वर्तनामुळे

आपल्या भावनांना धक्का पोचला असा संताप ती व्यक्त करतात. एखाद्या धर्मवेड्या माणसाला इतरांच्या धार्मिक भावनांची तू कदर करत नाहीस असे म्हटले की तो ताबडतोब रागाने उत्तर देतो की आपल्या अत्यंत तिरस्कारार्ह अशा उपासनापद्धतीबद्दलच्या वा पंथाबद्दलच्या आग्रहाने त्यांनीच माझ्या भावनाकडे दुर्लक्ष केले आहे. स्वतःच्या मताबद्दलची एखाद्याची भावना आणि त्याने असे मत बाळगल्यामुळे रागावलेल्या दुसऱ्या माणसाची भावना याना एकाच मापाने तोलता येणार नाही. या दोन भावना, मालकाची आपली वस्तू आपल्याजवळ कायम रहावी ही भावना आणि चोराची ती वस्तू पळवण्याची भावना, यासारख्या वेगळ्या आहेत. आणि माणसाची आवड ही त्याच्या मतासारखी किंवा वस्तूसारखी त्याच्या अख-त्यारीतील गोष्ट आहे. अनिश्चित गोष्टीबद्दलची व्यक्तीची आवड व स्वातंत्र्य अबाधित ठेवणारा आणि सार्वत्रिक अनुभवावरून त्याज्य ठरलेल्या चाली-रीतींचा अवलंब करू नये एवढाच निर्बंध घालणारा समाज कल्पिणे सोपे आहे. पण आपल्या अवीक्षणाला (censorship) एवढीच मर्यादा घाल-णारा समाज कुणाच्या दृष्टीस पडला आहे का? किंवा सार्वत्रिक अनुभव काय आहे हे पाहण्याची तसदी एखाद्या समाजाने कधी घेतली आहे का? खाजगी व्यवहारामध्ये हस्तक्षेप करताना त्याच्या डोळ्यात भरते ते फक्त आपल्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने वागण्याचे किंवा भावना बाळगण्याचे एखाद्याने दाखविलेले धाष्टर्य. आणि समाजाच्या विचाराचा हा निकष ( standard ) त्यावर झिरझिरित बुरखा घालून मानवजातीपुढे धर्म आणि तत्त्वज्ञान यांची आज्ञा म्हणून नव्वद टक्के नीतिशास्त्रज्ञ व तत्वचिंतन करणारे लेखक ठेवत असतात. वस्तू चांगल्या आहेत, कारण त्या चांगल्या आहेत व त्या चांगल्या आहेत असे आपल्याला वाटते म्हणून, अशी त्यांची शिकवण असते. आपल्यावर आणि इतर सर्वांवर बंधनकारक असे आचाराचे नियम स्वतःच्या मनात व हृदयात शोधा असे ते सांगतात. या सूचनेनुसार वागून बरे आणि वाईट याबद्दलच्या आपल्या ज्या कल्पना असतील त्या, सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य असतील

तर, सर्व जगावर लादण्याखेरीज गरीब बिचारा समाज तरी दुसरे काय करू शकेल ?

इथे उल्लेखिलेली दुष्ट गोष्ट केवळ कल्पनेतील नाही. कुणाला कदाचित् असे वाटेल की मी या ठिकाणी या युगातील व या देशातील समाजाने गैररीतीने आपल्या आवडीनिवडीना नैतिक कायद्याचे स्वरूप कसे दिले आहे त्याची प्रत्यक्ष उदाहरणे द्यावी. परंतु मी निबंध लिहितो आहे तो सध्याच्या नैतिक भावनांच्या भ्रष्टाचाराबद्दल (aberrations) नव्हे. तो विषय महत्त्वाचा असून त्याची उडत उडत (parenthetically) किंवा उदाहरण म्हणून चर्चा करणे योग्य ठरणार नाही. तरी मी जे तत्त्व प्रतिपादन करीत आहे ते गंभीर स्वरूपाचे व व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे हे दाखविण्यासाठी व केवळ काल्पनिक अरिष्टाविरुद्ध मी ओरड करत नाही हे सिद्ध करण्यासाठी काही उदाहरणे देणे जरूरीचे आहे. आणि खूप उदाहरणे देऊन हे सिद्ध करणे मुळीच कठीण नाही की व्यक्तीच्या सर्वमान्य अशा त्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण होईल अशा पद्धतीने ज्यांना नैतिक पोलिस असे वर्णन करता येईल त्यांचे कार्यक्षेत्र वाढविणे ही माणसामधील एक सार्वत्रिक प्रवृत्ती होऊन बसली आहे.

ज्यांची धार्मिक मते आपल्यापेक्षा वेगळी आहेत ते आपल्या धार्मिक उपचारांचे व विशेषकरून निषेधांचे पालन करत नाहीत याच एका कारणामुळे त्यांच्याबद्दल माणसांच्या मनात जी विरोधाची भावना निर्माण होते तिचाच एक पहिली बाब म्हणून विचार करता येईल. एक क्षुल्लक उदाहरण म्हणून या गोष्टीचा उल्लेख करता येईल की, ख्रिश्चनांचा धर्मसंप्रदाय अगर व्यवहार यापेक्षा, ते डुक्कर खातात या गोष्टीमुळे मुसलमानांना त्यांच्याबद्दल अधिक द्वेष वाटतो. मुसलमानांना भूक भागवण्याच्या या पद्धतीबद्दल जो तिरस्कार वाटतो तो ख्रिश्चन अगर युरपिअन याना कोणच्याही हीन गोष्टीबद्दल वाटणाऱ्या तिरस्कारापेक्षा अधिक असतो. पहिली गोष्ट ही की डुक्कर खाणे हे त्यांच्याविरुद्ध वागणे आहे. पण त्यांना

जो तिरस्कार वाटतो त्याची तीव्रता व प्रकार यांचे केवळ या धार्मिक निषेधाने स्पष्टीकरण होत नाही. कारण मद्याचाही त्यांच्या धर्माने निषेध केला आहे आणि मद्यसेवन करणे पाप आहे असे सर्व मुसलमान समजतात; पण मद्याबद्दल त्यांना तिरस्कार वाटत नाही. उलट त्या "अमंगळ जनावरच्या" मांसाबद्दल त्यांना वाटणारी घृणा ही, अस्वच्छतेची कल्पना एकदा मनामधे खोल रुजली म्हणजे, ज्यांच्या वैयक्तिक सवई फारशा स्वच्छतेच्या नसतात त्यांच्या मनात देखील अस्वच्छतेबद्दल एकदम जी विरोधाची भावना निर्माण होते तिच्यासारखी आहे. हिंदूंच्या मनात धार्मिक अशुद्धतेबद्दलची जी उत्कट भावना असते ती याच स्वरूपाची आहे. आता असे समजा की मुसलमान बहुसंख्य असलेल्या त्या समाजाने बहुसंख्याकांच्या इच्छेनुसार आपल्या देशात कुणी डुकराचे मांस खाऊ नये असे ठरविले. मुसलमानी राज्यात ही गोष्ट नवी नाही.* लोकमताच्या नैतिक सत्तेचा हा योग्य वापर आहे का ? आणि नसेल तर का नाही ? त्या समाजाला ती कृती खरोखरच बीभत्स वाटते. त्यांना प्रामाणिकपणे असे वाटते की देवाला ती आवडत नाही आणि त्याने ती निषिद्ध ठरविली आहे. हा निषेध

* मुंबईच्या पारसी लोकांचे या बाबतीत एक चमत्कारिक (curious) उदाहरण आहे. ही कष्टाळू आणि साहसी जमात पर्शियातील अग्निपूजकांच्या वंशाचा विस्तार आहे. खलिफांच्या जुलमामुळे जेव्हा आपला मूळ देश सोडून ते भारताच्या पश्चिम भागात येऊन दाखल झाले त्यावेळी हिंदू राजाने त्यांना सहिष्णुतेने वागविण्याचे आश्वासन दिले ते त्यांनी गोमांस भक्षण करू नये या अटीवर. नंतर जेव्हा तो प्रदेश मुसलमान विजेत्यांच्या अंमलाखाली गेला तेव्हा डुकराचे मांस खाणार नाही अशी कबूली देऊन पारसी लोकांनी तीच सहिष्णुतेची वागणूक चालू रहावी अशी सवलत मिळवली. सुरवातीला जे हुकुमाचे पालन करावयाचे म्हणून केले त्याचीच नंतर सवय लागली आणि पारसी मंडळी आज देखील गोमांस व डुकराचे मांस खात नाहीत. धर्माचा तसा आदेश नसतानाही त्या दोन वस्तू खाऊ नयेत ही कालांतराने रूढी बनली आणि पूर्वेकडील देशात रूढीला धर्माइतकेच महत्त्व आहे.

म्हणजे धार्मिक छळ आहे असे त्याला नाव ठेवता येणार नाही. तो निषेध धर्मातून निर्माण झाला असेल, पण त्याला धर्मछळ असे म्हणता येणार नाही. कारण कुणाचाही धर्म डुकराचे मांस खाल्लेच पाहिजे असा आदेश देत नाही. वैयक्तिक आवडीनिवडी व आत्मनिष्ठ व्यवहार यामधे ढवळाढवळ करण्याचा समाजाला अधिकार नाही या एकाच कारणासाठी त्या निषेधाची निंदा करता येईल.

आता घराशेजारचे उदाहरण घेऊ या. रोमन कॅथलिक धर्माने विहित केलेल्या मार्गाखेरीज इतर मार्गाने परमेश्वराची उपासना करणे हा घोर धार्मिक अनाचार असून आणि परमेश्वराला ते अतिशय अपमानास्पद वाटते अशी स्पेनमधील बहुसंख्य लोकांची समजूत आहे. इतर मार्गाने परमेश्वराची जाहीर उपासना करण्याला स्पेनमधे कायद्याने बंदी आहे. दक्षिण युरपमधील सर्व लोकांना विवाहित पाद्री अधार्मिक वाटतो एवढेच नव्हे, तर तो अशुद्ध, अशिष्ट, गावंढळ व ओंगळवाणा आहे असे वाटते. या मनापासून वाटणाऱ्या भावना आणि कॅथलिक धर्म न मानणाऱ्या लोकांवर त्या लादण्याचे प्रयत्न याबद्दल प्रॉटेस्टंट लोकांना काय वाटते ? इतरांच्या हिताशी ज्यांचा संबंध नाही अशा बाबीत देखील एकमेकांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करण्याचा लोकांना हक्क आहे हे मान्य केल्यानंतर कोणच्या तत्त्वानुसार, सुसंगतपणे विचार करावयाचा तर, वर उल्लेखिलेल्या बाबी वगळता येतील ? किंवा परमेश्वराच्या व मानवाच्या दृष्टीने जे लज्जास्पद आहे असे त्यांना वाटते ते दडपून टाकावे असे वाटल्याबद्दल कोण त्यांना दोष देऊ शकेल ? या कृती ज्यांना अधार्मिक वाटतात त्यांनी त्या दडपून टाकण्यासाठी ज्या युक्तिवादाचा अवलंब केला त्यापेक्षा प्रबळ युक्तिवाद वैयक्तिक स्वरूपाची अनीति असे ज्यांना समजले जाते त्या गोष्टी घडू नयेत असा आग्रह धरण्यासाठी वापरता येईल असे वाटत नाही. आपण बरोबर आहो म्हणून इतरांचा आपल्याला छळ करता येतो, पण इतरांनी मात्र, ते चूक असल्याकारणाने, आपला छळ करता

कामा नये हा छळ करणारांचा युक्तिवाद तरी आपल्याला मानला पाहिजे किंवा जे आपल्या स्वतःला लागू केले तर गंभीर अन्याय झाला अशी आपण रागाने ओरड करू ते तत्त्व तरी आपण कबूल केले पाहिजे.

आपल्यामधे जी परिस्थिती उद्भवण्यासारखी नाही त्या परिस्थितीतील ती उदाहरणे आहेत असा वर दिलेल्या उदाहरणांच्या बाबतीत कारण नसताना आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे. या देशातील लोकमत मांस खाऊ नका असे बंधन घालण्याची शक्यता नाही, किंवा उपासनेच्या बाबतीत लोकांना त्रास देणे शक्य नाही, किंवा आपल्या संप्रदायानुसार वा आवडीनुसार लग्न करा, करू नका, असे लोकांना सांगणे शक्य नाही. म्हणून आपली परिस्थिती वेगळी आहे असे आक्षेपक म्हणतील. आपल्या इथे देखील ज्या स्वातंत्र्यामधे हस्तक्षेप होण्याची धास्ती आहे त्याविषयीच पुढचे उदाहरण घेऊ. प्युरिटन लोकांच्या हाती जेव्हा जेव्हा पुरेशी सत्ता होती त्या त्या वेळी त्यांनी सर्व सार्वजनिक आणि जवळजवळ सगळ्या करमणुकीच्या गोष्टी बंद पाडण्याचा बहुंशी यशस्वी प्रयत्न केला. अमेरिकेतील न्यू इंग्लंड या भागामधे आणि कॉमनवेल्थकालीन ग्रेट ब्रिटनमधे हे घडलेले दृष्टीस पडते. विशेषेकरून गाणे, नाच, सार्वजनिक खेळ, करमणुकीसाठी एकत्र येणे, व नाटके यांच्यावर त्यांचा मोठा कटाक्ष होता. सध्या देखील या देशात अशी पुष्कळ मंडळी आहेत की ज्यांच्या नीतीच्या व धर्माच्या कल्पनेनुसार या सर्व करमणुकी निषिद्ध समजल्या जातात. ही मंडळी मुख्यत्वेकरून मध्यम वर्गातील आहेत; देशातील आजच्या सामाजिक व राजकीय घटनामधे त्याना वाढते महत्त्व आहे; त्यांच्या विचारांच्या मंडळींचे कधी ना कधी पार्लमेंटमधे बहुमत होणे अशक्य नाही. जी करमणुकीची साधने खुली राहतील त्यांचे, जास्त कर्मठ अशा काल्व्हिनिस्ट व मेथडिस्ट यांच्या धार्मिक व नैतिक भावनांनी नियंत्रण झाले, तर ते समाजातील उरलेल्या लोकाना कितपत आवडेल ? समाजातील या फाजील लुडबुड करणाऱ्या धर्मनिष्ठ मंडळींनी स्वतःपुरते पहावे अशी बरीच

निर्णायक स्वरूपाची इच्छा ते व्यक्त करणार नाहीत का? जे सरकार अगर जो समाज त्याच्या दृष्टीने जे अयोग्य त्या सुखाचा तुम्ही उपभोग घेऊ नका असे लोकांना सांगण्याचे धाष्टर्य करतो त्याला हेच सांगायला हवे. परंतु या आग्रहामागील तत्त्व एकदा मान्य केले की त्या तत्त्वाची बहुसंख्याकांच्या किंवा देशातील दुसऱ्या एखाद्या बलवत्तर सत्तेच्या मर्जीनुसार अंमलबजावणी होणे या गोष्टीला कुणालाही सयुक्तिकपणे विरोध करता येणार नाही. आणि मग न्यू इंग्लंडमधे पहिल्याने वसाहत करणारांच्या मनात जशा तऱ्हेचे ख्रिश्चन लोकराज्य (commonwealth) होते तशा तऱ्हेच्या समाजरचनेशी मिळते घेऊन राहण्याची सर्वांना तयारी ठेवावी लागेल. अर्थातच त्यांच्या धर्मसंप्रदायासारखा संप्रदाय, क्षीण होत चाललेले धर्म ज्याप्रमाणे पुष्कळ वेळा पुन्हा प्रभावी बनतात त्याप्रमाणे, गेलेले वर्चस्व पुन्हा परत काबीज करू शकला तरच हे घडेल.

दुसऱ्या एका संभवनीय घटनेचा आपल्याला विचार करता येईल. आताच उल्लेखिलेल्या घटनेपेक्षा ही घटना घडून येणे अधिक शक्य आहे. समाजाची घटना लोकशाहीस्वरूपाची असावी, जोडीला लोकनियुक्त राजकीय संस्था असोत नसोत, अशी आधुनिक जगामधे प्रबळ प्रवृत्ती आहे हे मान्य केले पाहिजे. युनायटेड स्टेट्समधे ही प्रवृत्ती संपूर्णपणे विजयी झाली असून तिथे समाज आणि शासनसंस्था दोन्ही पूर्णतया लोकशाही स्वरूपाच्या आहेत. तिथे सर्वांच्या आज ना उद्या आटोक्यात न येणारी अशी भडक किंवा खर्चिक राहण्याची पद्धत लोकांना आवडत नाही. लोकांच्या या आवडीला त्या देशात जवळजवळ कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि म्हणून असे म्हणतात की त्या देशातील पुष्कळ भागांत ज्यांचे उत्पन्न खूप आहे अशा मंडळींना लोकांचा राग होणार नाही अशा पद्धतीने आपला पैसा खर्च करणेही कठीण जाते. प्रचलित परिस्थितीचे वर्णन म्हणून अशा विधानात जरी बरीच अतिशयोक्ती असली, तरी त्यात वर्णिलेली परिस्थिती निर्माण

होणे संभवनीय व शक्य आहे. व्यक्तीने आपले उत्पन्न कसे खर्च करावे हे ठरविण्याचा समाजाला अधिकार आहे या कल्पनेची लोकशाही प्रवृत्तीला जोड लाभली की त्या प्रवृत्तीमुळे तशी परिस्थिती निर्माण होणे अधिक संभवनीय ठरते. भरीत भर म्हणून समाजसत्तावादी विचार जर बरेच फैलावले तर मर्यादित मालमत्तेपेक्षा जास्त मालमत्ता जवळ असणे अगर शारीरिक श्रमाने जे कमावले नाही अशा उत्पन्नाचा धनी बनणें हें बहुसंख्याकांच्या दृष्टीने पापासारखे ठरेल. तत्त्वतः या सारखी असणारी मतै सध्या देखील कारागीर वर्गामधे बरीच प्रचलित आहेत. त्या मतांचा त्या वर्गातील लोकांवर व त्या वर्गातील लोकांच्या मताप्रमाणे ज्यांची मतें ठरतात त्यांच्यावर बराच प्रभाव आहे. उद्योगधंद्यांच्या काही शाखांमधे जे बहुसंख्य वाईट कामगार आहेत त्यांना निश्चितपणे असे वाटते. हे सर्वांना माहित आहे की वाईट कामगारांना चांगल्या कामगाराइतकीच मजुरी मिळावी आणि कुणालाही अंगावरच्या कामामुळे अगर इतर मार्गाने अधिक हुषारी दाखवून वा अधिक काम करून ते न करणाऱ्या इतरांपेक्षा अधिक पैसे मिळवता येऊ नये. कुशल कामगारांनी अधिक उपयुक्त स्वरूपाची सेवा करून जास्त मोबदला मिळवू नये व कारखानदारांनी त्यांना तो देऊ नये म्हणून बाकीचे कामगार त्यांच्यावर नैतिक दडपण आणतात आणि काही वेळा त्याचे शारीरिक दडपणामधे देखील रूपांतर होते. समाजाला खाजगी व्यवहारामधे लक्ष घालण्याचा अधिकार असेल, तर या कामगारांचे काही चुकते असे म्हणता येणार नाही. तसेच सर्वसाधारण समाज सगळ्या लोकांच्यावर जी सत्ता गाजवतो ती व्यक्तीच्या विवक्षित समाजाने त्याच्यावर गाजवली तर तेही दोषार्ह ठरणार नाही.

पण केवळ संभवनीय अशा गोष्टींचा विचार करण्याचीही आवश्यकता नाही. आज प्रत्यक्षपणे देखील खाजगी जीवनाच्या स्वातंत्र्यावर मोठे अतिक्रमण घडून येत आहे. आणि यापुढे त्याहून मोठी अतिक्रमणे घडून येतील आणि ती बरीच यशस्वी होतील अशी धास्ती वाटते. आणि अशी मते

देखील आता व्यक्त होऊ लागली आहेत की जे चुकीचे आहे असे वाटते त्याला कायद्याने बंदी घालण्याचा समाजाला अमर्याद अधिकार आहे; व एवढेच नव्हे तर जे चूक ते थांबवण्यासाठी ज्या अनेक गोष्टी निरुपद्रवी आहेत असे मानले जाते त्यांनाही बंदी घालण्याचा समाजाला अधिकार आहे.

अतिरेकी मद्यपानाला आळा घालण्याच्या नावाने इंग्लंडच्या एका वसाहतीमधे व युनाटेड स्टेट्सच्या निम्या भागात लोकांना कायद्याने औषधाखेरीज इतर कामासाठी दारूचा उपयोग करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे म्हणजे उपयोगावरही, आणि तीच बंदी घालणारांची इच्छा आहे. कायद्याची अंमलबजावणी करणे अशक्य म्हणून बऱ्याच राज्यांनी ( states ) कायदा रद्द केला. ज्या राज्यामुळे कायद्याला नाव लाभले त्या राज्याचाही त्यांच्यामधे अंतर्भाव आहे. असे असतानाही या देशातही तसा कायदा व्हावा असे प्रयत्न सुरू झाले आहेत आणि काही तथाकथित भूतदयावादी त्याचा मोठ्या जोराने पुरस्कार करत आहेत. या कारणासाठी जी संस्था " अलायन्स " नावाची करण्यात आली आहे तिला सध्या बरीच कुप्रसिद्धी लाभली आहे. कुप्रसिद्धीचे कारण म्हणजे त्या संस्थेचे चिटणीस व देशातील एक सार्वजनिक व्यक्ती यांच्यातील प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार. राजकारणी पुरुषांच्या मतांना तत्त्वांचा पाठिंबा असावा असे मानणारी इंग्लंडमधे जी थोडी मंडळी आहेत त्यामधे त्या व्यक्तीची गणना होते. पत्र-व्यवहारामधे लॉर्ड स्टॅनले यांचा जो भाग आहे त्यामुळे त्यांच्याबद्दल ज्या आशा निर्माण झाल्या आहेत त्यांना दुजोरा लाभतो. त्यांच्या सार्वजनिक जीवनामधे ज्या गुणांचा आढळ होतो ते गुण राजकीय क्षेत्रात काम करणारांमधे फार विरळ आहेत ही दुःखदायक गोष्ट ज्यांना माहिती आहे त्यांना लॉर्ड स्टॅनले यांच्याबद्दल खूप आशा वाटते. अलायन्सचे जे मुखपत्र आहे त्याने म्हटले आहे की " दुराग्रह आणि छळ ज्याच्यातून निष्पन्न

होतील अशा कोणत्याही तत्त्वाला मान्यता दिली गेली तर आम्हाला अतिशय खेद होईल." मुखपत्राने त्या तऱ्हेची तत्त्वे आणि संस्थेची तत्त्वे यांच्यामधे जे "व्यापक व अनुल्लंघनीय अंतर" आहे ते स्पष्ट करण्याचे आश्वासन दिले आहे. लेखक लिहितो, "विचार, मते व सदसद्विवेक या संबंधीच्या सर्व बाबी कायद्याच्या कक्षेबाहेर आहेत असे मला वाटते. सामाजिक कृती, सवई व संबंध या बाबी मात्र कक्षेत येतात; या बाबींबद्दल शासनसंस्थेला योग्यायोग्य ठरविण्याचा अधिकार आहे, व्यक्तीला नव्हे". या वर्गांच्या बाबीपेक्षा वेगळा, ज्या कृती व सवई सामाजिक नसून वैयक्तिक आहेत, अशांचा तिसरा वर्ग आहे त्याचा या ठिकाणी उल्लेख नाही. दारू पिण्याचे कृत्य निर्विवाद या तिसऱ्या वर्गात मोडते. दारू विकणे हा मात्र व्यापार आहे आणि व्यापार ही एक सामाजिक कृती आहे. विकणाराच्या स्वातंत्र्याचा भंग होतो अशी तक्रार नसून, तक्रार आहे ती विकत घेणाऱ्याच्या व सेवन करणाऱ्याच्या स्वातंत्र्याच्या भंगाची. शासनसंस्था त्याला दारू पिऊ नको असे सांगेल किंवा दारू त्याला मिळणार नाही, अशी मुद्दाम व्यवस्था करील. संस्थेच्या चिटणिसांचे म्हणणे असे की, "माझ्या सामाजिक हक्कावर दुसऱ्या कुणाच्या सामाजिक (social) कृतीने अतिक्रमण केले तर नागरिक या नात्याने कायदा असावा असे म्हणण्याचा मला अधिकार आहे." आता या "सामाजिक हक्कांची" व्याख्या आपण पाहू या. "माझ्या सामाजिक हक्कावर जर कशामुळे अतिक्रमण होत असेल तर अंमली पेयांच्या विक्रीमुळे ते जरूर होते. त्या विक्रीमुळे वरचेवर समाजामधे गोंधळ निर्माण होतो व त्याला उत्तेजन मिळते आणि त्यामुळे सुरक्षिततेचा माझा प्राथमिक हक्क नष्ट होतो. माझ्याकडून घेतला जाणारा कराचा पैसा दुःस्थिति निर्माण करण्यासाठी वापरला जातो आणि त्या दुःस्थितीचा नफा कमावण्यासाठी उपयोग होतो हा माझ्या समानतेच्या हक्काचा भंग आहे. ज्या समाजाकडून सहकार्य व सहजीवन मागण्याचा मला हक्क आहे त्या समाजाचा नैतिक अधःपात झाल्यामुळे व तो दुबळा बनल्यामुळे

आणि माझ्या मार्गात अनेक धोके निर्माण झाल्याकारणाने मुक्त नैतिक व बौद्धिक विकासाचा माझा जो हक्क आहे तो अडविला जातो." अशा तऱ्हेच्या सामाजिक हक्कांचे तत्त्व आजवर कुणीही शब्दांकित केले नसेल. त्या तत्त्वांचा जो उघड उघड अर्थ आहे तो हा : प्रत्येक व्यक्तीचा हा निरपवाद सामाजिक हक्क आहे की इतर सर्वांनी त्याला जसे योग्य वाटेल तसे प्रत्येक बाबतीत वागले पाहिजे, त्या बाबतीत थोडी देखील चूक झाली तर त्यामुळे त्या व्यक्तीच्या सामाजिक हक्काचा भंग होईल आणि मग त्या व्यक्तीला कायदे-मंडळामार्फतीने ती अडचण दूर व्हावी अशी हक्काने मागणी करता येईल. हे राक्षसी तत्त्व स्वातंत्र्यावरील एखाद दुसऱ्या अतिक्रमणापेक्षा अधिक धोक्याचे आहे; स्वातंत्र्याची अशी कोणतीही गळचेपी नाही की जिचे त्या तत्त्वानुसार समर्थन करता येणार नाही; कोणच्याही तऱ्हेच्या स्वातंत्र्याचा हक्क ते तत्त्व मानत नाही; फार फार तर गुप्तपणे एखादे मत बाळगण्याचा हक्क ते मान्य करील, पण ते मत उघड बोलून दाखवता कामा नये, कारण माझ्या दृष्टीने विषारी अशा मताचा कुणी नुसता उच्चार केला की अलायन्सच्या मते माझे जे सर्व सामाजिक हक्क आहेत त्यांचा भंग होईल. या सिद्धांतानुसार मनुष्यजातीला प्रत्येकाच्या नैतिक, बौद्धिक व तसेच शारीरिक उत्कृष्टतेसाठी खटपट करण्याचा हक्क प्राप्त होतो, आणि ती उत्कृष्टता खटपट करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या कल्पनेनुसार निश्चित करावी.

व्यक्तीच्या न्याय्य स्वातंत्र्यावरील अन्याय्य अतिक्रमणाचे दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणून रविवारच्या सुट्टीबद्दलचे ( sabbatarian ) जे कायदे आहेत त्यांच्याकडे बोट दाखवता येईल. या अतिक्रमणाचा धोका आहे असे नव्हे; ते कधीच यशस्वी रीतीने वडून गेलेले आहे. नेहमीचे जे दैनंदिन उद्योग आहेत ते आठवडयातून एक दिवस, जीवनाच्या ज्या गरजा असतात त्या ध्यानात घेऊन, बंद ठेवण्याची प्रथा खूप हितावह आहे. ज्यू लोकांच्या खेरीज इतरांवर धार्मिक दृष्ट्या ते बंधन नाही. काम

करणाऱ्या सर्व लोकांचा सर्वसाधारण पाठिंबा असल्याखेरीज ही प्रथा रूढ करता येणार नाही. म्हणून काही मंडळींनी काम करून इतरांना काम करायला भाग पाडू नये यासाठी कारखान्यातील बहुतेक सारे काम एका विवक्षित दिवशी बंद ठेवून सर्वांकडून ती प्रथा पाळली जाईल असे प्रत्येकाला आश्वासन देणारा कायदा करणे योग्य व समर्थनीय ठरेल. प्रत्येकाने ती प्रथा पाळली पाहिजे यातच सर्वांचे हित आहे हे जे समर्थन या कायद्याच्या पाठीशी आहे ते एखाद्याने आपला विश्रांतीचा वेळ घालवण्यासाठी छंद म्हणून जे काम स्वीकारले असेल ते बंद पाडण्याला लागू पडत नाही. तसेच ते करमणुकीवर कायदेशीर बंधने लादण्यासाठी मुळी देखील उपयोगी पडत नाही. काही जणांची करमणूक हे इतरांचे दैनंदिन काम असते हे खरे; परंतु अनेकांच्या सुखासाठी किंवा उपयुक्त करमणुकी-साठी थोडया जणांना काम करावे लागले तर ते क्षम्य समजायला हवे. अट एवढीच की त्या थोड्यांनी ते काम खुशीने स्वीकारलेले असावे आणि मनात येईल तेव्हा ते काम सोडण्याची त्यांना मुभा असावी. सगळ्यांनी रविवारी काम केले तर सहा दिवसांच्या पगारात सात दिवस काम केल्यासारखे होईल ही कामगारांची कल्पना बरोबर आहे. पण जेव्हा बहुतेक काम बंद असते तेव्हा जी थोडी मंडळी इतरांच्या सुखासाठी त्या दिवशी काम करतात तेव्हा त्यांचे उत्पन्न काही एका प्रमाणात त्या कामाचा मोबदला म्हणून वाढते. आणि उत्पन्न वाढवण्यापेक्षा विश्रांती घेणे त्यांना अधिक पसंत असेल तर ते काम केलेच पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नाही. आणखीही एखादी सवलत हवी असेल तर त्या कामगारांना दुसऱ्या एखाद्या दिवशी सुट्टी देण्याची पद्धत रूढ करता येईल. म्हणून रविवारच्या दिवशीच्या करमणुकीवरील निर्बंधांचे समर्थन करता येईल ते केवळ एका मुद्याच्या आधाराने, आणि तो मुद्दा हा की धार्मिक-दृष्टया त्या करमणुकी चुकीच्या आहेत. कायदा करण्याच्या या हेतूविरुद्ध जितकी ओरड करावी तितकी थोडी होईल. समाज अगर समाजाचा

एखादा अधिकारी यांना परमेश्वराविरुद्ध जे तथाकथित गुन्हे घडतील, त्यांचे मानवी बांधवाविरुद्ध गुन्हे असे स्वरूप नसतानाही, त्यांच्याबद्दल शिक्षा देण्याचा अधिकार एखाद्या दैवी सत्तेने दिलेला आहे, असे अद्यापपावेतो तरी कुणी सिद्ध केलेले नाही. दुसरा मनुष्य धर्माचरण करतो की नाही हे पाहणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे ही कल्पनाच आजवर जो धार्मिक छळ झाला त्याच्या मुळाशी आहे. ती खरी आहे असे मानले की त्या सर्व छळांचे पूर्ण समर्थन होते. रविवारच्या दिवशी आगगाडीने करावयाच्या प्रवासावर बंदी घालण्याचे जे वारंवार प्रयत्न होतात किंवा वस्तुसंग्रहालये आदि रविवारी उघडी ठेवायला जो विरोध होतो त्याच्या मुळाशी जी भावना आहे ती मूलतः जुन्या काळातील धार्मिक छळवाद्यांच्या भूमिकेसारखीच आहे. तिचा आविष्कार पूर्वीच्या सारखा क्रूरपणाचा होत नाही एवढेच. छळ-वाद्यांच्या धर्माला मान्य नाही म्हणून इतरांना त्यांच्या धर्माला मान्य अशा कृती करू द्यावयाच्या नाहीत हा निर्धार त्यामधे व्यक्त होतो. पाखंडी मंडळींच्या कृत्याचा परमेश्वर तिरस्कार करतो एवढेच नव्हे, तर आपण त्यांना मुक्तपणे वागू दिले तर आपणही दोषी ठरू हा विश्वास त्याच्या बुडाशी आहे.

मानवी स्वातंत्र्याला किती कमी महत्त्व दिले जाते हे दाखविणाऱ्या या उदाहरणांच्या जोडीला आपल्या देशातील वर्तमानपत्रे मरमन संप्रदायाविरुद्ध जी पुरेपूर छळाची विषारी भाषा ज्या ज्या वेळी त्या विलक्षण संप्रदायाकडे लक्ष देणे त्याने जरूरीचे भासते त्या त्या वेळी वापरतात तिचा उल्लेख केल्या-वाचून मला राहवत नाही. वर्तमानपत्रांच्या, आगगाड्यांच्या व विद्युत् तारायंत्रांच्या या युगामधे कुणाला तरी साक्षात्कार व्हावा, त्या साक्षात्काराच्या बळावर नवीन धर्माची उभारणी व्हावी व भोंदूगिरी आहे हे उघडउघड दिसत असतानाही व धर्मसंस्थापकाच्या ठिकाणी लोकविलक्षण असे कोणतेही गुण नसतानाही, त्या धर्मावर लाखो लोकांची श्रद्धा बसावी व त्याचा एक समाज तयार व्हावा या अनपेक्षित पण बोधप्रद गोष्टीबद्दल

पुष्कळ लिहिता येण्यासारखे आहे. या ठिकाणी आपल्याला विचार करावयाचा आहे तो या गोष्टीचा की इतर जास्त चांगल्या धर्माप्रमाणे या धर्माचेही हुतात्मे आहेत. त्या धर्माच्या प्रेषिताला व संस्थापकाला त्याच्या शिकवणुकीबद्दल लोकांनी झुंडगिरी करून ठार मारले. त्या धर्माच्या अनेक अनुयायांना बेकायदेशीर हिंसेला बळी पडावे लागले. ज्या देशात त्यांची प्रथम वाढ झाली त्या देशातून त्यांची जबरदस्तीने सरसकट हकालपट्टी झाली. निर्जन वाळवंटाच्या एका भागात ते आता आसरा घेऊन राहिले आहेत. अशा लोकांच्या बाबतीत आज देखील आपल्या देशातील काही मंडळी असे उघडपणे म्हणत आहेत की त्यांच्या विरुद्ध सैन्य पाठवून त्यांना इतरांच्या मताप्रमाणे वागायला भाग पाडले तर ते योग्य होईल. (सैन्य पाठविणे सोईचे नाही ही गोष्ट वेगळी). मरमन संप्रदायातील ज्या विशिष्ट गोष्टीमुळे लोकांना त्यांच्याबद्दल शत्रुत्व वाटते आणि धार्मिक सहिष्णुतेचे बंध तुटतात ती म्हणजे बहुपत्नीकत्वाच्या चालीला त्यांनी दिलेली मान्यता. बहुपत्नीकत्व मुसलमानांमधे, हिंदूमधे, व चिनी लोकांमधे रूढ आहे व त्याबद्दल कुणी आक्षेप घेत नाही. इंग्रजी बोलणाऱ्या व एक प्रकारच्या ख्रिश्चन धर्माचे पालन करणाऱ्या लोकांनी त्याचा अवलंब केला म्हणजे मात्र कधीही शांत न होणारे असे शत्रुत्व निर्माण होते. मरमन लोकांच्या या चालीबद्दल मला मनस्वी घृणा वाटते. मला घृणा वाटते ती इतर अनेक कारणांच्या बरोबरीने त्या चालीमुळे स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा भंग होतो म्हणून. स्वातंत्र्याच्या कोणत्याही तत्त्वाचा तिला पाठिंबा नाही. त्या चालीमुळे समाजाच्या निम्या भागाच्या शृंखला अधिक घट्ट होतात व दुसऱ्या भागाची पहिल्या भागाबद्दलच्या ज्या त्याच्या परस्परान्वयी अशा जबाबदाऱ्या आहेत त्यातून मुक्तता होते. तरी देखील लक्षात घ्यायला हवे ते हे की लग्नसंस्थेच्या इतर प्रकारांमधे स्त्रिया जशा खुषीने लग्नाचे नाते पतकरतात तसेच मरमन समाजातील लग्नामधेही घडते. स्त्रियांना त्यामुळे त्रास होत असेल असे वाटते पण त्या खुषीने ते नाते पतकरतात. ही गोष्ट आश्चर्यजनक आहे

असे वाटेल, पण जगातील चालीरिती व कल्पना पाहिल्या की तिचे स्पष्टीकरण होते. स्त्रियांना, लग्न त्यांना अत्यंत आवश्यक आहे, असे शिकवले जाते. त्यामुळे अनेक स्त्रियांना कुणाचीच बायको न बनण्यापेक्षा पुष्कळ बायकांपैकी एक बायको बनणेही का आवडते त्याचा उलगडा होतो. इतर देशांनी या लग्नाला मान्यता द्यावी असा कुणाचा आग्रह नाही, तसेच मरमन लोकांच्या मताखातर आपल्या देशातील कुणा मंडळींची देशाचे जे कायदे असतील त्यापासून मुक्तता करावी असेही कुणाचे म्हणणे नाही. वेगळी मते धारण करणाऱ्या मरमन जमातीने दुसऱ्या लोकांच्या विरोधी भावनांपुढे न्यायाने मागता येईल त्यापेक्षा किती तरी अधिक पड खाल्ली आहे. ज्या देशांना त्यांची मते मान्य नव्हती ते देश त्यांनी सोडले. जगाच्या एका दूरच्या कोपऱ्यात ते आता स्थाइक झाले आहेत. तिथली जमीन त्यांनीच पहिल्या प्रथम मनुष्यवस्तीला योग्य अशी बनवली. हे सारे त्यांनी केल्यानंतर जुलुमजबरदस्ती खेरीज दुसऱ्या कोणच्या तत्त्वानुसार त्या प्रदेशामधे त्यांना योग्य वाटेल त्या कायद्यानुसार ते राहिले तर त्यांना प्रतिबंध करता येईल ते समजणे कठीण आहे. त्यांना सांगता येईल म्हणजे एवढेच की दुसऱ्या देशावर त्यांनी अतिक्रमण करता कामा नये आणि त्यांच्यातील ज्या मंडळींना त्यांच्या जीवनपद्धतीचा कंटाळा आला असेल त्यांना सोडून जाण्याचे त्यांनी पुरे स्वातंत्र्य द्यावे. काही बाबतीत बऱ्याच योग्यतेच्या अशा एका लेखकाने नुकतीच अशी सूचना केली आहे की मरमन लोकांविरुद्ध त्यांना जिंकण्यासाठी नव्हे तर त्यांना सुसंस्कृत बनवण्यासाठी म्हणून मोहीम पाठवावी. तिला तो सिव्हिलिझेड म्हणजेच संस्कृतीकरणाची मोहीम असे नाव देतो. मरमन जमातीतील बहुपत्नीकत्वाची चाल सांस्कृतिकदृष्ट्या प्रतिगामी स्वरूपाची आहे असे त्याचे म्हणणे. ती मोडून काढण्यासाठी संस्कृतीकरणाची मोहीम. मला देखील ती प्रतिगामी स्वरूपाची वाटते, पण एका समाजाला जबरदस्तीने सुसंस्कृत बनवण्याचा

अधिकार दुसऱ्या समाजाला आहे असे मला वाटत नाही. वाईट कायद्या-मुळे ज्यांना दुःख सहन करावे लागते ते जोवर दुसऱ्या समाजाची मदत मागत नाहीत तोवर त्या पहिल्या समाजाशी ज्यांचा संबंध नाही त्यांनी मधे पडून त्या समाजाला आपली परिस्थिती व चालीरीती बदलायला सांगणे योग्य आहे असे मला वाटत नाही. त्या समाजातील परिस्थिती व चालीरीती हजारो मैल दूर रहाणाऱ्या व त्या समाजाशी कोणताही संबंध नसणाऱ्या मंडळींना लज्जास्पद वाटत असतील, पण ज्यांचा त्यांच्याशी संबंध येतो त्यांना जर त्या समाधानकारक वाटत असतील तर बाहेरच्या मंडळींनी त्या बदलण्याचा आग्रह धरणे योग्य नाही. मर्जी असेल तर त्यांनी प्रचारक पाठवावे त्या चालीरीती विरुद्ध प्रचार करण्यासाठी आणि आपल्या लोकांमधे त्या संप्रदायाचा प्रसार होऊ नये म्हणून सर्व योग्य मार्गांनी ( शिक्षकांची मुस्कटदाबी करणे हा मात्र योग्य मार्ग नाही ) प्रयत्न करावे. जगभर रानटी चालीरीती चालू होत्या त्यावेळी जर संस्कृतीने रानटीपणावर मात केली तर रानटीपणा खूप मागे पडल्यानंतर तो पुन्हा डोके वर काढील आणि संस्कृतीवर विजय मिळवील अशी धास्ती बाळगणे रास्त नाही. पराभूत शत्रूपुढे संस्कृतीला जर हार खावी लागली तर त्याचा अर्थ हाच होईल की ती इतकी गुणहीन ( degenerate ) झाली आहे की तिच्या-वतीने बोलण्यासाठी किंवा तिचे रक्षण करण्यासाठी तिचे नियुक्त केलेले पुजारी ( priests ), शिक्षक किंवा इतर कुणीही तयार नाही; ती ताकत त्यांच्या ठिकाणी नाही किंवा तेवढी तसदी घ्यायला ते तयार नाहीत. अशी परिस्थिती असेल तर जितक्या लवकर त्या संस्कृतीला जा म्हणून सांगावे तितके अधिक बरे. तिची अधिकाधिक अवनती होत जाईल. शेवटी तिचा नाश होईल आणि मग कदाचित् प्रभावी रानटी लोकांच्या हस्ते ( पश्चिमी साम्राज्याचे झाले तसे ) तिचे पुनरुज्जीवन होईल.

प्रकरण ५ वे

# अनुप्रयोग

या निबंधात जी तत्त्वे सादर केली आहेत त्यांना तपशीलवार चर्चेचा आधार म्हणून अधिक सार्वत्रिक मान्यता मिळाल्याखेरीज शासनाच्या व नैतिक आचरणाच्या वेगवेगळ्या शाखांमधे त्यांची सुसंगत अंमलबजावणी कशी करता येईल त्याचे हितकारक ठरेल असे विवेचन करता येणार नाही. तपशीलाच्या बाबतीत मी जी थोडी विधाने करणार आहे ती त्या तत्त्वांचे परिणाम काय होतील ते दाखवण्यासाठी नसून केवळ काही उदाहरणे देऊन त्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी. अंमलबजावणीबद्दल मी लिहिणार नसून तिचा फक्त एखादा नमुना दाखवणार आहे. त्यामुळे या निबंधातील सिद्धांताचे सार अशी जी दोन तत्त्वे ( maxims ) आहेत त्यांचा अर्थ व मर्यादा अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल. तसेच ज्या बाबींमधे त्या दोहोपैकी कोणते तत्त्व लागू पडते त्याबद्दल संशय निर्माण होतो त्या वेळी दोन्ही बाजूंचा नीट विचार करून योग्य तो निर्णय घेण्यास त्यामुळे मदत होईल.

तत्त्वे आहेत ती अशी : पहिले हे की स्वतःखेरीज इतर कुणाच्याही हिताशी ज्यांचा संबंध येत नाही अशा कृत्यांच्या बाबतीत व्यक्ती समाजाला जबाबदार नसते. समाजाला त्याच्या आचरणाबद्दल नापसंती अगर अमान्यता व्यक्त करावयाची असेल तर ती सल्ला, उपदेश, समजूत घालणे या मार्गानेच व्यक्त करणे समर्थनीय ठरेल, फार फार तर इतरांना आपल्या हितसाठी गरज भासली तर त्या व्यक्तीला टाळता येईल. दुसरे तत्त्व असे की इतरांच्या हिताला ज्याच्या योगाने धक्का लागेल अशा कृत्यांच्या बाबतीत समाज व्यक्तीला जाब विचारू शकतो आणि स्वतःच्या

संरक्षणासाठी जरूर भासेल त्याप्रमाणे तो व्यक्तीला सामाजिक स्वरूपाचे किंवा कायदेशीर शासन करू शकतो.

इतरांच्या हिताचे नुकसान होईल अगर नुकसान होण्याची शक्यता असेल तेव्हाच समाजाला हस्तक्षेप करता येतो हे जरी खरे असले तरी प्रत्येक वेळी असा हस्तक्षेप करणे योग्य ठरेल असे धरून चालण्याचे कारण नाही ही गोष्ट प्रथम ध्यानात ठेवली पाहिजे. पुष्कळ वेळा न्याय्य उद्दिष्टासाठी झटत असताना व्यक्तीच्या हातून त्याचा परिणाम म्हणून व त्यामुळेच न्याय्य रीतीने दुसऱ्याच्या हिताला धक्का पोचतो किंवा तो दुखावला जातो किंवा एखादी चांगली गोष्ट मिळेल अशी त्याला सबळ आशा असते ती त्याला मिळत नाही. व्यक्तीव्यक्तींच्या हितसंबंधातील हा विरोध पुष्कळ वेळा अनिष्ट सामाजिक संस्थांमुळे निर्माण होतो; त्या संस्था जोवर विद्यमान आहेत तोवर तो विरोध टाळता येणार नाही; आणि काही विरोध असा आहे की जो संस्था कशाही असल्या तरी टाळता येणार नाही. गर्दी झालेल्या धंद्यात किंवा चढाओढीच्या परीक्षेत जो यशस्वी होतो, किंवा दोघांनाही हवी असलेली वस्तू मिळवण्याच्या स्पर्धेत जो स्वीकारला जातो, त्याचा फायदा होतो तो दुसऱ्याचे नुकसान झाल्यामुळे, दुसऱ्याचे श्रम फुकट गेले व त्याची निराशा झाली म्हणून. अशा तऱ्हेच्या परिणामांची क्षिती न बाळगता माणसांनी आपल्या उद्दिष्टासाठी झटत राहण्यातच मनुष्यसमाजाचे कल्याण आहे हे सर्वांना मान्य आहे. हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की अशा तऱ्हेचे दुःख आपल्याला सहन करावे लागणार नाही अशी समाजाकडून हमी मागण्याचा स्पर्धेमधे अपेशी झालेल्यांना नैतिक किंवा कायदेशीर अधिकार नाही. स्पर्धेमधील यश लबाडी, विश्वास-घात किंवा जबरदस्ती अशा सर्वांच्या हिताच्या दृष्टीने निषिद्ध अशा मार्गाने मिळवले असेल तरच समाज असल्या बाबीत हस्तक्षेप करील.

तसेच व्यापार ही एक सामाजिक कृती आहे. कोणत्याही तऱ्हेच्या वस्तू विकण्याचे काम जो अंगावर घेतो तो इतरांच्या व समाजाच्या हिताशी

संबंध असलेली कृती करतो; आणि म्हणूनच तत्त्वत: त्याचे आचरण समाजाच्या कक्षेमधे येते. या कारणामुळेच महत्त्वाच्या वाटणाऱ्या सर्व वस्तूंच्या बाबतीत किंमती ठरविणे व उत्पादन प्रक्रियेचे नियमन करणे हे शासनसंस्थेचे कर्तव्य आहे असे एकेकाळी समजले जात होते. परंतु आता, बऱ्याच वर्षांच्या झगड्यानंतर का होईना, सर्वांना मान्य झाले आहे की उत्पादक व विक्री करणारे यांना स्वातंत्र्य दिल्यानेच वस्तू कमी किंमतीत व चांगल्या दर्जाच्या मिळतील अशी सोय करता येते. एकाच नियंत्रणाची आवश्यकता आहे, ते म्हणजे वस्तू विकत घेणारांनाही त्या कुठूनही विकत घेण्याचे तितकेच स्वातंत्र्य हवे. यालाच खुल्या व्यापाराचा सिद्धांत असे म्हणतात. या निबंधामधे ज्या व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे त्यापेक्षा वेगळ्या तत्त्वाच्या आधारावर तो सिद्धांत उभा आहे. परंतु तो आधार तितकाच मजबूत आहे. व्यापारावरील किंवा व्यापारासाठी जे उत्पादन होते त्यावरील बंधने हे निर्बंधच आहेत. सर्व निर्बंध निर्बंध या नात्याने अनिष्ट असतात. परंतु या निर्बंधामुळे समाजाला आचरणाच्या ज्या भागावर निर्बंध घालण्याचा अधिकार आहे तेवढ्याच भागावर निर्बंध पडतात. ते चुकीचे आहेत हे खरे पण ते केवळ त्यांच्यामुळे जे परिणाम घडून येतील अशी अपेक्षा असते ते घडून येत नाहीत म्हणून. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा खुल्या व्यापाराच्या सिद्धांताशी संबंध नाही; तसेच त्या सिद्धांताच्या मर्यादेविषयी जे प्रश्न उपस्थित होतात त्यांच्याशी देखील व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा संबंध नाही. उदाहरणार्थ, भेसळीमुळे जी फसवणूक होते ती थांबवण्यासाठी सार्वजनिक नियंत्रण कितपत असावे, किंवा आरोग्यविषयक सोई, वा धोक्याचे काम करणाऱ्या कामगारांच्या संरक्षणाची योजना, अंमलात आणण्याची कारखानदारावर कितपत सक्ती करावी यासारख्या प्रश्नांशी व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचा संबंध पोचत नाही. अशा गोष्टींमधे स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित होतो तो एवढ्यापुरताच की लोकांवर बंधने लादण्यापेक्षा त्यांना

मोकळे सोडणे नेहमीच अधिक श्रेयस्कर असते. परंतु वर उल्लेखिलेल्या गोष्टी साधण्यासाठी बंधने लादणे अन्यायाचे नाही ही गोष्ट तत्त्वतः मुळीच नाकारता येत नाही. उलटपक्षी व्यापारावरील निर्बंधांच्या बाबतीत असे काही प्रश्न उपस्थित होतात की जे मूलतः स्वातंत्र्याचे प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, अगोदरच उल्लेखिलेला मेनचा कायदा, चीनमधे अफू आयात करण्यावरील बंदी, विष विकण्यावरील निर्बंध, थोडक्यात म्हणजे एखादी वस्तू मिळणे अशक्य अगर कठीण व्हावे या उद्देशाने घातलेले सर्व निर्बंध. हे निर्बंध आक्षेपार्ह आहेत ते त्यांच्यामुळे उत्पादक किंवा विक्री करणारा यांच्या स्वातंत्र्याचा भंग होतो म्हणून नव्हे तर विकत घेणाऱ्याच्या स्वातंत्र्याचा भंग होतो म्हणून.

विषाच्या विक्रीचे जे उदाहरण दिले आहे त्यांच्यातून एक नवीन प्रश्न निर्माण होतो. प्रश्न हा की पोलिसांचे जे कार्य असते त्याच्यावरील योग्य मर्यादा कोणती ? गुन्हा किंवा अपघात टाळण्यासाठी स्वातंत्र्यावर न्यायाने कुठवर अतिक्रमण करता येईल ? गुन्हा होण्यापूर्वी तो होणार नाही अशी खबरदारी घेणे व तो घडल्यानंतर त्याचा तपास लावून शिक्षा करणे हे शासंनसंस्थेचे एक निर्विवाद स्वरूपाचे कार्य आहे. गुन्ह्याला शिक्षा करण्याच्या कार्यापेक्षा गुन्हा टाळण्याच्या कार्याचा स्वातंत्र्याच्या दृष्टीने खूप दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. माणसाचे कार्य करण्याचे जे न्याय्य स्वातंत्र्य आहे त्याच्या कोणच्याही भागामुळे या नाही त्या स्वरूपाच्या गुन्हेगारीला उत्तेजन मिळते असे अतिशयोक्ती न करता म्हणता येण्यासारखे आहे. तरी देखील एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने किंवा खाजगी व्यक्तीने कुणालाही गुन्ह्याची तयारी करताना पाहिले तर त्यांनी गुन्हा होईपर्यंत स्वस्थ बसावे असे कुणीही म्हणणार नाही; गुन्हा होऊ नये म्हणून त्यांनी ताबडतोब हस्तक्षेप करावा. खून करण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कामासाठी विष जर कुणी कधी विकत घेतले नसते अगर वापरले नसते तर विषाच्या उत्पादनावर व विक्रीवर

बंदी घालणे योग्य झाले असते. परंतु निर्दोष, किंबहुना उपयुक्त, कामासाठी देखील एखाद्याला विषाची गरज लागू शकेल. एका बाबतीत घातलेला निर्बंध दुसऱ्या बाबीला लागू पडल्यावाचून रहात नाही. अपघात होऊ नयेत या साठी खबरदारी घेणे हे सार्वजनिक अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. सरकारी अधिकाऱ्याने किंवा इतर कुणीही ज्या पुलावर जाणे धोक्याचे आहे असे ठरले आहे तो पूल ओलांडण्यासाठी म्हणून एखादा मनुष्य जाऊ लागला आणि त्याला धोक्याची सूचना द्यायला वेळ नसला तर त्यांनी त्याला पकडून मागे फिरविणे योग्य होईल. असे करण्याने त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा भंग होत नाही. आपल्याला हवे ते करणे यामधे स्वातंत्र्य आहे आणि त्या माणसाला नदीत पडण्याची इच्छा नव्हती. परंतु ज्या वेळी निश्चित माहित नसते आणि दुर्घटना घडून येईल अशी केवळ धास्ती असते अशा वेळी धोक्याच्या ठिकाणी जाण्याचे साहस करण्यामागील हेतू कितपत योग्य आहे हे तो मनुष्यच फक्त सांगू शकेल. म्हणून अशा परिस्थितीत त्या माणसाला धोक्याची सूचना देणे तेवढेच योग्य होईल असे मला वाटते; धोक्याच्या ठिकाणी जाऊ नये म्हणून त्याला जबरदस्तीने अडवणे योग्य होणार नाही. ( लहान मूल असेल, भ्रम झाला असेल किंवा विवेकबुद्धीचा नीट उपयोग करता येत नाही अशा उत्तेजित अगर व्यग्र अवस्थेत मनुष्य असेल तर गोष्ट वेगळी. ) विषाच्या विक्रीसारख्या प्रश्नाला लागू पडणारे जे एतद्विषयक विचार आहेत त्यांच्यावरून नियमनाचे कोणते मार्ग तत्त्वाच्या विरूद्ध आहेत व कोणते नाहीत ते ठरविता येईल. औषधावर ते धोक्याचे आहे असे दर्शविणारी चिट्ठी लावण्याची खबरदारी घेणे हे स्वातंत्र्याचा भंग केल्यावाचून करता येईल. आपल्याजवळील वस्तूमधे विषारी गुण आहेत हे आपल्याला कळू नये अशी खरेदीदाराची इच्छा असणे शक्य नाही. परंतु प्रत्येक वेळी डॉक्टरचे शिफारसपत्र आणले पाहिजे या बंधनामुळे योग्य कारणासाठी देखील ती वस्तू मिळविणे कधीकधी

अशक्य होईल आणि नेहमीच खर्चाचे होईल. विषाच्या योगाने जे गुन्हे घडून येतात ते घडून येण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करण्यासाठी मला जो उपाय सुचतो तो बेंथमने ज्याचे "पूर्वनियोजित पुरावा" असे चपखल वर्णन केले आहे तो. योग्य कारणासाठी ती वस्तू ज्यांना हवी असेल त्यांच्या स्वातंत्र्यावर लक्षात घ्यावे लागेल असे बंधन त्यामुळे पडणार नाही. करारांच्या बाबतीत ही योजना सर्वांच्या परिचयाची आहे. एखादा करार ज्या वेळी होतो त्या वेळी त्याची अंमल-बजावणी हवी असेल तर सह्या, साक्षीदारांची साक्ष वगैरे काही उपचार पाळले पाहिजेत असे कायद्याचे बंधन चालणे योग्य असून ते सरावाचे झाले आहे. या उपचारांचे प्रयोजन असे की पुढे जेव्हा वाद निर्माण होईल, त्यावेळी करार खरोखरच झाला होता व कायद्याप्रमाणे तो रद्द ठरेल असे आजूबाजूच्या परिस्थितीत काही नव्हते हे सिद्ध करण्यासाठी पुरावा हजर असावा. या बंधनामुळे खोटे करार किंवा परिस्थितीचे ज्ञान होताच जे रद्द ठरतील असे करार होण्याच्या मार्गात खूप अडचणी निर्माण होतात. गुन्ह्याचे साधन होऊ शकणाऱ्या वस्तूंच्या विक्रीच्या बाबत या तऱ्हेची खबरदारी घेता येईल. विकणारावर असे बंधन घालता येईल की त्याने एखाद्या नोंदपुस्तकामधे ( register ) विक्रीची वेळ, विकत घेणाराचे नाव व पत्ता, विकलेल्या वस्तूचे स्वरूप व प्रमाण ही नोंदवून ठेवावी. कशासाठी वस्तू पाहिजे हे देखील त्याने विचारावे व मिळालेले उत्तर नोंदवून ठेवावे असाही निर्बंध घालता येईल. डॉक्टरने दिलेली औषधयोजनेची पत्रिका ( prescription ) नसेल तर विक्रीच्या वेळी एखादा तिऱ्हाइत इसम हजर असावा अशी सोय करता येईल. त्याच्या-योगाने पुढे जर ती वस्तू गुन्ह्यासाठी वापरली गेली असा संशय आला तर खरेदीदारानेच ती खरेदी केली हे सिद्ध करता येईल. या नियमामुळे वस्तू खरेदी करण्याच्या मार्गात विशेष अडथळे निर्माण होणार नाहीत, परंतु तिचा उघडकीस न येता अयोग्य उपयोग करणे मात्र खूप कठीण होईल.

केवळ आत्मनिष्ठ अशा दुराचाराच्या बाबतीत तो टाळण्यासाठी किंवा त्याबद्दल शासन करण्यासाठी समाजाने ढवळाढवळ करू नये या सिद्धांताच्या मर्यादा समाजविरोधी गुन्ह्यापासून अगाऊ खबरदारी घेऊन आपले संरक्षण करण्याचा समाजाचा जो मूलभूत हक्क आहे त्यावरून सूचित होतात. उदाहरणार्थ, सर्वसाधारणपणे दारू पिण्याविरुद्ध कायदा करणे योग्य नाही; परंतु ज्या माणसाला दारू पिऊन दुसऱ्याला इजा केल्याबद्दल एकदा शिक्षा झाली असेल त्याच्यावर त्यालाच लागू पडेल असे कायदेशीर बंधन लादणे अयोग्य ठरणार नाही; म्हणजेच तो पुन्हा दारू पिऊन तर्र झालेला आढळला तर त्याला शासन व्हावे आणि त्या अवस्थेत असताना त्याने पुन्हा गुन्हा केला तर त्या गुन्ह्याबद्दल त्याला अधिक कडक शिक्षा व्हावी. दारूच्या नशेमधे जो दुसऱ्यांना इजा पोचेल अशी कृत्ये करण्यास प्रवृत्त होतो त्याचे दारू पिऊन बेहोष होणे हे इतरांविरुद्ध गुन्हा करण्यासारखे आहे. तसेच सार्वजनिक संस्थेकडून ज्याला मदत मिळत नाही अशा माणसाच्या आळशीपणाला किंवा ज्याच्या योगाने कराराचा भंग होत नाही अशा आळशीपणाला कायदेशीर गुन्ह्याचे स्वरूप देणे योग्य नव्हे. ते घडले तर जुलूम झाला असे म्हणावे लागेल. परंतु आळशीपणामुळे किंवा इतर काही टाळता येतील अशा कारणांमुळे मनुष्य आपली मुलांच्या पालनासारखी कर्तव्ये पार पाडायला चुकत असेल तर, दुसऱ्या उपायाच्या अभावी, सक्तीचे काम लादून त्याला कर्तव्य बजवायला लावणे जुलुमाचें होणार नाही.

खेरीज, कृती करणारांनाच प्रत्यक्षपणे तापदायक होतील अशा ज्या कृती आहेत त्यांना कायद्याची बंदी नसावी. परंतु त्याच कृती सार्वजनिक रीत्या घडल्या तर शिष्टाचाराचा भंग झाला असे म्हणता येईल व इतरांच्या विरुद्ध गुन्ह्याच्या वर्गात ते पडल्यामुळे त्याला शिक्षा करणेही योग्य ठरेल. सभ्यतेच्या विरुद्ध घडणारे गुन्हे या स्वरूपाचे आहेत. त्यांचे विवेचन करण्याची आवश्यकता नाही; कारण आपल्या विषयाशी त्यांचा

संबंध नाही; ज्या कृती आपल्या परीने निषेधार्ह नाहीत किंवा निषेधार्ह आहेत असे समजले जात नाही त्यांच्या बाबतीतही प्रसिद्धी विरुद्ध मोठा आक्षेप येतो.

नमूद केलेल्या तत्त्वाला अनुरूप असे उत्तर दुसऱ्या एका प्रश्नाच्या बाबतीतही शोधले पाहिजे. जी वैयक्तिक वागणूक दोषास्पद आहे असे समजले जाते पण जिच्यामुळे घडून येणारे नुकसान फक्त कृती करणारालाच सहन करावे लागते म्हणून समाजाने त्यात हस्तक्षेप करून ते टाळण्याचा अगर त्याबद्दल शिक्षा देण्याचा प्रयत्न करू नये असे आपण म्हणतो व जे करावयाला मनुष्य मोकळा असतो त्या आचरणाला इतर माणसे मोकळेपणाने उत्तेजन अगर सहकार्य देऊ शकतील का ? हा प्रश्न सोपा नाही. एखाद्या माणसाला तू अमुक कर असे सांगणे हे खरोखर आत्मनिष्ठ कृतीत मोडणार नाही. दुसऱ्याला सल्ला देणे अगर आमिष दाखवणे ही सामाजिक कृती आहे आणि म्हणून इतरांशी संबंध येणाऱ्या सर्व कृतींप्रमाणे समाजाचे त्याच्यावर नियंत्रण येणे शक्य आहे ही जी पहिली समजूत होते, ती थोड्या विचारानंतर बदलावी लागते. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या व्याख्येमधे जरी ही कृती येत नसली तरी त्या स्वातंत्र्याचे तत्त्व ज्या कारणावर आधारलेले आहे ती कारणे या कृतीला लागू पडतात. स्वतःशीच ज्यांचा संबंध येतो अशा बाबींमधे माणसाला तो त्याचे परिणाम भोगायला तयार असेल तर स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्याचा अधिकार असला तर, काय करणे योग्य आहे याबद्दल इतरांशी सल्लामसलत करण्याचा, मतांची देवघेव करण्याचा व सूचना देण्याचा आणि घेण्याचाही अधिकार असला पाहिजे. जे करण्याची परवानगी असेल त्याबद्दल सल्ला देण्याचीही परवानगी असली पाहिजे. सल्ला देणाराचा सल्ल्यामुळे वैयक्तिक फायदा होत असेल तरच थोडा संशय निर्माण होईल. विशेषकरून जेव्हा एखादा मनुष्य समाजाला व शासनसंस्थेला जे अनिष्ट वाटते त्याला उत्तेजन देणे हा आपला जीवनाचा किंवा पैसे

मिळवण्याचा धंदा बनवतो तेव्हा अशा वेळी अडचणीचा एक नवीन मुद्दा उपस्थित होतो. तो हा की सामाजिक कल्याण म्हणून जे समजले जाते त्याला विरोध करण्यातच ज्यांचे हित आहे आणि त्याच्या विरुद्ध वागणे हाच ज्यांच्या जीवनाचा मार्ग आहे अशा व्यक्तींच्या गटांचे अस्तित्व. यामधे समाजाने हस्तक्षेप करावा की करू नये ? उदाहरणार्थ, व्यभिचार व जुगार यांच्याकडे दुर्लक्ष करायला हवे; पण मुली पुरवण्याचा अगर जुगारीचा अड्डा चालविण्याचा धंदा करू द्यावा का ? दोन तत्त्वामधील मर्यादा-रेषामधे पडणारी अशी ही बाब आणि कोणते तत्त्व तिला लागू पडते हे एकदम लक्षात येत नाही. दोन्ही बाजूने पुष्कळ बोलता येण्यासारखे आहे. सहिष्णुतेच्या बाजूने असे म्हणता येईल की एखादी गोष्ट धंदा म्हणून केली जाते किंवा मनुष्य ती करून आपले पोट भरतो अगर पैसे मिळवतो; या कारणाने ती गोष्ट, एरवी क्षम्य असेल तर, दंडार्ह ठरणार नाही. ती गोष्ट संगतवार क्षम्य मानावी किंवा निषिद्ध मानावी. आतापर्यंत ज्या तत्त्वांचे समर्थन केले ती खरी असतील, तर व्यक्तीचाच ज्याच्याशी संबंध येतो अशी गोष्ट चुकीची आहे असे म्हणण्याचा समाजाला समाज म्हणून अधिकार नसावा. त्या गोष्टीविरुद्ध मन वळविण्याचा प्रयत्न करण्यापलिकडे समाजाने जाता कामा नये. विरुद्ध मन वळवण्याचा जर एकाला अधिकार असला तर बाजूने मन वळवण्याचा दुसऱ्याला अधिकार असला पाहिजे. याविरुद्ध असे सांगता येण्यासारखे आहे की व्यक्तीच्या हिताशीच ज्याचा संबंध आहे असे आचरण, दडपून टाकण्यासाठी किंवा शिक्षा करण्यासाठी चुकीचे आहे अगर बरोबर आहे हे अधिकारवाणीने सांगण्याचा समाजाला किंवा शासनसंस्थेला हक्क नसला, तरी त्याना जर ते आचरण चुकीचे आहे असे वाटत असेल तर त्या प्रश्नाबद्दल निदानीला चर्चा व्हावी एवढी तरी अपेक्षा बाळगण्याचा त्याना खात्रीने अधिकार आहे. हे मान्य केले म्हणजे, निरपेक्ष नाहीत अशा प्रोत्साहकांच्या प्रोत्साहनाला व निष्पक्ष नाहीत अशा उत्तेजकांच्या उत्तेजनाला वाव मिळणार नाही असे त्यानी

प्रयत्न केले तर त्यात चूक नाही हे देखील मान्य करावे लागेल. कारण शासनसंस्थेला जी बाजू चुकीची वाटते तिच्यामधे त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात आणि त्या बाजूचा ते पुरस्कार करतात ते, त्यांच्या कबूलीप्रमाणे देखील, स्वतःच्या फायद्यासाठी. माणसानी आपली निवड, शहाणपणाची किंवा मूर्खपणाची, आपल्या विचाराने करावी व त्यांच्या मनाच्या ओढीला स्वतःच्या हितासाठी एका बाजूने वळण लावणाऱ्याच्या कारवायांपासून त्याना शक्य तेवढे संरक्षण लाभावे अशी तजवीज केली तर त्याच्या योगाने नुकसान होत नाही, कोणत्याही चांगल्या गोष्टीवर पाणी पडत नाही असे खात्रीने म्हणता येईल असा युक्तिवाद पुढे मांडला जाईल. म्हणून ( असे म्हटले जाईल की ) बेकायदेशीर खेळाबद्दलचे कायदे जरी पूर्णतया अयोग्य असले– माणसांना स्वतःच्या घरी, एकमेकांच्या घरी किंवा स्वतः वर्गणी काढून स्थापन केलेल्या व सभासद आणि त्यांचे मित्र यांनाच मोकळे असलेल्या दुसऱ्या एखाद्या जागी जुगार मोकळेपणाने खेळता यावा– तरी जुगारीच्या सार्वजनिक अड्यांना परवानगी नसावी. ही बंदी कधी परिणामकारक ठरत नाही हे खरे आणि पोलिसांना कितीही भरमसाट सत्ता दिली तरी या नाही त्या मिषाने जुगारीचे सार्वजनिक अड्डे चालूच राहतील. परंतु त्यांना आपले काम बरेचसे गुप्तपणे व एक प्रकारच्या गूढतेच्या आवरणाखाली चालवावे लागेल आणि त्यामुळे त्यांचा शोध घ्यायला जातील त्याखेरीज इतरांना त्यांच्या विषयी काही माहिती असणार नाही. समाजाने यापेक्षा जास्त साध्य करण्याची अपेक्षा बाळगू नये. या युक्तिवादामधे पुष्कळ तथ्य आहे. मूळ गुन्हेगाराला मोकळे सोडले जाते ( आणि तसे त्याला सोडलेच पाहिजे ) आणि त्याला मदत करणाराला मात्र शिक्षा होते यामधे जी नैतिक विसंगती आहे ती निवारण करण्याइतके तथ्य त्या युक्तिवादात आहे की नाही हे ठरविण्याचे धाष्टर्य मी करणार नाही. नैतिक विसंगती आहे ती यामधे की शिक्षा किंवा दंड होतो तो वेश्या पुरविणाऱ्याला

किंवा जुगारीचा अड्डा चालविणाराला; वेश्यागमन करणारा किंवा जुगार खेळणारा मात्र मोकळा सुटतो. तत्सदृश कारणासाठीच विक्रीच्या व विकत घेण्याच्या सर्वसामान्य कृतीमधे हस्तक्षेप करणे अयोग्य आहे. विकलेल्या व विकत घेतलेल्या कोणत्याही वस्तूचा अतिरेकी उपयोग होणे शक्य आहे. अतिरेकी उपयोगाला उत्तेजन देण्यात विकणारांचे हित आहे. पण मेन कायद्याचे समर्थन करता येईल असा मुद्दा या गोष्टीतून उपस्थित होत नाही. मद्याचा खप व्हावा हे जरी मद्यव्यापाऱ्यांच्या हिताचे असले तरी मद्याच्या योग्य उपयोगासाठी देखील त्यांची आवश्यकता आहे. मद्याच्या अतिरिक्त सेवनाला ते जे उत्तेजन देतात ती एक मोठी अनिष्ट गोष्ट आहे. शासनसंस्था त्यांच्यावर जी बंधने लादते व त्यांच्याकडून जी हमी मागते ती त्यामुळेच समर्थनीय ठरते. हे समर्थन नसते तर शासनसंस्थेचे ते कृत्य न्याय्य स्वातंत्र्यावरील अतिक्रमणासारखे ठरले असते.

आणखी एक प्रश्न उपस्थित होतो तो असा की एखाद्या आचरणाला शासनसंस्थेने परवानगी दिली असली तरी ते आचरण करणाराच्या हिताला बाधक आहे असे तिला वाटत असेल तर त्याला उत्तेजन मिळणार नाही अशा काही गोष्टी शासनसंस्थेला वेगळ्या मार्गाने करता येतील की नाही? उदाहरणार्थ नशाबाजीचे साधन जी दारू ती अधिक महाग करावी का, किंवा दारूविक्रीची दुकाने कमी करून ती मिळणे जास्त कठीण करावे का? इतर अनेक व्यावहारिक प्रश्नांच्या बाबतीत जसे अनेक भेदभाव करावे लागतात तसेच या प्रश्नाच्या बाबतीतही करावे लागतील. दारूसारख्या उत्तेजक पदार्थावर ते मिळणे कठीण व्हावे म्हणून कर बसवणे व त्यांना बंदी करणे यामधे फरक आहे तो फक्त अंशांचाच (degrees). बंदी समर्थनीय असली तरच कर बसविणेही समर्थनीय ठरेल. किंमतीतील वाढ ही ज्यांना वाढीव भावाने ती वस्तू घेणे शक्य नसेल त्यांच्यापुरती बंदीसारखी आहे; आणि ज्यांना खरेदी करता येईल त्यांच्यावरती त्यांच्या विशिष्ट आवडीच्या पूर्तीसाठी म्हणून लादलेला दंड आहे. सुखांची निवड व

शासनसंस्था आणि व्यक्ती यांच्याबद्दलच्या ज्या कायदेशीर आणि नैतिक जबाबदाऱ्या असतात त्या पार पाडल्यानंतर उरलेल्या उत्पन्नाचे विनियोग करण्याचे मार्ग हे प्रत्येकाच्या अखत्यारीतील असल्याकारणाने प्रत्येकाने स्वतःच्या विचारानुसार निश्चित करावे. सरकारी उत्पन्नासाठी कर बसविण्याच्या दृष्टीने उत्तेजक वस्तूंची निवड करणे योग्य नाही असा या विवेचनावरून एखाद्याचा सकृतदर्शनी ग्रह होईल. परंतु उत्पन्नासाठी कर बसवणे अटळ आहे हे लक्षात ठेवले पाहिजे; बऱ्याचशा देशात पुष्कळ कर अप्रत्यक्ष स्वरूपाचे असावे लागतात; म्हणून शासनसंस्थेला उपयोगाच्या वस्तूवर कररूपाचा दंड बसवावा लागतो, काही मंडळींच्या बाबतीत तो बंदीसारखा ठरण्याची शक्यता आहे. कर लादताना ग्राहक कोणच्या वस्तू वापरणे सहज टाळू शकेल त्याचा शासनसंस्थेला विचार करावा लागतो. हा विचार करून वस्तूंची निवड करावी लागते व निवड करताना ज्या वस्तूंचा अगदी लहान प्रमाणापलिकडे उपयोग केल्याने हानी होते अशा वस्तूंची शासनसंस्थेने निवड करणे क्रमप्राप्त आहे. शक्य तितके जास्त उत्पन्न निर्माण होईल (हे सारे उत्पन्न शासनसंस्थेला आवश्यक आहे असे मानल्यास) अशा रीतीने उत्तेजक वस्तूवर कर लादले तर ते समर्थनीय आहेत, एवढेच नव्हे तर ते चांगले आहेत अशीदेखील त्यांना मान्यता मिळायला हवी.

वर उल्लेखिलेल्या वस्तूंची विक्री करण्याचा हक्क कमीअधिक प्रमाणात थोडयाच लोकांपुरता मर्यादित ठेवण्याचा जो प्रश्न आहे त्याचे उत्तर ज्या कारणासाठी म्हणून ते बंधन घालण्यात आले असेल त्याप्रमाणे वेगवेगळे द्यावे लागेल. सर्व सार्वजनिक ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त असणे इष्ट असते; मद्यपानगृहांच्या शेजारी त्याची अधिक आवश्यकता आहे, कारण सामाजिक स्वरूपाच्या गुन्ह्यांचा त्या ठिकाणी प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून या वस्तू विकण्याचा हक्क (जागीच सेवन करण्याच्या बाबतीत तरी निदान) ज्यांच्या सदाचाराबद्दल माहिती आहे

अगर खात्री दिली जाते तेवढ्यांच्यापुरताच मर्यादित ठेवणे इष्ट आहे. तसेच सार्वजनिक देखरेख ठेवता येईल अशा बेताने दुकान उघडण्याची व बंद करण्याची वेळ ठरवणे, दुकानदाराच्या संमतीने अगर असहायतेमुळे जर वेळोवेळी शांतताभंग होत असेल या कायद्याविरुद्ध गुन्ह्यांची योजना आखण्यासाठी अगर तयारी करण्यासाठी जागेचा उपयोग होत असेल तर परवाना रद्द करणे वगैरेंची सोय करणेही जरूरीचे आहे. या पलीकडे आणखी निर्बंध लादणे तत्त्वत: समर्थनीय होईल असे मला वाटत नाही. बीअर व इतर दारू मिळणे कठीण व्हावे अगर त्यांचे सेवन करण्याचा मोह कमी व्हावा या स्पष्ट हेतूने त्या वस्तू विकणाऱ्या दुकानांची संख्या कमी केल्याने थोडे लोक गैरउपयोग करतात म्हणून सर्वांची गैरसोय केल्यासारखे होते. ज्या समाजामधे कामगारांना उघड उघड मुलाप्रमाणे व रानटी माणसाप्रमाणे वागवले जाते व पुढच्या काळात स्वातंत्र्याच्या सवलती मिळाव्या म्हणून आजच्या काळात त्यांना शिस्तीचे शिक्षण दिले जाते अशा समाजालाच ती बंधने शोभतील. कोणच्याही स्वतंत्र देशात या पद्धतीने, घोषणांकडे लक्ष पुरवता, कामगारांवर राज्य केले जात नाही; स्वातंत्र्याला योग्य महत्त्व देणारा कुणीही इसम त्या पद्धतीने त्यांच्यावर राज्य करण्याच्या धोरणाला पाठिंबा देणार नाही. त्यांना स्वातंत्र्याचे शिक्षण देण्याचे व स्वतंत्र माणसे म्हणून त्यांच्यावर राज्य करण्याचे सारे प्रयत्न फसले व मुले म्हणूनच त्यांच्यावर राज्य केले पाहिजे हे निर्विवाद सिद्ध झाले तर मात्र गोष्ट वेगळी. वैकल्पिक अवस्थेबद्दलचे जे साधे विधान केले आहे, त्यावरूनच हे उघड होईल की येथे विचारात घ्यावे लागतील असे याबद्दलचे प्रयत्न कुठेही झालेले नाहीत. या देशातील संस्थांमधे विसंगतीचा खूप गोंधळ आहे. म्हणूनच जुलमी अगर बापाप्रमाणे काळजी घेणाऱ्या राजवटीत शोभतील असे अनेक प्रकार आपल्या व्यवहारात घुसलेले आहेत. त्याच वेळी आपल्या संस्थांमुळे जे सार्वत्रिक स्वातंत्र्य आपल्याला लाभलेले आहे त्यामुळे एखाद्या बंधनाचा नैतिक शिक्षण म्हणून

योग्य उपयोग व्हावा यासाठी जो अधिकार वापरायला हवा तो आपल्याला वापरता येत नाही.

या निबंधाच्या सुरवातीच्या भागात असे दाखविले आहे की केवळ व्यक्तीशी संबंधित अशा गोष्टीतील व्यक्तीचे स्वातंत्र्य मान्य केले की त्यातूनच अनेक व्यक्तींचे त्यांच्याशीच संबंधित असलेल्या व इतर कुणाशीही संबंधित नसलेल्या गोष्टींचे एकमेकांच्या विचाराने नियमन करण्याचे स्वातंत्र्य निर्माण होते. सर्व संबंधित व्यक्तींची इच्छा जोवर बदलत नाही तोवर या गोष्टीमध्ये कोणचीही अडचण निर्माण होत नाही. परंतु ती इच्छा बदलण्याचा संभव असतो. त्यामुळे त्यांच्याशीच संबंधित अशा गोष्टींच्याबद्दल देखील त्यांनी एकमेकांशी करार करणे इष्ट असते आणि जे करार होतील त्यांची सर्वसाधारणपणे प्रत्येकाने अंमलबजावणी करावी; परंतु प्रत्येक देशात कायद्याने या सर्वसाधारण नियमाला काही अपवाद असतात. तिऱ्हाइत मंडळींच्या हक्कावर अतिक्रमण करणारे करार बंधनकारक धरले जात नाहीत; एवढेच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या हिताला करार बाधक होत आहे म्हणूनदेखील काही वेळा त्यांची करारातून मुक्तता होते. उदाहरणार्थ, या देशात व इतर अनेक सुसंस्कृत देशात स्वतःला गुलाम म्हणून विकण्याचा अगर विकले जाऊ देण्याचा करार रद्दबादल ठरविला जाईल व कायदा आणि लोकमत त्याची अंमलबजावणी होऊ देणार नाही. स्वतःच्या जीवनाची अशी खुषीने विल्हेवाट लावण्याच्या व्यक्तीच्या हक्कावरील या नियंत्रणाचे कारण उघड आहे आणि ते वर दिलेल्या निर्वाणीच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. एखाद्या माणसाच्या खुशीने केलेल्या कामात हस्तक्षेप न करण्याचे कारण जर कोणते असेल तर ती त्याच्या स्वातंत्र्याबद्दलची काळजी. खुशीने त्याने निवड केली त्याचाच अर्थ हा की निवड केलेली गोष्ट त्याला आवडते, निदान ती त्याला सत्य वाटते, आणि ती साध्य करण्यासाठी त्याला योग्य वाटेल त्या मार्गाचा अवलंब करू देणे यातच त्याचे सुख आहे. पण गुलाम म्हणून स्वतःला

विकून तो आपले स्वातंत्र्य नष्ट करतो; विकण्याच्या त्या एका कृतीपलीकडे पुन्हा परत स्वातंत्र्याचा उपयोग करण्याचा अधिकार तो देऊन टाकतो. स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्याच्या हक्काचे जे समर्थन आहे तेच आपल्या कृतीने तो नष्ट करतो. तो त्यापुढे स्वतंत्र रहात नाही; स्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार स्वतंत्र न राहण्याचे स्वातंत्र्य त्याला मागता येणार नाही. स्वतःचे स्वातंत्र्य देऊन टाकण्याची परवानगी म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. ही जी कारणे आहेत त्यांचे पुरे प्रत्यंतर या गोष्टीमधे आढळून येते; परंतु ती कारणे इतर अनेक गोष्टींना लागू पडतात. परंतु जीवनातील अडचणीं-मुळे त्यांच्यावरती प्रत्येक वेळी मर्यादा पडतात. त्या अडचणीमुळे आपल्याला स्वातंत्र्यावर पाणी सोडावे लागत नाही, परंतु त्याच्यावरील या नाही तर त्या बंधनाला मान्यता द्यावी लागते. कृती करणारांशीच ज्यांचा संबंध पोचतो अशा सर्व गोष्टींच्या बाबतीत माणसाला निरंकुश स्वातंत्र्य असले पाहिजे हे जे तत्त्व आहे त्या तत्त्वानुसार तिऱ्हाइतांशी ज्यांचा संबंध पोचत नाही अशा गोष्टींच्या बाबतीत कराराने एकमेकाशी बांधल्या गेलेल्या व्यक्तींना एकमेकांना त्या करारातून मुक्त करता यावे; आणि अशी खुषीची मुक्तता झाली नाही तरी, पैसे अगर तसल्याच इतर वस्तू याबद्दलचे करार सोडले, तर असा कोणताही करार नाही की ज्यापासून माणसाला परावृत्त होता येणार नाही असे म्हणता येईल. बॅरन विल्हेम फॉन् हम्बोल्ट याने मी पूर्वी उल्लेखिलेल्या आपल्या उत्कृष्ट निबंधात आपले निश्चित मत म्हणून म्हटले आहे की वैयक्तिक (personal) संबंध अगर सेवा याबद्दलचे करार निश्चित मुदतीपलीकडे कायद्याने कधीही बंधनकारक असू नयेत आणि यांपैकी सर्वांत महत्त्वाचा जो लग्नाचा करार तो तर, दोघांची मने एकमेकाशी जुळती असल्याखेरीज त्याचे उद्दिष्ट सफल होत नसल्याकारणाने, दोघांपैकी कुणाही एकाने तशी इच्छा व्यक्त करताच रद्द व्हावा. तो रद्द करण्यासाठी दुसरे कोणतेही कारण आवश्यक असू नये. हा विषय खूप महत्त्वाचा व गुंतागुंतीचा असल्याकारणाने त्याची केवळ अनुषंगाने

चर्चा करणे इष्ट नाही. मी त्याचा उल्लेख करतो आहे तो फक्त उदाहरण म्हणून. बॅरन हम्बोल्ट यांचा निबंध व्यापक स्वरूपाचा पण संक्षिप्तपणे लिहिलेला असा नसता, व त्यामुळे या विषयावरील त्यांचा निर्णय त्यांना साधकबाधक चर्चा केल्याविना द्यावा लागला नसता, तर त्यांनी उल्लेखिलेल्या साऱ्या कारणांचा विचार करूनच या प्रश्नाचा निर्णय देता येणार नाही हे त्यांच्या लक्षात आले असते. स्पष्ट वचनाने किंवा वर्तनाने ज्या वेळी एखादा मनुष्य दुसऱ्याच्या मनात आपण अमुक तऱ्हेने वागत राहू अशी अपेक्षा निर्माण करतो - आणि त्यामुळे तो दुसरा मनुष्य काही अपेक्षा बाळगतो व अंदाज बांधतो आणि त्याच्या आधारावर आपल्या जीवनाची योजना आखतो त्यावेळी त्या दुसऱ्या माणसाविषयी काही नवीन नैतिक जबाबदाऱ्या निर्माण होतात. त्या जबा-बदाऱ्या मुळीच बाजूला सारता येणार नाहीत असे नाही, पण त्या विचारात मात्र अवश्य घेतल्या पाहिजेत. आणि पुन्हा, करार करणाऱ्या दोघातील संबंधामुळे इतरांवर जर काही परिणाम घडून आले असतील, तिऱ्हाइतांच्या परिस्थितीत जर त्या संबंधामुळे काही विशिष्ट बदल घडून आले असतील, किंवा लग्नाच्या करारामुळे घडते त्याप्रमाणे काही नवीन जीव अस्तित्वात आले असतील, तर त्या वेगळ्या मंडळींच्या संबंधाने करार करणाऱ्या दोन्ही पक्षांवर बंधनकारक अशा काही नैतिक जबाबदाऱ्या निर्माण होतात; ज्याची पूर्तता होणे वा पूर्तता होण्याची पद्धत यावर त्या दोघामधील संबंध कायम राहतो की तुटतो या गोष्टीचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो; पण म्हणून, नाखूष पक्षाच्या सुखाचा विचार न करता, कराराची पूर्तता झालीच पाहिजे असे यावरून सिद्ध होत नाही, व मलाही ते मान्य नाही. परंतु त्या प्रश्नांच्या या बाबी एक अवश्यमेव भाग आहेत. आणि फॉन् हम्बोल्ट यांनी म्हटल्याप्रमाणे जरी त्या बाबींचा माणसाच्या करारामधून स्वतःला सोडवून घेण्याच्या कायदेशीर स्वातंत्र्यावर मुळीदेखील परिणाम घडून येऊ नये हे जरी खरे असले ( माझेही म्हणणे आहे की त्या बाबींचा

खूप परिणाम घडू नये ), तरी त्याच्यामुळे नैतिक स्वातंत्र्यामध्ये मात्र खूप फरक पडतो. दुसऱ्यांच्या महत्त्वाच्या हितावर परिणाम घडून येईल अशा तऱ्हेचे हे पाऊल टाकण्यापूर्वी माणसाने या सर्व गोष्टींचा नीट विचार केला पाहिजे; आणि लोकांच्या या हिताकडे जर त्याने योग्य ते लक्ष पुरवले नाही, तर जी हानी होईल तिच्याबद्दल नैतिकदृष्ट्या तो जबाबदार आहे असे समजता येईल. स्वातंत्र्याच्या सर्वसाधारण तत्त्वाच्या विशदीकरणासाठी म्हणून मी हे लिहिले आहे; प्रस्तुत प्रश्नाच्या विचारासाठी ते अगदी जरूरीचे आहे म्हणून नव्हे; हा प्रश्न नेहमीच चर्चिला जातो तो केवळ मुलांच्या हिताच्या दृष्टीने, जणू काय मुलांच्या हितालाच सारे महत्त्व आहे आणि मोठ्यांच्या हिताला काहीच महत्त्व नाही.

सर्वमान्य अशा तत्त्वांच्या अभावी स्वातंत्र्य पुष्कळ वेळा द्यावे तिथे दिले जात नाही व देऊ नये तिथे दिले जाते याबद्दल मी पूर्वीच लिहिले आहे. आधुनिक युरपमध्ये एका गोष्टीच्याबाबतीत स्वातंत्र्याचा मोठा आग्रह धरण्यात येत आहे, परंतु माझ्या मते त्या गोष्टीबद्दलचा तो आग्रह पूर्णतया अनाठाई आहे. स्वतःशी संबद्ध अशा बाबीमध्ये माणसाला पुरे स्वातंत्र्य असावे; परंतु दुसऱ्यासाठी जेव्हा तो काम करत असतो तेव्हा दुसऱ्याचे व्यवहार ते आपलेच असे दाखवून आपल्या मनाला वाटेल तसे वागण्याचा त्याला मुळीच अधिकार असता कामा नये. शासनसंस्थेने स्वतःशीच ज्यांचा संबंध आहे अशा बाबतीत व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर राखला पाहिजे, परंतु दुसऱ्यावर सत्ता गाजवण्याचा जो अधिकार एखाद्या व्यक्तीला दिलेला असतो त्याच्या उपयोगावर कडक नजर ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक संबंधांच्या बाबतीत ही जबाबदारी मुळीच पार पाडली जात नाही. मनुष्यांच्या सुखावर या संबंधांचा जो परिणाम होतो तो इतर सर्व गोष्टी-पेक्षा अधिक असतो. पतीची पत्नीवरती जी जवळजवळ अनियंत्रित सत्ता असते तिचे या ठिकाणी वर्णन करण्याचे कारण नाही. बाय-कांना ज्या वेळी समान हक्क लाभतील आणि इतरांप्रमाणे त्यांनादेखील

कायद्याचे समान संरक्षण लाभेल त्याच वेळी ही अनिष्ट गोष्ट दूर करता येईल. या बाबतीतील प्रचलित अन्यायाचे समर्थक स्वातंत्र्याचा पुकारा करत नाहीत, ते उघडपणे सत्तेच्या बाजूने उभे राहतात. मुलांच्या बाबतीत मात्र स्वातंत्र्याच्या कल्पना ही शासनसंस्थेने आपले कर्तव्य पार पाडण्याच्या मार्गातील मोठी धोंड आहे. माणसाची मुले ही अलंकारिक रीतीने नव्हे तर प्रत्यक्षरीतीने त्याच्या शरीराचा भाग आहे असे समजले जाते आणि त्यामुळेच त्याच्या मुलावरील अमर्याद व केवळ त्याच्याच अशा सत्तेमधे कायद्याने थोडा देखील हस्तक्षेप करता कामा नये असा आग्रह धरला जातो. स्वतःच्या स्वातंत्र्यावरील हस्तक्षेपापेक्षा देखील या हस्तक्षेपाला अधिक विरोध होतो. माणसे सत्तेच्या मानाने स्वातंत्र्याला किती कमी महत्त्व देतात ते यावरून उघड होते. शिक्षणाच्या प्रश्नाचा उदाहरण म्हणून विचार करा. नागरिक म्हणून जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीला एका विशिष्ट मर्यादेपर्यंतचे शिक्षण मिळालेच पाहिजे अशी सोय करणे हे शासनाचे कर्तव्य आहे हे स्वतःसिद्ध असे सत्य नाही का ? तरी हे सत्य मान्य करून त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे असा आग्रह धरायला घाबरणार नाही असा कुणी आहे का ? जगामधे एका मनुष्यप्राण्याची भर घातल्यानंतर जीवनामधे आपले कार्य स्वतःच्या व इतरांच्या दृष्टीने योग्य रीतीने पार पाडता येईल असे त्याला शिक्षण देणे हे आईबापांचे ( किंवा सध्याच्या कायद्यानुसार व रूढीनुसार बापाचे ) एक अत्यंत पवित्र असे कर्तव्य आहे हे कुणीही नाकारणार नाही. हे बापाचे कर्तव्य आहे असे सर्वांनी मान्य केले, तरी त्याला ते कर्तव्य पार पाडायला लावले पाहिजे हे मान्य करायला मात्र फारच थोडे तयार होतील. मुलाला शिक्षण मिळावे म्हणून खटपट करण्याऐवजी व झीज सोसण्याऐवजी, फुकट शिक्षण दिले जाते तेव्हादेखील ते घ्यावे की न घ्यावे हे ठरविण्याचा अधिकार त्याला देण्यात आलेला आहे. शरीरासाठी अन्न व मनासाठी शिक्षण पुरवता येईल अशी सामान्य

स्वरूपाची सोय केल्याखेरीज मुलाला जन्म देणे हा नैतिक गुन्हा आहे ही गोष्ट अद्याप मानली गेलेली नाही. दुर्दैवी मुलाविरुद्ध जसा तो गुन्हा आहे तसाच तो समाजाविरुद्धही गुन्हा आहे. म्हणून आईबापांनी ती जबाबदारी पुरी केली नाही तर शासनसंस्थेने ती, होता होईल तो आईबापांच्या खर्चाने, पुरी करावी या गोष्टीला मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सार्वत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी एकदा मान्य झाली की शासनसंस्थेने काय शिकवावे व कसे शिकवावे याबद्दलच्या ज्या अडचणी आहेत त्या दूर होऊ शकतील. या प्रश्नाबद्दल सध्या वेगवेगळे पंथ आणि पक्ष यामधे रणधुमाळी माजली आहे. जे श्रम आणि वेळ शिक्षणासाठी खर्च व्हायला हवे होते ते शिक्षणाविषयी वाद घालण्यात फुकट जात आहेत. प्रत्येक मुलाला चांगले शिक्षण मिळालेच पाहिजे असे शासनाने ठरवले, तर शिक्षण देण्याचे श्रम त्याला टाळता येतील. शिक्षण कुठे व कसे द्यावयाचे तो प्रश्न मुलांच्या आईबापांवर सोपवता येईल आणि शासनाला, गरीब मुलांची फी द्यावयाला मदत करावयाची आणि ज्यांच्या वतीने खर्च करायला कुणीच नसेल अशा मुलांच्या शिक्षणाचा सारा खर्च करावयाचा, एवढीच जबाबदारी पतकरावी लागेल. शासनसंस्थेने शिक्षण द्यावयाचे या गोष्टीला जो साधार विरोध होतो तो त्या संस्थेने शिक्षण दिलेच पाहिजे अशी व्यवस्था करायला विरोध नसून तिने शिक्षण देण्याची जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेण्याला विरोध आहे; आणि ती गोष्ट खरोखरच अगदी वेगळी आहे. शिक्षण देण्याची पुरी किंवा बहुतेक जबाबदारी शासनसंस्थेच्या हाती असावी या गोष्टीला इतरांइतकीच माझीदेखील तीव्र नापसंती आहे. स्वभावाचा वेगळेपणा आणि मनाचे व जीवनपद्धतीचे वैचित्र्य यांच्या महत्त्वाबद्दल जे विवेचन केले आहे ते तितक्याच महत्त्वाच्या शिक्षणातील वैचित्र्यालाही लागू पडते. शासनाने दिलेले सर्वसाधारण शिक्षण म्हणजे सर्व माणसांना एकमेकासारखे बनवण्याचे तंत्र आहे. शासना-

तील वरचढ सत्तेला जो साचा पसंत पडेल त्या साच्यातील माणसे त्या शिक्षणाने तयार होतील; मग ती सत्ता कोणाचीही असो— राजाची असो, भिक्षुकवर्गाची असो, अमीर-उमरावांची असो की विद्यमान पिढीतील बहु-संख्य लोकांची असो. ज्या प्रमाणात ती सत्ता कार्यक्षम व यशस्वी असेल त्या प्रमाणात ती मनावर आपले स्वामित्व प्रस्थापित करील. मनावरील स्वामित्वातून हलके हलके नैसर्गिक पद्धतीने शरीरावरील स्वामित्व निर्माण होते. शासनसंस्थेने स्थापलेले व नियंत्रित केलेले शिक्षण रहावयाचे असेल तर ते इतरांच्या बरोबरीने प्रयोगातील एक स्पर्धक म्हणूनच राहिले पाहिजे; उत्कृष्टतेचा विवक्षित दर्जा इतरांनी कायम ठेवावा यासाठी त्यांच्यापुढे उदाहरण असावे व त्यांना उत्तेजन लाभावे या हेतूनेच त्या शिक्षणाची सोय व्हावी. समाज अगदी मागासलेल्या अवस्थेत असेल आणि त्याला शासनाने जबाबदारी अंगावर घेतल्याखेरीज आपल्या प्रयत्नाने शिक्षणांच्या संस्था स्थापन करता येत नसतील, तर मात्र शासनाला, दोन अनिष्ट गोष्टीतील कमी अनिष्ट गोष्ट म्हणून, शाळा, विश्वविद्यालये स्थापन करण्याचे कार्य स्वतःच्या अंगावर घ्यावे लागेल. एखाद्या देशात मोठे उद्योगधंदे काढण्याची जबाबदारी घेणारे खाजगी भांडवलदार नसले म्हणजे जशा शासनाला समाईक भांडवलाच्या संस्था काढाव्या लाग-तात तसे करावे लागेल. परंतु सर्वसाधारणपणे शासनाच्या विद्यमाने शिक्षण देऊ शकतील अशी मंडळी जरूर त्या संख्येने देशामधे असली तर तीच मंडळी स्वतःच्या जबाबदारीवर खाजगी संस्थातून तितकेच चांगले शिक्षण आनंदाने देऊ शकतील. शिक्षण सक्तीचे बनवण्याच्या कायद्या-नुसार मोबदल्याची मात्र त्यांना हमी दिली पाहिजे आणि समाजातील ज्या गटांना शिक्षणावर खर्च करण्याची ऐपत नसेल त्यांचा तो खर्च भागवण्या-साठी शासनाकडून जरूर ती मदत देखील मिळाली पाहिजे.

या कायद्याची अंमलबजावणी करता येईल ती सर्व मुलांना लागू पडतील व अगदी लहान वयापासून सुरू होतील अशा सार्वजनिक

परीक्षांच्या पद्धतीने. ज्या वेळी प्रत्येक मुलाची त्याला (अगर तिला) वाचता येते की नाही याची परीक्षा घेता येईल असे वय निश्चित करावे. मुलाला जर वाचता आले नाही तर बापावर, त्याला या चुकीबद्दल योग्य कारण दाखवता आले नाही तर, लहानसा दंड बसवावा. जरूर तर हा दंड त्याला कामाच्या रूपाने देता येईल आणि मग मुलाला त्याच्या खर्चाने शाळेत घालावे. परीक्षा दर वर्षी घेतली जावी, परीक्षेचे विषय क्रमाक्रमाने वाढवावे, म्हणजे किमान मर्यादेचे सर्वसाधारण ज्ञान प्रत्येकाला मिळेल व त्याच्या डोक्यात राहील अशी जवळजवळ सक्तीची पद्धत रूढ होईल. या किमान मर्यादेपलिकडे वेगवेगळ्या विषयांच्या ऐच्छिक स्वरूपाच्या परीक्षा असाव्या आणि त्यामधे ठराविक दर्जाची गुणवत्ता दाखवतील त्यांना प्रमाणपत्रे मागण्याचा अधिकार असावा. या योजनेने शासनसंस्थेला लोकांच्या मतावर अयोग्य दडपण लादता येऊ नये म्हणून परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी, अगदी वरच्या दर्जाच्या परीक्षांसाठी देखील, जे ज्ञान आवश्यक असावे ते फक्त घटनांबद्दलचे (facts) व शास्त्राबद्दलचे असावे (भाषा व तिचा वापर यासारखे उपकरणात्मक (instrumental) स्वरूपाचे ज्ञान सोडून). धर्म, राजकारण व इतर विवाद्य विषयांवरील परीक्षांमधे मतांचा खरेपणा अगर खोटेपणा यांच्याकडे लक्ष न देता केवळ घटनांकडे म्हणजे अमुक ग्रंथकाराचे, अमुक विचारसरणीचे (school), अगर अमुक धर्मपीठाचे अमुक कारणांच्या आधाराने अमुक मत आहे याच्या-कडेच लक्ष असावे. ज्या गोष्टीबद्दल वाद आहे अशा गोष्टींच्या ज्ञानाबाबत या पद्धतीमुळे नवीन पिढी आजच्या पिढीच्या मानाने मुळीच मागासलेली राहणार नाही. ती आताच्या प्रमाणेच धर्मपीठावर श्रद्धा ठेवणारी म्हणून अगर वेगळ्या विचाराची म्हणून वाढवली जाईल. शासनसंस्था काळजी घेईल ती एवढीच की दोघांनाही आपआपल्या पंथांचे व विचारांचे योग्य ज्ञान झालेले असावे. नवीन पिढीतील मुलांना, त्यांच्या वडिलांची तशी इच्छा असेल तर, जिथे इतर विषय शिकवले जातात तिथेच

धर्माचे शिक्षण देण्यातही अडचण येऊ नये. विवाद्य विषयावरील नागरिकाच्या मताला वळण लावण्याचे शासन संस्थेचे प्रयत्न नेहमीच अनिष्ट असतात; परंतु एखाद्या माणसाचे एखाद्या विषयावरील निर्णय लक्षात घेण्यासारखे ठरावे यासाठी त्याच्या ठिकाणी जे ज्ञान हवे ते ज्ञान त्याच्याजवळ आहे की नाही याची शहानिशा करून त्याला प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात काही वावगे नाही. तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्याला लॉक आणि कान्ट यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल परीक्षा देता आली तर लोक त्याला अधिक मानतील, मागाहून दोघांपैकी कुणाचीही विचारसरणी त्याला पसंत पडो किंवा दोघांचीही पसंत न पडो. तसेच एखाद्या निरीश्वरवाद्याची ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वाबद्दल परीक्षा घेण्यास हरकत नसावी. त्या तत्त्वावर आपला विश्वास आहे असे सांगण्याची जबरदस्ती मात्र त्याच्यावर होऊ नये. ज्ञानाच्या उच्च शाखातील परीक्षा, मला वाटते, पूर्णपणे ऐच्छिक असाव्या. पुरेशी पात्रता नाही या सबबीवर एखाद्याला कोणच्याही पेशात, शिक्षकाच्या देखील, शिरण्याची परवानगी नाकारण्याचा अधिकार शासनाला दिला तर मोठी धोकादायक सत्ता त्याच्या हातात दिल्यासारखे होईल. म्हणून विल्हेम फॉन हम्बोल्ट याच्याप्रमाणे मला देखील वाटते की शास्त्रीय वा धंदेविषयक पात्रतेबद्दलची पदवी किंवा प्रमाणपत्र परीक्षेला जे बसतील आणि चाचणीने योग्य ठरतील त्या सर्वांना द्यावे. लोकांमधे त्या प्रमाणपत्रांना जी मान्यता लाभली असेल त्या पलीकडे दुसरा कोणताही फायदा इतर स्पर्धकाविरूद्ध प्रमाणपत्रधारकांना मिळू नये.

स्वातंत्र्याबद्दलच्या चुकीच्या कल्पनांमुळे, केवळ शिक्षणाच्या क्षेत्रातच नव्हे तर इतरत्रही, आईबापांच्या ज्या नैतिक जबाबदाऱ्या आहेत त्यांना मान्यता मिळत नाही व कायदेशीर जबाबदाऱ्यांची अंमलबजावणी होत नाही. नैतिक जबाबदाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मान्यतेला पाठिंबा देणारी उत्तम कारणे नेहमीच विद्यमान असतात, कायदेशीर जबाबदाऱ्या अंमलात

आणण्याच्या बाबतीतही ती पुष्कळ वेळा हजर असतात. दुसऱ्या जीवाला जन्म देणे ही मनुष्यजीवनातील सर्वात मोठी जबाबदारीची कृती आहे. ही जबाबदारी पतकरणे– शाप ठरेल किंवा हर्षाची गोष्ट ठरेल असे जीवन कुणालाही देणे– त्या जीवाला सर्वसाधारणपणे नीट जीवन जगता येईल अशी व्यवस्था केल्याखेरीज त्या जीवाला जन्माला घालणे हा त्या जीवा-विरुद्ध केलेला घोर अपराध आहे. ज्या देशाची लोकसंख्या बेसुमार वाढली आहे अगर वाढण्याची धास्ती आहे अशा देशात मोठ्या संख्येने मुलांची निर्मिती करणे, जिच्या योगाने चढाओढीमुळे कामगारांची मजुरी कमी होते, हा श्रमाबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यावर जगणाऱ्या सर्व मंडळीविरुद्ध मोठा गुन्हा आहे. युरपखंडातील काही देशांमधे कुटुंबाचे पोषण करण्याचे सामर्थ्य आहे असे दाखविल्याखेरीज लग्नाला प्रतिबंध करणारे जे कायदे आहेत ते शासनसंस्थेच्या न्याय्य हक्कापलीकडे जात नाहीत. हे कायदे योग्य आहेत की नाहीत ही गोष्ट वेगळी ( स्थानिक परिस्थिती व भावना यावर हा प्रश्न अवलंबून आहे ); परंतु स्वातंत्र्यावर अतिक्रमण होते हा त्यांच्यावर आक्षेप घेता येणार नाही. हे कायदे म्हणजे खोडसाळपणाचे ( mischievous ) कृत्य टाळण्यासाठी म्हणून केलेला शासनसंस्थेचा हस्तक्षेप आहे. या कृत्यामुळे लोकांना इजा होते; म्हणून ते कृत्य निंदनीय व सामाजिक-दृष्ट्या गर्ह्य ठरले पाहिजे; कायदेशीर शिक्षेची सामाजिक नापसंतीमधे भर घालणे जरूरीचे वाटो न वाटो. परंतु स्वातंत्र्याबद्दलच्या सध्याच्या कल्पनेप्रमाणे केवळ आत्मनिष्ठ अशा बाबींमधे देखील व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर सहज अतिक्रमण करता येते पण लग्नाबद्दलच्या त्याच्या ज्या प्रवृत्ती आहेत त्यावर निर्बंध लादणे मात्र आक्षेपार्ह ठरते. ही प्रवृत्ती अशी आहे की तिला वाव दिला की मुले जन्मतात आणि त्यांना भिकारपणाचे व दुर्गतीचे जीवन जगावे लागते. आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्याशी दूरचा का होईना संबंध येणाऱ्या सर्वांना भोगावे लागतात. माणसामधे स्वातंत्र्याबद्दलची काही गोष्टीतील जी चमत्कारिक आवड आहे तिची इतर काही गोष्टीतील

नावडीशी तुलना केली तर असे म्हणावे लागते की दुसऱ्याचे नुकसान करण्याचा माणसाला अनिवार्य हक्क आहे परंतु दुसऱ्या कुणालाही दुःख न देता स्वतःचे सुख साधण्याचा मात्र त्याला हक्क नाही.

या निबंधाच्या विषयाशी ज्यांचा संबंध आहे पण जे तत्त्वतः त्याच्या कक्षेत पडत नाहीत अशा शासनाच्या हस्तक्षेपाच्या मर्यादेबद्दलचे बरेच प्रश्न मी मुद्दाम शेवटी विचार करण्यासाठी म्हणून बाजूला ठेवले आहेत. या बाबीमधे हस्तक्षेपाच्या विरुद्ध जी कारणे आहेत त्यांचा स्वातंत्र्याच्या तत्त्वाशी संबंध पोचत नाही; प्रश्न आहे तो व्यक्तीवर नियंत्रणे लादण्याचा नसून त्यांना मदत करण्याचा आहे; त्यांच्या हितासाठी शासनाने काही करावे व करवावे की त्यांना स्वतःच्या प्रयत्नाने किंवा सर्वांनी मिळून स्वेच्छेने एकत्र येऊन ते करण्यासाठी मोकळे सोडावे हा प्रश्न आहे.

शासनाच्या हस्तक्षेपाविरुद्ध, जेव्हा त्याच्या योगाने स्वातंत्र्यावर अतिक्रमण होत नाही, घ्यावयाचे आक्षेप तीन तऱ्हेचे असू शकतात.

पहिला आक्षेप येतो तो जेव्हा एखादी गोष्ट शासनापेक्षा व्यक्ती अधिक चांगल्या रीतीने करू शकतात. सर्वसाधारणपणे बोलावयाचे झाले तर असे म्हणता येईल की ज्यांचे एखाद्या धंद्यात वैयक्तिक हित असते तेच दुसऱ्या कुणाहीपेक्षा अधिक चांगल्या रीतीने तो धंदा चालवू शकतील अगर तो कुणी अगर कसा चालवावा हे सांगू शकतील. उद्योगधंद्याच्या नेहमीच्या व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याच्या कायदेमंडळाच्या किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या, एके काळी ठिकठिकाणी दृष्टीस पडणाऱ्या, प्रयत्नांना जो विरोध होतो तो या तत्त्वानुसार. या विषयाची राजकीय अर्थशास्त्रज्ञांनी खूप चर्चा केली असून या निबंधामधे विषद केलेल्या तत्त्वांशी त्याचा विशेष संबंध नाही.

दुसऱ्या आक्षेपाचा आपल्या विषयाशी अधिक संबंध आहे. पुष्कळ बाबीत व्यक्तींना जरी एखादी गोष्ट सरकारी अधिकाऱ्याइतकी सरसकट चांगल्या रीतीने करता आली नाही तरी देखील सरकारच्या ऐवजी त्यांनीच

ती करावी हे इष्ट असते. असे कार्य केल्याने मन शिक्षित होते, अंगचे गुण वाढीला लागतात, विवेकबुद्धी कार्यक्षम बनते आणि काम अंगावर पडल्यामुळे त्याच्याविषयीची माहिती अधिकाधिक कळत जाते. न्यायदानाच्या बाबतीत ( राजकीय खटले सोडून ) ज्युरीची पद्धत जी योग्य ठरते ती मुख्यत्वेकरून याच कारणामुळे. स्थानिक व शहरी स्वतंत्र आणि लोकमतानुवर्ती संस्थांची व आपखुषीच्या ( voluntary ) संस्थांमार्फतीने औद्योगिक आणि इतर व्यवहार चालावे या गोष्टीची तरफदारी करण्यात येते ती देखील याच कारणामुळे. हे स्वातंत्र्याचे प्रश्न नसून विकासाचे प्रश्न आहेत; स्वातंत्र्याशी त्यांचा संबंध आहे तो केवळ दूरगामी प्रवृत्तींच्या दृष्टीने. या गोष्टींचा राष्ट्रीय शिक्षणाशी जो संबंध आहे त्याचा विचार वेगळ्या ठिकाणी केला पाहिजे. पण खरे पाहिले तर या काम करण्याच्या पद्धतीमुळेच नागरिकांना वळण लागते; स्वतंत्र जनतेच्या राजकीय शिक्षणाचा हा एक भाग आहे; या पद्धतीमुळे वैयक्तिक व कौटुंबिक स्वार्थाच्या मर्यादेपलिकडे लोकांना नेता येते व सामुदायिक हित व सामुदायिक व्यवहारांचे नियोजन यांच्याशी त्यांचा परिचय होतो; त्यांना सार्वजनिक वा अर्ध-सार्वजनिक हेतू डोळ्यापुढे ठेवून वागण्याची आणि, एकमेकापासून अलग करण्याऐवजी एकत्र आणणाऱ्या उद्दिष्टांनी, आचरणाला वळण लावण्याची सवय लागते. या सवयी व शक्ती असल्याखेरीज स्वातंत्र्यावर आधारलेली राज्यघटना राबवता येणार नाही किंवा तिचे संरक्षण करता येणार नाही. ज्या देशात राजकीय स्वातंत्र्याला स्थानिक स्वातंत्र्याचा पुरेसा आधार लाभत नाही तिथे ते तात्पुरत्या स्वरूपातच नांदू शकते, या अनुभवावरूनही ते सिद्ध होते. केवळ स्थानिक स्वरूपाचे जे व्यवहार आहेत ते स्थानिक संस्थांनी चालवावे आणि उद्योगधंद्यातील मोठ्या प्रकल्पांची व्यवस्था ज्यांनी आपण होऊन त्यांच्यासाठी पैसे जमा केले असतील त्या व्यक्तींच्या समूहाने पहावी. या दोन्ही गोष्टींना, प्रस्तुत निबंधामधे विकासाचे व्यक्तिवैशिष्ट्य व

कार्यपद्धतींचे वैचित्र्य यांचे जे फायदे वर्णन केले आहेत त्यांच्यामुळेही, खूप पाठिंबा लाभतो. सरकारी काम सगळीकडे एकाच पद्धतीने घडून येते. व्यक्ती वा ऐच्छिक संघ जी कामे करतात त्यामधे नाना तऱ्हेचे प्रयोग होतात आणि अनुभवांचे वैचित्र्यही अनंत असते. अनेकविध प्रयत्नांतून जो अनुभव निर्माण होईल त्याचा एकत्र साठा करणे आणि तो अनुभव लोकांना कळावा व त्यांच्यामधे तो पसरावा यासाठी खटपट करणे हे काम शासन-संस्था चांगल्या रीतीने करू शकेल. प्रयोग करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला इतरांच्या प्रयोगांचा फायदा मिळेल अशी व्यवस्था करणे हे तिचे कर्तव्य आहे; स्वतःखेरीज इतर कुणीही प्रयोग करू नये असे बंधन घालणे हे तिचे काम नाही.

सरकारी सत्तेमधे निष्कारण अधिक भर पडते हे सरकारी हस्तक्षेप मर्यादित ठेवण्याचे तिसरे आणि सर्वात अधिक महत्त्वाचे कारण आहे. सध्या सरकार जी कामे करीत आहे त्यामधे नवीन कामांची भर घालणे म्हणजे जनतेच्या आशा आणि जनतेच्या मनातील धास्ती यावरील सरकारचे वजन अधिक व्यापक करण्यासारखे आहे. तसेच त्यामुळे जनतेमधील जी कार्यदक्ष व महत्त्वाकांक्षी अशी माणसे असतात त्यांना सरकारच्या किंवा सरकार बनू इच्छिणाऱ्या एखाद्या पक्षाच्या आश्रयावर अवलंबून रहावे लागते. रस्ते, रेल्वे, बँका, इनशुरन्स कंपन्या, मोठ्या संयुक्त भागीदारीच्या संस्था, विश्वविद्यालये, परोपकारी संस्था वगैरे सर्व सरकारी खाती बनली; आणि त्या शिवाय नगरपालिका आणि स्थानिक संस्था, त्यांच्या सर्व व्यवहारासहित, एका मध्यवर्ती शासनाच्या वेगवेगळ्या शाखा बनल्या; या सर्व बहुविध प्रकल्पांचे नोकर, सरकारी नोकर, त्यांच्या नेमणुकी व पगार देणे सरकारमार्फत घडू लागले आणि ते जीवनातील उत्कर्षासाठी सरकारकडे बघू लागले;— हे सर्व झाल्यानंतर, वर्तमानपत्रे स्वतंत्र राहिली व कायदेमंडळे लोकनियुक्त असली तरी देखील, या देशातील काय आणि इतर कोणत्याही देशातील काय स्वातंत्र्य केवळ नाममात्र राहील आणि

शासनाची यंत्रणा जितकी अधिक कार्यक्षम व शास्त्रशुद्ध असेल आणि ती चालविण्यासाठी लागणारी शारीरिक व बौद्धिक कर्तबगारीची उत्कृष्ट माणसे मिळवण्याची पद्धत जितकी निर्दोष असेल त्या प्रमाणात या सर्वंकश सरकारचे अरिष्ट अधिक धोक्याचे ठरेल. इंग्लंडमधे अलिकडे अशी सूचना करण्यात आली आहे की जास्तीत जास्त हुशार व जाणती माणसे सरकारी नोकरीसाठी मिळावी या दृष्टीने त्यांची भरती करावयाची ती स्पर्धा परीक्षेच्या ( competitive examination ) मार्गाने करावी. या सूचनेच्या बाजूने व विरुद्ध पुष्कळ लिहिले गेले आहे. या सूचनेच्या विरोधकांकडून वारंवार घेतला जाणारा एक आक्षेप आहे, तो असा की मोठ्या कर्तबगारीच्या मंडळींना सरकारी नोकरीचे आकर्षण वाटणार नाही, कारण सरकारी नोकरीमधे मिळणारा पैसा व मान याच्या पेक्षा कितीतरी अधिक आकर्षक असे जीवन त्यांना उद्योगधंद्यामधे किंवा सार्वजनिक संस्थांमधे लाभण्यासारखे असते. सूचनेच्या समर्थकांनी तिच्यातील महत्त्वाची अडचण दूर करण्यासाठी म्हणून हा युक्तिवाद वापरला असता तर कुणालाही आश्चर्य वाटले नसते. विरोधकांनी त्याचा उपयोग करावा ही मात्र नवलाची गोष्ट आहे. आक्षेप म्हणून जो घेतला जात आहे तोच एक सुरक्षिततेचा मार्ग ( safety valve ) आहे. देशातील सारी उत्कृष्ट बुद्धीची मंडळी जर सरकारी नोकरीत गुंतून पडणार असतील तर ज्या पद्धतीमुळे ही गोष्ट घडून येईल तिच्याबद्दल अस्वस्थता वाटेल. ज्यांच्यासाठी संघटित विचारविनिमयाची वा विशाल व व्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे असे समाजाचे सर्व व्यवहार जर सरकारच्या हाती राहिले आणि समाजातील वरिष्ठ दर्जाच्या मंडळींनी सरकारी कचेऱ्या भरून गेल्या तर देशातील सारी वर्धिष्णु संस्कृती व कार्यप्रवण बुद्धिमत्ता नोकरशाहीच्या ठिकाणी एकवित होईल. सरकारी नोकरांची संख्या खूप वाढेल आणि त्यांच्या कक्षेबाहेर राहील ते केवळ शुद्ध अध्यात्मचिंतन.

समाजातील इतर वर्गांना सर्व गोष्टींच्यासाठी अवलंबून रहावे लागेल ते नोकरशाहीवर; सर्वसामान्य मंडळी जे जे काही त्यांना करावयाचे असेल त्याबाबतीत मार्गदर्शन व आज्ञा मिळाव्या म्हणून व कर्तबगार आणि महत्त्वाकांक्षी मंडळी वैयक्तिक बढतीसाठी, या नोकरशाहीमधे प्रवेश मिळावा व प्रवेश मिळाल्यानंतर वर चढता यावे हेच सर्वांच्या महत्त्वाकांक्षेचे एकमेव उद्दिष्ट होईल. या राजवटीमधे, प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे, बाहेरील सामान्य जनांना नोकरशाहीच्या कामकाजावर टीका करणे वा त्याला आळा घालणे शक्य होणार नाही. आणि लोकनियुक्त संस्थांच्या नेहमीच्या अगर दडपशाहीच्या कृतीमुळे दैव-वशात् कधीकाळी एखादा सुधारणावादी प्रवृत्तीचा राज्यकर्ता शिखरावर चढला तरी देखील नोकरशाहीच्या हिताला बाधक होतील अशा सुधारणा त्याला अंमलात आणता येणार नाहीत. रशियन साम्राज्यामधे अशी ही दु:खाची परिस्थिती विद्यमान आहे असे त्या साम्राज्याचे जवळून निरीक्षण करण्याची ज्यांना संधी लाभली त्यांच्या वर्णनावरून दृष्टीस पडते. नोकर-शाहीची जी चौकट आहे तिच्यापुढे झारचे देखील काही चालत नाही, नोकरांपैकी कुणालाही तो सैबेरियामधे पाठवू शकतो, पण नोकरशाहीखेरीज अगर तिच्या मर्जीविरुद्ध त्याला राज्य चालविता येणार नाही. त्याच्या हुकुमावर, त्याची अंमलबजावणी करण्याचे टाळून त्यांना नकाराधिकार ( veto ) गाजविता येतो. सुधारणा जिथे अधिक वाढली आहे आणि क्रांतीची भावना जिथे अधिक विद्यमान आहे अशा देशांत, सर्व गोष्टी शासनसंस्थेने कराव्या अशी अगर शासनसंस्थेची परवानगी मिळाल्याखेरीज व तिने एखादी गोष्ट कशी करावी हे दाखवल्या-खेरीज कोणचीही गोष्ट करावयाची नाही अशी सवय लागल्यामुळे, जनता जे जे अनिष्ट घडेल त्याबद्दल साहजिकपणेच शासनसंस्थेला जबाबदार धरते आणि अनिष्ट गोष्टी सहनशक्तीपलिकडे जातात त्यावेळी जनता सरकारविरुद्ध उठते व ज्याला क्रांती म्हणतात ती घडवून आणते.

क्रांतीमधून कुणीतरी पुढे येतो आणि, राष्ट्राची कायदेशीर संमती असो वा नसो, सत्तास्थान बळकावतो व नोकरशाहीला हुकूम देऊ लागतो. त्यानंतर पूर्वी जी अवस्था होती तीच पुन्हा सुरू होते, कारण नोकरशाही बदललेली नसते आणि तिची जागा दुसरा कुणीही घेऊ शकेल अशी परिस्थिती नसते.

ज्यांना स्वतःचे व्यवहार स्वतः चालवण्याची सवय असते अशा ठिकाणी वेगळा प्रकार घडून आलेला दृष्टीस पडतो. फ्रान्समधे समाजाचा एक मोठा भाग लष्करी नोकरीत गुंतलेला असतो; त्यांच्यापैकी अनेक सुभेदाराच्या हुद्यापर्यंत चढलेले असतात; त्यामुळे लोकांचे बंड उद्भवते त्यावेळी नेतृत्व करतील व काय करायचे त्याची योजना आखतील अशी काही मंडळी तरी प्रत्येक बंडात दृष्टीस पडतात. लष्करी व्यवहारांच्या बाबतीत जे फ्रान्समधे दृष्टीस पडते ते अमेरिकेमधे नागरी व्यवहाराच्या प्रत्येक बाबीमधे दिसून येते. सरकार नाही अशी परिस्थिती निर्माण होताच अमेरिकन नागरिक स्वतःच तात्पुरते सरकार बनवतील आणि आपले सार्वजनिक व्यवहार जरूर त्या हुषारीने, शिस्तीने व निश्चयपूर्वक चालवतील. स्वतंत्र लोकांना या तऱ्हेने वागता आले पाहिजे आणि जे लोक या तऱ्हेने वागू शकतील ते नेहमीच स्वतंत्र राहतील. मध्यवर्ती शासनयंत्रणेची सूत्रे हातात घेऊन आपल्यावर हुकमत गाजवण्याचा, एखाद्या व्यक्तीचा अगर गटाचा प्रयत्न ते कधीही यशस्वी होऊ देणार नाहीत. कोणच्याही नोकरशाहीला अशा लोकांना जे पसंत नाही ते करायला किंवा भोगायला लावता येणार नाही. परंतु जिथे नोकरशाहीमार्फतच सारे घडते तिथे नोकरशाहीचा ज्याला खरोखरच विरोध आहे अशी कोणतीही गोष्ट घडून येणार नाही. अशा देशांची राज्यघटना अशी असते की जिच्यामुळे देशातील अनुभव व कार्यशक्ती यांची संघटना इतरांच्यावर अंमल गाजवण्यासाठी व्यवस्थित रीतीने होते. आणि ही संघटना जितकी उत्कृष्ट असेल व समाजातील सर्व वर्गातील, कर्तबगार मंडळींना आपल्यामधे

ओढून घेण्यात आणि त्यांना आपल्याला आवश्यक ते शिक्षण देण्यात ती ज्या प्रमाणात यशस्वी होईल त्या प्रमाणात ती सर्वांना आपले दास बनवू शकेल. या सर्वांमधे नोकरशाहीच्या सभासदांचाही समावेश होतो. सामान्य लोकांना जसे राज्य करणारांचे दास्य पतकरावे लागते, तसेच राज्य करणाऱ्यांना त्यांच्या संघटनेचे व तिच्या शिस्तीचे दास्य पतकरावे लागते. चीनमधे विद्यमान असलेल्या जुलूमशाहीचा गरीबातील गरीब व शेतकरी जसा हस्तक व साधन आहे तसाच तेथील मांडारिन देखील ( तेथील राज्यकर्त्या वर्गातील इसमांना हे अभिधान दिले जाते ). जेझुइट संप्रदाय आपल्या सभासदांचे सामुदायिक महत्त्व व सत्ता वाढवण्यासाठी अस्तित्वात आलेला आहे. पण व्यक्तिशः प्रत्येक जेझुइटला मात्र आपल्या संप्रदायाचा नीचातील नीच दास बनून रहावे लागते.

देशातील सर्व कर्तबगारीचा शासकवर्गामधे समावेश होणे हे आज ना उद्या त्या वर्गाच्या बौद्धिक कार्यशक्तीला व विकासाला मारक ठरते हे देखील विसरून चालणार नाही. इतर पद्धतीप्रमाणे आपले बहुतेक सारे काम निश्चित नियमानुसार करणारी शासकीय पद्धत राबवण्यासाठी एकत्र आलेल्या शासकवर्गामधे नियमानुसार काम करत राहण्याची सुस्त प्रवृत्ती बळावण्याची नेहमीच धास्ती असते. त्या प्रवृत्तीमधे गुंतून पडण्याचा मोह त्यांना सारखा पडत असतो. किंवा कधीमधी घाण्याच्या बैलाच्या वर्तुळा-बाहेर त्यांच्यापैकी जे कोणी पडतील त्यांना त्यांच्याच पैकी एखाद्या पुढारी माणसाला सुचलेल्या अवास्तव कल्पनेमागे धावत जाण्याचा मोह पडतो. ती कल्पना पुष्कळ वेळा नीट तपासलेली देखील नसते. या प्रवृत्ती वरवर परस्परविरोधी आहेत असे वाटते; पण मूलतः त्यांचा एकमेकाशी निकट संबंध आहे. बाहेरून तितक्याच कर्तबगारीच्या मंडळींकडून शासकवर्गावर जागरुकतेने टीका होत राहील त्याचवेळी या उभय प्रवृत्तींना आळा पडेल आणि शासक वर्गाच्या कर्तबगारीचा दर्जा खालावणार नाही. शासन-यंत्रणेच्या व्यतिरिक्त कर्तबगारी वाढवण्याची व तिच्या ठिकाणी मोठाले व्यवहार

करण्यासाठी अचूक निर्णय घेण्याची शक्ती वाढेल असा अनुभव व संधी तिला मिळण्याची साधने समाजामधे अस्तित्वात असणे फार महत्त्वाचे आहे. कुशल आणि कार्यदक्ष असा कार्यकर्त्यांचा गट समाजामधे कायम नांदावयाचा असेल -असा गट की जो सुधारणेच्या नवनवीन कल्पना निर्माण करून त्या अंमलात आणू शकेल - आणि नोकरशाहीची पुस्तकी पंडितामधे अवनती व्हावयाची नसेल, तर मनुष्यजातीच्या शासनासाठी लागणाऱ्या गुणांचा व शक्तीचा ज्या व्यवहारामधे निर्मिती व परिपोष होतो ते सारे व्यवहार शासनयंत्रणा ग्रासून टाकणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे.

सामाजिक कल्याणाच्या आड येणारे अडथळे, समाजाची शक्ती समाजातील सर्वमान्य पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सामुदायिकरित्या वापरून, दूर करणे अवश्य आहे हे खरे. परंतु त्या कृतीमुळे जसे फायदे होतात तशाच मानवी स्वातंत्र्य व विकास यांना अतिशय बाधक अशा काही अनिष्ट प्रवृत्तीही निर्माण होतात. या अनिष्ट प्रवृत्ती फायद्यापेक्षा वरचढ होण्याची मर्यादा निश्चित करणे हा शासनाच्या कार्यातील एक अतिशय अवघड आणि गुंतागुंतीचा प्रश्न आहे. तसेच एकसूत्री सत्ता व बुद्धिमत्ता यांचा फायदा घेणे व त्याचवेळी सामाजिक व्यवहारांचा फार मोठा भाग शासनयंत्रणेत समाविष्ट होणार नाही अशी खबरदारी घेणे हा देखील तितकाच अवघड व गुंतागुंतीचा प्रश्न आहे. मोठ्या प्रमाणात बारीकसारिक गोष्टी ठरविण्याचा हा प्रश्न आहे. या बाबतीत अनेक गोष्टींचा अनेक बाजूने विचार करावा लागेल. निश्चित असा सर्वसाधारण नियम या बाबतीत घालून देणे शक्य नाही. परंतु ज्यामधे सुरक्षितता आहे असे व्यावहारिक तत्त्व, डोळ्यापुढे ठेवावयाचे उद्दिष्ट, अडचण दूर करण्यासाठी आखावयाच्या योजनांच्या परीक्षेसाठी उपयोगात आणावयाचा मानदंड– यांचे वर्णन पुढील शब्दात करता येईल असे मला वाटते : कार्यक्षमतेला बाधा येणार नाही असे सत्तेचे पराकाष्ठेचे विकेंद्रीकरण, माहितीचे शक्य तेवढे केंद्रीकरण,

व केंद्राकडून त्या माहितीचे प्रसरण. अमेरिकेतील न्यू इंग्लंड राज्यामधे आहे त्याप्रमाणे नगरपालिकांच्या कारभारामधे जे व्यवहार संबंधित व्यक्तीकडे सोपवता येत नाहीत त्यांची शक्य तेवढी फाळणी करून एकेक काम वेगवेगळ्या विभागानी निवडलेल्या वेगवेगळ्या अधिकाऱ्याकडे सोपवता येईल. याखेरीज स्थानिक व्यवहाराच्या प्रत्येक शाखेवर मध्यवर्ती सत्तेची देख-रेख असावी आणि अशी देखरेख करणे हा शासनयंत्रणेच्या कार्याचा एक भाग व्हावा. देखरेख करण्याचे हे कार्य ज्या कचेरीकडे सोपविले जाईल त्या कचेरीमधे सर्व विभागातील त्या सार्वजनिक कामाबद्दल जो अनुभव व माहिती प्राप्त होईल ती सारी एकत्रित करण्यात येईल. परदेशामधे तत्सम कामे कशी होतात याबद्दलची माहिती व राज्यशास्त्राच्या तत्त्वानुसार जे घडावयाचे त्याचीही माहिती तिथे गोळा होईल. जे जे काही घडेल त्याची माहिती या मध्यवर्ती कचेरीला कळली पाहिजे आणि एका विभागात जे घडले त्याची माहिती इतरांना पुरवणे हे तिचे प्रमुख कार्य झाले पाहिजे. लहान विभागात जे छोटे मोठे दुराग्रह निर्माण होतात व जो संकुचित दृष्टिकोन वाढतो त्यापासून ही कचेरी मुक्त असेल. तसेच तिचा दर्जा मोठा असेल व निरीक्षणाचे क्षेत्रही व्यापक असेल. या कारणामुळे साहजिकच तिचा सल्ला प्रभावी ठरेल. तरी देखील एक कायमची संस्था म्हणून स्थानिक अधिकाऱ्यांना त्यांच्या मार्गदर्शनासाठी मंजूर झालेल्या कायद्यानुसार काम करायला भाग पाडणे एवढ्यापुरतीच तिची सत्ता मर्यादित असावी असे मला वाटते. ज्या बाबतीत सर्वसामान्य नियमामधे तरतूद नसेल त्या बाबतीत आपल्या विवेक-बुद्धीप्रमाणे वागण्याची स्थानिक अधिकाऱ्यांना मुभा असावी. ज्यांनी त्यांना निवडून दिले त्यांना ते अर्थातच जबाबदार राहतील. नियमांचा भंग झाला तर कायदा त्याबद्दल त्यांना जबाबदार धरील. नियम कायदेमंडळाने करावे. मध्यवर्ती शासनयंत्रणेने फक्त त्यांची अंमलबजावणी होते आहे एवढेच पहावे. नियमांची नीट अंमलबजावणी झाली नाही तर, जरूर पडेल त्याप्रमाणे, कायदा अंमलात आणला जावा म्हणून तिने न्यायालयाची मदत घ्यावी

किंवा स्थानिक अधिकाऱ्यांनी कायद्याच्या तत्त्वानुसार काम केले नाही म्हणून त्यांना काढून टाकावे अशी स्थानिक मतदारांना विनंती करावी. पुअर रेटची (Poor Rate) व्यवस्था पाहणारे जे व्यवस्थापक देशभर आहेत त्यांची पुअर लॉ बोर्ड (Poor Law Board) जी देखरेख ठेवते ती सर्वसाधारणपणे या स्वरूपाची आहे. या मर्यादेपलिकडे बोर्डामार्फतीने जी सत्ता वापरली जाते ती या विवक्षित बाबतीत योग्य व जरूरीची आहे. कारण केवळ स्थानिक जनतेच्याच नव्हे तर सबंध समाजाच्या हिताच्या या बाबतीतील गैरव्यवस्थेची सवय फार दिवसापासून रुळलेली असून ती नष्ट करणे आवश्यक आहे. कारण कोणच्याही स्थानिक विभागाला गैरव्यवस्थेमुळे आपल्या आसमंतात दारिद्र्याचे घरटे निर्माण करण्याचा नैतिक अधिकार नाही. ते घरटे त्या विभागापुरते मर्यादित रहात नाही; ते पसरते आणि त्याच्यामुळे सबंध कामगार वर्गाची नैतिक व शारीरिक अवस्था बिघडते. पुअर लॉ बोर्डच्या जवळ शासकीय नियंत्रणाची व दुय्यम दर्जाचे कायदे करण्याची सत्ता आहे. (परंतु सध्या या प्रश्नाबद्दल जे मत प्रचलित आहे त्यामुळे तिचा फारसा उपयोग केला जात नाही). राष्ट्रीय महत्त्वाच्या मोठ्या बाबीमधे ही सत्ता वापरणे संपूर्णपणे न्यायाचे होईल, परंतु स्थानिक महत्त्वाच्या गोष्टीवर देखरेख ठेवण्यासाठी तिचा उपयोग करणे अत्यंत अनाठायी ठरेल. सर्व विभागांना माहिती व मार्गदर्शन देण्यासाठी स्थापन केलेली मध्यवर्ती संस्था या बाबतीत शासनयंत्रणेच्या सर्व खात्यात अतिशय उपयुक्त ठरेल. वैयक्तिक प्रयत्न व विकास यांच्या आड न येता त्यांना मदत करणारे व प्रोत्साहन देणारे कार्य सरकार करील तेवढे थोडेच आहे. जेव्हा व्यक्तींच्या व स्थानिक संस्थांच्या कार्यशक्तीला व अधिकारांना आवाहन करण्याऐवजी सरकार स्वतःच ती कामे करू लागते तेव्हा अनिष्ट गोष्टीला (mischief) सुरवात होते. ज्या वेळी माहिती व सल्ला देण्याऐवजी आणि क्वचित् प्रसंगी निषेध करण्याऐवजी सरकार त्यांना शृंखलाबद्ध करून काम करावयाला लागते अगर त्यांना

बाजूला सारून त्यांच्याऐवजी स्वतःच ते काम करते त्या वेळी सरकार चुकीच्या मार्गाने जाऊ लागण्याला प्रारंभ होतो. दूरच्या दृष्टीने विचार केला तर असे म्हणता येते की राष्ट्राची महती जर कशावर अवलंबून असेल तर ती राष्ट्रातील व्यक्तींच्या महत्तीवर. शासकीय कौशल्याच्या नावाने किंवा सवयीमुळे व्यवहारातील लहानसहान गोष्टीकडे पाहण्याचे जे कौशल्य निर्माण होते त्याच्या नावाने, जे राष्ट्र व्यक्तींच्या बौद्धिक विकासाकडे व उत्कर्षाकडे दुर्लक्ष करते अथवा जे, राष्ट्रहितकारक कामासाठी का होईना पण आपल्या हातातील दुबळी बाहुली बनावी म्हणून, माणसांची वाढ खुंटवते त्याच्या शेवटी हे लक्षात आल्यावाचून राहणार नाही. की छोट्या माणसा-निशी मोठी कामे कधीही करता येत नाहीत. तसेच त्याच्या हे देखील लक्षात येईल की जी यंत्रणा निर्दोष व्हावी म्हणून त्याने इतर सर्व गोष्टींवर पाणी सोडले ती यंत्रणा शेवटी निकामी ठरते. कारण यंत्रे सुरळितपणे चालावी म्हणून यंत्रणेतील जीवनशक्ती नष्ट केल्यामुळे ती काम देऊ शकत नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय
मुंबई-४०० ०३२.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्रा ९/२
मंत्रालय